(सभापतीस्थानी : मा. उपसभापती)

पृ.शी. : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी. : राज्यपालांच्या अभिभाषणाबददलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

उपसभापती : मा. राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेकरिता आज दि. 17 मार्च 2005 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 12.30 वाजेपर्यन्त म्हणजे अडीच तासांचा वेळ उपलब्ध आहे. या अडीच तासाच्या वेळेमध्ये माननीय सदस्यांना भाषणे करता येतील. प्रस्तावकर्त्यांना 10 मिनिटे व अनुमोदन देणा-या सदस्याना 10 मिनिटे देण्यात येतील. मा. विरोधी पक्षनेत्यांना 30 मिनिटे देण्यात येतील. ज्या माननीय सदस्यांना चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नांवे आपल्या पक्ष प्रतोदांमार्फत माझ्याकडे 10 मिनिटाच्या आत पाठवावीत. नांवे प्राप्त झाल्यानंतर वेळेचे बंधन घालावे की, काय ? याचा विचार करता येईल.

आता माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : अध्यक्ष महाराज मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतें.

" राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानपरिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. "

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय महत्वाच्या बाबींचा उल्लेख केल्यावर सुरुवातीलाच मुंबईच्या विकासाचा खास उल्लेख केलेला आहे. एरव्ही शेवटी शेवटी येणा-या मुंबईला अग्रक्रम दिला आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. भारताच्या या आर्थिक राजधानीला जागतिक दर्जाचे शहर बनविण्याचा सरकारचा मनोदय त्यांनी जाहीर केलेला आहे.

यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये माननीय अर्थमंत्र्यांनी प्रथमच मुंबई शहराचा खास उल्लेख केला आहे आणि भारत सरकारचा देखील मुंबईला जागतिक महत्वाचे तसेच दक्षिण आशियातील आर्थिक महत्वाचे शहर बनविण्याचा मनसुबा असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. महाराष्ट्रात निवडणूकानंतर नवीन सरकार सत्तेवर आल्यावर माननीय पंतप्रधान आणि योजना आयोग यांच्यासमोर मुंबईच्या समस्या, त्यावरच्या उपाययोजना तसेच त्यासाठी लागणारा खर्च यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांच्या प्रेरणेने प्रेझेन्टेशन दिले गेले. त्याचेच फलित म्हणजे केंद्रीय अर्थसंकल्पात मुंबईला मिळालेले स्थान आहे.

राष्ट्रीय पातळीवरच्या आणि राज्य पातळीवरच्या सरकारांमध्ये असलेल्या या समन्वयाचे आणि समविचारांचे मी स्वागत करते. हे शहर नुसत्या भारताचीच नव्हे तर जगाची शान बनेल अशी आशा व्यक्त करते. मुंबईच्या समस्या वाढत आहेत. त्याचे मुख्य कारण म्हणजे मुंबईत रोजीरोटीसाठी येणा-या लोकांचा लोंढा. त्यामुळे नागरी सुखसोईंवर येणारा ताण तसेच पायाभूत सुविधांची आणि साधनांची कमतरता.

पायाभूत सुविधांच्या मुख्य योजना म्हणजे रेल्वेचा पाचवा आणि सहावा कोरीडोर, मेट्रो रेल, बांदरा-नरिमन पॉईन्ट सी लिंक, शिवडी-न्हावा यांना जोडणारा ट्रान्स हार्बर जोडमार्ग. तसेच पूर्व-पश्चिम जोडमार्ग निर्माण करणे. मुंबईतील मुख्य रस्ते म्हणजे पूर्व द्रुतगती महामार्ग, पश्चिम द्रुतगती महामार्ग, एस. व्ही. रोड, यांचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे. मुंबईती वाहतुकीची समस्या लक्षात घेता ट्रक टर्मिनसची आवश्यकता आहे.

(यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी...

मोठया शहरांमध्ये सर्व विभागात ट्रक पार्कींगसाठी ट्रक टर्मिनस उभे करावेत. त्यामध्ये ड्रायव्हर्ससाठी विश्रांतीगृहे बांधावीत. त्यामुळे महसूलात वाढ होईल. वहातुकीतील अडथळे दूर होतील आणि अपघाताचे प्रमाणही कमी होईल. ट्रकप्रमाणेच ऑटोरिक्षांसाठीही टर्मिनसची गरज आहे. सगळीकडे रिक्षांचा सुळसुळाट झालाय त्यांना पार्कींगचीही सोय नाही. त्यामुळे पादचाऱ्यांना रस्त्यांनी चालणेही मुष्किल होत आहे.

मुंबईसाठी अधिक पाणी पुरवठयाच्या आणि मलनिस्सारणाच्या योजनांची आवश्यकता आहे. माननीय राज्यपालांनी महानगरपालिकेच्या मध्य वैतरणा आणि मुंबई मलनिस्सारण प्रकल्प या योजनांच्या प्रस्तावांना सरकारने जागतिक बँकेकडून सहाय्य मिळण्याची शिफारस केली आहे, असा उल्लेख केला आहे. महोदय, आपल्या माध्यमातून माझी अशी विनंती आहे की, सरकारने पण जबाबदारी उचलून महानगरपालिकेला भरघोस आर्थिक सहाय्य करावे. आणि त्यासाठी माननीय अर्थ मंत्री श्री. जयंतराव पाटील यांनी अर्थसंकल्पात याची तरतूद करावी. तसेच या सर्व विकास योजना, त्याला लागणारा कालावधी, त्याचे आर्थिक नियोजन आणि त्याचे इंम्प्लिमेंटेशन या संबंधीचा मास्टर प्लॅन सरकारने लवकर जाहीर करावा अशी मी विनंती करते. एक महत्वाचा मुद्दा असा की, मध्यंतरी एका वृत्तपत्रामध्ये माझ्या असे वाचनात आले की, एम.एस.आर.डी.सी. च्या व्यवस्थापकीय संचालकांनी एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत बांद्रा-नरीमन पॉईंट सी लिंक बांद्रा ते नेपियन्सी रोडपर्यंतच होण्याची घोषणा केली. हे खरे असेल आणि तसा निर्णय झाला असेलतर कृपया त्याचे स्पष्टीकरण सभागृहात मंत्रिमहोदयांनी करावे. तसे नसेल तर अशा तऱ्हेची घोषणाबाजी ज्यामुळे मूळ प्रकल्पाबद्दल संदेह निर्माण होतो असे करण्यापासून संबंधित अधिकारी वर्गाला रोकावे आणि त्यांना ताकीद द्यावी.

आणखी एका मुद्दयाकडे मी वळू इच्छिते. मुंबई शहराबद्दल जशी योजना करण्याचा मानस सरकारने जाहीर केला आहे त्याचप्रमाणे आय.टी आणि कॉल सेंटर यांचा पुणे शहरात खूप विकास व्हायला वाव आहे. पण त्यासाठी आवश्यक आहे नियमित कायम स्वरुपी वीज पुरवठा. आजही पुण्यात वीजेचे भार नियमन आहे, आणि रोज 3 तास विद्युत पुरवठा खंडीत होतो. अशा परिस्थितीत या दोन उद्योगांचा विकास आपण पुण्यात आय.टी. सिटी म्हणून कसा होऊ देणार? आज दक्षिणेकडील राज्ये बंगलोर बरोबरच म्हैसूर आणि मंगलोर तसेच त्रिवेंद्रम, मद्रास, हैद्राबाद यांचा आय.टी. सेंटर्स म्हणून जबरदस्त विकास करीत आहेत. या स्पर्धेत पुणे मागे पडत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी...

त्याकडे लक्ष देऊन विद्युत पुरवठा रस्ते इ. पायाभूत सुविधांची भरभक्कम सोय केल्यास पुण्याला ते वैभव मिळू शकेल. तसेच, मोठया प्रमाणावर रोजगार, नोकऱ्या उपलब्ध होतील. पुण्यातल्या उत्तम प्रतीच्या शैक्षणिक संस्थांमधून बाहेर पडणाऱ्या तरुणांना इतर राज्यांमध्ये स्थलांतर करण्याची गरज पडणार नाही.

आपल्या सरकारच्या उत्तम कार्यक्षमतेचा एक पुरावा म्हणजे इंटरनॅशनल इंस्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट स्वित्झर्लंड या संस्थेने आपल्या राज्याला जागतिक क्रमवारीत 38 वे स्थान दिले आहे. याचा अर्थ जगातले पुंजी निवेशक आपल्या राज्याकडे यायला इच्छुक आहेत. फ्रान्स, दक्षिण कोरीया, इटली यांच्या आपण बरोबरीने आहोत असे हा अहवाल नमूद करतो. तसेच, आपल्या राज्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांमध्ये प्रचंड गुंतवणूक आणि त्यामुळे निर्माण होणारी रोजगाराची संधी यांचे आकडे थक्क करणारे आहेत. राज्य शासनाचे याबाबत अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे.

लघु उद्योजकांच्या एका समस्येचा उल्लेख करते. महाराष्ट्रातील औद्योगिक वसाहतीमधील छोटे छोटे प्लॉट पाडणे प्लॉटींग बंद असल्यामुळे अनेक ठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे नवीन लघु उद्योजकांना संधी मिळत नाही. राज्यातील नवीन छोटया उद्योजकांच्या समस्या सोडवून नवीन उत्पादनाला, उद्योगांना चालना द्यावी आणि बेरोजगारांना संधी उपलब्ध करुन द्यावी. अपुरा विद्युत पुरवठा आणि अपुरे पाणी हे राज्यापुढील दोन जटील प्रश्न आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत मत / अशुद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी . . . .

सभापती महोदय, विजेचा तुटवडा दूर करण्यासाठी 5 वर्षात 5000 मे.वॅ.नवीन वीज निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यात सरकारी आणि खाजगी भांडवलाची उभारणी करण्याचा मानस आहे आणि त्या अंतर्गत निरनिराळया योजनांचा उल्लेख आहे. पण दाभोळ प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्यासंबंधी काहीच उल्लेख नाही. या संबंधात भारत सरकार पुढाकार घेत आहे आणि त्याचा पाठपुरावा महाराष्ट्र शासनान करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, जलनीती हा एक विविध पैलू असलेला विषय आहे. त्यामध्ये प्राधान्यक्रमाने पिण्याचे पाणी, औद्योगिक आणि कृषी पूरक उद्योग, कृषी आणि जलविद्युत आणि शेवटी पर्यावरण आणि करमणूक म्हणजे वॉटर स्पोटर्स् वगैरे अशा क्रमाने पाण्याचा वापर करण्याची जलनीती सरकारने ठरविलेली आहे. या जलनीतीचे खोरेनिहाय नियोजन, जलसंपत्ती प्रकल्पांची कार्यक्षमता वाढविणे, पर्यावरणाचा समतोल राखणे, शेतक-यांच्या पाणी वापर संस्थांकडे सिंचन व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया, त्याचा पुनर्वापर वगैरे गोष्टींकडे विशेष लक्ष पुरविण्याच्या योजना आखण्यात येत आहेत. थोडक्यात अत्यंत शास्त्रीय पध्दतीने पाण्याचे नियोजन, जनसहभाग, याव्दारे पाण्याचा गैरवापर आणि दुरुपयोग टाळून दोषींना शासन करणे अशा अत्यंत उपयुक्त गोष्टींचा यात समावेश आहे. माझ्यादृष्टीने जनसहभाग ही लोकाभिमुख चळवळ असून हीच खरी जल नियोजनाची सर्वात प्रेरक शक्ती होणार आहे आणि त्याचा आर्थिक सहभाग हा फार महत्वाचा घटक आहे. मासल्यादाखल या कार्यक्रमातून 2583 पाझर तलाव दुरुस्त झाले. 24,398 तळयांमधून गाळ उपसला गेला, 72,822 विधन विहिरी पुन्हा वापरात आल्या. 99,000 वनराई बंधारे बांधून झाले. या सर्वांसाठी 340 कोटी रुपयांची लोकवर्गणी खर्ची पडली. आता पुन्हा नद्यांची पात्रे जोडून पाण्याच्या वाटपाची नवी योजना भारत सरकारच्या विचाराधीन असल्याची बातमी परवाच म्हणजे 15 मार्चला आली आहे. जवळजवळ 2 लाख कोटी रुपयांची ही योजना आहे. पण त्यामध्ये महाराष्ट्रातील खो-यांचा उल्लेख असल्याचे मला आढळला नाही. तरी आपल्या सरकारने, महाराष्ट्राच्या खासदारांनी आणि केंद्रामध्ये असलेल्या महाराष्ट्राच्या मंत्री महोदयांनी महाराष्ट्राच्या वाटयाला हा गंगोध येण्यासाठी भगीरथ प्रयत्नांची शर्थ करावी अशी आग्रहाची मी विनंती करते. सभापती महोदय, पिण्याच्या पाण्याच्या शुध्दीकरणाचा प्रश्न हा एक गंभीर विषय आहे.त्यामुळे सरकार या विषयावर अग्रक्रमाने लक्ष देत असून विविध उपाययोजना करीत असल्याचा

. . . .सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी . . . .

उल्लेख केला आहे, ते फार महत्वाचे वाटतात. एकंदरीत दूषित पाण्याच्या प्रश्नाची व्याप्ती निश्चित करण्यासाठी केलेले सर्वेक्षणही महत्वाचे आहे.

सभापती महोदय, शिक्षण हे मनुष्यबळ विकासाचे एक पायाभूत अंग आहे आणि महाराष्ट्र हे शैक्षणिकदृष्टीने प्रगत राज्य आहे. प्राथमिक, माध्यमिक, उच्च आणि तंत्रशिक्षण तसेच वैद्यकीय शिक्षण हया सर्व स्तरांवर आपल्या राज्यातल्या संस्था उत्तम कार्य करीत आहेत. आपले शिक्षक शाळांमध्ये अत्यंत वेळेवर हजर असतात आणि इतर राज्यातल्या शिक्षकांपेक्षा कितीतरी जास्त तास शिकवितात असे जागतिक बँक आणि हॉवर्ड विश्वविद्यालयाने केलेल्या सर्वेक्षणात आढळून आले आहे हे खरोखरच कौतुकास्पद आहे. याचबरोबर शाळांमधील रिक्त पदांच्या प्रश्नाचा उल्लेख करणे आवश्यक आह. ही रिक्त पदे भरणे अनिवार्य आहे आणि त्यासाठी होणारा खर्च अत्यावश्यक आहे. यात काटकसर करणे म्हणजे आपल्याच पायावर धोंडा पाडण्यासारखे आहे. कारण भावी पिढयांचे भवितव्य पर्यायाने आपल्याच राज्याचे भवितव्य अंधारात ढकलण्याचे पातक आपण करता कामा नये. यासाठी सरकारने इतर खर्चात कठोर कपात करावी आणि शिक्षकांच्या भरतीचा मार्ग खुला करुन द्यावा.

सभापती महोदय, माझ्या असे वाचनात आले आहे की, यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये काटकसरीची कठोर पावले उचलून अनेक अनुचित खर्चांना फाटा देण्याची शिफारस राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या पदाधिका-यांनी केली आहे. सरकारने कठोर राजकीय इच्छाशक्ती दाखवून नोकरशाहीच्या विरोधाला न जुमानता याबाबत पुढाकार घ्यावा.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी...

कुपोषणग्रस्त बालकांचे आरोग्य आणि पोषण योजना तसेच 15 आदिवासी जिल्हयात प्रत्येक कुटुंबातील किमान दोन व्यक्तिंना रोजगार देण्याची योजना या स्वागतार्ह योजना आहेत. परंतु त्या राबविण्याची गरज आहे. यासाठी सरकारी यंत्रणेमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याची आवश्यकता आहे.तरच ख-या अर्थाने तळागाळापर्यंत, लाभार्थींपर्यंत या योजना पोहचतील. महाराष्ट्र क र्नाटक सीमाप्रश्नावर माननीय राज्यपाल महोदयांची सकारात्मक भूमिका मनाला भावलेली आहे. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकणी (नामनियुक्त) :माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे अभिनंदन केलेले आहे, स्वागत केलेले आहे. या अभिभाषणाच्या संदर्भात तसेच माननीय सदस्या श्रीमती सुधा ताईंनी मांडलेल्या प्रस्तावाला दुजोरा देत असतांना मी या निमित्ताने माननीय राज्यपाल महोदयांनी जे अभिभाषण केलेले आहे, त्याचे स्वागत करण्यासाठी, या ठिकाणी उभा आहे. सभापती महोदय, सन 1995 ते 1999 या कालावधीमध्ये या राज्यामध्ये युतीचे शासन होते. आपल्याला माहित आहे की, ज्यावेळी 1999 मध्ये लोकशाही आघाडीचे शासन सत्तेवर आले त्यावेळी पहिल्या प्रथम नागपूरच्या अधिवेशनामध्ये या शासनाने एक श्वेतपत्रिका काढली होती. आणि साडेचार ते पाच वर्षाच्या युतीच्या शासनामध्ये या राज्यावर असलेले 50 हजार कोटी रुपयाचे कर्ज आणि तत्कालीन राज्यमंत्र्यांनी वेळोवेळी त्यांच्या भाषणामध्ये व्यक्त केलेली निराशा, असलेली अडचणीची आर्थिक परिस्थिती, कर्मचा-यांचे पगार देण्याच्या संदर्भातील भूमिका अत्यंत नाजूक असल्यामुळे रिझर्व्ह बँकेकडून प्रत्येक वेळी ओव्हरड्राफ्ट काढण्याची परिस्थिती होती, ही संपूर्ण परिस्थिती आपण लक्षात ठेवली पाहिजे.

श्री. नितीन गडकरी :सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून खुलासा करु इच्छितो की, युतीचे सरकार सत्तेवर आले तेव्हा राज्यावर 19 हजार कोटी रुपये कर्ज होते. आणि जेव्हा युतीचे सरकार गेले तेव्हा 39 हजार कोटी रुपयाचे कर्ज होते. युतीच्या शासनाच्या काळात एकदाही ओव्हर ड्राफ्ट काढण्याची वेळ आलेली नव्हती. माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी दोन मुद्दे मांडलेले आहेत. 50 हजार कोटी रुपये कर्ज आणि कर्मचा-यांचे पगार देण्यासाठी शासनाकडे पैसे नव्हते त्यामुळे ओव्हर ड्राफ्ट काढण्याची त्या शासनावर पाळी आली असे म्हटलेले आहे. सभापती महोदय, युती शासनाच्या काळात कधीही ओव्हर ट्राफ्ट काढलेला नव्हता. हे सगळे आता सुरु झालेले आहे. 1 लाख 10 हजार कोटी रुपये तुमच्या काळातील कर्ज आहे. त्या नंतर हे सगळे सुरु झालेले आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, 1999 ला ज्यावेळी लोकशाही आघाडीचे सराकर सत्तेवर आले. लोकशाही आघाडी शासनाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर साडे बावीस ते साडे तेवीस हजार कोटी रुपयाचे महसुली उत्पन्न या ठिकाणी होते. गेल्या पाच वर्षातील या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

राज्यातील आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केला तर गेल्या अर्थसंकल्पात 23500 हजार कोटी रुपयाचे महसुली उत्तपन्न होते ते 39000 हजार कोटी रुपया पर्यंत गेल्याचे अर्थसंकल्पात दाखविण्यात आलेले आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात सरकारचे पुढील वर्षाचे धोरण या संदर्भात बघितले तर या वर्षात साधारणत: 7.1 टक्के इतकी या राज्यातील उत्पन्नात वाढ झालेली आहे. देशामध्ये उद्योगधंद्याच्या संदर्भात आज जी गुंतवणूक होत आहे त्यामध्ये देशामध्ये या राज्यातील गुंतवणूक सर्वाधिक राहिली आहे. मागील वर्षी ऑक्टोबर, 2001 पर्यंत एकूण 11967 इतके नव्या गुंतवणुकीचे प्रस्ताव येऊन 2,85,411 कोटी रुपये गुंतवणुकीचा समावेश झालेला आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरूनाथ कुलकर्णी .....

त्यातून साधारणत: 20 लाख नवीन नोकऱ्या निर्माण करण्याची क्षमता आहे. त्याशिवाय नवीन गुंतवणुकीचे 389 प्रस्ताव आले असून त्यामुळे आणखी 41 हजार तरुणांना नोकऱ्या उपलब्ध होतील असे आशावादी चित्र या अभिभाषणामध्ये दिसून येते. आज राज्यामध्ये सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण वाढलेले आहे. नोकऱ्या उपलब्ध होत नाहीत. म्हणून या राज्यामध्ये नवीन गुंतवणूक यावयास पाहिजे, नवीन उद्योगधंदे निर्माण व्हावयास पाहिजे, बंद पडलेले उद्योगधंदे सुरु व्हावयास पाहिजे आणि बेरोजगारांना, तरुणांना आणि सुशिक्षित बेरोजगारांना काम मिळाले पाहिजे यासंदर्भात सरकारची भूमिका माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये स्पष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे मी या निमित्ताने माननीय राज्यपालांचे अभिनंदन करु इच्छितो. सभापती महोदय, मुंबई शहराच्या विकासाच्या संदर्भात पुष्कळ चर्चा झाली. निरनिराळया लोकांनी, सत्तेवर असलेल्या लोकांनी चर्चा केली. आपल्याला माहीत आहे की, लोकसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने लोकसभेचे तत्कालीन सभापती, जे मुंबईचे आहेत, त्यांनी धारावीच्या विकासासाठी 100 कोटी रुपये आणण्याचे आश्वासन दिले होते. ते पैसे आले नाहीत. 1985 मध्ये ज्यावेळी काँग्रेसची शताब्दी साजरी झाली त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी धारावी झोपडपट्टीच्या विकासासाठी 100 कोटी रुपये दिलेले होते. मुंबईला तेच पहिले आणि शेवटचे पैसे मिळालेले होते. या अभिभाषणामध्ये राज्यपालांनी मुंबईच्या निरनिराळया इन्फ्रॉस्ट्रक्चर डेव्हलपमेंटच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. मुंबई शहर हे महाराष्ट्राची राजधानी आहे, देशाची आर्थिक राजधानी तसेच आंतरराष्ट्रीय शहर आहे हे सर्व ठीक आहे. परंतु या शहराकडे कोणी पाहात नव्हते. आज पहिल्या प्रथम भारत सरकारने मुंबई शहराच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाने जो 36600 कोटी रुपयांचा आराखडा दिला होता त्या आराखड्याला मान्यता देण्याचे काम केलेले आहे आणि या वर्षापासून 1100 कोटी रुपये या मुंबई शहराच्या इन्फ्रॉस्ट्रक्चर डेव्हलपमेंटसाठी दिलेले आहेत. त्याचा उल्लेख या अभिभाषणामध्ये केलेला आहे त्यामुळे मी माननीय राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करतो, त्यांचे आभार मानतो. हे राज्य औद्योगिकदृष्ट्या एक नंबरचे राज्य आहे. या राज्यामध्ये औद्योगिक वाढीचा दर 9 टक्के राहिलेला आहे. ही बाब सुध्दा या अभिभाषणामध्ये नमूद करण्यात आलेली आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

श्री. गुरूनाथ कुलकर्णी .....

सभापती महोदय, वीज निर्मिती हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. एन्रॉन प्रकल्प या ठिकाणी आणला. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. सुधाकरराव नाईक असतील, केंद्रीय मंत्री श्री. शरद पवार असतील, त्यावेळी एन्रॉन प्रकल्प आणण्यामागे जी भूमिका होती त्यामध्ये आज ना उद्या राज्यामध्ये विजेची टंचाई निर्माण होईल त्यामुळे 778 मेगावॅटचा पहिला टप्पा या प्रकल्पाच्या ठिकाणी आणला होता. त्याच्या दर युनिट विजेची किंमत 2 रुपये 40 पैसे ठरलेली होती. परंतु दुर्दैवाने हा एन्रॉन प्रकल्प अरबी समुद्रात बुडविण्यात आला. नंतर तो प्रकल्प अरबी समुद्रातून पुन्हा बाहेर काढण्यात आला. पहिल्या टप्प्याचे 778 मेगावॅट आणि 1300 मेगावॅटचा दुसरा टप्पा असे दोन प्रस्ताव एकत्र करुन 2150 मेगावॅट वीज निर्मिती एन्रॉन प्रकल्पातून होईल असे चित्र या राज्यामध्ये निर्माण करण्यात आले होते. परंतु आज या ठिकाणी एन्रॉन प्रकल्प तसाच पडलेला आहे. त्यातून काहीही वीज निर्मिती होत नाही. आज ना उद्या केंद्र शासन त्या ठिकाणचा प्रकल्प सुरु करील. आज त्या एन्रॉन प्रकल्पामध्ये भारतातील निरनिराळया बँकांची 7500 कोटी रुपयांची गुंतवणूक झालेली आहे. 1995 ते 1999 पर्यन्त आपण त्या ठिकाणी वीज निर्मिती करु शकलो नाही. 1999 ते 2004 पर्यन्त लोकशाही आघाडीच्या शासनाने पारस आणि परळी या दोन ठिकाणी 250 मेगावॅटचे प्रकल्प कार्यान्वित केले आणि 500 मेगावॅट वीज एक वर्षामध्ये या राज्याला उपलब्ध होऊ शकेल.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी..

परंतु आज या राज्यामध्ये विजेचे जे संकट आहे ते दूर करण्यासाठी किमान 5 हजार मेगॅवॅट विजेची आवश्यकता आहे. ती या राज्यामध्ये निर्माण करण्याचे चित्र अभिभाषणातून निर्माण केले आहे. तसा संकल्प सत्ताधारी आणि विरोधी पक्षाने मिळून केला तर ही 5 हजार मे.वॅ.वीज खाजगी माध्यमातून आणि शासकीय प्रकल्पांच्या माध्यमातून निर्माण होऊ शकेल. त्यामुळे आपल्याला विजेची तूट भासत आहे ती दूर होऊन राज्य विजेच्या बाबतीत सरप्लसमध्ये जाईल. ही वाढलेल्या विजेचा वापर राज्यातील उद्योगधंद्यांमध्ये होऊ शकेल. याचा उल्लेख अभिभाषणात केल्यामुळे मी मा.राज्यपालांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी, मा.सदस्य श्री.बी.टी.देशमुख आणि आम्ही काही सदस्य मा.राज्यपाल महोदयांना एका विशिष्ट कामासाठी भेटण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी मा.विरोधी पक्ष नेते आणि मा.सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी राज्यपालांना सांगितले की, आम्ही पाण्याचे पैसे वसुल करु. राज्यशासनाने आतापर्यंत 378 कोटी रुपयांची पाणीपट्टी वसूल केलेली आहे. यावर राज्यपालांनी असे म्हटले की, ही संकल्पना केवळ महाराष्ट्रातच दिसते. आज अनेक राज्यांमध्ये पाणी मोफत मिळाले पाहिजे अशी मागणी तेथील नागरिक करीत असतात. परंतु महाराष्ट्र हे देशामध्ये एकमेव राज्य आहे, येथे हजारो कोटी रुपये पाण्यासाठी खर्च केले जातात, निरनिराळी धरणे बांधली जातात, शेतीला पाणी उपलब्ध करुन दिले जाते आणि लोकांकडून पाणीपट्टीही वसूल केली जाते. याबाबत मा.राज्यपालांनी महाराष्ट्र शासनाचे कौतुक केले आहे. त्यांनी लॅण्ड रेव्हेन्यू टॅक्स राज्यात वसूल जात असल्याबाबतही कौतुक केले. इतर राज्यात जमिनीवर कर नाही किंवा घरावर महसूल कर नाही, पाणीपट्टीचा कर वसूल केला जात नाही ही देशातील इतर राज्याची परिस्थिती आहे. राज्यात पाटबंधारेवर पुष्कळ खर्च केला जातो. त्याच्यातून 13 टक्के इरिगेशन होते. त्याची वसुली पाणीपट्टीच्या माध्यमातून शेतक-यांकडून करण्याचे काम राज्यात चांगल्या प्रकारे होत आहे, त्याचाही उल्लेख राज्यापालांच्या अभिभाषणात असल्याने मी त्यांचे अभिनंदन करतो. सन 2003-2004 साली 50 हजार हेक्टर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी..

जमीन सिंचनाखाली आली होती. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे देशाच्या तुलनेत राज्यात 13 टक्के इरिगेशनखालील जमीन आहे. परंतु राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये 2 लाख हेक्टर जमीन नव्याने सिंचनाखाली येणार आहे असा उल्लेख केला आहे. इतक्या मोठया प्रमाणात शेतक-यांना सिंचनाच्या आणि पाटबंधारेच्या माध्यमातून पाणीपुरवठा झाला तर 2 लाख हेक्टर जमीन पाण्याखाली येईल. त्यामुळे राज्याच्या विकासाच्या प्रमाणात वाढ होईल यात मुळीच शंका नाही. राज्यात संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अभियान शासनाने राबविले आहे. या अभियानाच्या माध्यमातून लोकांच्या सहभागातून 500 कोटी रुपयांची निर्मिती करुन शासनाचे 500 कोटी रुपये वाचविले आहेत. यावर्षामध्ये जलसंधारणाच्या निरनिराळया कार्यक्रमांच्या माध्यमातून राज्यात एकूण 24398 कामे करण्यात आली. यामध्ये पाझर तलावांची निर्मिती केली, तलावांचा गाळ काढण्यात आला, बंधारे बांधले आहेत.

नंतर श्री.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी पुढे सुरु...)

तसेच वनराई आणि कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधले. याचा परिणाम भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत झाली आणि शेतीसाठी पाणी उपलब्ध झाले. जनतेकडून सुमारे 340 कोटी रुपयांचे श्रममूल्य लोक सहभागामधून प्राप्त झाले आहे. या कामांमुळे राज्यातील पाणीटंचाईची समस्या पुष्कळ अंशी कमी झाली आहे. जलसंधारण ही लोक-चळवळ करण्याचा शासनाने निर्धार व्यक्त केलेला असून त्याचा उल्लेख मा. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आल्या बद्दल मी मा. राज्यपालांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आपल्या महाराष्ट्रामध्ये कुपोषणाचा प्रश्न फार गंभीर आहे. या प्रश्नाच्या संदर्भात नागपूरच्या अधिवेशनामध्ये विरोधी पक्षाने सरकारला धारेवर धरले होते आणि तसे करण्यामध्ये काही चूक आहे असे मी मानत नाही. कुपोषणाचा प्रश्न महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर असला तरी हे कुपोषण समूळ काढून टाकण्याचा प्रयत्न शासन सातत्याने करीत आहे. या देशातील एकट्या केरळ राज्यामध्ये हे कुपोषणाचे प्रमाण 10 टक्के आहे. देशाच्या तुलनेत महाराष्ट्रातील कुपोषणाचे प्रमाण 54 टक्के आहे. पूर्वी हे प्रमाण 65 टक्के होते. ते आता खाली आलेले आहे. हे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता असून त्या संदर्भात शासनाने व्यक्त केलेल्या निर्धाराचा उल्लेख अभिभाषणामध्ये करण्यात आलेला आहे, त्याबद्दल मी मा. राज्यपालांचे अभिनंदन करतो.

आपल्या राज्यामध्ये 1972मध्ये रोजगार हमी योजनेचा कायदा करण्यात आला. ज्याच्या हाताला काम नाही त्याला काम देण्यासाठी ही रोजगार हमी योजना सुरु करण्यात आली. या सभागृहाचे तत्कालीन सभापती श्री. वि.स.पागेसाहेब यांचे हा रोजगार हमी योजनेचा कायदा करण्यामध्ये मोठे योगदान आहे. गेली तीन वर्षे महाराष्ट्रामध्ये भयंकर दुष्काळ पडला. त्या दुष्काळाची व्याप्ती खूप मोठी होती. 11 जिल्हे आणि 73 तालुक्यांमध्ये हा दुष्काळ पडला. या दुष्काळाच्या वेळी रोजगार हमीच्या माध्यमातून लोकांना काम उपलब्ध करुन दिले गेले आणि त्यायोगे 1150 कोटी रु.ची ॲसेट निर्माण झाली. आता केन्द्राने देखील आपल्या राज्यातील या रोजगार हमी योजनेची दखल घेऊन संपूर्ण राज्यामध्ये अशा प्रकारची योजना सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तेव्हा याही बाबीचा उल्लेख अभिभाषणामध्ये करण्यात आल्यामुळे मी मा. राज्यपालांचे अभिनंदन करतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी पुढे सुरु...)

आपल्या राज्यातील क्रीडापटुंना प्रोत्साहन, उत्तेजन देण्याच्या संदर्भातील कोणतीही योजना राज्य सरकारकडे नव्हती. म्हणून अशा उत्कृष्ट खेळाडूंसाठी शासकीय व निमशासकीय सेवेतील संवर्ग अ,ब,क, व ड मधील सरळसेवा भरतीने भरल्या जाणा-या पदांपैकी 5 टक्के पदे आरक्षित करण्याच्या निर्णयाचा उल्लेख अभिभाषणामध्ये असल्यामुळे मी मा.राज्यपालांचे अभिनंदन करतो.

प्रयोगिक तत्वावर राज्यातील एक कोटी शेतक-यांना "शेतकरी वैयक्तिक अपघात विमा योजना" शासनाने सुरु केली होती. या योजने अंतर्गत शेतक-याचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबाला 1 लाख रुपये मदत मिळत होती. आता ही "शेतकरी वैयक्तिक अपघात विमा योजना" पुढे कायमस्वरुपी चालू ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतला असून त्याचा उल्लेख अभिभाषणामध्ये करण्यात आलेला आहे, त्याबद्दल मी मा. राज्यपालांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आपले सध्याचे मा.राज्यपाल हे पूर्वी कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री होते. सीमाप्रश्नाच्या संदर्भात त्यांनी त्यावेळी घेतलेली भूमिका ही त्या राज्याचे मुख्यमंत्री या नात्याने घेतलेली होती. आता आपल्या राज्याचे राज्यपाल म्हणून पद स्वीकारल्यानंतर काहींनी शंका-कुशंका निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु आता आपल्या राज्याचे प्रमुख या नात्याने बेळगार-कारवार सीमा प्रश्नाचा जो तंटा सुप्रीम कोर्टात दाखल झालेला आहे त्याचा शेवटपर्यन्त पाठपुरावा करण्याचे अभिवचन त्यांनी आपल्या अभिभाषणामध्ये दिलेले आहे, त्याबद्दल मी मा.राज्यपालांचे अभिनंदन करतो.

...नंतर श्री. गिते.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

माननीय सभापती महोदय, मी एका गोष्टीचा उल्लेख करुन मी माझे भाषण संपविणार आहे. 17 जानेवारी 2005 रोजी बेळगाव येथे महाराष्ट्र एकीकरण समितीच्या वतीने हुतात्मा दिन साजरा केला जातो. या हुतात्मा दिनाच्या कार्यक्रमाला मी उपस्थित होतो. बेळगावच्या चौकामध्ये या कार्यक्रमाच्या अनुषंगाने मोठी जाहीर सभा झाली. त्या सभेत मी प्रमुख वक्ता होतो. प्रमुख वक्ता या नात्याने सीमा प्रश्नाचा महाराष्ट्रातील सर्वपक्षीय लोकांकडून पाठपुरावा केला जाईल अशा प्रकारचे अभिवचन त्या ठिकाणी मी महाराष्ट्रातील जनतेच्या बेळगाव कारवार आणि मराठी भाषीक जे महाराष्ट्रात येऊ इच्छिता त्यांना दिलेले आहे आणि त्याचा उल्लेख माननीय राज्यपालांनी आपल्या अभिषाणात केलेला आहे म्हणून त्यांचे या निमित्ताने मी अभिनंदन करतो आणि या प्रस्तावाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रतुत झाला.

(सुधारणा मांडण्यात आल्या नाहीत.)

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल माननीय श्री.एस.एम.कृष्णा यांनी दिनांक 14 मार्च, 2005 रोजी या वर्षीच्या पहिल्या अधिवेशनात संयुक्त अधिवेशनाला संबोधिताना आधाडी शासनाचे धोरण सभागृहासमोर मांडले आहे. सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांचे संयुक्त सभागृहासमोर होणारे अभिभाषण हे त्यांचे वैयक्तिक भाषण नसते, ते भाषण म्हणजे राज्याचे धोरण मांडण्याचा एक प्रकारे प्रयत्न असतो. लोकशाहीच्या परंपरेमध्ये माननीय राज्यपालांच्या कुठल्याही कृतीला विरोध करणे अपेक्षित नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचा प्रस्ताव शासनातर्फे अभिनंदनासह दोन्ही सभागृहात मांडण्यात येतो. तेंव्हा सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांच्याकडून तो प्रस्ताव एकमताने मंजूर होतो. त्यामुळे महामहीम राज्यपाल महोदयांनी संयुक्त सभागृहासमोर जे अभिभाषण केले आहे त्याबाबत राज्यपाल पदाची प्रतिष्ठा, महिमा, गरिमा अबाधित ठेवून राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दे हे नवीन शासनाचे धोरण असल्यामुळे त्यातील चुकीच्या, राज्यातील जनतेची दिशाभूल करणा-या मुद्यांबाबत विरोधी पक्षनेता या नात्याने माझी भूमिका मांडणे हे कर्तव्य समजतो. जरी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात जे उल्लेख केले गेलेले आहेत त्यावर मी टीका करीत असेल तर टीका राज्य शासनाच्या धोरणावर आहे असे समजावे. कारण माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे शासन करुन देत असते. तेंव्हा शासनाने त्यात जर दिशाभूल करणारी माहिती दिली असेल तर त्यास माननीय राज्यपालांना जबाबदार धरणे योग्य होणार नाही. ती शासनाची जबाबदारी आहे असे मी स्पष्ट रुपाने नमूद करु इच्छितो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद-2 मध्ये माननीय राज्यपाल महोदयांनी सांगितले आहे की," महाराष्ट्राच्या जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी, नवीन शासनाने, सर्वतोपरी कामे करण्यास सुरुवात केली आहे, हे पाहून मला समाधान वाटते," असे म्हटलेले आहे. पहिलेच वाक्य ऐकल्यावर मला आश्चर्याचा धक्का बसला. या ठिकाणी माननीय श्री. आर.आर.पाटील,श्री. हर्षवर्धन पाटील उपस्थित आहेत, आपण सभागृहात काहीही माहिती सांगा, काहीही घोषणा करा, त्या घोषणा पाळा अथवा पाळू नका, काहीही निर्णय घ्या, तुम्हाला सर्व काही चालते. आम्ही माहिती विचारतो, त्यास तुम्ही उत्तर देता ते उत्तर ऐकून आम्ही सभागृहाच्या बाहेर जातो. तुमच्या या दिशाभूल करण्याच्या प्रकारात बिचा-या महामहीम राज्यपालांना कशाला ओढता आहात. कमित कमी त्यांचे भाषण लिहीत असताना तरी अशा प्रकारचे

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

वाक्य कशाला टाकता.श्री. आर.आर.पाटील साहेब हे बरोबर आहे काय ? नैतिकतेचे आचरण करणा-या आपल्या सारख्या व्यक्तीला ते कधीच पटणार नाही. महाराष्ट्राच्या जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी नवीन शासनाने सर्वतोपरी कामे करण्यास सुरुवात केलेली आहे हे पाहून मला समाधान वाटले. सभापती महोदय, कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेसच्या जाहीरनाम्याची प्रत मी सोबत घेऊन आलेलो आहे. दिलेल्या वचना प्रमाणे हे लोक कसे वागत आहेत त्यासंबंधी एकेक मुद्दयाचा परामर्श मी आपल्या समोर मांडणार आहे. सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी सांगितले की, सरकारचे समाधानकारक काम सुरु आहे, सरकारचे आश्वासन पूर्ण करण्याचे काम सुरु आहे. सरकारने पहिले आश्वासन दिले होते की, कापूस एकाधिकार योजना सुरु ठेवावी. ..

यानंतर श्री. उपरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.नितीन गडकरी)

अध्यक्ष महाराज, या राज्यामध्ये कापूस एकाधिकार योजना सुरू आहे काय ? हा सन्माननीय मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांना माझा प्रश्न आहे. तरी यासंदर्भात त्यांनी होय किंवा नाही हे उत्तर द्यायचे आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : ही योजना चालू आहे.

श्री.नितीन गडकरी : महाराष्ट्र कॉटन मोनोपोली ॲक्ट तुम्ही तयार केला तो राज्यामध्ये सध्या अस्तित्वात आहे काय ? अध्यक्ष महाराज, काल सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सांगून टाकले की, जाहीरनाम्यातील जी वचने असतात ती पाच वर्षात पूर्ण करावयाची असतात. त्यामुळे मला खूप आनंद झाला. त्यांचा निर्धार पाहून मला त्यांचे अभिनंदन करावेसे वाटले. या राज्यामध्ये शेतक-यांच्या हिताकरिता पुढील पाच वर्षात 2700 रुपये भाव आम्ही देऊ. याचा अर्थ पुढील पाच वर्षे ही कापूस एकाधिकार योजना आम्ही चालू ठेवू असा आहे. पुढील 5 वर्षात 2700 रुपये भाव आम्ही देऊ हे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. महाराष्ट्रातील एक भूमीपुत्र महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतक-यांकरिता या वर्षी शक्य नाही पण पुढील पाच वर्षात 2700 रुपये भाव देईन असे सांगत आहे याचा मला आनंद वाटतो आणि या करिता कापूस एकाधिकार योजना चालू ठेवणार हे माननीय उप मुख्यमंत्र्यांसारख्या श्रेष्ठ पदावर असणा-या व्यक्तिने सांगितले आहे याबद्दल मी समाधान व्यक्त करतो. कॉटन मोनोपोली ॲक्टच्या संदर्भात अध्यादेश काढण्याचे मान्य करण्यात आले होते. तरी सन्माननीय मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांच्यावर तुम्ही अवलंबून राहू नका. तुम्ही अध्यादेश काढून टाका. या ठिकाणी मी आपल्याला सांगू इच्छितो की, पक्षाला जाहिरनामा असतो पण अपक्षाला जाहिरनामा नाही. तुम्हांला पक्षाचे कुंकू आहे. मला पक्षाचे कुंकू आहे. पण श्री.हर्षवर्धन पाटील हे बिन कुंकवाचे आहेत. त्यामुळे ते कधी तुमच्याकडे तर कधी आमच्याकडे असतात. सहा महिने परळीला तर सहा महिने बारामतीला. त्यांना पक्षाचा जाहीरनामा नाही. तुमचा जाहीरनामा आहे. त्यामुळे तुमची वाट लागली काय आणि नाही लागली काय याचे त्यांना घेणे-देणे काहीही नाही. या कापूस एकाधिकार योजनेच्या संदर्भात काल पासून मी पहात आहे. सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील हे पाच वर्षे आमच्या बरोबर राहिले. आमच्या बरोबर त्यांनी खाल्ले-पिल्ले. त्यांनी आमचे मीठ खाल्ले आणि त्याला ते जागून आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरीसाहेबांचा आदर ठेवून मी सांगतो की,"खाल्ले-पिल्ले, आमचे मीठ खाल्ले" असे ते या ठिकाणी म्हणाले. पण आम्ही त्यांना पाठिंबा दिला म्हणून ते सत्तेवर होते. आम्ही अपक्षांनी त्या काळात आपल्याला पाठिंबा दिला म्हणून आपले सरकार चालले हे आपल्यालाही माहिती आहे. आपण विरोधी पक्षाचे नेते आहात त्यामुळे मी आपला आदर करतो. परंतु कालपासून ब-याच वेळा आपण या ठिकाणी उल्लेख केला. आम्ही अपक्ष म्हणून निवडून आलो आहोत याचा अर्थ असा नाही की, आम्हांला काही तत्वज्ञान नाही. आम्ही अपक्षांनी पाठिंबा दिला म्हणून आपले सरकार मागच्या पाच वर्षामध्ये चालले. आता या सरकारमध्ये आम्ही काम करीत असताना लोकशाही आघाडीचे जे धोरण आहे तेच धोरण निश्चितपणे राबविले जाईल.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी केलेल्या खुलाशाबद्दल मी समाधान व्यक्त करतो. ही गोष्ट खरी आहे की, त्यांनी आम्हांला पाठिंबा दिला म्हणून आमचे सरकार आले. तसेच सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना पाठिंबा दिला म्हणून त्यांचे सरकार आले. त्यावेळी ते आणि आम्ही मिळून मेजवान्या खाल्ल्या. आता ते आणि तुम्ही मिळून मेजवान्या खात आहात. तुम्ही आणि आम्ही बदललो आहोत पण ते कायम आहेत. ते कायम असल्यामुळे राज्य कोणाचेही असले तरी त्यांचे पद अबाधित आहे. परमनंट आहेत. कारण ते अपक्ष आहेत. त्यामुळे त्यांची विचारधारा तुमच्याशी जुळते आणि त्यांची विचारधारा आमच्याशीसुध्दा जुळते. म्हणून सरकार कोणाचेही असो, ज्यांची सत्ता येईल त्यांच्याशी विचार जोडण्यामध्ये त्यांच्या इतकी आपला कोणालाही आपला नाही. हे त्यांचे कसब आहे. जिकडे सरशी तिकडे पारशी अशी एक म्हण आहे. ते दोषी नाहीत. तुमच्या विचारांमुळे, लोकशाही आघाडी सरकारच्या विचारामुळे ते प्रभावित झाले. आमच्याकडे होते त्यावेळी हिंदुत्वाच्या विचारांना ते प्रेरीत झाले होते. त्यांची प्रेरणा दोघांच्याही विचारांना मिळाली आणि दोघांनाही त्यांनी सहकार्य केले. या त्यांच्या वैचारिक भूमिकेबद्दलही मला समाधान आहे. पण त्यांच्या विचारांचा मी सन्मान करतो. त्यामुळे जे त्यांचे विचार आहेत त्याप्रमाणे ते सत्तारुढ पक्षात रहातील. त्या पक्षाच्या विचारांशी आपले विचार जुळवून घेणे असे वागण्याची त्यांची जी कृती आहे तिचा मी आदर करतो.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ...

सभापती महोदय, जाहीरनाम्यामध्ये त्यांनी दुसरे वचन असे दिले होते की," 2700 रुपये क्विंटल हा कापसाला भाव देण्यात येईल. " माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात असे सांगण्यात आले आहे की, " महाराष्ट्राच्या जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी, नवीन शासनाने, सर्वातोपरी काम करण्यास सुरुवात केलेली आहे हे पाहून मला समाधान वाटते." सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर. पाटील आणि सन्माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी शपथ घेतल्यानंतर पहिली कॅबिनेटची बैठक घेतली होती. त्या बैठकीत आपण दोघांनी पहिला निर्णय असा घेतला होता की, "कापसाला 2500 रुपये क्विंटल भाव देऊ व कापसाची खरेदी करु.". परंतु हा निर्णय घेतल्यानंतरसुध्दा कापूस एकाधिकार खरेदीची योजना सुरु करण्याच्या बाबतीत अध्यादेश काढलेला नाही. बाहेरच्या राज्यातून आपल्या राज्यात येणारा कापूस आपण कायदेशीररीत्या थांबवू शकत नाही. कापसाला 2500 रुपये भाव देऊ असे जाहीर केले होते परंतु तो भाव दिला गेला नाही. नांदेड - 44 या कापसाला 2225 रुपये भाव देतो असे सांगितले असतांना प्रत्यक्षात मात्र 1800 रुपये भाव देण्यात आला होता.तेव्हा 2700 रुपये भाव हा कोठे गेला हे आम्हाला कळले नाही.सभापती महोदय,या शासनाने अशी घोषणा केली होती की, विजेचे बिल माफ करु, मोफत वीज देऊ. माजी राज्यपाल माननीय श्री. मुहम्मद फजल यांनी आपल्या अभिभाषणात असे सांगितले होते की," माझ्या सरकारने शेतक-यांची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, त्यांचे हाल लक्षात घेता संपूर्ण शेतक-यांना मोफत वीज देण्याचे धोरण राबविण्याचे ठरविलेले आहे हे सांगतांना मला अतिशय आनंद होत आहे ". माजी राज्यपाल श्री.मुहम्मद फजल यांनी त्यावेळी जे अभिभाषण केले होते त्या अभिभाषणाची प्रत माझ्याकडे आहे.वीज पंप वापरणा-या शेतक-यांना एक जुलै 2004 पासून मोफत वीज दिली जात आहे त्यामुळे दुष्काळात होरपळणा-या शेतक-याला मोठा दिलासा मिळालेला आहे असे माजी राज्यपाल माननीय श्री.मुहम्मद फजल यांच्या अभिभाषणात सांगण्यात आले होते.तेव्हा राज्यपालांनी जाहीर केलेल्या धोरणाच्या बाबतीत काय झाले आहे ?माननीय राज्यपालांनी असे सांगितले होते की, शेतक-यांना मोफत वीज दिली जाईल तेव्हा त्या धोरणाचे काय झाले आहे? या बाबतीत आता खुलासा करण्यात यावा.जे धोरण पाळावयाचे नाही त्यासबंधीचे वाक्य माननीय राज्यपालांच्या तोंडी कशाला टाकता ? सभापती महोदय, मला सांगतांना अतिशय दु:ख होत आहे की, विजेच्या प्रश्नाच्या बाबतीत या शासनाने

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पूर्वी जे आश्वासन दिले होते त्याबाबत आता मेरिटवर चर्चा सुरु आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपली कॅबिनेटची बैठक रात्री झाली की सकाळी झाली होती ? याबाबतीत मी चौकशी केली होती तेव्हा ही बैठक सकाळी झाली होती असे मला समजले होते . त्या बैठकीच्या वेळी तत्कालिन मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे आणि तुम्ही उपस्थित होता. तेव्हा तुमच्या सारख्या निष्णात, अभ्यासू व अनुभवी माणसाने कोणत्याही प्रकारचा विचार न करता निर्णय केला असेल असा आक्षेप मी घेऊ शकत नाही. आपल्या पक्षाचे अध्यक्ष श्री.शरद पवार असे म्हणतात की, या संदर्भात मेरिटवर चर्चा करावी.त्यावेळीसुध्दा त्यांना विचारल्याशिवाय निर्णय केलेला नसेल. त्यांना विचारुनच निर्णय केला असेल.एवढा मोठा निर्णय घेत असतांना त्यांना विचारल्या शिवाय निर्णय घेतला गेला नसेल.शेतक-यांना मोफत वीज देऊ असा कॅबिनेटमध्ये निर्णय घेतला होता तेव्हा त्या निर्णयाचे काय झाले आहे ?त्या धोरणाची आता काय परिस्थिती आहे ?

श्री.आर.आर.पाटील (बसून) : ते धोरण चालू आहे.

श्री.नितीन गडकरी : हे घोरण जर चालू असेल परंतु निवडणुकीच्या वेळी शेतक-यांना शुन्य रकमेची बिले आली होती आणि आता पूर्ण रकमेची बिले आलेली आहेत. . तेव्हा आपण जी घोषणा केली होती त्याचे काय झाले आहे? . मोफत वीज देण्यात येईल अशा प्रकारे आपण जी घोषणा केली होती त्या बाबत आता काय झाले आहे याचा आपण आता खुलासा करावा.त्यानंतर मी दुसरा मुद्दा मांडतो. शेतक-यांना कमी व्याजाच्या दरात सरळ व्याज पध्दतीने कर्ज पुरवठा करुन कर्जावरील व्याज माफ करण्याचा निर्णय कॅबिनेटने घेतला आहे असे जाहीरनाम्यात सांगण्यात आले होते.तेव्हा माननीय उप मुख्यमंत्र्यांना मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, किती शेतक-यांचे किती व्याज आपण माफ केले होते ? विदर्भाचा आणि इतर क्षेत्राचा अनुशेष दूर करण्यासाठी दरवर्षी विशेष तरतूद करु असेही जाहीरनाम्यात सांगण्यात आले होते.एखाद्याला किती मूर्ख बनवावयाचे याला सुध्दा काही मर्यादा असतात..या बाबतीत पॅकेज जाहीर करण्यात आले होते.बजेटमध्ये जी कामे होती ती कामे पॅकेजमध्ये जाहीर करण्यात आली होती आणि पॅकेजच्या नावाने आम्हाला लिफाफे मिळालेले आहेत. बजेटमधील कामाचा जर पॅकेजमध्ये समावेश असेल तर त्यामध्ये नवीन कोणती घोषणा आहे? बजेटमधील मंजूर कामे पूर्ण करणे ही सरकारची जबाबदारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे.बजेटमधील कामे पॅकेजमध्ये टाकावयाची , पॅकेजमध्ये विशेष मदत केली असे म्हणावयाचे आणि मागासलेल्या भागातील भोळया भाबडया व गरीब माणसांचा विश्वासघात करावयाचा हे कोणते धोरण आहे ? .माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात असेही सांगण्यात आले होते की,
" विशेषत: विदर्भाचा आणि इतर क्षेत्राचा आम्ही अनुशेष दूर करु . "

नंतर श्री.कानडे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदय, अनुशेष दूर करण्याच्या संदर्भात मला सांगितले पाहिजे की, गेल्या 4 वर्षामध्ये भूतपूर्व राज्यपाल डॉ.अलेक्झांडर यांनी अनुशेष दूर करण्याच्या संदर्भात सरकारला निर्देश दिले होते. 2002-03 या वर्षाकरिता 15 डिसेंबर 2001 रोजी निर्देश दिले. 20003-2004 करिता 12 मार्च 2003 रोजी निर्देश दिले, 2004-05 या वर्षाकरिता 23 फेब्रुवारी 2004 रोजी निर्देश दिले. या निर्देशाप्रमाणे अनुशेषाची रक्कम सरकारने द्यावयास पाहिजे होती. यासंबंधीचे सर्व हिशेब आणि आकडेवारी माझ्याकडे आहे. प्रत्यक्षामध्ये अनुशेषाची रक्कम न देता राज्यपालांच्या निर्देशाला शासनाने केराची टोपली दाखविली. घटनेच्या कलम 371(2) प्रमाणे आणि 1957 साली केंद्र शासनाने पास केलेल्या कायद्याप्रमाणे राष्ट्रपतींनी दिलेल्या विशेष अधिकाराचा वापर करुन राज्यपालांनी सरकारला जे निदेश दिलेले असतात ते सरकारवर बंधनकारक म्हणजे मँडेटरी असतात. हे निर्देश कॉन्स्टीटयूशनल आहेत. या निर्देशांना सरकारने केराची टोपली दाखविली आहे. आता यावर्षी तरी हे निर्देश सरकार पाळणार आहे काय हा माझा प्रश्न आहे. उपमुख्यमंत्र्यांनी याबाबत उत्तर द्यावे. यावर्षी राज्यपालांनी 25.2.05 रोजी 2005-06 या वर्षाकरिता अनुशेषाबाबत निर्देश दिलेले आहेत. आता तरी राज्यपालांचे निर्देश यावर्षी हे शासन पाळणार आहे काय ? उपमुख्यमंत्री महोदयांना मी आवाहन करतो की त्यांनी याबाबत सभागृहामध्ये उत्तर द्यावे. 25.2.05 रोजी महामहीम राज्यपाल श्री. एस.एम.कृष्णा यांनी दिलेले निर्देश हे सरकार पाळणार आहे काय की पुन्हा राज्यपालांच्या निर्देशांना केराची टोपली दाखविणार आहे याबाबत माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. शासन हे निर्देश पाळणार असेल तर राज्यपालांचा आदर केल्यासारखे होईल आणि हे निर्देश पाळणार नसेल तर अनादर केल्यासारखे होईल्. राज्यपालांचे निर्देश म्हणजे रेकमंडेशन किंवा शिफारस नाही. डायरेक्शन्स् आहेत. कॉन्स्टीटयूशनल आहेत. हे निर्देश शासन पाळणार नसेल तर घटनाबाहय वर्तन केले असे होईल आणि हे सरकार बरखास्त होऊ शकते एवढे गंभीर परिणाम शासनाला भोगावे लागतील. राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल श्रीमती सुधाताई जोशी यांनी आभार प्रदर्शनाचे भाषण केले. अतिशय भोळेभाबडेपणाने त्यांनी भाषण केले. समजून-उमजून केले असे त्या आता म्हणत आहेत. भोळेपणाने भाषण केले यात काही चूक आहे काय ? अभ्यास करुन भाषण केले आहे. मला त्यांच्याबद्दल अतीव आदर आहे. आपले व्यक्तिमत्व

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी

भोळेभाबडे आहे आणि राज्यपालांच्या अभिभाषणाची वाट लावण्याकरिता तुमच्यासारख्या भोळयाभाबडया महिलेवर ही जबाबदारी टाकली आणि राज्यपालांचे अभिनंदन करण्यासाठी भाग पाडले याचे मला अतिशय दु:ख आहे. मा. राज्यपाल महोदयांनी जे निर्देश दिले ते या सभागृहात गेल्या 3 वर्षात पाळण्यात आलेले नाहीत. यावर्षी पाळले नाहीत तर या सरकारला काय म्हणावयाचे ? मी काही चुकीचे बोलत असेन तर तुमची क्षमा मागतो. राज्यपालांच्या निर्देशाला केराची टोपली दाखविणारे हे सरकार आहे. राज्यपालांनी दिलेले आश्वासन पूर्ण न करता सरकार समाधान व्यक्त करीत आहे. त्यापेक्षा घटनेने निर्देश दिलेले असताना त्याचे आम्हांला पालन करता आले नाही याचे दु:ख आहे असे अभिभाषणामध्ये का लिहित नाही ? खेद व्यक्त करावयाला काय हरकत आहे ? यावर्षी तरी निर्देशांचे पालन होणार आहे काय हा महत्वाचा प्रश्न आहे. सभापती महोदय, दुसरी एक गोष्ट याठिकाणी शासनाच्या लक्षात आणून देताना मला अतिशय दु:ख होत आहे. मा. उपमुख्यमंत्री महोदयांना मला दुसरी एक विनंती करावयाची आहे.

यानंतर श्री. सुंबरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गडकरी (पुढे चालू ...

या वर्षी राज्यामध्ये 12034 गावे दुष्काळग्रस्त आहेत आणि त्या गावांमध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे. असे असताना या बाबतीत तुम्ही काय उपाय योजना केली आहे याचा उल्लेख यामध्ये नाही. अध्यक्ष महाराज, या 12034 पैकी 10339 गावे विदर्भातील, 1278 गावे मराठवाड्यातील, 135 गावे कोकणातील आणि 251 गावे उत्तर महाराष्ट्रातील आणि पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील 31 गावे आहेत. या 12034 गावांमध्ये 50 पेक्षा कमी आणेवारी असताना आपण त्या गावांसाठी काय केले आहे ? या गावांसाठी केंद्र सरकारकडे किती मदत मागितली आहे ? दोन वर्षापूर्वी राज्यात या वर्षीपेक्षाही दुष्काळाची तीव्रता कमी असताना देखील आपण केंद्रातील एनडीएचे सरकार असताना त्या सरकारच्या नावाने ओरड करीत होता की, एनडीएचे सरकार महाराष्ट्रावर अन्याय करीत आहे म्हणून. तुमचे नेते श्री.शरद पवार आणि तुम्ही म्हणत होता की, एनडीए मध्ये कोणी शेतकरी नाही, भूमिपुत्र नाही, बाजपेयी आणि अडवाणी ही शेतकऱ्यांची नावे आहेत काय ? पण आता तर तुमच्याकडे सगळे भूमिपुत्र, शेतकरीच बसलेले आहेत मग आपण महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त गावांसाठी काय केले आहे ? मागील वर्षी 5022 गावांमध्ये 50 टक्के पेक्षा कमी आणेवारी होती आणि तत्कालीन केंद्र सरकारने 1500 कोटी पेक्ष जास्त मदत केली होती. मग या वर्षी तर 12 हजार पेक्षा जास्त गावांमध्ये 50 टक्केपेक्षा कमी आणेवारी असताना तुम्ही काय केले आहे ? तुमच्या सरकारने, केंद्रातील भूमिपुत्रांच्या सरकारने काय केले आहे ? अध्यक्ष महाराज, आपण वाटल्यास रेकॉर्ड तपासून घ्यावे, माझ्या माहितीतील एकही शब्द खोटा असेल तर मी माफी मागण्यास तयार आहे. या वर्षीचा दुष्काळ मागील वर्षीच्या दुष्काळापेक्षा अडीच पट मोठा आहे. मागील वर्षी 1022 गावांमध्ये 50 पेक्षा कमी आणेवारी होती तर या वर्षी 12 हजार पेक्षा जास्त गावांमध्ये 50 पेक्षा कमी आणेवारी आहे आणि त्यातील 10,339 गावे ही विदर्भातील आहेत, 1278 गावे मराठवाड्यातील आहेत, 135 गावे कोकणातील आहेत. तेव्हा मागील वर्षीपेक्षा अडीच पट मोठा दुष्काळ असताना या सरकारने काय केले आहे ? अध्यक्ष महाराज, मला हे मान्य आहे की, तुम्ही असा भेद करणे बरोबर नाही. कोणीही कसाही वागला तरी हे भेदाभेद करणे बरोबर नाही. पण मागील वर्षीचा दुष्काळ हा पश्चिम महाराष्ट्रामध्ये होता त्यावेळी तुम्ही सर्व राज्यामध्ये त्याबद्दल आवाज उठविला. पण या वर्षी मोठ्या प्रमाणात विदर्भ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

मराठवाड्यामध्ये दुष्काळ असतानाही तसे काही केल्याचे दिसत नाही. अध्यक्ष महाराज, मला खरे तर या बाबतीत काँग्रेस पक्षाची तरस येते आहे, कींव येते आहे. कारण वीजेचे खाते तुमच्या राष्ट्रवादी पक्षाकडे आहे, पाटबंधारे, गृह खाते या सारखी महत्त्वाची खाती राष्ट्रवादीकडे आहेत आणि केवळ भोळ्या-भाबड्या काँग्रेस पक्षाकडे काय आहे ? म्हणून मला काँग्रेस पक्षाची कींव येते. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपण असाच झपाटा चालू ठेवला तर पुढील काळात, भविष्यात लवकरच तुम्ही या राज्यातून काँग्रेसला मागे टाकाल, संपवून टाकाल याबद्दल माझ्या मनात शंका नाही. ....

श्री. आर.आर.पाटील : अध्यक्ष महाराज, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जी खाती घेतली आहेत ती सर्व खाती यापूर्वी युती शासनात भारतीय जनता पक्षाकडे असलेलीच खाती घेतलेली आहेत. अगदी पंढरपूरच्या एकादशी सह त्यांच्याकडे असलेलीच खाती आम्ही घेतलेली आहेत. तेव्हा यामध्ये जो काही चालूपणा केला असेल तर त्यांचेकडेच आहे.

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, हे बिलकुल खरे आहे की, युती शासनात असताना बीजेपी कडे जी खाती होती तीच आता राष्ट्रवादीकडे आहेत. पण त्यावेळी युती शासनातील शिवसेना आणि बीजेपी मध्ये समन्वय होता. शिवसेना प्रमुख जे सांगतील ते केले जात होते. त्यांच्यामध्ये आणि आमच्यामध्ये काही फरक नव्हता. त्यांनी एक्स्प्रेस हायवे बांधला गेला पाहिजे असे सांगितले आणि आम्ही तो बांधला देखील. पण आता या सरकारातील दोन्ही काँग्रेसमध्ये तसा समन्वय नाही. किंबहुना काँग्रेस पक्षाला कसे लंबे करता येईल हेच पाहिले जात आहे. या बाबतीत मी सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी साहेबांचे कौतुक करतो. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाची तुम्ही वाट लावण्याचे प्रयत्न आपण अगदी चांगल्या प्रकारे चालू ठेवले आहेत. पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळ होता तर त्यासाठी मोठ्या प्रमाणात ओरड करून मदत घेण्यात आली आणि आता राज्यातील 12 हजारच्या वर गावांमध्ये दुष्काळी स्थिती असताना आणि त्यापैकी 10 हजार पेक्षा अधिक गावे विदर्भ आणि मराठवाड्यातील असताना कोणीही काही बोलत नाही. म्हणजे यातून लंबे झालीच तर काँग्रेस होईल. नाही तरी सध्या विदर्भ-मराठवाड्यामध्ये काँग्रेस पक्ष मोठा आहे, तो यामुळे कमी होईल. असो. अध्यक्ष महाराज, मी या निमित्ताने एक गौप्यस्फोट करतो. सन्माननीय मंत्री श्री.सुरूपसिंग नाईक यांना मी सांगेन की, आपण जरूर ही गोष्ट सन्माननीय मुख्यमंत्री

..... एल 3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गडकरी ....

श्री.विलासराव देशमुख यांचेपर्यंत पोहोचवावी. अध्यक्ष महाराज, श्री.हंसराज अहीर, श्री.रामदास आठवले, श्री.कलमाडी यांच्यासह 11 सदस्यांनी लोकसभेमध्ये प्रश्न विचारला ... त्याची लिखित प्रत माझ्याकडे आहे. ...

(यानंतर श्री.जागडे .... एम 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

सभापती महोदय, दि. 14 मार्च 2005 रोजी श्री.लोनाप्पन नम्बाडन, श्री. हंसराज अहिर, श्री जसवंत सिंह बिश्नोई, श्री. एम. शिवन्ना, श्री कैलाश मेघवाल, श्री. महावीर भगोरा, श्री. सुखबीर सिंह बादल, श्री. सुरेश कलमाडी, श्री.रामदास आठवले, श्री अनंत कुमार, श्री थावरचंद गेहलोत हया 11 सदस्यांनी लोकसभेत श्री. शरद पवार यांना एक प्रश्न विचारला आहे. त्याचा हा पुरावा आहे. प्रश्न असा विचारला आहे की,

" क्या महाराष्ट्र सरकार ने महाराष्ट्र के कई जिलों में सूखे की गंभीर स्थिति को ध्यान में रखते हुए राहत और बचाव उपायों के लिए धनराशि के आबंटन का आग्रह किया है, यदि हां, तो क्या राजस्थान, आंध्र प्रदेश, गुजरात, जम्मू और कश्मीर, हिमाचल प्रदेश, केरल, कर्नाटक और पंजाब जैसे अन्य सूखा प्रभावित राज्यों ने भी ऐसी ही मांगें की है ?

इस प्रश्न के जवाब में कृषि मंत्री श्री शरद पवार ने कहा कि -" महाराष्ट्र सरकार से 2004-05 में पड़े सूखे के लिए केंद्रीय सहायता के लिए कोई अनुरोध प्राप्त नहीं हुआ है."

सभापती महोदय, जेव्हा पश्चिम महाराष्ट्रात 5022 गावात दुष्काळ पडला होता, त्यावेळी माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख, श्री. नितीन गडकरी, श्री. नारायण राणे, श्री. गोपीनाथ मुंडे, श्री. आर. आर. पाटील, मा. पंतप्रधानांना भेटावयाला गेले होते. आता दुष्काळ पडलेल्या गावांना मदत ही केलीच पाहिजे. परंतु आता विदर्भातील 12034 गावात दुष्काळ पडला आहे, या ठिकाणी 50 टक्केपेक्षा कमी आणेवारी आहे. विदर्भात 550 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. मागच्या दुष्काळाच्या तुलनेत या वर्षी अडीच पट दुष्काळ पडला आहे. एवढा मोठा भयानक दुष्काळ पडलेला असताना या राज्य सरकारने केंद्र सरकारकडे एक फुटकी कवडीही मागितलेली नाही. याचा पुरावाच माझ्याकडे आहे. आता सांगा मराठवाड्यातील मुख्यमंत्र्यांना की, हे राज्य तुमचे नाही. आपण संपणार आहांत. पुढील वेळी विधानसभेत आपण येणार नाही. श्री. शरद पवार तसेच श्री. आर. आर. पाटील यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन इ ाल्याशिवाय राहणार नाही. आज अडीच पट दुष्काळाची परिस्थिती असताना संवदेनशील मंत्री श्री.आर.आर. पाटील यांनी उत्तर दिले पाहिजे. मी कालही असे बोललो होतो की, श्री. आर. आर.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

पाटील यांच्या इच्छेवर मी डाऊट घेत नाही. परंतु आता या प्रश्नाबाबत मला उत्तर द्या. कोठे गेली आपली संवेदनशीलता ? 550 शेतक-यांनी आज आत्महत्या केल्या आहेत. वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशिम, बुलढाणा येथील शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. आता आंध्र प्रदेश म्हणजेच कापूस पिकविणा-या भागातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. मा. मंत्रिमहोदयांनी घोषणा केली आहे की, या बाबतचा रिपोर्ट आल्यानंतर ताबडतोब दुष्काळ जाहीर करण्यात येईल. त्यांनी असेही सांगितले आहे की, आम्ही सर्व ठिकाणी रोजगार हमी योजनेची कामे सुरु केली आहेत. ज्या दिवशी 50 टक्के पेक्षा कमी आणेवारी येते त्यावेळी एक सरकारी पत्रक काढले जाते आणि ते पत्रक आता माझ्याकडे आहे. 15 फेब्रुवारी 2005 रोजी शासनाने जे पत्रक काढले आहे, ते माझ्याकडे आहे. महाराष्ट्र राज्याची खरीप गावातील 2004-2005 ची अंतिम पैसेवारी जाहीर झाली असून त्यानुसार राज्यातील 12034 गावातील पीक पैसेवारी ही 50 पैसे पेक्षा कमी असल्याचे दिसून आले आहे. जिल्हावार माहितीचे " अ " पत्रक सोबत जोडले आहे. या पत्रकात असे म्हंटले आहे की, शासन 12034 गावात टंचाई परिस्थिती जाहीर करीत आहे. शासन निर्णय क्र. एससीवाय / 1204 / प्र .क्र. 16 / 7 / मंत्रालय, मुंबई, दि. 15.2.2005. 12034 गावात शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अनुज्ञेय सवलती जिल्हाधिका-यांनी देण्याची व्यवस्था करावी. एससी 4 / प्र. क्र. 198 / 7 दिनांक 8 डिसेंबर 2005 रोजी काढलेले आदेश खरीप गावापुरते सुधारीत होतील, अशा प्रकारचे आदेश काढण्यात आले आहेत.

(यानंतर श्री. सरफरे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

हे आदेश वित्त विभागाच्या संमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ प्र. क्र.92/5 व्यय(9), दिनांक 27 जानेवारी 2005 रोजी निर्गमित करण्यात येत आहेत. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने श्री. प्रकाश गोसावी, अवर सचिव यांची सही आहे. राज्यात अडीच पट दुष्काळ असतांना, केंद्र सरकारकडे तुमच्या पक्षाचे अध्यक्ष माननीय श्री. शरद पवार हे कृषि मंत्री असतांना तुम्ही फुटकी कवडी देखील मागितली नाही. कां मागितली नाही? तुम्ही 5022 गावांकरिता त्यावेळी 5 हजार कोटींची मागणी केली होती. त्यावेळी आपण सांगितले की, एनडीए सरकार हे महाराष्ट्राच्या विरोधी आहे. तुम्ही केंद्र सरकार पैसे देत नाही म्हणून आमच्या नावाने कोल्हापूर, सातारा व सांगली जिल्हयात डमरु वाजवीत फिरले. महाराष्ट्रात तुमचे राज्य व दिल्लीमध्येही तुमचे राज्य आहे, माननीय प्रधानमंत्रीही कॉग्रेसचे, कृषिमंत्री राष्ट्रवादी कॉग्रेसचे आहेत. आदरणीय श्री. पवार साहेब हे कृषिमंत्री व तुम्ही उप मुख्यमंत्री, विलासराव मुख्यमंत्री आहेत आणि राज्यात दुष्काळाची स्थिती आहे. तुम्ही दुष्काळी गावे जाहीर करता. मग आमच्याकरिता केंद्र सरकारकडे मदत कां मागितली नाही? मागील वर्षीपेक्षा अडीच पट दुष्काळ असतांना तुमचे हे कशाचे द्योतक आहे? आपण जर असे केले तर महाराष्ट्र कसा एक राहील? या परिस्थितीत महाराष्ट्र एक राहिला पाहिजे असे आपण म्हणतो. तुम्हाला साधी सवडही मिळाली नाही. आम्ही केंद्र सरकारकडे यायला तयार आहोत अशी आम्ही मागणी केली होती व सभागृहातही सांगितले होते. आम्ही विरोधी पक्षाचे सहकार्य घेऊन वेळ पडलीतर केंद्र सरकारकडे जाऊ हे सांगण्यास आपल्याला कसे सुचले नाही? आणि देशाच्या सार्वभौम लोकसभेमध्ये राज्याचे भूषण असणारे, ज्यांचे तुम्ही शेतकऱ्यांचा मसिहा म्हणून कौतुक करता ते आदरणीय श्री. शरद पवार साहेब कृषि मंत्री असतांना तुमच्या धोरणाचा लोकसभेत ते पर्दाफाश करतात की, महाराष्ट्र सरकारने अजून पर्यंत एकाही पैशाची मदत मागितली नाही. विदर्भ, मराठवाडा व कोकणाने काय करायचे? ज्यांच्या गावात दुष्काळ पडला आहे त्यांचा समावेश पश्चिम महाराष्ट्रात होत नाही हा त्यांचा गुन्हा आहे काय? विदर्भातील आमचे मंत्री बिच्चारे साधे आहेत. त्यांच्या हातात फायनान्स नाही. बिच्चारे लाल दिव्याच्या गाडीतून फिरतात. पेट्रोल पंपवाला त्यांच्या गाडीला पेट्रोल देखील देत नाही. गाडया उभ्या राहिल्यानंतर पेट्रोल पंपवाला बाहेर जा म्हणून सांगतो. तो सांगतो लाल दिव्याची गाडी आहे, पेट्रोल टाकले तर त्याचे पैसे मिळत नाही. ही त्यांची हालत आहे. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराजांचे नाव घेतात ते माननीय राज्यमंत्री श्री. दयानंद मस्के साहेब यांना आपण एक बंगला देखील देत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

नाही. त्यांना तो जबरदस्तीने घ्यावा लागतो. त्यांच्या मतांचा आपण वेळोवेळी उपयोग करुन घेता. ते म्हणतात गडकरी साहेब, माझ्याकडे काहीच काम नाही. मी असाच बसलो आहे. माझ्याकडे फाईल येत नाहीत. त्यांच्याकडे बदल्यांची कामे येत नाहीत, कुणाचेही दर्शन होत नाही. त्यांना देण्यात आलेली गाडी सुध्दा मलबार हिलच्या रस्त्यावर सारखी बिघडते. मा.श्री. कवाडे साहेब जशी विदर्भ, मराठवाडा कोकण यांची स्थिती आहे तशीच आपली स्थिती आहे हे आपण लक्षात ठेवा. हे फक्त युज आणि थ्रो वाले आहेत, तुम्हाला पाडणारे हेच, सुलेखाताईंना पाडणारे हेच, गवईंना पाडणारेही हेच , आंबेडकरांना पाडणारे हेच, लक्ष्मणराव ढोबळेना पाडणारे हेच, उज्वला शिंदेना पाडणारे हेच, बाबासाहेब आंबेडकरांना भंडारा लोकसभा मतदारसंघामध्ये पाडणारे हेच. आणि पुन्हा त्यांच्या नावाने मते मागणारे हेच. आणि त्यांच्या मागे फिरणारे देखील तुम्हीच . आणि मग पुन्हा विदर्भ मराठवाडयातील दलित समाजाची वाट चालूच आहे. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये सामाजिक न्याय वगैरे... चालूच आहे. काय चालले आहे? माझे शब्द कदाचित कठोर असतील. मी आपली क्षमा मागतो. मी पुढील अधिवेशनामध्ये विरोधी पक्ष नेता रहाणार नाही. मी एक नेहमी काळजी घेतो. माझी जर चूक झाली असेल तर मी क्षमा मागतो. मी नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवली की, विरोधी पक्षामध्ये बोलत असतांना कठोर टीका केली पाहिजे परंतु जखम होता कामा नये. मार लागला पाहिजे परंतु जखम होता कामा नये. आणि माझ्या बोलण्याने कुणावरही डायरेक्ट, इनडायरेक्ट जखम होत असेल तर हात जोडून मी त्याची क्षमा मागतो. परंतु विरोधी पक्ष नेता म्हणून महाराष्ट्राच्या जनतेसमोर सत्य मांडले नाही तर मी माझ्या कर्तव्याचे पालन केले नाही असे होईल. सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या भाषणामध्ये आम्हाला दिलासा दिला की, महाराष्ट्राचा विकास होईल, सर्व आश्वासने पूर्ण होतील.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

सभापती महोदय, दुष्काळाच्या प्रश्नावर आमचा विश्वासघात झाला आहे. मी आपल्याला विनंती करतो की, सभागृहामध्ये या प्रश्नावर विशेश चर्चा करण्यासाठी आम्हाला परवानगी द्यावी. अनुशेषाच्या बाबतीत तर केराची टोपली दाखविलेलीच आहे. आता मागच्या वेळी 22 फेब्रुवारीला दिलेले आदेश तरी पाळणार आहात की नाही ? ते सांगा. तेही आदेश पाळणार नाहीत, त्याबाबतीत बजेटमध्ये काही येणार नाही . माननीय राज्यपालांचे निदेश टेबलवर ठेवा सांगितले तर ते देत नाहीत, कॉन्फडेन्शिअल आहे असे सांगतात आणि ते आदेश नाहीत आणि आमच्या भागात दुष्काळ असताना, 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असताना आम्हाला मदत मिळत नाही आणि केंद्र शासनाकडे देखील कोणतीही मदत मागत नाहीत. आता यावर मी काय बोलणार ते तुम्हीच सांगावे. मी आता इरिगेशनवर तसेच कायदा आणि सुव्यवस्थेवर काय बोलणार ? आर.आर.पाटीलसाहेब, आचारसंहिता तयार करा. भ्रष्टाचार करावयाचा असेल तर त्याची शिस्त पाळा. त्याची एक आचारसंहिता तयार करा की, जे गृह राज्यमंत्री असतील, त्यांनी लेडीज बारमध्ये जाऊ नये. तेथे नृत्य सुरु असताना गल्ल्यावर जाऊन पैसे मागू नयेत, मागावयाचे असतील तर ते बंगल्यामध्ये स्विकारावेत. शक्यतो रात्रीच्या वेळी स्विकारावेत आणि मिळालेले पैसे वापस करु नयेत. तीन लाख रुपये मिळाले, त्यातील 1 लाख 75 हजार रुपये वापस केले. हे काय आहे ? हे बरोबर आहे का ? भ्रष्टाचाराच्या बद्दलची आचारसंहिता तयार करा. मंत्र्यांना मार्गदर्शक तत्वे द्या आणि या लोकशाही आघाडीच्या सरकारला सांगा की, शक्यतो पैसे घरीच स्विकारावेत, बेडरुम मध्ये स्विकारावेत, सकाळच्यावेळी स्विकारावेत. मंत्रालयात भेटावयास येणा-या लोकांकडून, तसेच बदल्या किंवा इतर बाबींसाठी आलेले पैसे डायरेक्ट मंत्रालयात स्विकारु नयेत. पण एक गोष्ट चांगली आहे, ते मी आता वाचून दाखवतो. कोणत्या मंत्र्याकडे कोणता एजंट पूर्णवेळ आहे आणि तो कशी वसूली करतो याची नावे माझ्याकडे आहेत. एका एजन्टच्या बाबतीत काय गडबड झाली ? तर त्याचे दहा टक्के कमिशन मंत्र्यांनी दिले नाही म्हणून त्याने माझ्याकडे यादीच आणून दिली की, गेल्या सहा महिन्यात कुठे-कुठे वसूली केली आणि त्याचे ॲफीडेव्हीट केले. सभापती महोदय, मी येथे काय मांडू ? बार असोसिएशनचे श्री.मनजितसिंग सेठी यांनी माझ्याकडे काल यादी दिली सभापती महोदय, मला येथे बोलावयास संकोच होतो, मी सभागृहात बोलू शकत नाही. हे काय आहे ? एक राज्यमंत्री होते, ते पेट्रोलपंपावर जाऊन उभे रहावयाचे आणि सांगावयाचे की, पैसे

. . . .ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

द्या. अरेरे, असे करु नका. खाण्याचे देखील स्टॅण्डर्ड मेन्टेन करा. त्यातही काही नीतीमत्ता ठेवा. आर.आर.पाटीलसाहेब, तुमच्याबद्दल मला आदर आहे. तुमच्याबद्दल मी बोलत नाही. पण तुमचे हे जे ज्युनिअर सहकारी आहेत, तुम्हाला जरी पटत नसले तरी त्यांना शिकवा. त्यांचे प्रशिक्षण शिबीर घ्या आणि हे शिबीर एकटया राष्ट्रवादीचे नाही तर संयुक्त मंत्र्यांचे शिबीर घ्या.

डॉ.अशोक मोडक(खाली बसून) : गुरुनाथ कुलकर्णी असे म्हणत आहेत की, आर.आर.पाटीलच त्यांच्याकडून शिकतील.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या सरकारने याबाबतीत नवीन आचारसंहिता तयार करावी अशी विनंती करतो. माझ्याजवळ त्यांचे ॲफीडेव्हीट आहे आणि कोणत्या मंत्र्यांनी किती ? वगैरे सर्व यादी आहे. पुढे कधीतरी आर. आर. पाटील साहेबांना वाचून दाखवेन. आता एकाच दिवशी एवढे सगळे बोलणे बरोबर नाही. सभापती महोदय, या महाराष्ट्राला वाचवा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराजांचा हा महाराष्ट्र आहे. या महाराष्ट्राला लुटमारी करणा-या या टोळीपासून वाचवा आर.आर.पाटीलसाहेब.

(सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी खाली बसून काही बोलतात.)

गवळीसाहेबही निवडून येतात ना. मी त्याबाबत दोष देत नाही. पण सुधाताईसारख्या भोळया लोकांची मला चिंता आहे. विलासरावांसारख्या भोळया लोकांची चिंता आहे. विलासरावांबद्दल मला आदर आहे. त्यांची तुम्ही कशी केविलवाणी स्थिती करीत आहात हे आम्ही पहात आहोत.

श्रीमती सुधा जोशी(खाली बसून) : तेही भोळे आहेत.

श्री.नितीन गडकरी : ते खरोखर भोळे आहेत. तुम्हीही भोळया आणि तुमचे नेतेही भोळे म्हणूनच तुमच्या छातीवर हे बसलेले आहेत. या निमित्ताने माझी या शासनाला एकच विनंती आहे की, कमीतकमी माननीय राज्यपालांना तरी चुकीचे बोलावयास लावू नका. मेहेरबानी करुन, जे तुम्ही पाळत नाही, ती वाक्य त्यांच्या तोंडी टाकू नका. तुमचे काय व्हावयाचे असेल ते होईल. पण त्या बिचा-या माननीय राज्यपालमहोदयांना कशाला बदनाम करता ? कशाला त्यांच्या तोंडी ही वाक्ये टाकता ? सभापती महोदय, मी जे मुद्दे उपस्थित केले आहेत, ते पुराव्यानिशी सांगितलेले आहेत. त्याची बरोबर पुराव्यासहित उत्तरे त्यांनी द्यावीत. त्यांचा जाहीरनामा माझ्याजवळ आहे, त्यातील पुष्कळसे मुद्दे अभिभाषणामध्ये तुम्ही मांडलेलेच नाहीत. दुष्काळाच्या बाबतीत, अनुशेषाच्या

. . . .ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

निर्देशांच्या बाबतीत माझ्याकडे सगळे पुरावे आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत सांगावयाचे तर बारवाईज, व्यक्तीवाईज, तारीखवाईज,मोबाईल नंबरवाईज विस्तृत माहितीही मी त्यांना जरुर देईन.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

याबाबतीत त्यांनी काळजी घेऊन, चर्चा करुन भ्रष्टाचार कसा करावयाचा याबाबतीतील मार्गदर्शक तत्वे लोकशाही आघाडी सरकारमध्ये मंत्र्यांना घालून द्यावीत, जेणेकरुन सरकारची बदनामी होणार नाही, कमीत कमी जी इज्जत आहे ती कायम राहील, याची काळजी घ्यावी. एवढे दोन शब्द बोलतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी**)

श्री. मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सन्माननीय उपसभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल श्री. एस.एम.कृष्णा यांच्या अभिभाषणाबद्दलचा अभिनंदनाचा प्रस्ताव, आभार प्रदर्शनाचा प्रस्तव या सदनामध्ये मांडला गेला आहे. आणि त्यावर काही सन्माननीय सदस्यानी आपापले विचार देखील मांडलेले आहेत. अर्थात सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी या अभिनंदनाच्या प्रस्तावावर बोलत असतांना माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचे समर्थन केलेले आहे. म्हणून आता विरोधी पक्षातर्फे या संपूर्ण भाषणाचा थोडासा उल्लेख करण्याची आवश्यकता आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील क्रमांक 2 च्या मुद्दामधील पहिले वाक्य वाचून मला आश्चर्य वाटले. त्यांचे सरकार जे हे अभिभाषण तयार करुन बिचा-या राज्यपालांच्या हातात देतात. त्यांनी त्यांचे भाषण पूर्ण वाचून झाल्या नंतर कदाचित यावर विचार केला असेल. आणि आताही ते विचार करतील की, शासनाने काय लिहून दिले आणि आपण कुठले भाषण वाचले आणि त्याचे पडसाद येथे काय उमटत हे त्यांच्यापर्यंत जाऊन पोहचतील अशी अपेक्षा केली तर चुकीचे ठरणार नाही. मुद्दा क्रमांक 2 मध्ये असे म्हटले आहे की,"महाराष्ट्राच्या जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी, नवीन शासनाने, सर्वतोपरी काम करण्यास सुरुवात केली आहे," परंतु या शासनाने त्या सगळया आश्वासनांना पूर्णपणे फाटा देऊन काम करण्यास सुरुवात केली आहे. आणि माननीय राज्यपाल म्हणतात की, आश्वासने पाळण्याची कृती शासनाने सुरु केली आहे. सभापती महोदया, हा केवढा मोठा विरोधाभास आहे. हे कशासाठी? खरे म्हणजे सन्माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात आमची अशी अपेक्षा आहे आणि आजपर्यंत येथे माननीय राज्यपालांनी जी अभिभषणे वाचली आणि केंद्र शासनामध्ये माननीय राष्ट्रपतींच्या अभिभाषणात सुध्दा शासनाचा संपूर्ण वर्षाचा कार्यक्रम कशा पध्दतीने राहणार आहे यावरील मार्गदर्शन असते. एवढेच नाही तर त्या व्यतिरिक्त माननीय राष्ट्रपतींच्या मनामध्ये जे काही उद्देश आहेत त्याचे सुध्दा दिग्दर्शन राष्ट्रपतींच्या भाषणामध्ये दिसते. आमच्या महाराष्ट्रात आता जे राज्यपाल आलेले आहेत ते एका जमान्यात कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री सुध्दा होते. त्यामुळे राज्य कशा पध्दतीने चालते. राज्यपालांचे अभिभाषण कशा पध्दतीने तयार केले जाते, याची त्यांना कल्पना नाही, असे कोणी म्हटले तर ती अतिशयोक्ती होईल. निश्चितच त्यांना या सगळया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

गोष्टीची कल्पना आहे. तरी पण त्यांनी आपल्या भाषणची सुरुवात अशी केली, त्याबद्दल मला खूप-खूप आश्चर्य वाटते. मुद्दा क्रमांक 4 मध्ये असे म्हटले आहे की,"सर्वात जबर तडाखा बसलेल्या अंदामान व निकोबार बेटांवर, मदतकार्यासाठी मनुष्यबळ पाठविले आहे." कां? त्यांच्याकडे मनुष्यबळ कमी होते? मनुष्यबळ पाठविले असे म्हणण्यापेक्षा किती आर्थिक मदत केली आणि त्या आर्थिक मदतीच्या माध्यमातून त्यांना कसा दिलासा दिला आणि त्यांच्याबरोबर मनुष्यबळ किती पाठविले होते याचा उल्लेख आला असता तर त्याचे जास्त स्वागत करता आले असते. केवळ मनुष्यबळाचा उल्लेख करुन अभिभाषणात काय औचित्य साधले आहे, हे मला सांगता येणे कठीण आहे. मुद्दा क्रमांक 6 तपासून पाहिला तर त्यामध्ये सन्माननीय राज्यपाल असे म्हणतात की, "भारत सरकारने मुंबईच्या विकासाची निकड ओळखून, राज्याने सादर केलेल्या 36,600 कोटी रुपये खर्चाच्या महत्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांबाबतचा विशेष उल्लेख सन 2005-2006 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात केला आहे." काय केले आहे? केवळ तरतुदीचे वर्णन केले आहे. फक्त उल्लेख केला आहे. प्रत्यक्षात आपल्या महाराष्ट्र राज्याला आर्थिक मदत किती दिली याचा उल्लेख करण्याची आवश्यकता आहे. नुसत्या शब्दाने माणसांचे पोट भरु शकत नाही. चांगले शब्द पेरुन महाराष्ट्र राज्याचे कल्याण होऊ शकत नाही. केवळ सदिच्छा देऊन महाराष्ट्र राज्य खूप मोठी प्रगती करील ही शक्यता नाही.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

महाराष्ट्र राज्यामध्ये दुष्काळ पडतो, महाराष्ट्र राज्यामध्ये अनेक प्रकारची संकटे आली, नक्षलवाद्यांचे एवढे मोठे आव्हान महाराष्ट्र राज्यामध्ये आहे तसेच गुन्हेगारीची प्रवृत्ती महाराष्ट्र राज्यामध्ये जोरात वाढत चाललेली आहे. महाराष्ट्र राज्य हे संपूर्ण देशामध्ये क्रमांक एकचे राज्य म्हणून ओळखले जात होते. आज राज्याची परिस्थिती काय आहे याचा विचार कोण करतो ? केंद्र शासन आमचे आहे आणि आम्ही केंद्र शासनाकडून एवढे मोठे पैसे घेऊन येऊ आणि महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांचे प्रश्न, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न आणि इतर जे प्रश्न महाराष्ट्रामध्ये उभे राहिले आहेत त्यांचा समाचार घेऊ अशी घोषणा निवडणुकीच्या कालखंडामध्ये सत्ताधारी पक्षाने केली होती. आज त्या घोषणेचे काय झाले ? त्या घोषणा कोठे विरल्या ? आज महाराष्ट्र राज्याचे नेते त्या ठिकाणी कृषी मंत्री आहेत. महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या का करीत आहेत याचे उत्तर आज शासनाने दिले पाहिजे. देशाचे कृषी मत्री हे आपल्या राज्यातील आहेत. त्यांना संपूर्ण राज्याची परिस्थिती माहीत आहे. राज्याच्या सगळया समस्यांचा त्यांचा अतिशय चांगला अभ्यास आहे. प्रत्येक समस्यांवर अधिकारवाणीने बोलू शकतील असा त्यांचा त्याबाबतीतील अभ्यास आहे. हे सगळे असताना महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांच्या किती आत्महत्या होत आहेत आणि ही संख्या किती पुढे गेली आहे ? आजही हे प्रमाण थांबलेले नाही. तरी सुध्दा महाराष्ट्र राज्याचे संपूर्ण मंत्रिमंडळ या पध्दतीचे अभिभाषण बनविण्यासाठी पुढाकार घेते आणि त्याचा उल्लेख यामध्ये केला जातो त्याबद्दल खूप आश्चर्य वाटते.

सभापती महोदय, अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 7 च्या बाबतीत विचार केला तर त्यामध्ये "जागतिक बँकेकडे जे सहाय्य मागितले, त्याची शिफारस माझ्या शासनाने केली आहे." असे म्हटले आहे. जागतिक बँकेचे कर्ज आपल्याला का मिळणार नाही या विषयी बाहेर सगळया वर्तमानपत्रांमध्ये बातम्या छापून आल्या आणि माननीय राज्यपाल महोदय या भाषणामध्ये लिहितात की, माझ्या शासनाने शिफारस केली आहे. केंद्रामध्ये सुध्दा तुमचे शासन आहे. त्यांनी शिफारस केली का ? महाराष्ट्र राज्याला जागतिक बँकेचे कर्ज मिळावे आणि त्या कर्जाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याची एकूण जी विपन्नावस्था आहे, जी अतिशय हलाखीची परिस्थिती सर्व क्षेत्रात होत आहे त्यामध्ये केंद्राच्या सहाय्याने सुधारणा घडवून आणू अशा प्रकारची कोणतीही भाषा माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. मधुकर सरपोतदार .....

राज्यपालांच्या अभिभाषणामधून आमच्यासमोर आलेली नाही. त्यामध्ये जर याचा उल्लेख असता तर बरे वाटले असते. सभापती महोदया, मुद्दा क्रमांक 8 मध्ये असे म्हटले आहे की, "एकूण देशांतर्गत उत्पादनात राज्याचे 13 टक्के अंशदान असून, देशाच्या निर्यातीत 31 टक्के, निगम करात 43 टक्के आणि आयकरात 36 टक्के इतका वाटा राज्याचा असतो. गेल्या वर्षातील निर्यातवाढीचा दर त्याच्या लगतपूर्वीच्या वर्षापेक्षा 63 टक्क्यांनी अधिक होता." याबद्दल महाराष्ट्र राज्याचे अभिनंदन करतो परंतु माझा प्रश्न असा आहे की, कराच्या माध्यमातून केंद्राला एवढी मदत देणारे आपले राज्य आहे. केंद्राच्या पाठीमागे समर्थपणे उभे राहणारे आपले राज्य आहे. केंद्राला अनेक माध्यमातून पैशाच्या रुपाने रक्कम उपलब्ध करुन देणारे राज्य आहे. आज मुंबईची परिस्थिती भयानक आहे. मुंबईला मदत करण्याच्या संदर्भात, मुंबईला कोणत्या प्रकारची मदत केली, मुंबई शहराच्या एकंदर समस्या सोडविण्यासाठी किती निधी उपलब्ध करुन दिला याचा उल्लेख नाही. मुंबई शहराच्या बाबतीत आतापर्यन्त केवळ शाब्दिक फुंकर घातली गेली. कोणतीही आर्थिक मदत दिली नाही. ही मदत आणण्याची जबाबदारी कोणाची आहे हे माननीय राज्यपालांनी स्पष्ट केले असते तर चांगले झाले असते. सभापती महोदया, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 9 मध्ये असे म्हटले आहे की, " जागतिक स्पर्धात्मक अहवाल 2004 मध्ये राज्याला जागतिक मानांकनामध्ये 38 वा क्रमांक मिळाला आहे." ही अभिमानाची गोष्ट आहे. जगातील संपूर्ण राज्यांमध्ये आमचा 38 वा क्रमांक लागला असेल, यामध्ये रशिया, ब्राझील असताना त्यांच्या वर आमचा क्रमांक असेल तर आमच्या राज्यकर्त्यांचे अभिनंदन करावयास पाहिजे. त्यामध्ये काही चूक नाही. परंतु खरोखर वस्तस्थिती काय आहे ? आपल्या देशामध्ये महाराष्ट्र राज्यात कामगार वर्गाची काय परिस्थिती आहे ? महाराष्ट्र राज्यातील किती कारखाने बंद आहेत ? उत्पादन करणारे किती कारखाने बंद आहेत ? मुंबईतून दहा वर्षापूर्वी एक्साईज डयुटीच्या माध्यमातून मिळणारे संपूर्ण उत्पन्न किती होते आणि आज किती उत्पन्न मिळते ? याची माहिती या ठिकाणी दिली असती तर योग्य झाले असते. याच मुद्दयामध्ये पुढे असे म्हटले आहे की, " हा क्रमांक फ्रान्स, दक्षिण कोरिया यांसारख्या राष्ट्रांच्या जवळपास जाणारा असून, ब्राझील, रशिया, इटली आणि फिलिपाईन्स या राष्ट्रांपेक्षा फार वरचा आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..

एक जमाना असा होतो की जगामध्ये दोनच राष्ट्र बलाढय मानली जात होती, यामध्ये एक अमेरिका आणि दुसरा रशिया. या दोन देशांवर संपूर्ण जगाचे हालहवाल अवलंबून होते. ते कोणत्या बाजुने सरकतील आणि कोणत्या बाजुने झुकतील त्याच्यावर संपूर्ण जगाचे अर्थकारण अवलंबून होते. आता एकच राष्ट्र बलाढय राहिले आहे आणि ते म्हणजे अमेरिका, कारण रशियाचा आता कोठेच उल्लेख होत नाही, ते राष्ट्र आता कमजोर झाले आहे. त्या राष्ट्राच्यावर आमचा दर्जा आहे. याच्या पाठीमागचे इंगित काय आहे, हे अभिभाषण तयार करुन देणा-या अधिका-यांना माहीत असेल त्यामुळे तेच काय ते सांगू शकतील. मागील वर्षी 11967 औद्योगिक गुंतवणूकीचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत अशी यामध्ये माहिती दिली आहे. मला एकच म्हणावयाचे आहे की, केवळ प्रस्ताव येण्यामुळे पोट भरणार आहे काय, यापैकी किती प्रस्तावांबाबत अंमलबजावणी झाली आहे. किती कारखानदारीतून उत्पादन सुरु झाले, किती बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे, किती बेकारांना काम मिळाले आहे आणि त्याच्यातून उत्पादन केव्हा सुरु होणार आहे त्याचा उल्लेख या आकडेवारीबरोबर केला असता तर जरुर त्याचा उपयोग झाला असता. मुद्दा क्रमांक 12 मध्ये "374 गावातील लोक संध्याकाळच्या कृषी पंपांचा वापर थांबविण्यासाठी स्वेच्छेने पुढे आले" असे म्हटले आहे, याबाबत शासनाने खुलासा केला तर बरे होईल. मुद्दा क्र.13 मध्ये "सिंगल फेजची" योजना राबविण्याचे ठरविल्याचे नमूद केलेले आहे. या सिंगल फेज योजनेतून काय साध्य केले जाणार आहे याचे उत्तर ऊर्जा खात्याकडून मिळावे अशी मला विनंती करावयाची आहे. या योजनेला अनेक लोकांचा विरोध आहे, या योजनेतून अनेक अडचणी येण्याची शक्यता आहे. कृपया त्याच्याकडे लक्ष द्यावे. आज दिनांक 17 मार्च आहे. योगायोग असा आहे की, राज्य विद्युत मंडळाच्या कर्मचा-यांचा संपूर्ण राज्यभर संप सुरु आहे. वीज मंडळाच्या खाजगीकरणाच्या विरोधाबद्दल हा संप चालू आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे तीन तुकडे करुन ते निरनिराळया खाजगी कंपन्यांकडे चालविण्यासाठी देण्याचा उद्योग शासनामार्फत केला जात आहे. त्याच्या विरोधात सगळे कर्मचारी उतरले आहेत. हा संप बाहेर चालू असताना राज्यपाल मात्र याचा उल्लेख भाषणामध्ये करतात याचे खूप आश्चर्य वाटते. मुद्दा क्र.14 मध्ये असे म्हटलें आहे की, "माझ्या शासनाने, आजमितीस असलेला विजेचा तुटवडा येत्या 5 वर्षात संपुष्टात आणण्याकरिता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

श्री.मधुकर सरपोतदार..

एक कृती योजना तयार केली आहे." मला यानिमित्ताने एकच उल्लेख करावयाचा आहे की, या विद्युत मंडळामध्ये प्रचंड भ्रष्टाचार आहे. त्याठिकाणच्या अनेक भ्रष्टाचारावर चर्चा झाल्या आहेत. राज्यामध्ये मोठया प्रमाणात विजेची चोरी होते. त्याच्याबाबतीत काय झाले त्याचे उत्तर मा.ऊर्जा मंत्री देत नाहीत. केवळ आमचे प्रयत्न चालले आहेत, एका समेट योजनेचा कायद्यात अंतर्भाव केला आहे असे सांगितले जाते. याचा अर्थ सगळया वीज चोरांना एकत्र आणून समेट घडवून आणली जात आहे. मग हळूहळू चोरी करणा-यांसाठी, दरोडेखोरांसाठी समेट योजना घडवून आणावी. मग तू 5 लाखांचा दरोडा घातला असशील तर अडीच लाख तुम्हाला आणि अडीच लाख आम्हाला अशी समेट घडवून आणाल. अशाप्रकारच्या योजना पुढे आल्या तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मुद्दा क्र.18 मध्ये "शेतक-यांच्या प्रत्यक्ष सहभागामुळे आणि सिंचन क्षेत्रात घडवून आणलेल्या धोरणात्मक सुधारणांमुळे, 2003-2004 या वर्षात, सलग दुस-या वर्षी पाणीपट्टीची 378 कोटी रुपये इतकी विक्रमी वसुली झाली असल्याचे" नमूद केले आहे. परंतु ही वसुली कशापध्दतीने होत आहे,शेतकरी आत्महत्या करीत आहेत, त्यांचे जीवन उदध्वस्त होत आहे, त्यांच्यावर अनन्यसाधारण अन्याय केला जात आहे. 378 कोटीचा महसूल जमा झाला ही आनंदाची गोष्ट आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

कोणाला काही फुकट मिळावे अशा मताचा मी नाही. परंतु हा महसूल गोळा केल्यानंतर शेतक-यालाही त्याचा मोबदला मिळणे हे अतिशय महत्वाचे आहे. मुद्दा क्रमांक 20 मध्ये महात्मा फुले जलभूमी संधारण अभियान हे जलसंधारणाच्या कामात जनतेचा सहभाग मिळविण्यात अत्यंत यशस्वी झाले असल्याचे सिध्द झाले आहे. जलसंधारणाच्या कामामुळे राज्यातील पाणीटंचाईची समस्या पुष्कळ अंशी कमी झाली आहे. जलसंधारण ही लोक चळवळ करण्याचा शासनाचा निर्धार आहे, असे या अभिभाषणामध्ये म्हटलेले आहे. सभापती महोदय, आज महाराष्ट्रातील अनेक गावे अशी आहेत की, त्या गावांना पिण्याचे पाणी मिळत नाही. महिला, लहान लहान मुले पिण्याच्या पाण्याकरिता मेलौनमैल पायी हिंडत असतात. अशी राज्यातील परिस्थिती असताना अशा प्रकारचा उल्लेख मा. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आल्याबद्दल आश्चर्य वाटते.

पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी व नियंत्रित करण्यासाठी राज्य कृती दल स्थापनेचा उल्लेख अभिभाषणामध्ये आहे. पिण्याच्या पाण्यामुळे किती प्रकारचे आजार होतात हे प्रत्यक्ष पाहणीमध्ये, आरोग्य तपासणीमध्येच समजून येते.

मुद्दा क्रमांक 24 मध्ये "माझ्या शासनाने, राज्यातील 15 आदिवासी जिल्ह्यांसाठी, सर्वसमावेशक नवसंजीवन योजनेला अंतिम रुप दिलेले आहे. या कार्यक्रमात गावनिहाय रोजगार कार्यक्रम, अद्याप रस्त्यांनी न जोडलेली गावे व पाडे रस्त्यांनी जोडणे आणि क्षेत्रफळ मानकांच्या आधारे दुर्गम आदिवासी भागात आरोग्य संस्था स्थापन करण्यासाठी प्रयत्नशील आहे" असे म्हटलेले आहे. कालच माननीय आरोग्य मंत्री डॉ. विमलताई मुंदडा यांची "ई" टीव्हीवरील मुलाखत पाहिली. त्या मुलाखतीच्या वेळी रुग्णालयांची जी प्रत्यक्ष परिस्थिती दाखवली ती फार भयावह अशी आहे. अशा परिस्थितीबद्दल शासनाला लाज वाटली पाहिजे. त्या मुलाखतीच्या वेळी वस्तुस्थितीचे चित्रण दाखविताना सांगितले गेले की, रुग्णालयामध्ये रुग्णांना औषधे मिळत नाहीत. 60 लाख रु.ची औषधे येतात, पण ती रुग्णांना मिळत नाहीत. रुग्णांना बाहेरुन औषधे आणण्यास सांगितले जाते. काही रुग्णालयांमध्ये अधीक्षक नाहीत, डॉक्टर्स् नाहीत, नर्सेस नाहीत. ही पदे मंजूर झाल्यानंतर भरली जाणार आहेत. अशी आरोग्याच्या संदर्भातील राज्यातील एकूण परिस्थिती असताना रुग्णांना चांगल्या प्रकारे आरोग्य सेवा कशा प्रकारे पुरविली जाईल याचा उल्लेख

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/

(श्री. मधुकर सरपोतदार...)

अभिभाषणामध्ये आला असता तर मी मा. राज्यपालांचे अभिनंदन केले असते.

आश्रमशाळांच्या बाबतीत बोलायचे झाले तर राज्यातील सर्वच आश्रमशाळांची परिस्थिती अगदी भयावह आहे. आदिवासी आश्रमशाळांतील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाने आश्रमशाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा उभारल्या असून महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, मर्यादित यांच्यामार्फत आश्रमशाळांतील विद्यार्थी व शिक्षक यांना संगणक प्रशिक्षण देण्यासाठी योजना मंजूर केलीली आहे. शासन अनेक योजना करते. परंतु त्या योजनांची प्रत्यक्षात अंमलबजावणी होते काय ? म्हणून या संगणक प्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणीचे फलित काय आहे याचा उल्लेख अभिभाषणामध्ये यावयास पाहिजे होता. आदिवासींसाठी आम्ही हे करु, ते करु असे सारखे सांगितले जाते. परंतु प्रत्यक्षात काय केलेले आहे, यावर प्रकाश टाकणे जरुरीचे असून ती जबाबदारी पार पाडलेली नसल्याचे दु:ख होते.

मुद्दा क्रमांक 29 मध्ये "राज्यातील बालकांचे कुपोषण आणि बालमृत्यू या गंभीर समस्या हाताळण्यासाठी " राजमाता जिजाऊ - माता-बाल आरोग्य आणि पोषण मिशन" स्थापन करण्यात येत आहे." असा उल्लेख आहे. नुसत्या संस्था कशाला काढता ? या सदनामध्ये माननीय आरोग्य मंत्र्यांनी सांगितले पाहिजे की, यापुढे राज्यामध्ये आजारपणामुळे आणि कुपोषणामुळे एकही बालमृत्यू होणार नाही. आज आरोग्याच्या कामामध्ये संपूर्ण भ्रष्टाचार चाललेला आहे. रुग्णांना चांगली औषधे मिळत नाहीत. डॉक्टर्स् औषधांचा भ्रष्टाचार करतात, डॉक्टरांवर पोलीस रोज धाडी टाकत आहेत आणि अनेक डॉक्टर्स् पकडले जात आहेत. अशा प्रकारे राज्यातील आरोग्याच्या बाबतीत विदारक परिस्थिती असताना "आरोग्य व पोषण या विषयी अधिकाधिक जन-जागरण करण्यासाठी, राज्यभर प्रसिध्दी मोहीम हाती घेतली जाईल" अशा प्रकारचा उल्लेख अभिभाषणामध्ये करण्यात आलेला आहे याचे दु:ख होते.

सभापती महोदय, अंत्योदय अन्न योजनेच्या बाबतीत मी एवढेच म्हणेन की, या योजनेचा लाभ प्रत्यक्षात लाभार्थीना मिळतो काय ? आज राज्यामध्ये शेतक-यांचे उपासमारीने मृत्यू होत आहेत. ते आत्महत्त्या करीत आहेत. तेव्हा अशा प्रकारच्या अत्यंयात्रा थांबविण्यासाठी महाराष्ट्र शासन काही करीत आहे यासंबंधीची माहिती अभिभाषणामध्ये दिली असती तर मी मा. राज्यपालांचे अभिनंदन केले असते.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

"राज्यातील 15 आदिवासी जिल्हयांमध्ये, प्रत्येक कुटुंबातील किमान दोन आदिवासी व्यक्तींना वर्षभर रोजगार पुरविण्यासाठी यथार्थदर्शी पंचवार्षिक योजना तयार करुन त्या अंमलात आणण्यास सुरुवात झाली आहे." असा उल्लेख अभिभाषणामध्ये करण्यात आलेला आहे. आज आदिवासींची दयनीय अवस्था सुधारण्यासाठी कोणती पावले शासनाने उचललेली आहेत ? त्यांना पिण्याचे पाणी मिळत नाही, आरोग्याच्या सुविधा मिळत नाहीत, औषधे मिळत नाहीत, शिक्षण मिळत नाही. आदिवासी भागामध्ये शाळा असल्या तर शाळांवर छप्पर नसते. तेव्हा प्रत्यक्षात काय परिस्थिती आहे, त्याची माहिती घेऊन त्याप्रमाणे योजना आखण्याची गरज आहे. अनेक शाळांमध्ये संगणक पुरविल्याचे अभिभाषणामध्ये सांगितलेले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, लोकप्रतिनिधींनी अनेक शाळांमधून संगणक पुरविलेले आहेत. प्रत्यक्षात शासनाने किती शाळांना संगणक पुरविलेले आहेत ?

...यानंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

महाराष्ट्र शासनाने कोणकोणत्या व किती शाळांना संगणक पुरविले आहेत यासंबंधी ऑथँटीक इन्फरमेशन या सभागृहात देण्यात यावी अशी माझी मागणी आहे. राज्यातील विविध क्रिडा प्रकारांना प्रोत्साहन मिळावे यासाठी माझ्या शासनाने शासकीय व निम शासकीय सेवेतील संवर्ग "अ" "ब" "क" व "ड" मधील सरळसेवा भरतीने भरल्या जाणा-या पदांपैकी 5 टक्के पदे,उत्कृष्ट खेळाडूंसाठी आरक्षित करण्याचा निर्णय घेतला आहे. क्रीडा विभागासाठी महाराष्ट्र शासनाने येणा-या अंदाजपत्रकात मोठया प्रमाणात तरतूद केलेली आहे काय याबाबतची आम्हाला दाखवून द्यावी. विविध खेळ, व्यायाम याकडे शासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. फक्त काही गोष्टींवरच शासनाचे लक्ष आहे आणि ते म्हणजे लोकांना निरनिराळया गोष्टी सांगून झुलवत ठेवणे, हा एक प्रयोग राज्यकर्ते करीत आहेत. प्रत्यक्ष डोळे उघडे ठेवा, या विभागाचे काम व्यवस्थित चालले आहे की नाही ते पहा. बाहेर काय चालले आहे याचा अंदाज घ्या. त्यासंदर्भात काही तरी उपाययोजना करा. सभापती महोदय, राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न अतिशय गंभीर बनत चालला आहे. राज्यात रोज कुठे तरी दरोडे पडत आहेत. राज्यातील जनतेस पोलीस सहाय्य करीत नसतील तर दरोडेखोरांना पकडा आणि त्यांना ठार करा अशा निर्णयाप्रत जनता आलेली आहे. हे अपयश कुणाचे आहे ? कायदा व सुव्यवस्थेचे हे सगळयात मोठे अपयश आहे. अनेक लोक भ्रष्टाचारात पकडले. भ्रष्टाचारामुळे पोलिसांमध्ये देखील टोळीयुध्द भडकू लागले आहे.पोलीस विभागातील अधिकारी एकमेकाच्या विरुध्द उभे राहिले आहेत. जे पोलीस अधिकारी कर्तव्यदक्ष आहेत त्यांचे आयुष्य कसे नष्ट होईल असा काही पोलीस अधिका-याकडून प्रयत्न होत आहे. दाऊद इब्राहीम हा पाकिस्तानमध्ये जाऊन बसलेला आहे. त्यांचे मोठया प्रमाणात एजन्ट महाराष्ट्रात तयार झालेले आहेत. या एजन्टांच्या माध्यमातून पोलीस यंत्रणा पोखरण्याचे काम चालले आहे. या कामाला राज्य शासन दुरुन का होईना, न कळत का होईना, पाठिंबा देते आहे काय अशी शंका राज्यातील जनतेत निर्माण होऊ लागलेली आहे. सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, विधानसभेच्या सभागृहात माननीय विरोधी पक्ष नेते श्री. नारायण राणे यांनी गृह विभागावर स्पष्टपणे आरोप केलेला आहे. श्री.माजिद मेमन हा वकील आहे. माझी महाराष्ट्र शासनाला अशी सूचना आहे की, या वकीलास महाराष्ट्राचा ॲडव्होकेट जनरल म्हणून नेमून टाका. म्हणजे दाऊद आणि ॲड.मेमन या दोघांची दोस्ती चांगल्या प्रकारे होऊ शकेल. ॲड.मेमन यांना ॲडव्होकट जनरल

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

केले तर शासनाकडे दाऊद विरुध्द बॉम्ब स्फोटाच्या केसेस आहेत तसेच इतर अन्य केसेस आहेत. त्या केसेस लवकर मार्गी लागू शकतील.पर्यायाने शासनाची डोकेदुखी कमी होईल. राज्यात कायदा व सुव्यवस्था चांगली राहिलेली नसल्यामुळे जनतेला खूप त्रास होऊ लागलेला आहे.राज्यात कायदा सुव्यवस्था बिघडत राहिली तर राज्यातील जनतेमधून सामूहिक उठाव होईल. कायदा व सुव्यवस्थेचा राज्यात जो अतिरेक चालला आहे. त्याला कुठे तरी पायबंद घातल्या शिवाय चालणार नाही. राज्यात कायदा व सुव्यवस्था चांगली रहावी यासाठी शासनाने सातत्याने प्रयत्न केला पाहिजे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात अनेक मुद्दयांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. मला सर्वच मुद्दयांवर बोलावयाचे होते. परंतु आमच्या शिवसेनेचे व भारतीय जनता पक्षाचे काही सदस्य बोलणार आहेत त्यांना बोलण्याची संधी मिळावी म्हणून मी काही मुद्यांचा मुद्दाम उल्लेख केला नाही.सभापती महोदया, आपण वेळेचे बंधन घालून दिलेले आहे. आपण घालून दिलेले बंधन मला पाळले पाहिजे. मी या ठिकाणी निर्विवादपणे सांगू इच्छितो की, या राज्यामध्ये एका बाजूला कॉग्रेसचे राज्यकर्ते व दुस-या बाजूला राष्ट्रवादीचे कार्यकर्ते यांच्या दोघांमध्ये एक स्पर्धा चाललेली आहे. इतर स्पर्धा मी समजू शकतो. परंतु जनतेच्या प्रश्नाच्या बाबतीत सुध्दा कोण कुणावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतो अशी स्पर्धा सत्ताधारी पक्षातील राज्यकर्त्यांमध्ये चालली आहे. अशा प्रकारची राज्यात स्पर्धा होणे हे चांगल्या कार्यकर्त्यांना अशोभनीय गोष्ट आहे. या संपूर्ण बाबीचा विचार राज्यकर्त्यांनी करावा. या वर्षी माननीय राज्यपालांनी अभिभाषण केले असे अभिभाषण पुन्हा होऊ नये असे आम्हाला वाटते. याचे कारण म्हणजे राज्याच्या विकासाची एकही चांगली गोष्ट माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात आम्हाला दिसून आली नाही. लोकांच्या हिताचे अभिभाषण असावे, लोकांची दिशाभूल करणारे असे अभिभाषण नसावे एवढे विनम्रपणे नमूद करतो आणि माझे भाषण संपवितो.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीपाठी नाही

यानंतर श्री. उपरे...

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सन्माननीय सभापती महोदया, आपल्या राज्याच्या महामहीम राज्यपाल महोदयांनी जे अभिभाषण केले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा प्रस्ताव या सभागृहामध्ये आपण मांडला आहे. त्या अनुषंगाने महामहिम राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. या अभिभाषणामध्ये राज्यपाल महोदयांनी सरकार जे काम करणार आहे त्याचे चित्र उभे केले आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, सांस्कृतिक, क्रीडा अशा विविध क्षेत्रामध्ये राज्याचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या संदर्भात जे चित्र राज्यपाल महोदयांनी सादर केले आहे ते अत्यंत उत्कृष्ठ आहे याबद्दल वाद नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी आणि सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी या अभिभाषणावरील त्यांचे विचार या ठिकाणी मांडले आहेत. विशेषत: सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी यांनी हासत हासत फटकारे लगावले आणि थट्टा केली. ही थट्टा करता करता त्यांच्या थट्टेतून आणि मस्करीतून जी दाहकता जाणवत होती ती केवळ आपण सत्तेमध्ये नाही या मानसिकतेपोटी असावी असे मला वाटते.

डॉ.दीपक सावंत : आपण राज्यपालांचे अभिनंदन करा.

प्रा.जोगेंद्र कवाडे : त्यांचे अभिनंदन करण्याचा माझा अधिकार आहे. आपला अधिकार आपण राखून ठेवावा. सभापती महोदया, माननीय राज्यपालांचे अभिनंदन करीत असताना या शासनाचे लक्ष काही मुद्यांवर वेधणे हे मी माझे कर्तव्य समजतो. महामहीम राज्यपालांच्या अभिभाषणातील दुस-या परिच्छेदावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी आणि सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार हे बोलले आणि या परिच्छेदामध्ये "महाराष्ट्राच्या जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी, नवीन शासनाने, सर्वतोपरी काम करण्यास सुरुवात केली आहे, हे पाहून मला समाधान वाटते." असे म्हटले आहे यावर आक्षेप घेतला. राज्यपालांच्या या कर्तव्यावर आपण आक्षेप घेतला नाही. पण सरकारने राज्यपालांना जी माहिती दिली त्यासंबंधी माननीय राज्यपालांनी अभिभाषण केले त्यासंबंधी आपण हा मुद्दा मांडला आहे. आघाडीच्या सरकारने जी आश्वासने दिली त्यावर या ठिकाणी बोलले गेले. या ठिकाणी सर्व गोष्टींचा उल्लेख सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी आणि सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे)

यांनी केला याबद्दल मला आश्चर्य वाटले. पण या आश्वासनांमध्ये आमचे सरकार सत्तेवर आले तर मुंबईतील 80 हजार झोपड्या हटविल असे आश्वासन नव्हते. उलट यासंदर्भात असे आश्वासन होते की, 1995 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण दिले तसेच संरक्षण 2000 पर्यंतच्या झोपड्यांना देऊ. परंतु ते आश्वासन पाळले गेले नाही. त्याचा उल्लेख महामहीम राज्यपालांच्या अभिभाषणात येऊ नये याच्या वेदना माझ्यासारख्या तळागाळात काम करणा-या कार्यकर्त्याला होत आहेत. तरी मला सरकारला असे सांगावयाचे आहे की, जी आश्वासने पाळायची नसतात ती देऊ नयेत. जी आश्वासने पाळायची नाहीत ती कोणीही देऊ नयेत. मग ती विरोधी पक्षाने देऊ नयेत आणि सरकारनेही देऊ नयेत.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ...

कारण सरकारच्या विश्वसनीयतेचा हा प्रश्न आहे. आश्वासने देऊन सत्ता प्राप्त केली जाते आणि त्या आश्वासनाच्याप्रती जर आपण गंभीर नसू तर येणा-या पुढच्या काळात आपण जनतेचा विश्वास गमाविल्याशिवाय राहणार नाही. याची दखल घेणे आवश्यक आहे. सभापती महोदया, शासनाने मुंबई महानगरीच्या बाबतीतच नव्हे तर राज्यातील प्रमुख 48 शहरातील झोपडपट्टया उध्वस्त करण्याचा, त्या हटविण्याचा ॲक्शन प्लॅन तयार केलेला आह अस मला समजले आहे. ही बाब जर खरी असेल तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले,छत्रपती शिवाजी महाराज,शाहू महाराज यांची नावे घेणा-या आणि सामाजिक न्यायाची घोषणा करणा-या सरकारच्या बाबतीत ही बाब उचित नाही. सभापती महोदया, दिल्लीमध्ये यु.पी.ए चे. सरकार असून त्या सरकारचा जो किमान समान कार्यक्रम आहे त्यामध्ये पायाभूत सुविधे संबंधीचा एक परिच्छेद आहे. त्या परिच्छेदामध्ये आश्वासित करण्यात आलेले आहे की, " कोणत्याही झोपडपट्टया बळजबरीने हटविण्यात येणार नाही. झोपडपट्टयाचे पुनर्वसन केल्याशिवाय झोपडपट्टया हटविल्या जाऊ नयेत.अशा प्रकारे जनतेला आश्वासित करण्यात आल्यानंतरसुध्दा मुंबई सारख्या महानगरीमध्ये तसेच राज्यामधील काही शहराच्या बाबतीत या झोपडया पाडण्याच्या बाबतीत ॲक्शन प्लॅन केलेला आहे. विरोधी पक्ष नेते असो वा सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार असो यांनी याबाबतीत काहीही उल्लेख केलेला नाही याचे मला आश्चर्य वाटते. सभापती महोदया, या चर्चेत भाग घेत असतांना एका महत्वाच्या गोष्टीचा मी उल्लेख करणार आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार बाकीच्या मुद्यांच्या बाबतीत बोलले होते परंतु या बाबतीत ते काहीही बोलले नाहीत.

श्री.मधुकर सरपोतदार : वेळ कमी पडल्यामुळे मी बोलू शकलो नाही.

प्रा.जोगेन्द्र कवाडे : सभापती महोदय, एका गोष्टीबद्दल मला आनंद वाटत आहे की मुंबई महानगरीला ईकॉनॉमी पॉवर हाऊस म्हणजे आर्थिक सत्ता केन्द्राची महामहिम राज्यपालांनी.उपमा दिली आहे. मुंबई शहर हे जागतिक दर्जाचे शहर झाले पाहिजे हे सर्वाचे स्वप्न आहे.मुबईमध्ये राहणारा असो वा नसो सर्वाचे ते स्वप्न आहे. महाराष्ट्राची राजधानी म्हणून मुंबई शहर हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शहर व्हावे असे सर्वाना वाटते. विदेशातून जे पर्यटक भारतात येत असतात ते मुबईचे दर्शन घेतल्याशिवाय परत जात नाहीत. भारतात आल्यानंतर व आग्रा येथील

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ताज महाल पाहिल्यानंतर मुंबईला भेट दिल्या शिवाय ते परत जात नाहीत एवढे विदेशी पर्यटकांना मुंबईचे आकर्षण आहे. मुंबई शहराला ईकॉनॉमी पॉवर हाऊस म्हणून उपमा देत असतांना हे जागतिक दर्जाचे शहर कसे होईल याचीसुध्दा संकल्पना माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात मांडली आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.मुंबई शहरासाठी अनेक पायाभूत सुविधा देण्यात येणार असून त्यात मेट्रो रेल्वेचा सुध्दा समावेश करण्यात आला आहे .त्याचबरोबर जलमार्गसुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.विदेशामध्ये अनेक समुद्राकाठा वरील मोठ मोठी शहरे इतर ठिकाणाला जलमार्गाने जोडली जातात. त्याला अंतर्गत जलमार्ग आपण म्हणत असतो.तेव्हा अशा प्रकारची जलमार्गाची सुविधा मुंबई शहरात उपलब्ध करुन देण्यात आली तर बरे होईल. न्हावा शेवा किंवा अलिबाग या ठिकाणी भाऊचा धक्का किंवा गेट वे ऑफ इडियावरुन लॉचेस जात येत असतात . अशा प्रकारे जल मार्ग जास्तीत जास्त उपलब्ध करुन दिल्यामुळे रस्त्यावर वाहतुकीचा जो ताण येतो तो निश्चितपणे कमी झाल्याशिवाय राहणार नाही. या जल मार्गाच्या योजनांच्या बाबतीत माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात उल्लेख केलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात भाषण करावे.

प्रा.जोगेन्द्र कवाडे : सभापती महोदय, मला थोडा वेळ देण्यात यावा. मी थोडक्यात मुद्दे मांडतो. महाराष्ट्र राज्य हे प्रमुख औद्योगिक राज्य म्हणून उभे झाले पाहिजे.माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात असेही सांगण्यात आलेले आहे की, " स्वित्झर्लन्ड येथील आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन विकास सस्थेच्या " जागतिक स्पर्धात्मकता अहवाल 2004 "मध्ये राज्याला जागतिक मानांकनामध्ये 38 वा क्रमांक मिळाला आहे. " ही बाब मुंबई शहराच्या दृष्टीने तसेच राज्याच्या दृष्टीने अत्यंत अभिमानास्पद आहे. सर्वात महत्वाचा मुद्दा असा आहे की मुंबई हे शहर आंतरराष्ट्रीय दर्जाचे औद्योगिक शहर व्हावे यासाठी 3 हजार 655 थेट विदेशी गुंतवणुकीचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

अशुद्धीत प्रत / शीर्षकासाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

त्यापैकी 147 थेट विदेशी गुंतवणूकदारांचे प्रस्ताव राज्य शासनाने मंजूर केलेले आहेत ही गोष्ट आपल्या राज्याच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने अतिशय चांगली आहे असे मला मुद्दाम याठिकाणी सांगावेसे वाटते. विजेच्या तुटवडयाबाबत मी बोलणार नाही. कारण 5000 मे.वॅ. विजेचे उत्पादन येत्या 5 वर्षात करण्याचे शासनाने ठरविलेले आहे. खाजगी गुंतवणूकदारांची सोय करण्यासाठी मुद्दाम विजेचा तुटवडा निर्माण केला जात नाही ना अशी मला शंका वाटते. दाभोळचा वीज प्रकल्प समुद्रात बुडवायचा आणि पुन्हा वर काढायचा याचा देखील गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. अशा प्रकारचा संदेश राज्यातील जनतेपुढे जाता कामा नये असे मला वाटते. सिंगल फेडर लाईन आणि सिंगल फेज वापरली जाणार आहे. याबाबतीत तांत्रिक सल्ला घेण्याची गरज आहे. परंतु वीज तुटवडयाच्या बाबतीत चुकीचा संदेश जनतेपुढे जाता कामा नये याची दक्षता घेण्याची गरज आहे. `राज्य वीज मंडळाने चार भागामध्ये विभाजन होणार आहे. यासंदर्भात मंडळातील 80 हजार कर्मचारी संपावर गेलेले आहेत. राज्य वीज मंडळाचे विभाजन होता कामा नये असे मला वाटते. जसे महाराष्ट्रापासून विदर्भ वेगळा होता कामा नये किंवा मराठवाडा होता कामा नये त्याप्रमाणेच वीज मंडळातील 80 हजार कर्मचा-यांना असे वाटते की आपल्यातील भावाभावाचे नाते हे लोकांच्या सोईसाठी तोडण्याचा प्रयत्न होत असेल तर ते योग्य नाही. म्हणून वीज मंडळाच्या पुनर्रचनेच्या संदर्भात गंभीरपणाने विचार करण्याची गरज आहे. दुर्बल घटकांसाठी आणि विशेषत: आदिवासी आणि दुर्गम भागाचा विकास करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु आदिवासींचे कुपोषणामुळे होणारे मृत्यू आणि बालमृत्यूचे प्रमाण थांबविण्यासाठी युध्द पातळीवर प्रयत्न होण्याची गरज आहे. आदिवासी बालकांचे मृत्यू आणि कुपोषणामुळे होणारे मृत्यू हे जर भ्रष्टाचारामुळे होत असतील तर अशा लोकांना फाशीच्या शिक्षेशिवाय दुसरी शिक्षा असता कामा नये. याची देखील शासनाने गंभीरपणाने विचार करावा. यामध्ये सुधारणा केली तर आदिवासी बालकांचे कुपोषणामुळे होणा-या मृत्यूचे प्रमाण थांबविता येईल. दुसरी एक गोष्ट म्हणजे सध्याच्या खाजगीकरण,उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या धोरणामुळे ज्याला आम्ही खाउजा असे म्हणतो अशा धोरणामुळे तरुणांमध्ये नोकरीच्या संधीमध्ये दिवसेंदिवस घट होत चालली आहे. मागासवर्गीयांना विशेषत: अनु.जातीच्या तरुणांना आणि

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे .....

विद्यार्थ्यांना जी मदत द्यावयास पाहिजे त्याबाबतीत आराखडा तयार करण्यात आलेला आहे म्हणून मी शासनाचे अभिनंदन करतो. विशेष घटक योजनेच्या संदर्भात अनु.जातीकरिता असणारा निधी इतरत्र कुठेही वळविला जाता कामा नये. दुसरी गोष्ट म्हणजे उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या नावाखाली शिक्षणाचे खाजगीकरण करण्याची प्रक्रिया महाराष्ट्रामध्ये सुरु करण्यात येणार आहे असा माझा आरोप आहे. माझाच नाही तर समाजातील काही लोकांचाही असा आरोप आहे. काही विशिष्ट लोकांची मक्तेदारी शिक्षण क्षेत्रात प्रस्थापित करण्यासाठी .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.कवाडे (पुढे चालू ...

पूर्वी जी चातुर्वर्ण्य व्यवस्था आपल्या समाजामध्ये होती ती या नवीन शिक्षण पध्दतीतून पुन्हा समाजामध्ये आणण्याचे प्रयत्न होत आहेत किंवा काय अशी शंका येते आहे. फुले-शाहू-आंबेडकर यांचे नाव घेऊन राज्य करणाऱ्या सरकारने याबाबत गंभीरतेने विचार करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. ...

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, या सरकारचे असे काही धोरण जाहीर झालेले आहे का ? ...

प्रा.जोगेंद्र कवाडे : अध्यक्ष महोदया, माझे म्हणणे असे आहे की, स्वयं अर्थशासित विद्यापीठांची जी मागणी केली जात आहे, त्यासाठी विधेयक आणले जात आहे .. उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या निमित्ताने हे जे प्रयत्न केले जात आहेत त्यातून आपल्या राज्यामध्ये पुनश्च अशा प्रकारची भेदभावाची भावना निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे श्रीमंतांचीच मुले शिक्षण घेऊ शकतील आणि गरीबांची मुले शिक्षणाविना तशीच राहतील. अशा प्रकारची व्यवस्था खाजगी विद्यापीठांच्या माध्यमातून उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या नावाखाली केली जात आहे, ते चुकीचे आहे हे मला येथे या निमित्ताने आवर्जून सांगावयाचे आहे.

अध्यक्ष महोदया, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात विचार केल्यास राज्यातील ग्रामीण भागामध्ये राहणारा अनुसूचित जातीतील जो दलित वर्ग आहे या वर्गावर प्रचंड अत्याचार सुरू आहेत. ही परिस्थिती सुधारणा अत्यावश्यक आहे. युती शासनाच्या काळात राज्यामध्ये जे अत्याचा होत होते त्यापेक्षा सध्याच्या काळात या प्रकाराचे प्रमाण कमी असले तरी या गोष्टीची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. कारण आमच्या सरकारची ती एक नैतिक जबाबदारी आहे. युती शासनाच्या काळात राज्यामध्ये दलितांवरील अन्याय-अत्याचाराला ऊत आला होता पण आमच्या राज्यामध्ये असे काही प्रकार होत असतील, शासन वा प्रशासनाच्या कोणत्याही पातळीवर दलितांवर अन्याय-अत्याचार होणार नाहीत आणि होणाऱ्या अशा प्रकारांची दखल घेऊन आपले पोलीस खाते संबंधितांवर त्याबद्दल उचित प्रकारे कारवाई करील असा विश्वास आपण जनतेमध्ये निर्माण केला पाहिजे. अध्यक्ष महाराज, माननीय राज्यपालांचे त्यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल अभिनंदन करीत असताना या ठिकाणी आपण पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्याचा प्रयत्न करीत आहात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे .....

त्याबाबत मी एवढेच सांगेन की, 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' असे एक संतवाक्य आहे त्यानुसार आपले प्रयत्न असले पाहिजेत. पोलीस दलामध्ये जर काही कीड लागली असेल ती दुरुस्त करण्यासाठी केवळ पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून त्यांच्या मानसिकतेचेही आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे असे मला वाटते आणि याच गोष्टीकडे आपण लक्ष देणे गरजेचे आहे. अध्यक्ष महोदया, मी माननीय राज्यपालांचे एका गोष्टीबद्दल अंत:करणापासून अभिनंदन करतो. माननीय राज्यपाल महोदय हे कर्नाटक राज्याचे भूमिपुत्र आहेत आणि त्या राज्याचे ते मुख्यमंत्री देखील होते. आता आपल्या राज्याचे राज्यपाल म्हणून त्यांचे आगमन झाले आहे आणि असे असताना, स्वत: कर्नाटक राज्याचे असूनही महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाला न्याय देण्याची भाषा त्यांनी आपल्या भाषणामध्ये वापरली आहे त्याबद्दल त्यांचे निश्चितपणे अभिनंदन केल्याशिवाय मला रहावत नाही. माननीय राज्यपालांनी या ठिकाणी अभिभाषण केल्याबद्दल, त्याद्वारे काही आश्वासने दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे तसेच अध्यक्ष महोदया, आपण मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले देखील आभार मानतो. धन्यवाद.

श्री. मधुकर सरपोतदार : अध्यक्ष महोदया, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. माननीय सदस्य प्रा. कवाडे यांनी या ठिकाणी जे भाषण केले आहे ते ऐकल्यानंतर मला त्यांना केवळ एकच विचारावयाचे आहे की, 'सहन होत नाही आणि सांगताही येत नाही' अशा अडचणीला ते सध्या सामोरे जात आहेत काय ?

प्रा. जोगेंद्र कवाडे : अध्यक्ष महोदया, मी माझ्या मित्रांना इतकेच सांगू इच्छितो की, सहन होत नाही आणि सांगताही येत नाही अश प्रकार आमच्याकडे नसतो तर आमच्याकडे सारे काही सरळसोट, अगदी क्लिअर असते.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.मोडक हे भाषण करतील.

(यानंतर श्री.जागडे .... वाय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : मा. सभापती महोदय, महामहीम राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी मी सुरुवात करीत आहे. पान क्र. 2 पासून मी माझ्या भाषणाला सुरुवात करीत आहे. जोगेंद्रजी आपण एका महत्वाच्या विषयाकडे का दुर्लक्ष केले आहे, हे मला कळत नाही. केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या बजेटमध्ये मुंबईचा उल्लेख असला तरी जाणता अजाणता महामहीम राज्यपालांनी एका गोष्टीकडे दुर्लक्ष केले आहेण ही बाब मला विनम्रपणे निदर्शनास आणून द्यावयाची आहे. आता त्याच पानावर महाराष्ट्राकडून केंद्राच्या गंगाजळीमध्ये किती भर पडत आहे, याचा उल्लेख करण्यात आला आहे. आता यामध्ये केंद्र सरकार राज्याला काय देणार, हे आपण कृपया सांगा. या बाबत सर्वसामान्य जनतेची अपेक्षा आहे. कृपा करुन समजून घ्या. मी या ठिकाणी काही आकडे देणार आहे. मुंबईतील आयकर महसूल 43 टक्के आहे. 61 टक्के बँक व्यवहार मुंबईतून होत आहेत. 65 टक्के रोखे बाजार मुंबईहून कार्यान्वीत होतात. असे असतानाही महाराष्ट्राला केंद्राकडून मिळणारा महसूल परतावा केवळ 11 टक्के आहे. आणि हे बाराव्या वित्त आयोगाने ठरविले आहे. याच कोठेही उल्लेख नाही, याबद्दल खेद नाही. तर अभिनंदन करण्यात येत आहे. आता बाराव्या वित्त आयोगाची महाराष्ट्रात चर्चा सुरु आहे. 11 व्या वित्त आयोग जेव्हा जाहीर झाला होता, तेव्हा याच महाराष्ट्रातील हेच मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख दिल्लीला धावत गेले आणि आमच्यावर अन्याय झाला आहे, असे सांगत सुटले होते. मी तो अहवाल संपूर्ण वाचला आहे. विलासराव देशमुख यांनी केंद्र सरकारला दिलेले पत्रही वाचले आहे. त्यावेळी वाजपेयी आणि अडवाणी हे केंद्र सरकारचे कर्णधार होते. त्यावेळच्या 11 व्या वित्त आयोगाने जाणीवपूर्वक समन्यायाची कल्पना अंमलात आणली. संपूर्ण भारतामध्ये अर्थकारणाच्या बाबतीत जी राज्य पिछाडीवर राहिलेली आहेत, मागे राहिलेली आहेत, त्यांना झुकते माप दिले. त्यालाच इंग्रजीमध्ये इक्विटी आणि मराठीत समन्याय म्हणतात. परंतु याबाबत मात्र कांगावा करण्यात आला. आम्ही महसूल वाढवितो, असे असताना आमच्यावर अन्याय केला आहे, असे त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. आता मात्र मा. राज्यपाल आणि मा. कवाडे एक गोष्ट विसरत आहेत. केंद्रीय बजेटमध्ये एक परिच्छेद बिहारसाठीच आहे. महाराष्ट्राला आणि मुंबईला हे केंद्र सरकार किती रक्कम द्यावयाला निघाले आहे, याची विचारणा त्यांनी केली असती तर आम्हाला निश्चितच आनंद वाटला असता. तुम्ही विचारणार नाही, तुम्हाला परवडणारे नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक ....

सभापती महोदय, माझ्याकडे बिझीनेस वर्ल्डचा 14 मार्चचा अंक आहे. केंद्र सरकार मुंबईच्या विकासासाठी साडेपाच हजार कोटी रुपये द्यावयाला तयार आहे. हा लेख पान क्र. 18 वर आहे. केंद्र सरकार साडेपाच हजार कोटी द्यावयाला तयार आहे. याचे कारण आमचे सरकार केंद्रात आहे. केवढा मेहरबानीचा वर्षाव चालला आहे ? मला या ठिकाणी खेदाने म्हणावेसे वाटते की, महामहीम राज्यपाल राज्याची दिशाभूल करीत आहेत. फार जबाबदारीने आणि जाणीवपूर्वक मी बोलत आहे. यामधील जे चार पैलू आहेत ते कृपा करुन आपण सर्वांनी समजून घ्यावेत. पहिला पैलू यामध्ये असा आहे. आपण गेल्या वर्षीचे मा. राज्यपाल महमद फजल यांचे भाषण वाचा. तेव्हाही मुंबईवर एक परिच्छेद खर्ची पडला आहे. गेली 10 वर्षे या बाबतची चर्चा चालली आहे. राजकारणी असतील, नोकरशहा असतील आणि कार्पोरेट कॅप्टन्स असतील त्या सगळ्यांनी जाणकारांचा सल्ला घेऊन मुंबईसाठी 9 हजार कोटी रुपयाच्या पॅकेजची मागणी केली होती. आणि केंद्र सरकार 5500 कोटी रुपये देत आहे. याचा खेद नाही की खंत नाही. अशा परिस्थितीत मा. सदस्य श्री. कवाडे मा. राज्यपालांचे अभिनंदन करावयाला निघाले आहेत.

(यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक..

सभापती महोदया, दुसरा पैलू असा की, हे जे 5500 कोटी दिले आहेत ते केवळ मुंबईसाठी नाही. " The corpus is part of a bigger urban development programme designed for 60 Urban areas in the country that includes seven mega cities, 35 smaller cities and the State Capital." मुंबईच्या वाटयाला किती येणार आहेत? हे सत्य आपण कां दडवून ठेवता? 5500 कोटी रुपये मुंबईला मिळणार असे म्हणता तर मग सत्य सांगा. माननीय राज्यपालांचे अभिनंदन आम्ही कसे करणार ते सांगा? तिसरा पैलू असा की, मी जाणीवपूर्वक सेंट्रल बजेटची कॉमेंट्री वाचत आहे." What's more, the cities need to mend their ways to avail of the funds." हे 5500 कोटी रुपये आपल्याला कंडिशनल मिळणार आहेत. मुळात ते मुंबईला मिळणार नाहीत. जी काही 5500 कोटींची दक्षिणा मिळणार आहे त्यामध्ये मुंबईवर आणि महाराष्ट्रावर केंद्र सरकारने काही बंधने घातली आहेत. तुम्ही नागरी जमीन कमाल मर्यादा करणार कां? भाडे नियंत्रण कायदा करणार कां? स्टँप डयुटी बदलणार काय? ही कंडिशनल मेहेरबानी आहे, पार्शल मेहेरबानी आहे. मला मूळ मुद्दा जरा वेगळा मांडावयाचा आहे. जेव्हा माझ्यासारखा माणूस महामहीम राज्यपालांच्या भाषणातील 5500 कोटी रुपयांच्या देणगीचा, दक्षिणेचा उल्लेख करतो. मुळात ती देणगी नाही, ते अनुदान आहे, ते कर्ज आहे हे आपण लक्षात घ्या. त्यातून काही गंभीर प्रश्न जन्माला येतात.

" The other twist in the tale is that the funds will come mostly as loans. Of the Rs. 5500 crores, only Rs. 1650 crores will be available as direct grant." आपण कृपा करुन लक्षात ठेवा. केंद्र सरकारचे बजेट हा आजच्या चर्चेचा विषय नाही. महामहीम राज्यपालांनी केंद्राचे बजेट आणि रोजगार हमी योजनेचा उल्लेख केला. पृष्ठ क्र. 7 वरील परिच्छेद क्र. 31 वर त्यासंबंधी उल्लेख आहे. त्यासंबंधी मी केंद्राचे बजेट वाचले. दुर्दैव असे की, यावेळच्या केंद्र सरकारच्या माननीय अर्थमंत्र्यांनी ग्रेट ब्रिटनमधील रॉबर्ट मिनाकॅन्सचे अनुकरण करण्याचे ठरविले. वारेमाप खर्च करावयाचा आणि त्यातून अशी अपेक्षा करायची की, कदाचित त्यातून रोजगार जन्माला येईल. जाणकार माणसे काय सांगतात ते लक्षात घ्या. केवळ पैसे खर्च करुन रोजगार जन्माला येत नसतो.

" No Government so far has taken hard decision to increase the demand for semi-skilled and unskilled labour in a

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक..

sustainable manner."या रोजगार हमी योजनेची महाराष्ट्रामध्ये काय वाट लागली हे आपल्याला माहीत आहे. चार दिवसापूर्वी कै. वि.स. पागे यांच्या पुस्तकाचे अनावरण, विमोचन झाले. बिच्चारे कै. वि.स. पागे नक्कीच स्वर्गामध्ये गडबडा लोळत असतील. रोजगार हमी योजना ही प्रॅक्टिकली भ्रष्टाचारी योजना झाली आहे. त्या योजनेच्या नावाने आपण दवंडी पिटता. तो विषय आपण आता बाजूला ठेवू. मुळात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील पान क्र. 8 वरील तिसऱ्या परिच्छेदामध्ये शिक्षकांचे कौतुक करण्यात आले आहे, शिक्षण संस्थांचे कौतुक करण्यात आले आहे. मा. श्री. जोगेंद्र कवाडे साहेब आपण प्राध्यापक आहात, हे कसे झाले हे आपण लक्षात घ्या? "मेहनत करे मुर्गा और अंडा खाए फकीर" शिक्षकांचे, शिक्षण संस्थाचे कौतुक करणे बरोबर आहे. परंतु राज्य सरकारने शिक्षण संस्थासाठी असे काय केले आहे? शाळांना वेतनेतर अनुदान दिले आहे काय? इमारतीचे भाडे दिले आहे काय? शिक्षकांचे, प्राध्यापकांचे पगार नित्य नेमाने होतात काय? शिक्षक सेवकांचे भजे करुन टाकले आहे. त्यांना 3 वर्षानंतर परमनंट केले जाईल असे आश्वासन दिले होते. त्याबद्दल खंत नाही आणि खेद नाही, गिल्टी भाव नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक . . . .

आणि आम्ही सर्वजण वल्गना करीत आहोत या गोष्टीचा मला खेद आहे. जेव्हा मी दोन्ही राज्यपालांच्या अभिभाषणाचे कम्पॅरिझन आणि कान्ट्रास्ट करण्याचे ठरविले आणि मग मला धक्का बसला. गेल्या वर्षी माजी माननीय राज्यपाल श्री.महमद फझलसाहेब यांनी याठिकाणी भाषण केले होते. कृपा करुन माननीय माजी राज्यपाल श्री.महमद फझलसाहेब यांनी आपल्या भाषणाचा शेवट कसा केला आहे ते समजून घ्या आणि आताचे महामहीम राज्यपाल हे आपल्या भाषणाचा समारोप कसा करीत आहेत ते पहा. प्लीज कम्पेअर ॲण्ड कॉन्ट्रास्ट. माझ्याकडे दोन्ही भाषणे आहेत. मागच्या वेळी माननीय माजी राज्यपाल श्री.महमद फझलसाहेब यांनी सांगितले होते की, मतदारांना दिलेले अभिवचन अंमलात आणण्यास आमचे शासन कटीबध्द आहे. आता माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख हे फार सोयीस्कररित्या या सगळया अभिवचनांमधून,आश्वासनांमधून पिछेहाट पत्करत आहेत आणि त्याचे अनडयु, इललेजिटीमेट समर्थन करीत आहेत. मला एक प्रश्न विचारावयाचा आहे की, महामहीम राज्यापालांच्या अभिभाषणामध्ये सहा महिन्यात एवढा फरक पडावा ? तुमच्याकडे पाच वर्षे आहेत आणि क्रमाक्रमाने गेल्या सहा महिन्यात पिछेहाटीला सुरुवात झाली आहे. मग तुमच्या अभिवचनावर, तुमच्या आश्वासनांवर सामान्य माणसाने कसा विश्वास ठेवावयाचा ? बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात अशी दुर्दैवाने स्थिती आहे. केंद्र सरकार काय किंवा राज्य सरकार काय, केवळ आम्ही पैसे खर्च करु, योजना काढू, अभिवचने देऊ एवढेच करीत आहेत. मला आपल्याला हे सांगावयास नको की, केंद्र शासनाच्या बजेटला आपल्याच सहयोगी सी.पी.एम.पक्षातील श्री.प्रभात पटनाईक यांच्या लेखणीतून "विंडो ड्रेसिंग" असा शब्द वापरण्यात आला आहे. ज्यो. मुलराज नावाच्या माणसाने "फॉक्सट्रॉट" असा शब्द वापवरलेला आहे. दुस-या एका जाणकार माणसाने "स्लेट ऑफ हॅण्ड" म्हणजे हातचलाखी असा शब्द वापरला आहे. आता धाकटया पातीने मोठया पातीचे अनुकरण करावयाचे नाही तर कोणाचे करावयाचे ? सगळीच हातचलाखी, बोलाची कढी आणि बोलाचाच भात. माननीय राज्यपालांचे अभिभाषण वाचून मनात विषादाची भावना उत्पन्न झाली आहे. महामहीम राज्यपालांकडून हे अपेक्षित नव्हते. सन्माननीय सदस्य आणि माझे मित्र प्रा.कवाडे यांनाही हे सत्य माहिती आहे. पण बिचारे त्याबाजूला बसलेले आहेत, त्यामुळे अभिनंदन करणार नाही तर काय करणार ? स्वाभाविकपणे महामहीम राज्यपालांचे अभिभाषण वाचून खेद वाटतो हाच निष्कर्ष कोणीही सामान्य माणूस काढेल आणि तो निष्कर्ष व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड (नामनियुक्त) : सभापती महोदय, याठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा ठराव मांडलेला आहे आणि मी देखील त्यांचे अभिनंदन करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, अभिभाषणामध्ये अनेक मुद्यांचा उहापोह करण्यात आला आहे. शासनाच्या प्रगतीचा आढावा देखील घेतलेला आहे आणि अनेक योजनांच्या बाबतीत याठिकाणी उल्लेख करण्यात आला आहे. परंतु यामध्ये आणखीही काही गोष्टींचा समावेश व्हावा अशी मी भावना व्यक्त करीत आहे. सिंचन अनुशेषाच्या बाबतीत बोलताना आम्हाला असे वाटते की, माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाप्रमाणे जे अनुशेषग्रस्त विभाग आहेत, त्यांना त्यांचा वाटा निश्चितपणे मिळाला पाहिजे. त्यासाठी नियमात आणि कायद्यात आवश्यक त्या सुधारणा आणि आवश्यक त्या दुरस्त्या कराव्या लागल्या तरी त्या केल्या पाहिजेत. विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि कोकणामध्ये सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी प्रभावी आणि कठोर अशी पावले उचलण्याची नितांत गरज आहे. शेतीमालाच्या भावाच्या बाबतीत सांगावयाचे तर शासनाने जरी हमी दिलेली असली तरी प्रत्यक्षात शेतक-यांना उत्पादनासाठी येणारा जो खर्च आहे, त्याप्रमाणात किफायतशीर भाव मिळाला पाहिजे. यासाठी देखील आपल्याला काही प्रभावी योजना आखणे अत्यंत गरजेचे आहे असे मला वाटते. कापूस एकाधिकार योजनेच्या बाबतीत आपण खूप चर्चा केली. परंतु शेतक-यांच्या दृष्टीने कापूस एकाधिकार योजना ही अत्यंत महत्वाची असल्यामुळे त्यामध्ये योग्य त्या दुरुस्त्या करुन, योग्य त्या सुधारणा करुन ही योजना यापुढेही सुरु ठेवली पाहिजे अशी तमाम महाराष्ट्रातील शेतक-यांची भावना आहे. त्यामुळे ही योजना बंद न करता, त्यामध्ये योग्य त्या सुधारणा करुन ती पुढेही सुरु ठेवावी असे मला वाटते.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड..

शिक्षणाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर शहरी शिक्षण, ग्रामीण शिक्षण, शिक्षणाचे खाजगीकरण, कायम विनाअनुदान तत्व या सगळया गोष्टींचा अभ्यास करुन शासनाची ही जबाबदारी आहे की, प्राथमिक स्तरावरील शिक्षण हे 6 ते 14 या वयोगटातील मुलांना मोफत दिले पाहिजे. पण आज मात्र या ठिकाणी कायम विना अनुदाना तत्वावर प्राथमिक शाळा देण्यात येत आहेत. तसेच माध्यमिक शाळांच्या बाबतीतही कायम विनाअनुदानाचे तत्व अंगिकारलेले आहे. आत्ताच या ठिकाणी श्री. जोगेंद्र कवाडे यांनी सांगितल्याप्रमाणे उच्च शिक्षणामध्ये आपण जे खाजगीकरण करीत आहोत, त्यामुळे सर्वसामान्य माणसाच्या मुलांना शिक्षण घेता येणार नाही, या गोष्टीचा आपण या ठिकाणी विचार केला पाहिजे. महाराष्ट्रातील लोक सैन्यामध्ये दिसत नाहीत. कर्तबगारीच्या कामावर दिसत नाहीत, अशा प्रकारची खंत आपण व्यक्त करीत होतो. त्यासाठी या ठिकाणी आपण सैनिकी शाळा काढल्या. त्या सैनिकी शाळांमध्ये आकारण्यात येणारी जी फी आहे ती फी मात्र सर्व सामान्य माणसाच्या मुलांना न परवडणारी फी आहे. ती फी कशी नियंत्रित करता येईल किंवा ती फी देण्यासाठी शासन त्याचा काही भार उचलणार आहे काय, याचा विचार या ठिकाणी झाला पाहिजे. तरच सैन्यामध्ये महाराष्ट्राच्या मर्द-मराठयाला आपले नांव कमावता येईल, असे मला वाटते.

ग्रामीण पाणी पुरवठयाच्या बाबतीत बोलत असतांना उपलब्ध पर्जन्यमान, पाण्याची पातळी कमी होणे, कोरडे पडत चाललेले पाण्याचे स्त्रोत, या सगळया गोष्टींचा विचार करुन महाराष्ट्रातील जनतेलाच नव्हे तर महाराष्ट्रातील जनावरांना पिण्याचे पाणी उपलब्ध झाले पाहिजे, यासाठी काही प्रभावी योजना राबविण्याची गरज आहे. परवा जालना येथे ग्रामीण पाणी पुरवठयाच्या नांवाखाली पाणी टंचाईच्या संदर्भात एक बैठक झाली. त्या बैठकीला मी उपस्थित होतो. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया जालन्याचे असल्यामुळे तेही त्या बैठकीला उपस्थित होते. या आढावा बैठकीत शासन यंत्रणा अत्यंत ढेपाळली असल्याचे दिसून आले. 15 मार्च नंतरही परिपत्रक "ब" भरलेले नाहीत. अंदाजपत्रक तयार झालेले नाहीत, मग ही कामे कधी सुरु होणार आणि लोकांना पाणी कधी मिळणार? असा प्रश्न आमच्या मनामध्ये उपस्थित झाला. अनेक चांगल्या योजनांचे अधिकारी कसे वाटोळे करतात याचा प्रत्यय अनेक बैठकीतून आम्हाला येतो. लोअर दूधना प्रकल्पावर या अगोदर अनेकवेळा चर्चा झालेली आहे. हा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोडीराम राठोड...

लोअर दूधना प्रकल्प पूर्ण झाला तर मंठा आणि परतूर तालुक्यातील 55 गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकतो, असे आम्ही अनेक वेळा सांगितलेले आहे. कारण या 55 गावांचा पाण्याचा उद्‌भव दूधना नदीत आहे. दूधना नदी कोरडी पडलेली आहे. लोअर दूधना प्रकल्प पूर्ण झाला तर शेतीला पाणी मिळेल तेव्हा मिळेल परंतु पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकेल अशा प्रकारची भावना आम्ही अनेक वेळा व्यक्त केली. पण तो प्रकल्प पूर्ण होत नाही. जे प्रकल्प अपूर्ण असतील आणि त्या प्रकल्पातून पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असेल, सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार असेल तर त्या प्रकल्पांना प्राधान्यांने आर्थिक तरतूद झाली पाहिजे, असे मला वाटते. सभापती महोदय, या अभिभाषणाच्या प्रतीवर नजर फिरविल्यानंतर एक मुद्दा जणवला की, सामाजिक न्याय विभागाच्या बाबतीत यात उल्लेख झालेला नाही. मागच्या वर्षी अर्थसंकल्पात आपण असे सांगितले होते की, हा अर्थसंकल्प सामाजिक न्याय देणारा अर्थसंकल्प आहे. मागासवर्गीय, भटक्या विमुक्तांना न्याय देणारा हा अर्थसंकल्प आहे. सभापती महोदय, राज्य शासनाने कितीही चांगला अर्थसंकल्प मांडला आणि कितीही चांगल्या योजना मांडल्या तरी अधिकारी त्याची कशी वाट लावतात याचा या वर्षेभरात या ठिकाणी अनुभव आलेला आहे. तांडे, वस्त्या सुधार योजनेसाठी मागच्या वर्षी साडेसतरा कोटी रुपयाचे बजेट होते. यावर्षी ते 1.5 कोटी रुपयाचे बजेट आहे. शिष्यवृत्यांसाठी पैसे उपलब्ध करुन देण्यामध्ये सामाजिक न्याय विभाग कमी पडतो. विमुक्त भटक्यां जातीच्या वसतिगृहाना पैसे देण्यासाठी सामाजिक न्याय विभाग कमी पडतो असे दिसते.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड ....

या सगळया गोष्टींकडे लक्ष दिल्यानंतर असे दिसून येते की, सामाजिक न्याय विभागाच्या, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या योजनांना पैसे उपलब्ध करुन देण्यामध्ये उदासिनता आहे. परवाच एक शिष्यवृत्ती योजना लागू झालेली आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्यात आलेली आहे. परंतु विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत वाढ करण्यात आलेली नाही. अनेक वेळा नंतर दुरुस्ती पत्रके निघतात, सुधारित आदेश निघतात. असे का घडावे ? विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी क्रिमी लेयरची जाचक अट टाकण्याचा प्रयत्न चालू आहे. एका हाताने द्यावयाचे आणि दुसऱ्या हाताने काढून घ्यावयाचे असे प्रकार अधिकाऱ्यांकडून चालू आहेत. हे कृत्य थांबविले पाहिजे. सभापती महोदया, कुपोषणाच्या बाबतीत डोंगराळ भागातील आदिवासी असतील, तांडे-पाड्यांमध्ये राहणारे लोक असतील त्यांच्या पालकांचे कुपोषण थांबविण्यासाठी सकस आहाराची योजना प्रभावीपणे राबविली पाहिजे. त्या मुलांचे कुपोषण थांबवावयास पाहिजे. त्यासाठी अधिकची तरतूद करण्याची वेळ आली तर ती केली पाहिजे आणि कुपोषण थांबविले पाहिजे. काही गोष्टी केवळ कागदावरच करुन भागणार नाही तर त्या गोष्टी प्रत्यक्षामध्ये आल्या पाहिजेत. अशा प्रकारच्या काही सूचना माझ्या मनामध्ये होत्या त्या आपल्यासमोर मांडलेल्या आहेत. मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो की, ज्या ज्या महत्वाच्या गोष्टी या ठिकाणी राहून गेलेल्या आहेत त्यांचा जर अंतर्भाव यामध्ये झाला, सामाजिक न्याय विभागाचा उल्लेख अभिभाषणाच्या एखाद्या परिच्छेदामध्ये आला तर बरे होईल. एवढे बोलून या प्रस्तावाला दुजोरा देऊन मी माझे भाषण संपवितो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आपण जो अभिनंदनाचा प्रस्ताव मांडलेला आहे त्याबाबतीत खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदया, सुनामी आली आणि अनेक लोकांचे सर्व जनजीवन उध्वस्त झाले. त्या त्सुनामीग्रस्तांच्या मदतीसाठी नेहमीप्रमाणे महाराष्ट्र पुढे आला. परंतु नेहमीप्रमाणे या महाराष्ट्राने काय केले हे पाहिले तर अजूनही सगळे बासनातच आहे. आपल्याकडे देणग्यांच्या माध्यमातून कोटयवधी रुपये जमा झाले परंतु प्रत्यक्षात काय झाले याचा अनुभव कालच्या तारांकित प्रश्नाला दिलेल्या उत्तरातून मिळतो. हा प्रश्न आम्हीच विचारलेला होता. त्यामध्ये असा प्रश्न विचारलेला आहे की, दिनांक 26 डिसेंबर, 2004 रोजी झालेल्या त्सुनामी लाटांमुळे पाँडिचरी राज्यातील उध्वस्त झालेल्या भागांचे पुनर्वसन महाराष्ट्र शासन करणार आहे हे खरे आहे काय ? यासंदर्भात असे उत्तर देण्यात आले आहे की, "पाँडेचरी राज्यातील उध्वस्त झालेल्या काही भागाचे पुनर्वसन महाराष्ट्र शासनामार्फत करण्याचे जाहीर करण्यात आले आहे." म्हणजे संपूर्ण पाँडेचरीचे पुनर्वसन करणार नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये संपूर्ण पाँडेचरीचा उल्लेख आहे. हा एक विरोधाभास आहे. "महाराष्ट्र शासनातर्फे या कामासाठी अंदाजे 55 कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आह." असे दुसऱ्या उपप्रश्नाच्या उत्तरात म्हटले आहे. पाँडेचरी शासनाने जी काही माहिती दिलेली आहे त्यानुसार 450 कोटीचे नुकसान झालेले आहे. हा दुसरा विरोधाभास आहे. आपण पुनर्वसन कधी करणार असा प्रश्न विचारलेला आहे. पुनर्वसनाचे काम आजही सुरु झालेले नाही. आपले मंत्रिमहोदय डॉ. पतंगराव कदम साहेब त्या ठिकाणी जातात, तेथील दौरा करतात, ते चारवेळा जाऊन आले परंतु प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. शासनाने प्रश्नाला दिलेल्या उत्तराप्रमाणे पुनर्वसनाचे काम एप्रिल, 2005 ला सुरु होणार आहे. म्हणजे आज कामाला सुरुवात झालेली नाही. तेथील जे पिडित आहेत त्यांना ताबडतोब मदतीची गरज आहे. ते आजही रस्त्यावर असतील. उशिरा होणाऱ्या अशा पुनर्वसनाची काय गरज ? आपण कोणाचे पुनर्वसन करीत आहात ? महाराष्ट्र शासन स्वत:चे आर्थिक पुनर्वसन करीत आहे काय ? माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये अशा प्रकारच्या गोष्टींचा उल्लेख यावा ही दुर्दैवी बाब आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी यामध्ये स्वत: लक्ष घातले पाहिजे. त्यांना दिलेली जी माहिती असेल ती किती खोटी असते ? जर आज पुनर्वसन होणार नसेल तर मग सहा महिन्यानंतर पुनर्वसन करुन काय साध्य

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करणार ? महाराष्ट्र नेहमी शेजाऱ्यांच्या मदतीला धावून जातो. त्या पूर्वपरंपरेला महाराष्ट्र शासनाने काळिमा फासण्याचे काम केलेले आहे असे मी सांगू इच्छितो. दुसरी गोष्ट अशी की, मुंबई शहर हे देशाचे आर्थिक शक्ती केंद्र आहे. त्सुनामी येऊन गेली. मुंबईसाठी सुध्दा कधी त्सुनामी येऊ शकते. त्या आपतकालीन संकटासाठी मुंबई सज्ज आहे काय ? काल परवा 5.1 रिश्टर स्केलचा भूकंप झाला. त्यामध्ये आपली काय वाताहत झाली ?

यानंतर श्री. खंदारे ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

आज आपण पश्चिम समुद्र किनारपट्टीवर आहोत. आपल्यावर त्सुनामीचे संकट केव्हाही येऊ शकते. मंत्रालयातील सातव्या मजल्यावर यासाठी असलेली संपूर्ण यंत्रणा बंद आहे. माझ्याजवळ कात्रणे आहेत. मा.श्री.विलासराव देशमुख यांनी मागील सरकारच्या वेळी प्रशासन गतीमान करण्यासाठी आणि ही यंत्रणा गतीमान करण्यासाठी 100 कोटीची तरतूद केली होती. परंतु आज मंत्रालयातील ही यंत्रणा बंद पडली आहे. आताच मांढरदेवी दुर्घटना घडली आहे. आपल्याकडे जर आपत्कालीन योजना असती तर विविध चॅनेल्सकडून माहिती मागविण्याची मंत्रालयाला गरज पडली नसती. आज हॉस्पिटल्स सुसज्ज नाहीत, ब्लड बँका सुसज्ज नाहीत, एखादी दुर्घटना घडली तर फायर ब्रिगेडची सुजज्ज यंत्रणा नाही, हेलिकॉप्टरची सोय नाही. आपण दुस-या राज्यांना मदत देण्यास नेहमी तयार असतो, परंतु आपल्या घरासाठी चांगल्या सोयी करण्याची आवश्यकता आहे. या अभिभाषणामध्ये महिलांचा उल्लेख केला आहे आणि मागील अभिषणात देखील महिलांच्या संदर्भात उल्लेख केला होता. आताच आपण महिला दिन साजरा केला आहे. आपण माजी सैनिकांच्या विधवा असतील, ज्यांना एड्स झालेला आहे. ज्यांचे पती हयात नसतील परंतु आपल्या पतीपासून एड्स झालेला असेल याबाबत मागील तिन्ही अभिभाषणांमध्ये उल्लेख केला होता याची आपल्यालाही जाणीव असेल. त्याचे पुढे काय झाले ? आपण टाळया वाजविण्यासाठी उल्लेख करता परंतु त्याचे पुढे काय झाले त्याचा परामर्श घेतला जात नाही. आज महाराष्ट्रामध्ये मुलींचे सातत्याने प्रमाण घटत आहे, त्याबाबत काय उपाययोजना केली आहे त्याचा उल्लेख अभिभाषणात नाही, गर्भलिंग चिकित्सा बंद करण्याचा उल्लेख केला जातो, परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, 1000 पुरुषांच्या प्रमाणात 888 इतके स्त्रियांचे प्रमाण आहे. उलट काही जिल्हयांमध्ये त्याहीपेक्षा अधिक प्रमाण घसरलेले आहे. त्याचा उल्लेख अभिभाषणातून केलेला नाही. आज अभिमत विद्यापीठाचा उल्लेख केला जातो. हा विषय राज्यपालांच्या अखत्यारितीमध्ये येतो. त्याविषयी काय धोरण ठरविले आहे त्याचा उल्लेख नसल्यामुळे खेद व्यक्त करीत आहे. "शासनाने पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी व नियंत्रित करण्यासाठी राज्य कृती दल स्थापन केले आहे" असे म्हटले आहे. परंतु पाण्याचे स्त्रोत रसायनांमुळे प्रदूषित झाले आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार दरवर्षी 21 लाख लोक दुषित पाण्यामुळे

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..

आजारी पडतात असे म्हटले आहे, त्याचे काय होणार आहे ? रायगड जिल्हयात सर्वात जास्त पाणी प्रदूषित आहे. हे कधी थांबणार आहे ? आज पाणी नमुना तपासणीचे काम प्राथमिक तत्वावर किमान सहा ठिकाणी सुरु केले आहे. परंतु त्यामुळे राज्यातील सर्व जिल्हयातील पाण्याची गुणवत्ता नियंत्रित होऊ शकेल काय, या दहा टक्के पाण्याचे काय होणार ? मुद्दा क्र.24 मध्ये नवसंजीवन योजनेचा उल्लेख केला आहे. आज जव्हार, मोखाडा, मेळघाट आणि नंदुरबार याठिकाणची गावे आजही रस्त्याने जोडलेली नाहीत. आज हातरु या गावाच्या रस्त्याचे काम सुरु झाले परंतु ते केवळ 1.25 कि.मी. इतके झाले आहे. उर्वरित 14 कि.मी.चे काम झालेले नाही, त्यामुळे या गावाला प्राथमिक सोयीपासून वंचित ठेवले आहे. त्याचाही उल्लेख केलेला नाही. या अभिषाणांमध्ये "आदिवासी व इतर क्षेत्रे यांच्या पायाभूत सुविधांची पातळी सुधारण्यासाठीही राज्यशासन प्रयत्नशील असल्याचे" म्हटले आहे. अशाप्रकारची ढोबळ आश्वासने दिले आहेत. आश्वासने नेहमीच दिली जातात परंतु त्याची प्रतिपूर्ती होत नाही. तुम्हाला खरोखरच कुपोषणाचा प्रश्न सोडवावयाचा असेल तर नवसंजीवन योजना जी युतीच्या काळात सुरु केली गेली आहे तिची काटेकोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे.

नंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी मा. उपसभापती)

उपसभापती : सभागृहाची वेळ 12.30 वाजेपर्यन्त होती. मा.सदस्यांचे भाषण संपेपर्यन्त सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

डॉ. दीपक सावंत : मुद्दा क्रमांक 29वर कुपोषणाचा उल्लेख केलेला आहे. राज्यातील बालकांचे कुपोषण आणि बालमृत्यू या गंभीर समस्या हाताळण्यासाठी "राजमाता जिजाऊ- माता-बाल आरोग्य आणि पोषण मिशन" स्थापन करण्यात येत आहे. उपसभापती महोदय, या सदनामध्ये कुपोषण आणि बालमृत्यू या विषयी आपल्या उपस्थितीमध्ये चर्चा झालेली आहे. या प्रश्नासंबंधी आपण किती तरी अहवाल मागविलेले आहेत. मानव विकास अहवाल मागविण्यात आला. डॉ. अभय बंग यांचा अहवाल मागविण्यात आला. या विषयावर अनेकदा चर्चा झाल्या. आता हे मिशन स्थापन करण्यात आलेले आहे. हे मिशन काय आहे यासंबंधीची माहिती दिलेली नाही. मला जी माहिती मिळाली त्यानुसार या मिशनमध्ये सर्व ब्युरोक्रॅटस् आहेत. यामध्ये एकही तज्ज्ञ व्यक्ती नाही. आदिवासी विकास विभाग, ग्रामविकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग अशा वेगवेगळया विभागातील माणसे घेऊन, सगळी मिसळ करुन हे मिशन स्थापन केलेले आहे. यामध्ये एकही पोलिटीकल विल असलेला माणूस नाही हे मी जाणीवपूर्वक नजरेस आणून देत आहे. काल "ई" टीव्हीवर मा. आरोग्यमंत्र्यांची मुलाखत दाखविण्यात आली. त्यावेळी मराठवाड्यातील सर्व रुग्णालयांची दुर्दशा दाखविली. त्या रुग्णालयांची इतकी विदारक अवस्था आहे की, त्याबाबतीत मा. आरोग्य मंत्री डॉ. विमलताई मुंदडा ह्या काहीही उत्तर देऊ शकल्या नाहीत. आज आपण सीटी स्कॅन, ऑटो ॲनलायझर यासारखी अद्यावत यंत्रणा आणून ठेवलेली आहे. परंतु ही यंत्रणा चालविण्यासाठी ऑपरेटर नाही. मग केवळ पैसे खाण्यासाठी ही यंत्रणा आणलेली आहे काय ? तेव्हा आरोग्याच्या संदर्भात जर पारदर्शकता आणावयाची असेल तर याबाबतीत शासनाने श्वेतपत्रिका काढावी असे माझे शासनाला आवाहन आहे. कुपोषणाच्या विषयाला थातूरमातूर उत्तरे देऊन ऐवढे बालमृत्यू नाही तर एवढे बालमृत्यू झाले असे सांगून चर्चा संपवितो आणि पुढच्या अधिवेशनाची वाट पाहतो. मागील अधिवेशनामध्ये मा.सदस्या डॉ. नीलम गो-हे आणि मी डॉ. अभय बंग यांचा अहवाल सदनाला सादर करण्यासाठी आटापिटा केला होता. शेवटी काय झाले ? आजही जव्हार, मोखाडा या भागात बालमृत्यू होत आहेत. शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांच्या या कुपोषणाच्या संदर्भात अतिशय तीव्र भावना आहेत आणि त्यामुळे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/

(डॉ. दीपक सावंत पुढे सुरु..)

25-30 वेळा प्रश्न उपस्थित करुनही या प्रश्नाला न्याय मिळत नाही आणि कुपोषण रोखण्यामध्ये शासन हतबल झालेले आहे हे शासनाने मान्य करावे. तेव्हा कुपोषणाच्या संदर्भात शासनाने गांभीर्याने विचार करुन कुपोषण आणि बालमृत्यू रोखण्यासाठी पावले उचलावीत एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

--

उपसभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. दुपारी 1.00 वाजता सभागृहाची बैठक पुन: भरेल.

(दुपारी 12.34 ते 1.00 वाजेर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी सभापती मा.श्री.शिवाजीराव देशमुख)

पृ.शी.व मु.शी. : हरकतीच्या मुद्दयासंबंधी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, काल सभागृहासमोरील सगळे कामकाज बाजूला सारुन नियम 289 अन्वये कापसावरील चर्चा प्राथम्याने घ्यावी अशी विनंती केली होती. त्यानंतर आपण नियम 97 अन्वये आमची विनंती मान्य करुन या विषयाच्या चर्चेस सुरुवात झाली. काल चर्चा सुरु झाली. या चर्चेत फक्त माननीय विरोधी पक्ष नेते यांनीच मत मांडले. परंतु चर्चेच्या वेळी मध्येच एक वेगळा संदर्भ आला आणि ती चर्चा एका बाजूला राहिली. आपण अडीच तासाची चर्चा मान्य केलेली होती. परंतु तेवढी वेळ काल चर्चा झालेली नाही. या विषयाच्या बाबतीत फक्त माननीय विरोधी पक्ष नेत्यांची आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. अजून अनेक सदस्यांना या विषयी भावना व्यक्त करावयाच्या आहेत. त्यामुळे ही चर्चा आज पुन्हा उपस्थित करण्यासाठी आपण परवानगी द्यावी अशी मी विनंती करतो. या विषयावर माननीय मंत्र्यांचे उत्तरही झालेले नाही. आपण जर ही चर्चा आजच्या दिवशी उपस्थित करण्यास परवानगी दिली तर शासनाच्या भावना देखील आम्हाला कळतील.

सभापती : या सदनामध्ये काल नियम 289 अन्वये चर्चा उपस्थित करु द्यावी अशी मागणी करण्यात आली त्यावेळी मी ती मागणी नाकारली. शेतक-यांच्या कापूस खरेदी संबंधीचा महत्वाचा विषय असल्यामुळे, राज्यातील सर्व विभागातील शेतक-यांचा जिव्हाळयांचा प्रश्न असल्यामुळे मी नियम 97 खाली चर्चा स्वीकारली. साधारणत: या चर्चेला अडीच तासाचा वेळ देण्यात आलेला होता. ही चर्चा सुरु झाली, तदनंतर चर्चेतच प्रश्नोत्तरे होऊ लागली. तसेच या चर्चेत थोडा वेगळा संदर्भ आल्यामुळे व काही वेळ सभागृह तहकूब करावे लागले लागल्यामुळे अनेक सदस्यांना या चर्चेत भाग घेता आला नाही ही गोष्ट खरी आहे. तसे म्हटले तर तांत्रिकदृष्टया अडीच तास चर्चा पूर्ण झालेली आहे. परंतु ही चर्चा होत असताना मंत्र्यांचे उत्तर येणे हाही महत्वाचा भाग आहे. अशा प्रकारची चर्चा सभागृहात होत असताना प्रथम विरोधी पक्ष नेते बोलत असतात, त्यानंतर गट नेत्यांनी बोलणे आवश्यक असते. कालच्या चर्चेत गट नेत्यांना देखील आपल्या भावना व्यक्त करता

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आलेल्या नाहीत. अशा चर्चेत सत्ताधारी पक्षाच्या बाजून एक दोन सदस्यांना बोलण्याची संधी दिली जाते ती देखील संधी काल दिली गेली नाही. मी या निर्णयाप्रत आलो आहे की, काल नियम 97 अन्वये मी चर्चा स्वीकारली आहे त्यास पणन मंत्र्यांनी आज उत्तर द्यावे. मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि श्री. अरविंद सावंत यांना या चर्चेत भावना व्यक्त करण्यासाठी परवनगी देणार आहे. परंतु मी सन्माननीय सदस्यांना वेळेचे बंधन घालून देणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना 7 मिनिटे आणि श्री. अरविंद सावंत यांना 5 मिनिटे बोलण्यासाठी मी परवानगी देणार आहे. पणन मंत्र्यांना किंवा संसदीय कामकाज मंत्र्यांना वाटले की, सत्ताधारी पक्षाच्या एखाद्या सदस्यास बोलण्याची परवानगी द्यावी तर त्या सदस्यासाठी मी 5 मिनिटांचा वेळ देईन. काल विधानसभेत कापसावरील निवेदन केले ते निवेदन या सभागृहात पणन मंत्री वा संसदीय कार्य मंत्री यांनी करावे. आज प्रश्नोत्तराच्या तासानंतर आपण या चर्चेस सुरुवात करु. ही चर्चा 25 ते 30 मिनिटात संपेल अशा प्रकारचा आपण प्रयत्न करु. मी ज्या सदस्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे त्यांनाच बोलण्याची मी संधी देईन. अन्य सदस्यांना संधी दिली जाणार नाही.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, काल आपण अडीच तासाची चर्चा आपण मान्य केली होती. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी हे फक्त 30 मिनिटे बोलले आहेत. आपण या चर्चेत सहभाग घेण्यास सदस्यांना बंधन घातले आहे. राज्यातील शेतक-यांचा अतिशय महत्वाचा हा प्रश्न आहे.यावर काल फक्त 30 मिनिटांची चर्चा झालेली आहे. उर्वरित वेळ शिल्लक आहे म्हणून इतर सदस्यांना देखील चर्चेत भाग घेण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी अशी मी आपणास विनंती करतो.

यानंतर श्री. उपरे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीपाठी नाही

सभापती : मी रुलींग पूर्ण केलेले आहे. दिनांक 15, 16 आणि 17 मार्च या तीन दिवसांमध्ये नियम 289 च्या अनुषंगानेही आपण चर्चा केली. कापूस या अनुषंगानेही आपण चर्चा केली. महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतक-यांचे पीक यादृष्टीनेसुध्दा अनेक सन्माननीय सभासद या सदनामध्ये बोलले आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांच्याबरोबर माझी दालनात चर्चा झाली आहे आणि त्यानंतर मी हा निर्णय घेतला आहे. त्या निर्णयाप्रमाणे काम होईल. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे 5 मिनिटांऐवजी 10 मिनिटे बोलतील आणि सन्मासननीय सदस्य श्री.अरविंद सावंत हे 7 मिनिटे बोलतील.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. दोन-तीन दिवस या निमित्ताने काही प्रश्न या सभागृहामध्ये चर्चेला आलेले आहेत. या ठिकाणी चर्चा का झाली, विरोधी पक्षांनी बहिष्कार का घातला, विरोधी पक्षांनी उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांचा या ठिकाणी राजिनामा का मागितला, हे प्रश्न जर या चर्चेच्या अनुषंगाने उपस्थित झाले तर या बाजूच्या काही सन्माननीय सदस्यांना त्या संदर्भात स्पष्टीकरण करावयाचे असेल तर आपण त्यांना न्याय दिला पाहिजे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, मघाशी मी असे सांगितले की, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि श्री.अरविंद सावंत हे बोलतील. सन्माननीय मंत्री महोदय या अनुषंगाने उत्तर देतील. त्याचवेळी मी असेही सांगितले की, सत्तारुढ पक्षाच्या एकदोन सभासदांना बोलण्याची आवश्यकता वाटली तर त्यांनाही मी परवानगी देईन. पण कोणत्याही परिस्थितीत मी सांगितलेले वेळेचे जे बंधन आहे ते आपल्या सगळ्यांनाच पाळावे लागेल. मंत्र्यांनी केलेल्या निवेदनावरसुध्दा मी तीन प्रश्नापेक्षा जास्त प्रश्न विचारण्यास परवानगी देणार नाही.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, आपली चर्चा 289 खाली झाली आहे काय ?

सभापती : तुम्ही असे सांगितले की, 289 खाली जे तुम्ही मागितले त्याचा निर्णय 97 प्रमाणे दिला.

श्री.विलासराव शिंदे : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तरांच्या यादीतील अनुक्रमांक 11 वर असलेला प्रश्न महाराष्ट्रातल्या शेतक-यांच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचा असल्याने या प्रश्नाला प्राधान्य देण्यात यावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : अन्य मार्गाने या प्रश्नाला प्राधान्य द्यायचे असेल तर कसे द्यावयाचे ते मी पहातो. तरी यासंदर्भात आपण माझ्या दालनात यावे.

श्री.विलासराव शिंदे : ठीक आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कापसाच्या प्रश्नावर काल या ठिकाणी नियम 298 अन्वये चर्चा करावी असा आम्ही आग्रह धरीत असताना या सदनातील सन्माननीय सदस्य मेजर सुधीर सावंतसाहेब हे उभे राहिले आणि अशी चर्चा करण्यामध्ये आमच्या प्रश्नोत्तराच्या तासावर अन्याय होतो असे ते म्हणाले. प्रश्नोत्तरांचा तास हा पवित्र असतो असेही ते म्हणाले. त्यावेळी आम्ही असे म्हटले की, पहिल्या दिवशी आपण कोठे होता ? मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, प्रश्नोत्तरांचा तास पवित्र आहे, अत्यंत महत्वाचा आहे, असे ज्यांना वाटते ते सन्माननीय सदस्य पहिल्या दिवशी येथे आले होते. दरवाजात आम्ही त्यांना पाहिले होते. त्यांनी सही केली होती. पण अशा पवित्र तासाला ते हजर राहू शकले नाहीत. म्हणजे लोका सांगे ब्रह्म ज्ञान.... अशा प्रकारे त्यांची प्रवृत्ती या सभागृहात प्रचलित झालेली आहे. काल शेतक-यांच्या प्रश्नावर ते आम्हाला अडवित होते. म्हणून हा हरकतीचा मुद्दा मी काढला आहे.

मेजर सुधीर सावंत : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा अत्यंत आभारी आहे. त्यांनी अशा प्रकारे हरकतीचा मुद्दा अुपस्थित करून आमच्या सही करण्यावर आक्षेप घेतला असेल किंवा नसेलही. पण सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तरांचा तास हा.....

सभापती : ही चर्चा आपण येथेच थांबवू.

मेजर सुधीर सावंत : सभापती महोदय, त्यांनी व्यक्तिगत आक्षेप घेतल्यामुळे त्यासंदर्भात उत्तर देणे हे माझे काम आहे. त्यामुळे मला उत्तर दिलेच पाहिजे. प्रश्नोतरांच्या तासामध्ये असा मुद्दा उपस्थित करण्याचे औचित्य काय हेही आपण पाहिले पाहिजे.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

(यानंतर श्री.गायकवाड)

मेजर सावंत .

यामध्ये मी एकच विषय या ठिकाणी मांडत आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांना जे काही सांगावयाचे असेल ते त्यांनी एका वाक्यात सांगावे.

मेजर सुधीर सावंत : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास हा अतिशय महत्वाचा आहे ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेले असतात ते सदस्य प्रश्नोत्तराच्या तासामध्ये उपस्थित असतात. मात्र सगळेच सन्माननीय सदस्य प्रत्येक वेळी उपस्थित नसतात. त्याबाबतीत आम्हालासुध्दा आपला रेकॉर्ड माहीत आहे. ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला असतो त्यांच्या दृष्टीने प्रश्नोत्तराचा तास महत्वाचा असतो. या ठिकाणी जो मुद्दा मांडण्यात आलेला आहे तो मुद्दा केव्हाही मांडता आला असता. सभापती महोदय, मला आपल्याला एकच विनंती करावयाची आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

मेजर सुधीर सावंत :सभापती महोदय, मी आपल्याला एकच विनंती करतो की, कोणत्याही सदस्याला प्रश्नोत्तराच्या तासात कोणताही विषय उपस्थित करु देता कामा नये.या संदर्भात सदनाने नियम तयार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे. आता प्रश्नोत्तरे घेण्यात येतील.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.मु.शी : तोंडी उत्तरे 13.10

शासनाच्या मोफत पुस्तक योजनेबाबत

(१) * १६७६ श्रीमती संजीवनी रायकर , श्री. रामनाथ मोते , श्री. मधुकर चव्हाण , डॉ. अशोक मोडक , श्री. विनोद तावडे , श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत , श्री. दिवाकर रावते , श्री. अनिल परब , श्री. अनंत तरे , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. नानासाहेब बोरस्ते , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जयंत पाटील , श्री. रमेश निकोसे , प्रा. जोगेंद्र कवाडे : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील ज ाय :-

(१) राज्य शासनाने सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके या योजनेच्या अंमलबजावणीतून आलेले अनुभव लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष २००५-२००६ करिता सुधारित स्वरुपात योजना राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या सुधारित प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे?

श्री.हसन मुश्रीफ,प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता : (१), (२) व (३) राज्य शासनाने सन २००५-२००६ या आगामी वर्षात, शैक्षणिक वर्ष २००४-२००५ मध्ये सर्व शिक्षा अभियान योजनेतील लाभार्थी वगळता, इतर सर्व विद्यार्थ्यांना तसेच इयत्ता ९ वी व १० वी तील विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तके पुरविण्यात आलेली योजना बंद केली आहे.

स-ा २००५-२००६ या वर्षी मोफत पाठयपुस्तक योजनेची व्याप्ती केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियान योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांपुरती मर्यादित ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

मात्र सर्व शिक्षा योजनेंतर्गत असलेले विद्यार्थी व पुस्तकपेढी अंतर्गत असणारे लाभार्थी वगळून, इयत्ता ३ री ते ८ वी तील दारिद्रय रेषेखालील विद्यार्थी, भटक्या व विमुक्त जमातीतील सर्व विद्यार्थी, इतर मागासवर्गीय विद्यार्थी, गरजू विद्यार्थी आणि इयत्ता ९ वी व १० वी तील सर्व मुली, अनुसूचित जाती जमाती, विमुक्त व भटक्या जाती जमाती, दारिद्रय रेषेखालील विद्यार्थी व इतर मागासवर्गीय व गरजू विद्यार्थी यांना, शैक्षणिक वर्ष २००४-२००५ मध्ये वाटप केलेल्या पुस्तकांपैकी परत प्राप्त झालेली पुस्तके, पुर्नवाटपाने दोन वर्षासाठी वितरीत करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, या संबंधीची पूर्वपिठीका मी आपल्याला थोडक्यात सांगते.डिसेंबर 2003 च्या अधिवेशनामध्ये शासनाने ठरविले की, नवीन निविदा मागवावयाच्या त्यानंतर जून महिन्यात पाठयपुस्तके छापून होतील. त्यावेळी मी लक्षवेधी सूचना आणि नियम 93 अन्वये सूचना मांडली होती.त्यावेळी असा प्रश्न उपस्थित केला होता की, उशिरा निविदा मागविण्यात आल्या आहेत त्यामुळे वेळेत पुस्तके छापून येणार नाहीत.त्यामुळे या वर्षी ही योजना सुरु करण्यात येऊ नये त्या ऐवजी पुढच्या वर्षी योजना सुरु केली तरी चालेल.तेव्हा त्यावेळच्या शिक्षण मंत्र्यानी असे उत्तर दिले होते की,"भ्रष्टाचार निपटून काढावयाचा असल्यामुळे या

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वर्षी निविदा काढू व जूनच्या आत पुस्तके छापून तयार होतील." त्यामुळे काही शिक्षक प्रतिनिधींनी माननीय शिक्षण मंत्र्यांचे अभिनंदन केले होते. वेळेत पुस्तके छापून आली तर ते ठीक होते परंतु डिसेंबर महिन्यात पाठयपुस्तके छापण्याला सुरुवात करण्यात येणार असल्यामुळे जून महिन्यात पुस्तके छापून होणार नाहीत हे आम्हाला माहीत होते. म्हणून आमचा त्याला त्यावेळी विरोध होता पंरतु शासनाने त्यावेळी आमचे ऐकले नाही. जो काही घोटाळा व्हावयाचा होता तो झाला .आता वार्षिक परीक्षा सुरु होईपर्यन्त पाठय पुस्तके वाटपाचे काम सुरु होते. एवढेच नव्हे तर पाठयपुस्तकामध्ये अनेक दोष आहेत. त्याची बांधणीसुध्दा नीट नाही. पुस्तकामध्ये कोण कोणत्या चुका आहेत हे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने सांगितलेले आहे. या संदर्भात त्यांनी सगळे स्पष्टीकरण केलेले आहे. तेव्हा चुकासहित ही पाठयपुस्तके विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पाठयपुस्तके देण्याच्या बाबतीत मागील वर्षी थोडासा विलंब झाला आणि त्यामध्ये अनेक अडचणी आल्या होत्या ही वस्तुस्थिती आहे.या वर्षी जून महिन्यात विद्यार्थ्यांना पुस्तके मिळतील व त्यामध्ये कोणताही दोष राहणार नाही अशी व्यवस्था शासनाने केलेली आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिलेले आहे की, जून महिन्यापासून ही योजना पुन्हा सुरु करण्यात येईल . त्यामध्ये दोन भाग आहेत पहिला भाग असा आहे की, सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत केन्द्र सरकारकडून पुरवठा होणारी पाठयपुस्तके आणि दुसरा भाग असा आहे की, राज्य सरकारकडून पुरविण्यात येणारी पाठयपुस्तके तेव्हा या दोन्ही योजना जून महिन्या पासून सुरु करण्यात येणार आहेत काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासनाने आता या योजनेचा पुर्नविचार केलेला आहे.सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत पहिली ते आठवीपर्यन्तच्या सर्व मुलींना त्यानंतर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या समाजातील सर्व मुला मुलींना मोफत पाठयपुस्तके आपण देत असतो. त्याकरता केन्द्र सरकार 53 कोटी रुपये महाराष्ट्र शासनाला देत असते आणि पाठयपुस्तक मंडळाच्या वतीने महाराष्ट्र शासन ही पुस्तके छापत असते.दुसरी योजना अशी आहे की,गेल्या वर्षी 12 कोटी पुस्तके पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शासनाने मोफत दिलेली आहेत.त्यातील 70 टक्के पुस्तके आम्ही जी पुस्तक पेढी निर्माण केलेली आहे त्यातून येतील आणि ती पुस्तके

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दारिद्रय रेषेखालील मुले, भटक्या व विमुक्त जमातीची तसेच ओ.बी.सी.च्या मुला मुलीना देण्याचा शासनाचा मानस आहे.अशा प्रकारची योजना राज्य शासनाने आखलेली आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : 2004-2005 साली राज्य शासनाची आणि केन्द्र सरकारची योजना होती. तेव्हा या दोन्ही योजना आपण जून पासून जशीच्या तशी आपण लागू करणार आहात काय ?

श्री.हसीन मुश्रीफ : त्यात बदल केलेला आहे हे मी सांगितलेले आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : ही योजना जशीच्या तशी सर्व विद्यार्थ्यासाठी लागू करण्यात येणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : शासन जशीच्या तशी योजना स्वीकारणार नाही. त्यामध्ये आपल्याला अनेक अडचणी आल्या होत्या. ज्याची ऐपत आहे त्या पालकाच्या मुलालासुध्दा मोफत पाठयपुस्तके द्यावयाची काय ? त्यामुळे आपण त्याबाबतीत निर्णय घेत आहोत.

नंतर श्री.कानडे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1676 पुढे सुरु ....

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरामध्ये शासनाने स्पष्ट केले आहे की, सन 2005-2006 या आगामी वर्षात शैक्षणिक वर्ष 2004-05 मध्ये सर्व शिक्षा अभियान योजनेतील लाभार्थी वगळाता इतर सर्व विद्यार्थ्यांना तसेच इ. 9 वी आणि 10 तील विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तके पुरविण्यात आलेली योजना बंद केली आहे. माझा प्रश्न असा आहे की, शालेय शिक्षण विभागाने ही योजना चालू ठेवण्याबाबत वित्त विभागाला प्रस्ताव पाठविला होता काय ? त्याचप्रमाणे केवळ 8 वी किंवा 10 वी च्या गटापर्यंत असा भेदभाव न करता सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तके द्यावीत असा न्यायालयीन निवाडा झाला होता याची शासनाला माहिती आहे काय ?या निवाडयाचे शासन पालन करणार आहे काय ? तसेच उत्तरामध्ये म्हटले आहे की, 2004-05 या वर्षातील पुस्तके आम्ही परत घेणार आहोत आणि त्याचे पुनर्वाटप करणार आहोत. परंतु ही पुस्तके पुनर्वाटप करण्याच्या अवस्थेमध्ये आहेत काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पहिली ते आठवीपर्यंतची सर्व शिक्षा अभियानातील मुली,आदिवासी,अनु.जातीमधील मुलांना आपण मोफत पुस्तके देतो. पहिली आणि दुसरीमधील विद्यार्थ्यांची पुस्तके हाताळताना फाटली असण्याची शक्यता आहे. तिसरी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची पुस्तके आपण देणार आहोत. पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत मोफत पुस्तके देण्याची व्यवस्था शासन करणार आहे. पुस्तके पुरतील असा शासनाला विश्वास आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना सांगितले की, 2004-05 या आर्थिक वर्षामध्ये सर्व शाळांमधून पुस्तकांचे वाटप झालेले आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सदरहू पुस्तके शाळांना केव्हा देण्यात आली ? महाराष्ट्रातील किती विद्यार्थ्यांना या पुस्तकांचा लाभ झाला आणि किती विद्यार्थी या लाभापासून वंचित राहिले ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना 12 कोटी पुस्तके मोफत दिली. त्यानंतर उच्च न्यायालयामध्ये प्रिंटर्स गेले. मध्यंतरी ट्रकचा संप झाला अशा प्रकारच्या अनेक अडचणींमुळे पुस्तके वाटपास उशीर झाला. पुस्तके वेळेवर न मिळाल्याने परिक्षेचा कालावधी देखील वाढविला होता. यावर्षी जूनपर्यंत पुस्तके मिळतील याबाबत शासनाचा कटाक्ष राहील आणि पुस्तके वेळेवर मिळतील.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1676 पुढे सुरु...

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, प्रिंटींगसाठी शासन जो खर्च करणार आहे तो कसा करणार आहे ? पुस्तकांचे पुनर्वाटप होणार आहे. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत काही घटकांना पुस्तके मिळाली नाहीत. मूळ योजनेत बदल केल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना या योजनेपासून वंचित रहावे लागले अशा वंचित विद्यार्थ्यांची संख्या किती ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, गेल्या वर्षी पहिली ते दहावीपर्यंतच्या 1 कोटी 70 लाख 20 हजार 413 विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तके दिली. सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत 93 लाख 45 हजार 913 विद्यार्थ्यांना पुस्तके दिली. राहिलेल्या 26 लाख 2 हजार 859 विद्यार्थ्यांना पुस्तकपेढीद्वारे पुस्तके देण्याचा प्रयत्न आहे. इतर मागासवर्गीय, गोरगरीब,गरजू विद्यार्थ्यांना पहिल्यांदा पुस्तके देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

यानंतर श्री. सुंबरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 1676 ....

श्री. वसंतराव खोटरे : अध्यक्ष महाराज, मागील वेळेस या योजनेखाली मोफत पुस्तके वाटपासाठी दिली होती आणि त्यासाठी शासनाने प्रत्येक शाळेला पुस्तके देण्यासाठी म्हणून वाहतूक भत्ता देखील दिलेला होता. त्यानुसार प्रत्येक शाळेसाठी 25 हजार रुपये ॲडव्हान्स दिलेला होता. पण त्यातून कोणत्याही शाळेला अजून एकही पैसा शिक्षण अधिकाऱ्यांनी दिलेला नाही. तरी याबाबत आपण चौकशी करून संबंधितांवर कारवाई करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महाराज, ही बाब तपासून पाहिली जाईल आणि जे कोणी संबंधित दोषी असतील त्यांचेवर कारवाई करण्यात येईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : अध्यक्ष महाराज, प्रत्येक तालुक्याच्या पातळीवर या पुस्तकांच्या वितरण व्यवस्थेसाठी प्रत्येक शाळेमागे 25 हजार रुपये अग्रीम रक्कम दिली होती आणि त्यातून शाळांना पुस्तके पोहोचवावयाची होती. परंतु तेथील आपल्या शिक्षण अधिकाऱ्यांनी या रकमेतून पुस्तके पोहोचविली नाहीतच उलट शाळांनाच पुस्तके घेऊन जाण्यास सांगितले गेले आणि त्याप्रमाणे प्रत्येक शाळांच्या मुख्याध्यापकांनी पुस्तके स्वत: खर्च करून नेलेली आहेत मात्र त्याच्या वाहतुकीच्या खोट्या रिसिटस् तयार करून ते पैसे आपल्या अधिकाऱ्यांनी हडप केलेले आहेत. अशा प्रकारे या मध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. तेव्हा या भ्रष्टाचाराचा चौकशी 15 दिवसात करून त्याबाबतचे निवेदन सभागृहामध्ये आपण करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महाराज, एक महिन्यामध्ये याबाबत चौकशी करून ...

सभापती : हे अधिवेशन संपण्यापूर्वी ...

श्री. हसन मुश्रीफ : होय, हे अधिवेशन संपण्यापूर्वी त्याबाबतचे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. विलास अवचट : अध्यक्ष महाराज, सवंग लोकप्रियतेसाठी कशा प्रकारे योजना लागू करतात याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. या सभागृहामध्ये गेल्या वेळेस बहुतेक सगळ्यांनीच या योजनेसंदर्भात तक्रारी केल्या होत्या. विशेष म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या ठिकाणी पुस्तके आणून देखील दाखविली होती. या योजनेतून देण्यात येत असलेली पुस्तके अत्यंत निकृष्ट दर्जाची होती, त्यांची बांधणी देखील योग्य प्रकारे केलेली नव्हती, प्रिंटींग व्यवस्थित नव्हते वगैरे अनेक तक्रारी त्याबाबत आपल्याकडे करण्यात आल्या होत्या. अशा तक्रारी आपल्याकडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आल्या नंतर संबंधितां विरूद्ध आपण काय कारवाई केली होती ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महाराज, कल्याणकारी राज्य राबवित असताना, कल्याणकारी योजना राबवित असताना अशा काही चुका होणारच. म्हणूनच आम्ही या बाबतीत टेंडर पध्दती ठेवण्याचा निर्णय घेतला होता आणि त्यामध्ये 15 कोटीची बचत झालेली होती. सन्माननीय सदस्यांनी चुका झाल्याचे सांगितले, ते बरोबर आहे. पण या चुका फारशा नव्हत्या. 12 कोटी मध्ये ..98 एवढ्याच चुका होत्या. त्या संबंधात संबंधित प्रिंटर्स आणि बाईंडर्स होते त्यांच्या लक्षात आपण या गोष्टी आणून दिल्या आहेत शिवाय त्यापैकी काही लोकांना आपण ब्लॅकलिस्टेड देखील करण्याचे काम मंडळाने केलेले आहे.

श्रीमती कांता नलावडे : अध्यक्ष महाराज, या उत्तराच्या शेवटी आपण म्हटले आहे की, '..वाटप केलेल्या पुस्तकांपैकी परत प्राप्त झालेली पुस्तके, पुनर्वाटपाने दोन वर्षांसाठी वितरित करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.' अध्यक्ष महाराज, मुळातच या पुस्तकांचा दर्जा कसा आहे ते या ठिकाणी सांगितले गेले आहे आणि शासनाकडून देखील ते मान्य केलेले आहे. शिवाय या पाठ्यपुस्तकांमध्ये अनेक चुका आहेत आणि या पुनर्वाटपामुळे त्या चुका असलेलीच पुस्तके पुन्हा विद्यार्थ्यांच्या हाती जाणार आहेत. म्हणजेच आपण चुका दुरुस्त करण्यासाठी वा संपूर्णत: निर्दोष अशी पुस्तके विद्यार्थ्यांच्या हाती जाण्याच्या दृष्टीने ती पुस्तके रिप्रिंट न करताच विद्यार्थ्यांना देणार आहात काय ? त्यातील एका पुस्तकामध्ये 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलितांचे नेते' असा उल्लेख इ ालेला आहे. हे उदाहरण म्हणून मी सांगितले. तर अशा प्रकारे प्रत्येक विषयाच्या पुस्तकांमध्ये चुका आहेत आणि पुनर्वाटपामुळे ती चुका असलेलीच पुस्तके विद्यार्थ्यांच्या हाती जाणार आहेत. खरे तर दर्जेदार पुस्तके विद्यार्थ्यांना मिळणे हा विद्यार्थ्यांचा हक्क आहे. त्यासाठी ही पुस्तके रिप्रिंट करूनच सर्व विद्यार्थ्यांना आपण देणार का ? दुसरे असे की, वर्गामध्ये पुस्तके वाटप करताना कोण दलित आहे असा उल्लेख करून पुस्तके दिली जात होती तर अशा गोष्टी आपण टाळणार आहात की नाही ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महाराज, असा उल्लेख झाल्यामुळेच गेल्या वर्षी आपण ही पुस्तके सरसकट देण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळेच मग ऐपत असणाऱ्यांना मोफत पुस्तके नको म्हणूनही मागणी आली आणि त्यामुळे आपण ही योजना बदलली आहे. आता जी पुस्तके परत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घेतलेली आहेत त्यामध्ये जी चांगली पुस्तके असतील तीच आपण विद्यार्थ्यांना पुनर्वाटप करू. आमचा विश्वास आहे की, 70 टक्के पुस्तकांमध्ये पहिली ते आठवी पर्यंतच्या मुलांना पुनर्वाटप करू शकू, ते पुरेसे झाले नाही तर त्याचा विचार करू.

श्री. जी.एल.ऐनापुरे : अध्यक्ष महाराज, वास्तविक सर्वांना मोफत पुस्तके देण्याचा सरकारने चांगला विचार केला होता आणि त्याबद्दल सरकारचे मी अभिनंदन देखील केले होते. अशाच प्रकारे यापूर्वी इबीसी ची योजना लागू केली होती तेव्हाही ओरडा झाला होता पण या योजनेचा फायदा ही मोठ्या प्रमाणात लोकांना झाला. अर्थात अशा योजनांमध्ये काही दोष असतील तर त्याची चौकशी करून, ते दूर करता येतात. त्याप्रमाणे करून ही पुस्तके सर्व.. विनाअनुदानित शाळांसह सर्व शाळांना वाटण्याचे धोरण सरकार चालू ठेवील काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यख महाराज, मी यापूर्वीच सांगितले आहे की, याबाबतीतील धोरण आपण बदलले आहे म्हणूनच या सर्व शिक्षा अभियाना संबंधात आपण जी सूचना केली आहे ती अमलात आणण्यात येईल.

(यानंतर श्री. जागडे .... केके 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद पाटील : सभापती महोदय, गेल्या वर्षी या राज्यात मोफत पाठ्यपुस्तक योजना राबविण्यात आली होती. त्यावेळी दुसरी पुस्ते बाजारात येता कामा नयेत, असे निर्बंध शासनातर्फे घातले गेले होते. त्यामुळें दुसरी पुस्तके बाजारात आली नाही आणि शासनानेही वेळीच पुस्तके आणलेली नाहीत. आता या वर्षी तरी निश्चितपणे बाजारात पुस्तके उपलब्ध केली जातील काय ?

श्री. हसन मुश्रीफ : बाजारात पुस्तके उपलब्ध होतील.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील गटई कामगारांना स्टॉल व ५०० रुपये अनुदान मिळणेबाबत

(२) * ४१९० श्री. नातिकोद्दीन खतिब , श्री. संजय दत्त , श्रीमती सुधा जोशी , श्री. धनाजी साठे :

सन्माननीय सामाजिक न्याय व व्यसन मुक्ती कार्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गटई काम करणाऱ्या गटई कामगारांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी ग्रामपंचायत व नगरपालिका या क्षेत्रात शासनाने १०० टक्के शासकीय अनुदानातून पत्र्याचे स्टॉल व रुपये ५००/- रोख अनुदान देण्याचा निर्णय सन १९९७-९८ या वर्षापासून घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हयात सन २००२-२००३ या वर्षापासून उपरोक्त योजनेसाठी शासनाने अनुदान दिले नसल्याने ते लवकरात लवकर देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांना दिनांक २.६.२००४ रोजी वा त्यादरम्यान एक लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे ज्ाय,

(३) असल्यास, शासनाने प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार गटई कामगारांना स्टॉल व ५०० रुपये अनुदान देणेबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय?

श्री. धर्मरावबाबा आत्राम, श्री. चंद्रकांत हंडोरे यांच्याकरिता : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) ठाणे जिल्ह्यात सन २००२-२००३ या वर्षात शासनाकडून रु.३.०७ लाख इतकी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली असून ती १००% खर्च करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नतिकोद्दीन खतिब : सभापति महोदय, वर्ष 2002-03 में ठाणे जिले में कितने गटई कामगारों को अुनदान दिया गया है ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापति महोदय, ठाणे जिले में 50 लाभार्थियों को 3 लाख 7 हजार रुपये दिए गए हैं.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, गटई कामगारांचे पोट हे हातावर असते. 2003-2004 या वर्षापासून या योजनेसाठी शासनाने अनुदान न दिल्यामुळे 3 जून 2004 रोजी सामाजिक न्याय मंत्र्यांना एक निवेदन देण्यात आले आहे. तसेच उत्तरामध्ये असे म्हंटले आहे की, " ठाणे जिल्ह्यात सन 2002-2003 या वर्षात शासनाकडून रु. 3.07 लाख इतकी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली असून ती 100 टक्के खर्च करण्यात आलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, किती गटई कामगारांनी अर्ज केले होते आणि किती कामगारांना ही रक्कम देण्यात आली आहे ? तसेच लाभार्थींची निवड करीत असताना कोणते निकष लावण्यात आले होते ? तसेच 2003-04 आणि 2004-05 या वर्षाच्या अनुदानाबाबतची काय परिस्थिती आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, ही योजना 1997-98 सालापासून अंमलात आली आहे. या बाबतची सर्व यादी मी पटलावर ठेवावयाला तयार आहे. मला या बाबत असे सांगावयाचे आहे की, 50 लाभार्थींचे अर्ज मंजूर झाले असून त्यांना 3.07 लाख रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे अनुदानाचा खर्च पूर्णपणाने झालेला आहे ?

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, 2003-04 आणि 2004-05 या वर्षाच्या अनुदानाची काय परिस्थिती आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आपण ही योजना शासनामार्फत सुरुवातीपासून राबवित होतो. आता ही योजना लिडकॉमच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संपाबाबत शासननिर्णयाच्या विरोधात संचालकांनी काढलेले परिपत्रक

(३) * १६८३ श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. -ानासाहेब बोरस्ते , प्रा. शरद पाटील , श्री. रमेश निकोसे : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १७ जानेवारी, २००४ च्या शासननिर्णयान्वये द्विलक्षी व एम.सी.व्ही.सी. चा अभ्यासक्रम शिज विजा-या शिक्षक/निदेशकांचा ४२ दिवसांचा संप कालावधी देय व अनुज्ञेय रजा म्हणून नियमित करण्याचा आदेश शासनाने दिलेला असताना शासनाच्या आदेशाशिवाय आपल्या दिनांक १९ ऑक्टोबर,२००४ च्या परिपत्रकान्वये नागपूर अधिवेशनावर मोर्चा (लाँग मार्च) काढला म्हणून आय.टी.आय. निदेशकांचे २ ते ३ दिवसाचे वेतन कपात करण्याचे आदेश भेदभावपूर्ण वागणूक देणार आहेत अशी तक्रार महाराष्ट्र राज्य आय.टी.आय.निदेशक संघटनेच्या कार्यवाहांनी प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांच्याकडे ४ डिसेंबर, २००४ रोजी किंवा त्या दरम्यान केली हे खरे आहे काय,

(२) सदरहू तक्रारीत प्रथम दर्शनी तथ्य आढळून आल्याने मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी दिनांक १७ डिसेंबर, २००४ रोजी किंवा त्या दरम्यान उपरोक्त कारवाईस स्थगिती दिली हे खरे आहे काय,

(३) "रजा घेणे हा संपाचा प्रकार" व मान्य रजा असली तरी "सचोटी व कर्तव्य परायणतेच्या " ती गोष्ट विरुध्द आहे, यासारखी आक्षेपार्ह विधाने व आवश्यक सेवेचा चुकीचा अर्थ लावणे, इत्यादी दोष १९ ऑक्टोबर, २००४ च्या परिपत्रकात असल्याचे ४ डिसेंबर, २००४ च्या तक्रारीत नमुद आहे हेही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : (१) होय.

(२) होय.

प्रत्यक्ष वस्तुस्थिती समजून घेवून त्यावर निर्णय होईपर्यन्त स्थगिती दिली आहे.

(३) अशा प्रकारचा उल्लेख दिनांक ४ डिसेंबर,२००४ च्या तक्रारीमध्ये आढळून येत नाही.

(४) शासकीय कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचा मुलभूत नियम १७ (ए) व दिनांक १ मे,१९९१ च्या आदेशानुसार संप कालावधीतील अनुपस्थितीचे वेतन संप करणाऱ्यां कर्मचाऱ्यांना देय ठरत नाही. लाक्षणिक संपाबाबत केंद्रशासनाचे काम नाही वेतन नाही हे धोरण राज्य शासनाने अनुसरले आहे. सामुहिक रजा घेणे हा एक प्रकारचा संप असल्याने वरील कालावधीतील सामुहिक रजेचा कालावधी विनावेतन म्हणून ग्राह्य धरण्यात यावा असा निर्णय शासनाने घेतला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, व्यावसायिक शिक्षकांना तसेच निदेशकांना माध्यमिक शिक्षकांची वेतनश्रेणी दिली जाते. परंतु गेल्या पाच ते सात वर्षे ही वेतनश्रेणी दिली नाही. या बाबत 17 जानेवारीला शासनाने जी. आर. काढला. 42 दिवसांचा संपाचा कालावधी हा नियमित करण्यात आला. तसेच या दिवसांची वेतनाची रक्कम संबंधीत शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधीत जमा केली आहे. आपण याप्रमाणे या लोकांना न्याय दिला आहे.

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ SBT/ 13:30

ता.प्र.क्र. 1683...

प्रा. बी. टी. देशमुख...

प्रश्न असा आहे की, या सर्व लोकांनी त्या संपाला विरोध केला नव्हता. मोर्चा काढण्यासाठी दोन-तीन दिवसांची रजा मान्य करण्यात आली होती व त्यांना रजेचे वेतन देण्यात आले होते. यामध्ये पुष्कळ चुकीच्या गोष्टी आल्या आहेत त्याबाबत प्रश्न विचारुन मी सभागृहाचा वेळ घेत नाही. मी एकच प्रश्न विचारतो की., त्यांची रजा मान्य करण्यात आली होती व त्यानंतर हा आदेश निघाला. असे जर होत असेल तर आपल्या वरिष्ठांवर कुणाचाही विश्वास रहाणार नाही. प्रश्न असा की, त्यांचे वेतन झाले होते हे खरे आहे काय? असेल तर हे आदेश रद्द केले जातील काय?

श्री. दिलीप वळसे पाटील : शासकीय कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी वेळो वेळी अनेक आंदोलने केली आहेत त्याचाच एक भाग म्हणून 42 दिवसांचा संप करण्यात आला होता. वेतनश्रेणी आणि 42 दिवसांच्या संपाचे वेतन या संदर्भात दिर्घ काळापासून शासन दरबारी त्यांची मागणी प्रलंबित होती. तिला वाचा फोडण्यासाठी त्यांनी पुन्हा तीन दिवसांचा लाँग मार्च काढला. आणि मग सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये 42 दिवसाच्या संपाच्या कालावधीबाबत त्यांना न्याय देण्याचा निर्णय घेतला व तसे सभागृहात सांगितले होते. परंतु प्रश्न असा निर्माण झाला की, 42 दिवसांच्या संपाच्या रजेचा निर्णय राज्य सरकारने मंत्रिमंडळात घेतला, त्यामध्ये या तीन दिवसांच्या रजेचा समावेश करण्यात आला नव्हता.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, 42 दिवसांचा संप करणारी ही मंडळी पूर्णपणे वेगळी आहेत. त्यांनी मोर्चा काढला नव्हता तर या सर्व मंडळींनी मोर्चा काढला होता. हे जे व्यावसायिक शिक्षक आहेत त्यांनी 42 दिवसांचा संप केला होता. आणि हे दुसरे आय.टी.आय. निदेशक आहेत या लोकांनी संप केला नव्हता, त्यांची संघटना वेगळी आहे. या लोकांनी फक्त वर्ध्याहून नागपूर विधान भवनपर्यंत मोर्चा काढला. आपण याठिकाणी 42 दिवसांच्या संपाच्या कालावधीचे वेतन अनुज्ञेय केले त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. परंतु रजा वरिष्ठांकडून मान्य करुन घेऊन ते मोर्चाला गेले व त्यांना वेतनही दिले गेले. शासनाचा याबाबत निर्णय नसतांना या लोकांच वेतन कापा असे पत्रक निघाले. माझे असे म्हणणे आहे की, एका वर्गाने 42 दिवसांचा संप केला म्हणून त्यांचे वेतन नियमित करणे आणि दुसऱ्या वर्गाने तीन दिवसांची रजा घेऊन मोर्चा काढला म्हणून त्यांना दिलेले वेतन कापून घेणे हे परस्पर विसंगत आहे. आपल्या प्राचार्याकडून रजा मान्य करुन ते मोर्चाला गेले व त्यांना पगार दिला गेला आहे. तो पगार नंतर कापण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आला आहे हे किती चुकीचे आहे? माझे असे म्हणणे आहे की, यामध्ये किती कारस्थान केले जात आहे? शासनाचा एक अधिकारी शासन निर्णय नसतांना, त्यांची रजा मंजूर असतांना दिलेले वेतन कापून घेतो आणि सांगतो की, ही अनिर्वाय सेवा आहे. त्यासंबंधीचा जी.आर. सुध्दा त्यांने वाचलेला नाही. त्यामध्ये म्हटले आहे की, या शासन निर्णयाव्दारे व्यावसायिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेशाचे काम, परीक्षेचे काम आणि निरीक्षणाचे काम यांचा अंतर्भाव अनिवार्य सेवेत केला आहे. या तीन गोष्टी त्यामध्ये नाहीत. त्यांनी रजा मान्य करुन घेतली. प्रश्न असा आहे की, आपण या दोन्ही वर्गाना मदत केली आहे. त्यांना 5-6 वर्षानंतर करेक्ट पे स्केल दिले आहे त्याबाबत सभागृहात मी आपल्याला धन्यवाद दिले. तेव्हा प्रश्न असा आहे की, रजा मान्य करुन मोर्चाला गेले व त्यांना त्या रजेचा पगार सुध्दा दिला गेला. तेव्हा ती कार्यवाही कायम केली जाईल व वेतन कापण्यासंबंधीचे आदेश रद्द केले जातील असे आपण सांगणार काय?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, एक विशेष बाब म्हणून हे आदेश रद्द केले जातील. आणि अशाप्रकारे भविष्य काळात कोणत्याही पध्दतीने सार्वजनिक स्वरुपामध्ये संप करण्यासाठी कर्मचारी बाहेर पडले तर ती बाब मान्य केली जाणार नाही. यावेळी ही विशेष बाब म्हणून मी मान्य करतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र.1683 . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांचा आभारी आहे की, त्यांनी या प्रकरणात स्वत: न्याय दिला. रजा मान्य करुन घेऊन आय.टी.आय.निदेशक मोर्चासाठी गेले, ते बरोबर नव्हते म्हणून त्यासंबंधात परिपत्रक काढण्यात आले. पण आता आपण विशेष बाब म्हणून याबाबतीत हे परिपत्रक मागे घेण्याचे ठरविलेले आहे. तर माझा प्रश्न एवढाच आहे की, याबाबतचे आदेश आठ दिवसात, पंधरा दिवसात किंवा महिन्याभरामध्ये, म्हणजे केव्हा निघणार आहेत ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, याबाबतचे आदेश आज संध्याकाळपर्यंत काढले जातील.

. . . .2 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : ता.प्र.क्र.2773.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

सभापती : ता.प्र.क्र.1695 .

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय . . . .

(सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड व इतर सदस्य सभागृहात प्रवेश करतात.)

श्री.जगन्नाथ शेवाळे : सभापती महोदय, आमचा ता.प्र.क्र.2773 आहे. त्यासंबंधी आम्हाला प्रश्न विचारावयाचा आहे.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, आपण माननीय सदस्यांचा प्रश्न यापूर्वीच पुकारलेला होता. पण त्यावेळी ते येथे उपस्थित नसल्याने, आपण माझा पुढील प्रश्न पुकारला असून त्यावर प्रश्न विचारण्यासाठी मी उभा आहे. त्यामुळे आता त्यांना प्रश्न विचारण्यास परवानगी देऊ नये.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शेवाळे यांनी आपला प्रश्न विचारावा.

. . . .2एम-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

साक्री (जि.धुळे) येथील लघुबंधाऱ्यांच्या जमातील भ्रष्टाचार

(4) * 2773 श्री. वसंतराव चव्हाज , श्री. जितेंद्र आव्हाड , डॉ. वसंत पवार , श्री. जजनाथ शेवाळे : तारांजित प्रश्न क्र.602 ला दिनांज 17 डिसेंबर,2004 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्मानीय जलसंधारज मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा जरतील जाय :-

(1) साक्री (जि.धुळे) येथील लघुबंधाऱ्यांच्या जामामध्ये झालेल्या जैरव्यवहाराची सुरु असलेली पोलिस चौजशी पूर्ज झाली आहे जाय,

(2) असल्यास, चौजशीत जाय आढळून आले व त्यानुसार पुढे जोजती जार्यवाही जेली वा जरज्यात येत आहे,

(3) अद्याप जोजतीही जार्यवाही जेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारज जारजे जाय आहेत ?

श्री.राजेश टोपे, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (1) होय.

(2) व (3) सरपंच, ग्रामसेवज व शाजा अभियंता हे सदृत दर्शनी दोषी आढळून आल्यामुळे त्यांच्याविरुध्द न्याय दंडाधिजारी (ज्युडीशिअल मॅजिस्ट्रेट), साक्री यांच्या न्यायालयात दिनांज 24.2.2005 रोजी दोषारोपपत्र दाजल जेले आहे.

श्री.जगन्नाथ शेवाळे : सभापती महोदय, हा राज्यातील केवळ ठाणे महानगर पालिकेबाबतचा प्रश्न आहे असे नाही, तर राज्यात ज्या महानगरपालिका आणि नगरपालिका आहेत . . . .

काही सन्माननीय सदस्य : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य चुकीचा प्रश्न विचारीत आहेत. हे काय चालले आहे ?

(सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शेवाळे व सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड बोलण्यासाठी उभे राहतात.)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शेवाळे यांनी खाली बसावे, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनीही खाली बसावे. मघाशी मी जेव्हा प्रश्न पुकारला, तेव्हा आपण दोघेही येथे उपस्थित नव्हता. त्यामुळे मी सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांचा पुढील प्रश्न पुकारीत आहे.

. . . .2 एम-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डोंबिवली (जि.ठाजे) येथील न्यूएरा हायस्कूलबाबतच्या तक्रारी

(5)*1695डॉ. अशोक मोडक , श्री. रामनाथ मोते , श्रीमती संजीवनी रायकर , श्री. प्रतापराव सोनवजे , श्री. श्रीकांत जोशी , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. जयंत पाटील : सन्माननीय शालेय शिजज, क्रिडा व युवक कल्याज मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा करतील काय :-

(1) डोंबिवली येथील मानपाडा रोडवर असलेल्या महावीरनगर येथील नयूएरा हायस्कूलमध्ये इयत्ता 7 वी तील 5 विद्यार्थ्यानाा बॅच लावलेला नाही, बॅक व बेल्टचे पैसे न दिल्यामुळे तेथील शिजकानी दिनांक 14 जानेवारी,2005 रोजी बेदम मारहाज व शिवीजाळ केली व यापैकी एक विद्यार्थी अपंज असून त्याला फक्त एकच पाय आहे व तो सुध्दा तोडून टाकण्याची धमकी दिली, हे जरे आहे काय,

(2) असल्यास, पालकांनी रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाजल केली आहे हे जरे आहे काय,

(3) असल्यास,सुमारे एक वर्षापूर्वी अशाप्रकारच्या दोन तीन घटना ठाजे, मुंबई येथे घडल्या होत्या व एका मुलाचा डोळा निकामी झाला होता, हेही जरे आहे काय,

(4) असल्यास,यासंदर्भात चौकशी करुन सदर शिजकांवर कडक कारवाई करुन यापुढे अशा घटना घडू नयेत म्हजून संस्थाचालकांना सूचना देण्यात येतील काय?

श्री.हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता : (1) दिनांक 12/1/2005 रोजी इयत्ता 7 वी तील 5 विद्यार्थ्यांना व्यवस्थापनातील व्यक्तीकडून मारहाज झाली हे जरे आहे.

(2) हे जरे आहे.

(3) ठाण्यातील अंबिका नगरमधील राजश्री शाहू महाराज विद्यालयातील दोघा विद्यार्थ्यांना त्याच शाळेतील एका शिक्षिकेने पट्टीने दि.11/2/2003 रोजी शिक्षा केली होती, त्या दरम्यान श्री.विनोद तळेकर या विद्यार्थ्याच्या डोळयाचे वर कपाळावर मार लाकला होता. तज्ञ डॉक्टरांकडून झालेल्या तपासजीअंती डोळयाला कोजतीही इजा झाले नसल्याचे निष्पन झाले होते.

(4) प्रस्तुत प्रकरजी रामनगर पोलीस ठाजे, डोंबिवली येथे पालकांनी तक्रार नोंदविली असून, या पोलीस ठाण्यांमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हजून सर्व शाळांना सूचना देण्यात येतील.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, याठिकाणी प्रश्न विचारण्यापूर्वी मी माननीय

. . . .2 एम-5

17-03-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) MM-5

APR/MHM/SBT 13:35

ता.प्र.क्र.1695 . . . .

डॉ.अशोक मोडक . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मंत्री महोदयांना एका कारणासाठी धन्यवाद देऊ चाहतो. कारण त्यांनी आमच्या प्रश्नातील एक चुक दुरुस्त केली आणि ती म्हणजे याठिकाणी शिक्षकांनी मुलांनी मारहाण केली नाहीतर व्यवस्थापना - तील माणसाने केली आहे. माझ्याकडे काही पालकांची पत्रे आहेत. ज्याने मुलांना मारहाण केली, तो निवेश शेजपाल नावाचा माणूस व्यवस्थापनाशी संबंधित असलेला आहे. त्याने विद्यार्थ्यांना पट्टीने बेदम मारहाण केली आहे. यासंबंधातील डॉक्टरांचे जे सर्व रिपोर्ट आहेत, ते आपण वाचावेत. या मारहाणीमुळे विद्यार्थ्यांना गंभीर जखमा, दुखापती झालेल्या आहेत. माझे दु:ख असे आहे की, याठिकाणी उत्तर देताना दुर्दैवाने कळत न कळत एक अन्याय घडलेला आहे. ही घटना होऊन तीन महिने झालेले आहे. पण चौथ्या क्रमांकाच्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "प्रस्तुत प्रकरणी रामनगर पोलीस ठाणे, डोंबिवली येथे पालकांनी तक्रार नोंदविली असून, या पोलीस ठाण्यामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे." पण घटना होऊन तीन महिने झालेले आहेत ना ? म्हणून मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, याठिकाणी एक पायंडा पडण्याची शक्यता आहे की, गणवेषाचे पैसे दिले नाहीत, वहयांचे पैसे दिले नाहीत म्हणून उद्या कोणीही शाळेत घुसावे आणि विद्यार्थ्यांना मारहाण करावी. याठिकाणी कदाचित हातमिळवणीही झाली असेल. अशा वेळी निरपराध पालकांनी आपल्या पाल्यांना मारहाण होते म्हणून तक्रार करावी. तेव्हा याबाबतीत तातडीने ॲक्शन घेतली जाईल का ? जो संबंधित माणूस आहे, त्याच्यावर खटला भरला जाईल का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, गुजराथी सेवा मंडळाची डोंबिवली येथे न्यूएरा हायस्कूल असून ती गुजराथी माध्यमाची शाळा आहे. यामध्ये दोन गोष्टी होत्या. तेथे पाचवी ते सातवी पर्यंतचे वर्ग अनधिकृतपणे सुरु होते, ते आम्ही बंद केले आहेत. त्याठिकाणी पहिली ते चौथीपर्यंतच्या वर्गांना परवानगी होती. तेथील ट्रस्टी श्री.निवेश शेजपाल यांनी त्या मुलांना मारहाण केली आहे. एकूण पाच मुलांना मारहाण केली आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

तारांकित प्रश्न क्रमांक ..1695...

श्री. हसन मुश्रीफ...

या मुलांच्या पालकांनी पोलीसस्टेशनमध्ये कलम 155(2) अन्वये फौजदारी दंड संहितेनुसार गुन्हा दाखल केला आणि त्याप्रमाणे त्यांना अटक झाली. शेजपाल हा ट्रस्टी आहे. त्याने राजीनामा दिला आहे. तो ट्रस्ट्री आहे. तो शिक्षक असता तर त्याला ताबडतोब नोकरीतून काढण्याची कारवाई केली असती. तो ट्रस्टी आहे आणि त्याने त्याचा राजीनामा दिला आहे. आता त्याला अटक झालेली आहे.रीतसर पोलीस केस चालू आहे. आता दुसरी काय कारवाई करावी हे आज तरी शासनाच्या हातामध्ये नाही. अशा पध्दतीची गोष्ट होऊ नये म्हणून शासना याच्या बद्दल निश्चितपणे कारवाई करील आणि त्या शाळेकडे आमचे पूर्णपणे लक्ष आहे की, अशा गोष्टी तेथे घडून नयेत.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, डॉक्टरांचा रिपोर्ट आपल्याकडे आलेला आहे. आपल्या मनात तो हेतू नाही पण नकळत जी घटना घडली ती मला फार भयानक वाटली आहे. आपण माझ्या मताशी सहमत आहात की, कुणीही शाळेत घुसावे आणि मारहाण करावी, हे बरोबर नाही. तो शिक्षक नाही म्हणून या ठिकाणी तो स्पॉट फ्री सुटतो, हा पायंडा बरोबर आहे काय? जी मारहाण केली ती जबरदस्त आहे. मी त्यांचे पत्र वाचून दाखवितो.वर्गात हजर असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे बेल्ट खेचून काढले. शाळेची बॅग खाली करुन वर्गात जाळण्यात आली आणि सर्व मुलांना नवीन बॅगे प्रत्यर्थ 225 रुपये प्रती बेल्ट 100 रुपये आणण्याची जबरदस्ती करण्यात आली आणि जर सोमवार तारीख 17.01.05 पर्यंत पैसे दिले नाहीत तर परीक्षेला बसू दिले जाणार नाही अशीही धमकी देण्यात आली. त्यानंतर पाईप घेऊन या शेजपाल नावाच्या माणसाने अमानुष मारहाण केली. शाळा तेथील मारहाण हा विषय बाजूला ठेवू. पण एक माणूस येतो,कोणालाही मारहाण करतो आणि पोलीस त्याच्यावर काहीही करीत नाहीत.समजा जामीनावर सोडले असेल तर प्रकरण तेवढे लाईटली घेऊ नका. शाळेचे पावित्र्य विद्यार्थ्यांची सुखरुपता हे सगळे लक्षात घेऊन आपण नेमकी कृती लवकरात लवकर काय करणार ते सांगावे?

श्री. हसन मुश्रीफ :सभापती महोदय, फौजदारी दंड संहितेप्रमाणे त्याला अटक झालेली आहे. त्या नंतर तो जामिनावर सुटलेला आहे.तो ट्रस्टी आहे. त्यामुळे शासनाने करावयाची कारवाई आता काही शिल्लक राहिलेली नाही. त्याच्यावर आणखी काही कारवाई करावयाची असेल तर पुन्हा त्या डी.एस.पीं.ना., किंवा त्याच्या वरिष्ठ अधिका-यांना कळवून पुन्हा त्याच्या विरुध्द काही कारवाई करता येईल काय याच्या बद्दल शासन निश्चितपणने प्रयत्न करील. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक ..1695...

श्री. विलासराव शिंदे :सभापती महोदय, एखाद्या प्राथमिक शाळेमध्ये, माध्यमिक शाळेमध्ये किंवा कॉलेजच्या प्रिमायसेसमध्ये संपूर्ण अधिकार त्या मुख्याध्यापक अथवा प्राचार्यांकडे असतात. तेव्हा या ठिकाणी किंवा अन्य ठिकाणी एखाद्या बाहेरच्या व्यक्तिने येऊन अशा प्रकारची मारहाण किंवा आणखी काही केले असेत तर त्या मुख्याध्यापकांनी कोणती कारवाई केली असती? आणि ती कारवाई केली नाही म्हणून शासनाने त्याच्यावर काय कारवाई केली, याबाबतचा खुलासा व्हावा.

श्री. हसन मुश्रीफ :त्याचा ट्रस्टीचा राजीनामा घेतला आणि मुलांच्या पालकांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंद करुन त्याला अटक झालेली आहे.

श्री. दिवाकर रावते : त्याने ट्रस्टीचा राजीरामा दिला हे उत्तर न देता शिक्षण खात्याच्या वतीने याबाबतची तातडीने चौकशी होऊन, प्रशासक मंडळ नेमून ती शाळा ताब्यात घ्यावयास पाहिजे होती. ट्रस्टीचा राजीनामा घेतला म्हणजे झाले का? मग ती केस चालेल, मग तो निर्दोष सुटेल वगैरे सगळे नेहमीसारखे होईल. त्यासाठी शिक्षण अधिका-यांनी चौकशी करुन,या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन, त्या शाळेवर प्रशासक नेमून, ती शाळा शासनाच्या ताब्यात घ्यावयास पाहिजे होती. त्यासंबंधात काय कारवाई केली आहे?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही बाब तपासण्यात येईल आणि धर्मादाय आयुक्तांना आणि उपसंचालकांना सुध्दा त्याप्रमाणे कळविण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभपती महोदय, या प्रश्नाचे उत्तर वाचून मला आश्चर्य वाटले. हा गुन्हा शाळेमध्ये घडला आहे. मुलांना मारझोड झाली, त्याची तक्रार पालकांना करावयास सांगितली. ही तक्रार त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी त्या मुलांना बरोबर घेऊन जाऊन पोलीस स्टेशनला कां केली नाही, ती जबाबदारी पालकांवर कां टाकली?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी अत्ताच सांगितल्याप्रमाणे पुन्हा एकदा याची चौकशी करण्यात येईल आणि योग्य असेल ती कारवाई करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या शाळेत विद्यार्थ्यांना व्यवस्थापक मंडळाकडून किंवा त्या ट्रस्टीकडून मारहाण होत आहे, ही अत्यंत गंभीर स्वरुपाची बाब आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणा-या सर्वांचा हा अत्यंत चिंतेचा विषय आहे. हे काही आता एक प्रकरण घडलेले नाही. अशा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रकारची अनेक प्रकरणे आहेत की, त्या ठिकाणचे व्यवस्थापक मंडळे विद्यार्थ्यांना अशा प्रकारची मारहाण करीत आहेत.केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर डयुटीवर असतांना शिक्षकांना शाळेत मारहाण केलेली आहे अशी अनेक प्रकरणे पोलीस स्टेशनमध्ये प्रलंबित आहेत. परवाच कल्याणला एका क्लार्क बाईंना व्यवस्थापक मंडळाने येऊन मारहाण केली. त्यासंबंधत पोलीस स्टेशनला तक्रार केल्या नंतर फक्त चौकशी केली, त्यानंतर पुढे काहीही झालेले नाही. म्हणून मी या संदर्भात प्रश्न विचारु इच्छितो की,

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा प्रकारे व्यवस्थापक मंडळाकडून विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना मारहाण करण्याचे प्रकार थांबविण्यासाठी शासनाजवळ अशा प्रकारची काही योजना आहे काय की ज्या योजनेच्या माध्यमातून ही सगळी व्यवस्थापकीय मंडळे शासन आदेश काढून ताब्यात घेऊ शकेल आणि प्रशासक नेमू शकेल ? ही कारवाई शासन करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, तसे काही करता येणार नाही. परंतु बाहेरची कोणीही व्यक्ती येऊन, मग तो ट्रस्टी असेल, मॅनेजमेंटचा माणूस असेल, कोणीही येऊन शाळेत अशा प्रकारचे वर्तन करणार नाही अशा सूचना पुन्हा एकदा देऊ.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. वारंवार असे घडते की शाळेमध्ये कधी तरी मुख्याध्यापक मारतो, कधी शिक्षक मारतो, कधी ट्रस्टी मारतो तर कधी बाहेरचा माणूस शाळेत येऊन मारतो. असे काल ठाण्यामध्ये घडले. सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो, पाच वर्षाच्या दोन मुलांना चार तास विवस्त्र अवस्थेत बंद करण्यात आले होते. हा भयानक प्रकार आहे. हे एक प्रकरण तुमच्या समोर आले. मागच्या वर्षी मुंबईमध्ये एका मुलाला मारहाण झाली त्यामुळे त्या मुलाला डोळे गमवावे लागले. शासन जर म्हणणार असेल की आमच्याकडे असा कोणताही कायदा नाही तर मग शासन झोपले आहे की काय असा प्रश्न पडेल. याबाबतीत तुम्हाला कोड ऑफ कंडक्ट करावे लागेल. आपण ते करणार आहात की नाही ? बालक हा पुढच्या पिढीचा आधार म्हणून पुढे जाणार आहे. त्याला मारहाण झाली, त्याचे डोळे गेले, त्याचे हात गेले तर हा प्रकार अमानुष आहे आणि हे शिक्षण क्षेत्रात घडत आहे ही गोष्ट त्यापेक्षाही वाईट आहे. सरकार असे काही कडक नियम करणार काय की, जेणेकरुन विद्यार्थ्यांना झालेल्या मारहाणीची जबाबदारी कोणावर तरी निश्चित करुन या प्रकाराला संपूर्ण महाराष्ट्रात पायबंद बसेल ? अशा उपाययोजना केल्या जातील काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, अशा प्रकारची कडक कारवाई करावी अशा प्रकारचे आदेश काढण्यात येतील.

श्री. नानासाहेब बोरस्ते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी निवेदन केलेले आहे की, ही शाळा प्राथमिक आहे आणि इयत्ता पाचवी ते सातवीच्या वर्गांना आपण अधिकृत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परवानगी दिलेली नाही त्यामुळे त्यांच्यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही. महाराष्ट्रभर अशा प्रकारचे अनधिकृत वर्ग किंवा अनधिकृत शाळा चाललेल्या आहेत त्यांच्यावर प्रचलित नियमाप्रमाणे शासनाने काय कारवाई केलेली आहे ? त्यामध्ये ही शाळा मोडते. तुमच्याकडे असा काही कायदा आहे काय की, ज्यामुळे अशा लोकांवर वचक बसेल ? आज कोणीही उठावे आणि अनधिकृत शाळा किंवा तुकडया सुरु कराव्यात आणि अशा प्रकारचे थैमान मांडावे ही परिस्थिती या पुरोगामी राज्याला शोभादायक नाही. यावर काय प्रतिबंध करणार याबाबतीत सुस्पष्ट मत व्यक्त करावे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, राज्यामध्ये ज्या संस्था चालकांनी अनेक बेकायदेशीर शाळा चालवावयाच्या आणि परीक्षेची वेळ आली की, शासनाची भावनिक कोंडी करुन हयुमिनिटी ग्राऊंडवर खऱ्या अर्थाने सरकारला अडचणीत आणू अशा प्रकारच्या संस्था जर कोणी चालवित असतील तर त्यासंदर्भात परवा आम्ही अशा प्रकारच्या संस्था चालकांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करावे अशा प्रकारची मान्यता आम्ही दिलेली आहे. याबाबतीत निश्चित कारवाई केली जाईल. कोणत्याही प्रकारे शिक्षण संस्थेच्या, शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये जे ट्रस्टी आणि संस्था चालक हस्तक्षेप करतील त्यांच्यासाठी आम्ही संहितेमध्ये सुध्दा योग्य तो बदल करु आणि कारवाई करु.

श्री. नानासाहेब बोरस्ते : सभापती महोदय, फौजदारी गुन्हा कोणी दाखल करावयाचा ? शिक्षण खात्याला फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा अधिकार दिलेला नाही...

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला पूर्ण उत्तर आलेले नाही.

(काही सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : या प्रश्नावर सदनाच्या दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांनी अत्यंत गांभीर्याने प्रश्न विचारलेले आहेत. अल्पवयीन मुलगा किंवा मुलगी असेल त्यांना मॅनेजमेंटच्या ट्रस्टीनी किंवा कोणी शिक्षकांनी त्या संस्थेमध्ये बेसुमार मारहाण करणे हा दखलपात्र गुन्हा करण्याकरिता आपण गृह विभागाशी संपर्क साधावा. हा प्रश्न अत्यंत मामुली किंवा साधा आहे असे न समजता या लहान वयाच्या मुलांवर कोणाचाही हात अकारण उगारला जाता कामा नये आणि जर हात उगारलाच तर तो हात आपण कायद्याने रोखला पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केंद्रिय शेतमाल खर्च व किंमत आयोगाची बैठक

(६) * ३२४७ श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनंत तरे , श्री. सुरेश जेथलिया , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. रमेश निज ोसे : स-मा-न-नीय ृषी मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या २००५ सालच्या खरीप हंगामाच्या किमान हमी किंमती विषयीचे धोरण ठरविण्यासाठी केंद्रिय शेतमाल खर्च व किंमत आयोगाची बैठक दि.१७-१-२००५ रोजी मंत्रालयात घेण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतमालाच्या आधारभूत किंमती ठरवितांना महाराष्ट्राची सिंचन क्षमता व इतर बाबी विचारात न घेता केंद्र शासन आधारभूत किंमती कमी ठरवित असल्याने महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतकऱ्यांवर अन्याय होतो ही बाब राज्य शासनाने केंद्र शेतमाल खर्च व किंमत आयोगाच्या निदर्शनास सदर बैठकीत आणली आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र शासनाने केंद्रिय कृषि आयोगाला शिफारस केलेल्या किंमती पेक्षा कितीतरी कमी प्रमाणात शेतमालाच्या आधारभूत किंमती ठरविल्या गेल्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहे हे खरे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्यांच्या कृषि व उत्पन्न भावाला रास्त भाव देण्याबाबत राज्य शासनाने केंद्रिय कृषि आयोगाला काही शिफारशी केल्या आहेत काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील,श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता: (1) दि-ांज 17-01-२००५ रोजी आयोगाच्या गटासमवेत बैठक झाली.

(२) होय.

(३) महाराष्ट्र शासनाने शिफारस केलेल्या किंमतीपेक्षा कमी प्रमाणात शेतमालाच्या आधारभूत किंमती ठरविण्यात आल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो असे शासनाकडून केंद्रिय शेतमाल खर्च व किंमत आयोगाच्या गटाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे.

(४) अ) महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालालाल उत्पादन खर्चानुसार रास्त भाव देण्याबाबत केद्रिय कृषि आयोगाला सन २००५-०६ च्या खरीप पिकांच्या उत्पादन खर्चासंबंधीची अंदाजित आकडेवारी उपलब्ध करुन देण्यात आली. राज्य शेतमाल भाव समितीच्या मान्यतेने सदर आकडेवारीची केंद्रिय शेतमाल खर्च व किंमत आयोगाला शिफारस करण्यात येईल.

ब) उत्पादन क्षमता, सिंचन क्षमता व इतर बाबी विचारात घेवून महाराष्ट्राकरिता विशेष किमान आधारभूत किंमती जाहीर करण्याबाबत विनंती करण्यात आली.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, केंद्र सरकारने शेतमालाच्या किंमती ठरविताना महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतक-यांच्या पिकांच्या उत्पादनांच्या किंमती कमी ठरविल्या आहेत असे सांगितले होते. महाराष्ट्र शासनाच्या कृषी खात्याने कापूस, सोयाबीन, सुर्यफूल, ज्वारी, बाजरी, तूर यांच्या कोणत्या किंमती ठरविल्या होत्या आणि केंद्राने किती किंमती ठरविल्या होत्या ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

ता.प्र.क्र.3247...

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मागील 2004-2005 मध्ये दरांमध्ये किती तफावत होती ते मी सांगतो. कापसासाठी 2909 रुपये हा दर महाराष्ट्र शासनाने ठरविला होता. केंद्राने 2010 रुपये असा दर ठरविला होता. (अडथळा) लांब धाग्यासाठी केंद्र सरकारने 2010 रुपये, मध्यम धाग्यासाठी 1760 रुपये आणि आखूड धाग्यासाठी 1760 रुपये दर ठरविला होता. महाराष्ट्र सरकारने वर्क आऊट केलेली किंमत लांब धाग्यासाठी 2909 रुपये, मध्यमसाठी 2781 रुपये आणि आखूड धाग्यासाठी 2596 रुपये अशी होती. तूरसाठी राज्यसरकारने 1995 रुपये दर ठरविला होता तर केंद्राने 1390 रुपये ठरविला होता. सोयाबीनचा राज्यसरकारचा दर 1420 रुपये तर केंद्राचा दर 1000 रुपये होता, उडीदचा राज्यसरकारचा 2461 रुपये दर होता तर केंद्राचा 1410 रुपये दर होता. ज्वारीचा राज्यसरकारचा दर 800 रुपये तर केंद्राचा 515 रुपये दर होता, भाताचा राज्यशासनाचा दर 916 तर केंद्राचा 560 रुपये दर होता.

श्री.अरविंद सावंत : सन्माननीय मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की, यामध्ये दोन घटक आहेत. एक घटक असा आहे की, केंद्रीय शेतमाल खर्च व किंमत आयोगाची यांच्याबरोबर दिनांक 17 जानेवारी रोजी बैठक झाली. राज्य शेतमाल भाव समितीच्या मान्यतेने उत्पादन खर्चाच्या आधारावर काय किंमत असावी यासाठी राज्यसरकारने केंद्र सरकारला कळविले आहे. मग आता केंद्र सरकारने ठरविलेले जे भाव सांगण्यात आले ते आम्ही शिफारस केलेले भाव आहेत काय , त्याला राज्य शेतमाल भाव समितीची मान्यता आहे काय, कारण ती मान्यता घेणार आहे असे उत्तरात नमूद केले आहे. केंद्र सरकारकडून किती दिवसात ही मान्यता केव्हा घेतली जाणार आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : राज्य शेतमाल भाव समितीची 1 मार्च रोजी बैठक झाली आहे. समितीने सध्याचा उत्पादन खर्च काढूनच केंद्र सरकारला कळविले आहे की, त्यामध्ये बदल करावा. केंद्र सरकारने ज्या आधारभूत किंमती ठरविल्या आहेत त्या कमी आहेत त्या वाढवून मिळण्यासाठी शासनाकडून शिफारस केली जाणार आहे, ही शिफारस एक आठवडयामध्ये केंद्राकडे जाईल.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.3247 पुढे सुरु...)

श्री. यशवंतराव गडाख : आपल्या राज्यातील शेतक-याला त्याच्या शेतमालाला नेहमीच कमी आधारभूत किंमत मिळते आणि त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडतो. या वर्षी पश्चिम महाराष्ट्रामध्ये गव्हाचे फार मोठ्या प्रमाणावर पीक आलेले आहे. मागील तीन वर्षे पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुष्काळ होता. या वर्षी पाऊस पडल्यामुळे गव्हाचे पीक मोठ्या प्रमाणावर आलेले आहे. आजच गव्हाच्या किंमती 500 रु. पर्यन्त आलेल्या आहेत. त्या आणखी 400 ते 300 रु. पर्यन्त खाली जाण्याची शक्यता आहे. तेव्हा शेतक-यांच्या हाताशी आलेल्या गव्हाच्या पीकाला योग्य किंमत मिळावी यासाठी शासनाने सर्व जिल्हा बँकांचे अध्यक्ष तसेच एमसी बँक यांची मिटींग घेऊन जर सोसायटीला कॅश क्रेडिट उपलब्ध करुन दिले तर त्या कॅश क्रेडिटवर ते गहू गोडाऊनमध्ये ठेवून योग्य भाव आल्यानंतर विकू शकतील. म्हणून अशा प्रकारची पर्यायी व्यवस्था शासन करणार आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : मा.सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी जी सूचना केली त्याप्रमाणे एमएससी बँकेला विनंती करण्यात येईल.

डॉ. वसंत पवार : शेतमालामध्ये कांदा येतो. सरकारने 500 रु. आधारभूत किंमत दिलेली आहे. परंतु याबाबतीत केन्द्र शासनाकडे शिफारस करण्याची आवश्यकता आहे. कांद्याचे अमाप पीक येते. त्यामुळे त्या पिकाला आधारभूत किंमत मिळाली पाहिजे. नाफेडतर्फे हा कांदा खरेदी केला जातो. मागे बाजार हस्तक्षेप योजनेमध्ये 150 कोटी रु.चा कांदा खरेदी करुन कांदा उत्पादक शेतक-याला दिलासा देण्यात आलेला होता. आता मा. राज्यमंत्र्यांनी जी आकडेवारी दिली ती फारशी समजलेली नाही. त्यांनी कांद्याबद्दलची आकडेवारी द्यावी अशी माझी त्यांनी विनंती आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : कांद्याचा यामध्ये समावेश नाही. मा.सदस्यांनी जी विनंती केली त्यासंदर्भात निश्चित कारवाई करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KGS/ MHM/ MHM/

केंद्र शासनाकडून अनुदान मिळणाऱ्या चांगल्या प्रकारच्या आश्रमशाळांना ग्रँन्ट देण्यात अधिकाऱ्याकडून होणाऱ्या बेपर्वाइबाबत

(७) * १७२८ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे , डॉ. अशोक मोडक : तारांकित प्रश्न क्र.११७९ ला दिनांक १३-१२-२००४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात स-मा-न-नीय आदिवासी विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केंद्रशासनाकडून अनुदान मिळणाऱ्या ज्या आश्रमशाळा आहेत त्यातील चांगल्या चालणाऱ्या आश्रमशाळांचे अहवाल देखील केंद्र शासनाकडे न पाठविल्यामुळे गत तीन वर्षात त्यांना ग्रँन्ट मिळालेली नाही व त्यामुळे या कृतीस जबाबदार असणाऱ्या आदिवासी विकास विभागाच्या श्री.रमेशकुमार सचिव आदिवासी विकास व श्री.लिमये या दोन अधिकाऱ्यांविरुध्द संपूर्ण चौकशी केली जाईल व योग्य ती कारवाई केली जाईल असे मा.राज्यमंत्री आदिवासी विकास यांनी मान्य केले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास यादृष्टीने आतापर्यन्त याप्रकरणी कोणत्या स्वरुपची कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) अद्याप कोणतीच कारवाई झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व ही कारवाई किती दिवसात पूर्ण होणार आहे ?

श्री. रविशेट पाटील, डॉ. विजयकुमार गावित यांच्याकरिता : (१) होय.

(२) व (३) केंद्र शासनाकडून अनुदान मिळणाऱ्या आश्रमशाळांचे निरीक्षण अहवाल प्रकल्प अधिकाऱ्याकडून तयार करण्यात आलेले आहेत. सदर अहवालामध्ये अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक ह्यांनी त्यांचे अभिप्राय नमूद केलेले आहेत. अहवालामध्ये नमूद केलल्या वस्तुस्थितीवरुन केंद्र शासनास अहवाल पाठविण्यात आलेला आहे. ह्यामुळे मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग आणि अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक या अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. नितीन गडकरी : हा फार गंभीर प्रकार आहे. या खात्याचे सचिव आणि अप्पर आयुक्त श्री. आनंद लिमये हे या प्रकरणी जबाबदार आहेत. गेल्या तीन वर्षापासून केन्द्र सरकारने ज्या आश्रमशाळा मंजूर केलेल्या आहेत त्या आश्रमशाळांच्या बाबतीत केवळ शिफारस करुन अहवाल पाठवायाचा होता. परंतु अप्पर आयुक्त श्री. लिमये आणि रमेश कुमार नावाचे दोन अधिकारी हे सरकारला लांच्छनास्पद आहेत, ते मंत्रीमहोदय डॉ. विजयकुमार गावित यांचे ऐकत नाहीत. दोन वर्षात तीन वेळा तपासणी अहवाल अप्पर आयुक्तांकडे गेला, दोन वर्षात अनुदान मिळालेले नाही. 14 आणि 15 डिसेंबर रोजी आदिवासी मंत्र्यांनी अप्पर आयुक्तांना आश्रमशाळांची पुनर्तपासणी करण्याचे आदेश दिले. पुन्हा नाशिक आणि धुळे जिल्ह्यातील आश्रमशाळा तपासून निरीक्षण अहवाल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 1728 पुढे सुरु.... (श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

सहाय्यक प्रकल्प अधिकारी, नंदूरबार, प्रकल्प अधिकारी, कळवण यांनी स्वाक्षरी करुन अप्पर आयुक्तांकडे पाठविला. श्री.आनंद लिमये, अप्पर आयुक्त, श्री. देवरे, प्रकल्प अधिकारी नंदूरबार यांनी स्वाक्षरी न करता श्री. रमेश कुमारसाहेबांकडे अहवाला पाठविला. तुम्हाला एक पैसा द्यावयाचा नाही. 1200 आदिवासी विद्यार्थी कुपोषणामुळे मृत्यूमुखी पडले तर हे जबाबदार राहाणार आहेत. तुम्हाला फक्त अहवाला पाठवायला तीन वर्षे लागली. हा अहवाल तुम्ही का पाठवला नाही? हा अहवाल पाठविण्यामध्ये तीन वर्षे दिरंगाई करणा-या या सचिवांवर आणि अप्पर आयुक्त श्री.लिमये यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे? हा प्रश्न मी धसास लावीन. या आयएएस अधिका-यांवर शासनाने कडक कारवाई केली पाहिजे. हे अधिकारी आदिवासींचे विरोधक आहेत. यांनी तीन वर्षे अहवाल का पाठवला नाही ? अशा अधिका-यांवर शासन का कारवाई करीत नाही असा माझा प्रश्न आहे.

श्री. रविशेट पाटील : मा. विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी सचिव श्री. रमेश कुमार आणि अप्पर आयुक्त श्री. लिमये यांचा उल्लेख केला. या दोघांचीही मी चौकशी केली. चौकशीमध्ये त्यांचा काही दोष आढळून आला नाही .

श्री. नितीन गडकरी : मग दोन-तीन वर्षे केन्द्राकडे शिफारस का केली नाही ?

...नंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, हे प्रस्ताव सहाय्यक प्रकल्प अधिकारी, प्रकल्प अधिकारी, अप्पर आयुक्त, आयुक्त,आणि प्रधान सचिव यांच्यामार्फत येतात. त्यांच्या निष्कर्षानुसार आदिवासी विभागाच्या क्षेत्रिय अधिक-यांकडून आलेले निरीक्षण अहवालानुसार प्रधान सचिवांनी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविलेले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आदिवासी विभागाकडून तीन वर्षे केंद्र शासनाकडे संबंधित संस्थांचे प्रस्ताव पाठविण्यात आलेले नाहीत. ज्या संस्थेचे प्रस्ताव पाठविण्यात आलेले नाहीत त्यांची नावे मी वाचून दाखवितो. रेणुकादेवी शिक्षण प्रसारक मंडळ, सिध्दकला शिक्षण प्रसारक मंडळ,नांदगाव, अभ्यूदय शिक्षण प्रसारक मंडळ,दाभाडी, जयहिंद मित्रमंडळ, परभणी शाळा, कुलस्वामिनी शिक्षण प्रसारक मंडळ, काष्टी, अन्नपूर्णादेवी शिक्षण प्रसारक संस्था, थाळनेर यांचे प्रस्ताव पाठविलेले नाहीत. कन्हैयालाल महाराष्ट्र..एन.सी.पी. व कॉग्रेसचे हे कार्यकर्ते आहेत. श्री. रमेशकुमार आणि श्री.लिमये हे नुसते पोस्टमनचे काम करीत आहेत. एन.सी.पी. आणि कॉग्रेस कार्यकर्त्याचीच कामे केली जातात. मी उल्लेख केला त्या संस्थांचे प्रस्ताव गेल्या तीन वर्षापासून आदिवासी विभागाकडे पडून आहेत. या संस्थांच्या बाबतीत एक तरी पत्र केंद्र शासनाला पाठविले आहे काय याची माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी. एका तरी संस्थेची शिफारस केंद्र सरकारकडे केली आहे काय ? प्रस्ताव अयोग्य असतील तर प्रस्ताव पाठवू नका. तुम्ही संस्था चालकांना कळवा की, तुमचे प्रस्ताव योग्य नाहीत. हे प्रस्ताव केंद्र सरकारकडे का पाठविले नाही ? प्रस्ताव न पाठविण्यास कोण जबाबदार आहे ?

श्री. रविशेठ पाटील : सदर प्रस्ताव आम्ही केंद्र शासनाकडे पाठविलेले आहेत. ज्या ज्या संस्थांचे प्रस्ताव प्राप्त झाले परंतु प्रस्तावात काही त्रुटया आहेत ते प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेले नाहीत. काही वर्गखोल्यांमध्ये फर्निचर नसणे,अंथरुण-पांघरुण असे साहित्य उपलब्ध नसणे,, प्राथमिक शाळेची परवानगी असताना सुध्दा माध्यमिक शाळांचे वर्ग सुरु केले,प्रकल्पांचे स्वतंत्र रेकॉर्ड नसणे...

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.मी जबाबदार सदस्य म्हणून या ठिकाणी विनंती करतो की, मी ज्या आश्रमशाळांचा मघाशी उल्लेख केला, त्या आश्रमशाळांमध्ये एकही चूक असेल वा दोष असेल तर ते प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवू नये. सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माननीय आदिवासी विकास मंत्री श्री. विजयकुमार गावीत

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

यांच्याकडे बैठक झाली. त्यांनी फेर तपासणी करण्याचे आदेश दिले. प्रस्ताव मंत्रालयात आले. यांनी सांगितले की, त्यावर कोणी तरी सही केली आणि ते प्रस्ताव पुन्हा परत पाठविले. आदिवासी विकास विभागाने शिफारस करुन या संस्थांचे प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविले नाहीत म्हणून गेल्या तीन वर्षापासून या संस्थांतील आश्रमशाळांना केंद्र सरकारचे अनुदान मिळालेले नाही. या आश्रमशाळांना 100 टक्के अनुदान केंद्र सरकारकडून मिळते. या संदर्भात दोन वेळा आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावीत यांच्याकडे बैठक झाली. त्यावेळी डॉ. गावीत म्हटले की, प्रधान सचिव माझे ऐकत नाही. तसेच श्री.लिमये जे आहेत ते देखील ऐकत नाहीत. या आश्रमशाळेतील मुलांचे शोषण होत आहे. तीन वर्षापासून या आश्रमशाळा विना अनुदान चालविल्या जात आहेत. सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, या संदर्भात आपल्या दालनात एक संयुक्त बैठक आपण बोलवा. या संस्थांची सर्व कागदपत्रे आपण तपासा. या विभागाचे प्रधान सचिव श्री. रमेशकुमार यांना बोलवा तसेच श्री.लिमये यांना बोलवा. एकदा जर तुमच्याकडे हा विषय आला तर तो विषय मी मुळीच सोडणार नाही. हा विषय मी पूर्ण लावून धरीन. माननीय मंत्र्यांना जबाबदार धरीन. आज डॉ.विजयकुमार गावीत सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांना या संदर्भात जबाबदार धरीन. माझ्याकडे या प्रकरणाचे सर्व रेकॉर्ड उपलब्ध आहे. सभापती महोदय, आपण सर्व रेकॉर्ड तपासा. यासंदर्भात आदिवासी विकास विभागाकडून शिफारस करण्यात आली नाही म्हणून श्री. रमेशकुमार यांना निलंबीत केले पाहिजे. श्री. लिमये यांना देखील या प्रकरणी निलंबीत केले पाहिजे. हे दोघेही अधिकारी आय.ए.एस. आहेत. हे अधिकारी शासनाच्या सेवेत ठेवण्याच्या लायकीचे नाहीत. हे अधिकारी खोटे बोलतात. मंत्र्यांना चुकीची माहिती देतात. सभापती महोदय, माझी पुन्हा विनंती आहे की, आपण यासंदर्भात एक संयुक्त बैठक बोलवा. या प्रकरणांची सर्व कागदपत्रे आपण तपासा. त्यानंतर आपण कायदेशीर निर्णय द्यावा एवढी माझी विनंती आहे. श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाने आदिवासी विभागातील आश्रमशाळांना अनुदान देण्याचा संदर्भात जी.आर.काढला. त्यामध्ये काय म्हटले आहे की, आदिवासी भाग असेल व त्या ठिकाणी शाळा असेल त्या शाळेत तसे निकष लागेल. परंतु आदिवासी विकास विभागाने तोंडी आदेश काढला की, त्या शाळेतील प्रत्येक तुकडीत 50 टक्के विद्यार्थी आदिवासी आहेत काय ? असा तोंडी आदेश काढलेला आहे.या आदेशाची चौकशी करा. तुम्ही तुमच्या विभागाचे कौतूक करु नका...

..यानंतर श्री.उपरे..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र.1728.....

(श्री.व्ही.यू.डायगव्हाणे)

कारण महाराष्ट्रातील 92 शाळांना अनुदान मिळाले नाही म्हणून ते लोक उपोषणाला बसले आहेत. तरी आपण अनुदानाच्या संदर्भात तातडीने कार्यवाही कराल काय ?

प्रा.बी.टी.देशमुख : अध्यक्ष महाराज, हा प्रश्न येथे आलेला आहे. केंद्राचे अनुदान मिळत असताना विभागाच्या सचिवांनी काही करायचे नाही आणि तीन-तीन वर्षे अनुदान द्यावयाचे नाही हे बरोबर नाही. अध्यक्ष महाराज, तुम्ही सांगता हे सारे खरे मानले तर डॉ. गावित यांनी ही कारवाई का लावली ? या ठिकाणी पहिल्या प्रश्नाला "होय" असे उत्तर दिले आहे. या उत्तरामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे म्हणून माझे म्हणणे असे आहे की, हे उत्तर समाधानकारक नाही. पहिल्या उत्तरामध्ये होय म्हटले आहे आणि मग या दोन अधिका-याविरुध्द चौकशी करावयाची मान्य केले आहे हे खरे आहे काय , त्याला "होय" असे उत्तर दिले. पण सभागृहात येईपर्यंत त्या थोर महात्म्यानी उत्तर बदलून टाकले. तरी माझे म्हणणे असे आहे की, हा प्रश्न राखून ठेवावा. आपण आपल्या दालनामध्ये या लोकांना बोलवून या सर्व गोष्टी तपासण्याची आवश्यकता आहे आणि यासंदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी सूचना केलेली आहे ही या प्रश्नाला न्याय देणारी आहे. तरी त्यांना आपण बोलवावे आणि तोपर्यंत हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जी सूचना केली आहे त्या अनुषंगाने माझ्या दालनामध्ये या बाबतीत सन्माननीय मंत्री महोदय आणि अन्य अधिकारी, त्याचप्रमाणे मुख्य सचिवांनासुध्दा मी बोलावितो आणि त्यांच्याबरोबर मी सविस्तर चर्चा करतो. तरी मला असे वाटते की, हा प्रश्न राखून ठेवण्याऐवजी अन्य मार्गाने यावर चर्चा करण्यास मी आपणास परवानगी देईन.

श्री.नितीन गडकरी : आपण जो निर्णय दिला आहे त्याचा मी सन्मान करतो. माझी एकच विनंती आहे. 1200 मुले गेल्या तीन वर्षापासून खाण्यापिण्यास मोताब झालेली आहेत. केंद्र सरकारचे 100 टक्के अनुदान आहे. तरी आपण बैठक बोलवा. कारण यामध्ये एक विसंगती आहे. पहिला प्रश्न जो विचारण्यात आलेला होता त्याला "होय" असे उत्तर आहे. तेव्हा मला असे वाटते की, आपल्याकडे यासंदर्भात बैठक झाल्यानंतर सुधारीत उत्तर आमच्यासमोर त्यांना ठेवायला सांगा. असे केले तर तो निर्णय होईल आणि त्या मुलांना न्याय मिळेल.

सभापती : हा प्रश्न मी राखून ठेवतो. माझ्या दालनात चर्चा होईल आणि त्यानंतर सुधारीत उत्तर या ठिकाणी येईल.

प्रश्नोत्तरांचा तास संपला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्त्याच्या मुद्याबाबत.

सभापती : या ठिकाणी सन्माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी मला एक टाचण दिलेले आहे. त्या अगोदर सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी औचित्त्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी माझ्याकडे मागितली आहे. औचित्त्याचा मुद्दा मांडण्यास आपण हल्ली परवानगी देत नाही. परंतु विशेष बाब म्हणून आज मी त्यांना परवानगी देत आहे. तरी त्यांनी औचित्त्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, आपल्या परवानगीने मी या ठिकाणी हा औचित्त्याचा मुद्दा मांडतो. आपले सभागृह हे ज्येष्ठ सभागृह आहे. आर्थिक बाबींमध्ये आपला अधिकार जरी कमी असला तरी कला, क्रीडा, संस्कृती, आणि समाजकारणामध्ये आपला नैत्तिक अधिकार मोठा आहे. म्हणून ज्या लोकांनी चांगली कामगिरी केली असेल त्यांच्या पाठीवर थाप मारण्याचे कामसुध्दा आपल्या सभागृहाने करणे ही काळाची गरज आहे. कालच आपल्या संपूर्ण भारतामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये अत्यंत आनंद झाला. आपला क्रिकेटपटू श्री.सचिन तेंडूलकर यांनी एक विश्व पराक्रम केला आहे. चार विश्व क्रिकेटपटूमध्ये त्यांचे पाचवे नाव आता गेलेले आहे. सचिन तेंडूलकर हा पाचवा फलंदाज असून ज्याने 10,000 पेक्षाही जास्त धावा केलेल्या आहेत. त्यामुळे आज सुनील गावस्कर यांच्याबरोबरीने त्यांचे नाव आलेले आहेत आणि महत्वाची बाब म्हणजे 122 सामाने खेळून 57 सरासरी देऊन त्यांनी या 10,000 धावा केल्या आहेत. आपण सगळेजण आता वाट पहात आहोत की, तो पस्तिसावे शतक केव्हा करील. तेव्हा या ठिकाणी मी सचिन तेंडूलकरांचे या सभागृहाने अभिनंदन करावे अशी या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे.

(यानंतर श्री.गायकवाड)

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

डॉ.वसंत पवार ....

पुढच्या क्रिकेटच्या कारकिर्दीत श्री.सचिन तेंडूलकर याने 40 शतकापर्यन्त जावे आणि 15 हजार धावा पूर्ण कराव्यात तसेच महाराष्ट्राचा आणि देशाचा नाव लौकिक जास्तीत जास्त वाढावा यासाठी मी आपल्या अनुमतीने खालील प्रस्ताव मांडू इच्छितो :

"भारताच्या या महान सर्वकालीन .....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हा प्रस्ताव मांडण्यास आपण सन्माननीय सदस्यांना परवानगी दिली आहे काय ?

सभापती : सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांना औचित्याचा मुद्दा मांडण्यास मी परवानगी दिली आहे. हा प्रस्ताव मांडण्यास त्यांना मी परवानगी दिलेली नाही.सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे . सन्माननीय सदस्य जो प्रस्ताव मांडत आहे त्या प्रस्तावातील भावनेला माझा विरोध नाही.परंतु या सभागृहाच्या काही प्रथा, परांपरा आहेत तसेच सभागृहाचे काही नियम आहेत.सन्माननीय सदस्यांना जर काही प्रस्ताव मांडावयाचा असेल तर प्रोसिजरप्रमाणे त्यासाठी माननीय सभापतींची परवानगी घ्यावी लागते.सत्तारुढ पक्ष आणि विरोधी पक्षाच्या संमतीने नंतर हा प्रस्ताव मांडला जातो. सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांना मी सांगू इच्छितो की., त्सुनामी लाटांमुळे मृत्यूमुखी पडलेल्या लोकांना जेव्हा श्रध्दाजंली अर्पण करावयाची होती तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी मला त्याबाबतीत फोन करुन सांगितले होते. तेव्हा मी त्यांना सांगितले की, "ठीक आहे हा शोक प्रस्ताव घेण्यात यावा. त्या संदर्भात आम्हाला काहीही म्हणावयाचे नाही."अशा प्रकारे लोकशाहीची प्रथा आणि परंपरा आहे.सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांना अभिनंदनाचा प्रस्ताव येथे मांडावयाचा आहे परंतु हा प्रस्ताव मांडण्यापूर्वी जर त्यांनी मला सांगितले असते तर आपण दोघांनी मिळून या संबंधीचा प्रस्ताव दिला असता व त्यासाठी माननीय सभापतींची परवानगी मागितली असती.परंतु सन्माननीय सदस्य डॉ.वसत पवार हे माननीय सभापतींची परवानगी न घेता बोलले आहेत ते योग्य नाही. त्यासाठी माननीय सभापतींना वेगळया मार्गाने परवानगी द्यावयाची असेल तर ती त्यांनी द्यावी.परंतु आतापर्यन्त ते जे काही बोलले आहेत ते रेकॉर्डवर ठेवण्यात येऊ नये.हा प्रस्ताव मांडण्यास नंतर परवानगी द्यावयाची की नाही हा तुमचा प्रश्न आहे.नियमाला धरुन हे कामकाज झालेले नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MHM/ KGS/ प्रथम श्री.उपरे

सभापती :सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांना मी सांगू इच्छितो की, औचित्याच्या मुद्दाव्दारे सभागृहासमोर तुम्ही हा इश्यू मांडलेला आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला एकाच गोष्टीचा खुलासा करावयाचा आहे. सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांनी हा विषय या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. त्याबाबतीत मी त्यांना असे सांगितले होते की, हा मुद्दा उपस्थित करण्यासाठी दुसरे कोणतेही आयुध आपल्याकडे उपलब्ध नाही.तेव्हा आपण औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने हा विषय उपस्थित करावा आणि नंतर सर्व संमतीने हा प्रस्ताव मांडावा. तेव्हा आता त्यांनी औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने हा विषय मांडलेला आहे परंतु प्रस्ताव मात्र सर्वाच्या संमतीने नंतर सभागृहासमोर येऊ द्यावा.

सभापती : या सबंधीची चर्चा मी आता थांबवितो.

श्री.दिलीप वळसे पाटील :सभापती महोदय, आपणच अभिनंदन करावे आणि हा विषय संपवावा असे मला वाटते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, त्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याला आमचा विरोध नाही. हा प्रस्ताव मांडण्यासाठी दोन्ही पक्षाच्या प्रतोदांनी माननीय सभापतीना विनंती करावी व त्यासाठी आपण परवानगी घ्यावी .त्यानंतर एक वाक्याचा हा प्रस्ताव सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांनीच मांडावा. त्याला आम्ही समर्थन देऊ. हे सभागृह नियमाने चालले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.सन्माननीय सदस्यांच्या भावनेला आमचा विरोध नाही.

श्री.उल्हास पवार :सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. हा मुद्दा मी कालच मांडणार होतो.

सभापती : औचित्याचे मुद्दे मांडण्याची प्रथा आपण बंद केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे तेवढया मर्यादेपर्यन्तच अपवाद म्हणून हा औचित्याचा मुद्दा मांडण्यास मी सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांना परवानगी दिली होती.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, मी पॉईन्ट ऑफ इनफरमेशन मांडू इच्छितो. सन्माननीय महामहिम राज्यपालांचे दिनांक 14 मार्च रोजी अभिभाषण झाले होते.माझ्या माहिती प्रमाणे शिष्टाचाराप्रमाणे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या अगोदर राष्ट्रगीत होणे आवश्यक होते.त्या दिवशी माननीय राज्यपालांच्या उपस्थितीमध्ये अगोदर राष्ट्रगीत झालेले नाही.

नंतर श्री.कानडे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

SSK/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. गायकवाड 14:15

श्री. उल्हास पवार ....

सभापती महोदय, माहिती चुकीची असेल तर दुरुस्त करायला मी तयार आहे. मला खरी माहिती द्यावी. मा. राज्यपालांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रगीत होणे आवश्यक आहे.

सभापती : याबाबत मी वस्तुस्थिती तपासून घेतो. अशा पध्दतीने एखादी गोष्ट राहून गेली असेल तर तसे होता कामा नये. परंतु पूर्वी अशी प्रथा नसेल आणि ती आता सुरु करावयाची किंवा नाही याबाबत ठरविता येईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, अतिशय धक्कादायक माहिती मला मिळालेली आहे. ज्यांचा आदर्श तमाम महाराष्ट्रवासीय ठेवतात त्या शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचा लिलाव सध्या चालू आहे. महाराष्ट्र सरकार शिवाजी महाराजांचे किल्ले ताब्यात घेऊ शकते. पुरातत्व विभागाकडे तसे अधिकार आहेत. अतिशय गंभीर विषय आहे.

सभापती : संबंधित विभागाकडून मी माहिती घेतो.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, एका गंभीर विषयाकडे मी आपले लक्ष वेधण्यासाठी उभी आहे. परवा राज्यामध्ये काही ठिकाणी भूकंपाचा धक्का बसला. संध्याकाळी आम्ही जेव्हा मनोरा येथील आमदार निवासामध्ये पोहोचलो त्यावेळी मनोरा आमदार निवासातील मध्यवर्ती दरवाजा वगळता अन्य सर्व दारे बंद होती. अन्य सर्व दारांना कुलुपे लावण्यात आलेली होती. मी दारे उघडण्यासाठी विनंती केली असता आम्हांला वरुन परवानगी नाही असे आम्हांला सांगण्यात आले. सर्व दरवाजे उघडावयाचे असतील तर आमच्या वरिष्ठांना पत्र द्या असे सांगण्यात आले. 4 ते 7.30 पर्यंत मी सातत्याने फोन करीत होते आणि शेवटी मी पत्र सुध्दा दिले. आपत्कालीन स्थितीमध्ये भूकंप झाला तर लोकांना बाहेर पडायचे असेल तर ते शक्य नाही असे मी मॅनेजरला सांगितले. मॅनेजरने सांगितले की प्रत्येक दारापाशी काचेच्या पेटीमध्ये दरवाजाची चावी आहे आणि सेवकाने त्या चावीन कुलूप उघडल्यानंतर बाहेर पडावयाचे. माझा प्रश्न असा आहे की, सेवक आपला जीव वाचविणार की आमदारांचा जीव वाचविणार. शेवटी विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री. राणे साहेब यांना मी रात्री 8.30 वा. फोन केला आणि त्यानंतर 10 मिनिटांनी सर्व दरवाजे उघडण्यात आले. जोपर्यंत भूकंपाबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट होत नाही तोर्यंत मनोरा आमदार निवासातील सर्व दरवाजे उघडे ठेवण्याबाबत आपण शासनाला निदेश द्यावेत. (..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : याबाबत मा. मंत्रीमहोदयांनी स्वत: पाहणी करावी. याबाबत अनेक लोकांच्या तक्रारी आहेत. तीन दरवाजे बंद असतील आणि एकच दरवाजा उघडा असेल तर वाहने आणि लोकांना जाण्या-येण्याच्या दृष्टीने अवघड आहे. वाहनांना आणि माणसांना सहजपणे जाता येईल आणि येता येईल अशी व्यवस्था करावी. मंत्रीमहोदयांनी संबंधित विभागाशी चर्चा करावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मनोरा आमदार निवासाच्या संदर्भात याठिकाणी प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. याबाबत मी जरुर माहिती घेईन. मनोरा आमदार निवासाच्या सुरक्षेच्या दृष्टीने यापूर्वी काही निर्णय घेतला असेल तर त्याचा विचार करावा लागणार आहे. याबाबत मी संबंधित अधिका-यांशी जरुर चर्चा करीन.

यानंतर श्री. सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : अध्यक्ष महाराज, या संबंधात माहिती घेण्याचा काही प्रश्नच उद्‌भवत नाही. तेथील ज्या चार इमारतींमध्ये आमदार राहतात त्या इमारतीचे चारही दरवाजे बंद केलेले आहेत आणि केवळ एकच दरवाजा ये-जा करण्यासाठी उघडा ठेवलेला आहे. मी स्वत: याबाबत विचारणा केली असता मला सांगण्यात आले की, मोबाईल्स चोरीला जातात म्हणून हे दरवाजे बंद करण्यात आलेले आहेत. अध्यक्ष महाराज, संकट काळामध्ये प्रसंग आला तर आमदार तसेच इतरांनाही इमारतीतून बाहेर पडण्यास कोठे वावच ठेवण्यात आलेला नाही. कारण नसताना हे दरवाजे बंद करण्याने उद्या मोठा अनर्थ उद्‌भवू शकतो. तरी आपण याबाबत योग्य तो निर्णय घेऊन संबंधितांना आदेश द्यावेत ही विनंती.

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मी स्वत: या बाबत माननीय संसदीय कामकाज मंत्री आणि अन्य अधिकारी यांची उद्या दुपारी एक बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावतो.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, या विधानभवनाच्या इमारतीतील उद्‌वाहनांचाही मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. यापूर्वी उद्‌वाहन नेमके कोठल्या मजल्यावर आहे हे समजत तरी होते. पण आता तेही समजत नाही शिवाय आपल्याला पाहिजे त्या मजल्याचे बटन दाबल्यानंतर ते रजिस्टर देखील होत नाही त्यामुळे लिफ्ट मिळण्याची मुष्कील होते. तरी आपण हाही प्रश्न सोडविण्याची कृपा करावी.

सभापती : सन्माननीय सदस्यांना माझी विनंती राहील की, अशा ज्या आपल्या आणखी काही अडचणी असतील तर त्याबाबत आपण माझ्या दालनात येऊन सांगितले तरी त्या अडचणी सोडविण्यात पुष्कळशी मदत करता येईल. यासाठी प्रश्न सभागृहातच उपस्थित केला पाहिजे असे नाही. तरी आता यानंतर कार्यक्रम पत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात येईल.

***

..... व्हीव्ही 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचा सन् 2002-2003 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ. सुनील देशमुख : महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचा सन् 2002-2003 चा महालेखापालांचा लेखापरीक्षण व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

श्री. प्रमोद नवलकर : अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत असलेला अहवाल वेगळा आहे आणि आमच्या हाती आलेला अहवाल वेगळाच आहे. आमच्या हाती आलेला अहवाल हा 1999-2000 आणि 2000-2001 सालचा आहे. ... कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या अहवालाबाबतच मी सांगत आहे ...

डॉ. सुनील देशमुख : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांकडे असलेले अहवाल या अगोदरचे आहेत. आता मी जो अहवाल सभागृहासमोर ठेवीत आहे तो वेगळा आहे आणि तो सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्यानंतर माननीय सदस्यांच्याकडे जाईल.

सभापती : लेखापरीक्षण आणि त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

डॉ. सुनील देशमुख : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खारे विकास महामंडळाचा सन् 2001-2002 चा सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

***

<u>औचित्याच्या मुद्याबाबत</u> .....

श्री. प्रमोद नवलकर : अध्यक्ष महाराज, मला एक औचित्याचा मुद्दा आपल्यापुढे उपस्थित करावयाचा आहे. न्या.पी.बी.सावंत आयोगाचा अहवाल आताच आमच्या हाती आलेला आहे... पाच मिनिटापूर्वीच शिपायाने आणून दिलेला आहे. पण गेल्या 3 दिवसापासून वर्तमानपत्रातून या अहवालाची चर्चा चाललेली आहे. ... (यानंतर श्री.जागडे .... W W 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर.....

पत्रकारांच्या हातात हा अहवाल आहे. या बाबत बाहेर तीन दिवस चर्चा सुरु आहे. वर्तमानपत्रातून यावर अग्रलेख आलेले आहेत. अशा परिस्थितीत आता हा अहवाल आमच्या हातात येत आहे.

सभापती : अहवाल सादर झाल्यानंतर तो त्वरीत सदस्यांच्या पीजन होलमध्ये टाकण्यात आला आहे.

श्री. प्रमोद नवलकर : हा अहवाल प्रथम आम्हाला न मिळता पत्रकारांना देण्यात आला आहे. हे योग्य आहे काय ?

सभापती : अहवाल प्रथम सदस्यांना कसे मिळतील, या दृष्टीने व्यवस्था केली जाईल.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, हा अहवाल इंग्रजीत आहे. आम्हाला तो वाचता येत नाही. त्यामुळे मराठीतील अहवाल आम्हाला मिळाला पाहिजे.

सभापती : मराठीतून अहवाल देण्याची व्यवस्था शासनाला करता येईल काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सन्माननीय नवलकरसाहेबांना इंग्रजी वाचता येत नाही, हे नवलच आहे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पु.शी. व मु.शी : **अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे**

डॉ. दीपक सावंत (समिती सदस्य):महोदय,मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 18 मार्च, 2005 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखाविण्यात येणा-या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 17 मार्च, 2005 समितीची बैठक झाली. विधानपरिषदेकडे सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांचे एक पुर:स्थापनार्थ आहे. त्यासाठी 5 मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित 145 मिनिटांचा वेळ अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे देण्यात यावा, अशी शिफारस समितीने केली आहे.

1) श्री. मधुकर चव्हाण, वि. प. स. यांचा ठराव क्रमांक 59 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

2) डॉ. नीलम गो-हे, वि.प. स. यांचा ठराव क्रमांक 31 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

3) श्री. संजय दत्त, वि. प. स. यांचा ठराव क्रमांक- 64 45 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकांच्या ठरावास देण्यात यावा, अशीही शिफारस केली आहे.

सभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

डॉ. दीपक सावंत (समिती सदस्य):महोदय,अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वये सूचना

सभापती : माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी " दि. 12.3.2005 रोजी थेऊर, जि.पुणे येथे एका दलित कुटूंबावर उपसरपंचाने केलेल्या बेछूट गोळीबारात कुटूंबातील सुमारे 11 जण गंभीर जखमी होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री. अनंत तरे व इतर यांनी " कोहोजगाव, ता. उल्हासनगर, जि. ठाणे येथील सीतामाऊली विद्यामंदिर या मान्यताप्राप्त नसलेल्या शाळेच्या व्यवस्थापनाने 10 वीच्या विद्यार्थ्यांकडून जमा केलेली परीक्षा फी न भरल्यामुळे विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी " बाळापूर पंचायत समितीच्या (जि. अकोला) प्रभारी गटविकास अधिका-यांने त्यांच्याबाबत मुख्य कार्यकारी अधिका-याकडे तक्रार केल्यामुळे एका ग्रामस्थास जीवे मारण्याची दिलेली धमकी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.शासनाने लक्ष घालावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्न गंभीर असल्यामुळे शासनाला यावर निवेदन करण्यास सांगावे.

सभापती : शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी " देगलूर, जि. नांदेड येथील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेत जमा केलेले वेतनाचे पैसे गेल्या तीन महिन्यापासून बँकेकडून अदा करण्यात न येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.शासनाने गांभिर्याने लक्ष घालावे.

(यानंतर श्री. सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा. सभापती ...

माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी "अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक व प्रकल्प अधिकारी, नंदूरबार यांच्या गलथान कारभारामुळे सुमारे 1200 आदिवासी विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान, सदर अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता" याविषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. सूचनेतील विषय नियम 93 चा होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारतो. याबाबत माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना दिल्यास ती स्वीकारण्यात येईल.

माननीय सदस्य श्री. मधु चव्हाण व इतर यांनी "आंध्र प्रदेश, जम्मू-काश्मीर, नागालँड येथून बेकायदेशीर रित्या आणलेले शस्त्र परवाने राज्य शासनाने ऑल इंडिया परमीट म्हणून अधिकृत करण्याची केलेली बेकायदेशीर कृती" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. सूचनेतील विषय हा नियम 93 चा होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारतो. शासनाने त्यावर निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी "महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या निर्णयाविरोधात बुधवार, दिनांक 16.3.2005 रोजी मध्यरात्री पासून वीज मंडळाचे एक लाख कर्मचारी संपावर जाणे, यामुळे राज्यातील वीज वितरण यंत्रणा कोलमडून पडणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. सूचनेतील विषय नियम 93 चा होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारतो. यावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री. मधु चव्हाण व इतर यांनी "मुंबईतील धर्मादाय रुग्णालयांपैकी बहुतांश रुग्णालये 10 टक्के रुग्णांना मोफत सेवा न देता मोठे शुल्क आकारुन आर्थिक शोषण करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. सूचनेतील विषय नियम 93 चा होत नसल्यामुळे व या विषयावरील लक्षवेधी सूचना स्वीकृत करीत असल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

इतर सर्व नियम 93 च्या सूचनांना मी दालनामध्ये अनुमती नाकारली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कापसाला 2700 रुपये भाव देण्याच्या घोषणेपासून शासनाने घेतलेली माघार.

मु.शी.: कापसाला 2700 रुपये भाव देण्याच्या घोषणेपासून शासनाने घेतलेली माघार या विषयी श्री. नितीन गडकरी यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे चालू)

सभापती : सभागृहाच्या कामकाजाच्या सुरुवातीला प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी मी सभागृहामध्ये सांगितले होते की, काल या सभागृहामध्ये नियम 97 अन्वये चर्चा घेण्यात आली होती व ती चर्चा अपूर्ण राहिली होती. सभागृहाच्या परंपरेनुसार त्या चर्चेला संबंधित मंत्रिमहोदयांनीं उत्तर देणे अपेक्षित असते. परंतु वेळेअभावी म्हणा किंवा त्यावेळी वेगळी चर्चा झाली म्हणून इच्छा असतांनाही मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण होऊ शकले नाही. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, कालची अपूर्ण राहिलेली चर्चा आता आपण पुन्हा सुरु करु या. यामध्ये माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दहा मिनिटे भाषण करावे, त्यानंतर माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सात मिनिटे भाषण करावे. सत्ताधारी पक्षाकडून जर माननीय सदस्यांची बोलण्याची इच्छा असेल आणि त्यासंबंधी माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी सांगितले तर त्यांना परवानगी दिली जाईल. माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी काल खालच्या सभागृहामध्ये कापसासंबंधी निवेदन केले ते निवेदन करावे आणि त्यासंबंधीच्या चर्चेला उत्तर द्यावे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, काल या विषयावर अडीच तास चर्चा होती, परंतु ती अडीच तासामध्ये पार पडलेली नाही....

सभापती : काल सव्वा दोन तासामध्ये चर्चा संपलेली आहे...

श्री. जयंत प्र.पाटील : काल अडीच तासापैकी अर्धा तास सुध्दा चर्चा झाली नाही. सव्वा दोन तासामध्ये एकमेकांचे मुद्दे खोडून काढण्यावरच चर्चा झाली. मुळात कापसावर जी चर्चा व्हायला पाहिजे ती काही झाली नाही. मा. उप मुख्यमंत्र्यांनी केलेल्या निवेदनामध्ये दोष आढळले त्यावरच दोन तास चर्चा झाली. सुरुवातीला माननीय सभापतींनी अडीच तासाची चर्चा होईल असे सांगितले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

आणि नंतर ती चर्चा गुंडाळण्यात आली. अशाप्रकारची अनिष्ट प्रथा पडणे बरोबर नाही, ही बाब अन्यायकारक आहे.

सभापती : आपण काल अडीच तास बसलो, दरम्यानच्या काळात 30 ते 40 मिनिटे सदनाचे कामकाज तहकूब झाले. दरम्यानच्या काळात व्यवस्थित चर्चा न झाल्यामुळे व त्यामधून मार्ग काढावा यासाठी मी आज हा पुर्ननिर्णय घेतला. मी याठिकाणी काही माननीय सदस्यांना बोलण्याकरिता परवानगी दिली आहे. त्यानंतर माननीय पणन मंत्री हे कालचे कापसासंबंधीचे निवेदन वाचून दाखवतील व त्याचबरोबर कालच्या आणि आजच्या चर्चेला ते उत्तर देतील.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आपण कापसाच्या प्रश्नाच्या संदर्भात नियम 97 अन्वये आज पुन्हा चर्चा करण्यासाठी अनुमती दिली, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, या विषयावर खूप चर्चा व्हावी अशी इच्छा होती. नागपूर अधिवेशनाच्या वेळी कापूस या विषयावरच अधिवेशन संपले. त्याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले की, कापसाची पूर्ण खरेदी करु. कापसाचा शेवटचा बोंड असेपर्यंत खरेदी करु आणि कापूस खरेदी केल्यावर 15 दिवसाच्या आत आम्ही शेतक-यांना हमी भावाने रक्कम देऊ आणि जून व ऑक्टोबरमध्ये अग्रीम देऊ. पण एकतर कापूस खरेदी उशीरा सुरु झाली आणि त्या बाबतीत प्रचंड प्रमाणात घोळ निर्माण झाला. विदर्भ, मराठवाडा, खानदेशमध्ये फार मोठया प्रमाणात गोंधळ निर्माण झाला. कारण या शासनाने मुळातच असे धोरण ठरविले होते की, कापूस एकाधिकार योजना रद्द करावी आणि अशा मानसिकतेला आलेल्या शासनाने या मंडळातील जवळजवळ 80 टक्के कर्मचा-यांना निवृत्त केल्यामुळे कापूस एकाधिकार योजनेसाठी काम करण्याकरता कर्मचारीच राहीले नाहीत ही खरी बाब होती. पण निवडणुकीच्या काळात शेतक-यांना भुलविण्यासाठी, सत्ता काबीज करण्यासाठी आम्ही अमुक इतका भाव देऊ असे सांगून शेतक-यांची दिशाभूल करण्यात आली आणि त्यामुळे पुढे ही एकाधिकार योजना सुरु ठेवण्याची वेळ आली आणि माननीय मंत्री महोदयांची एखाद्या सापळयामध्ये सापडल्यासारखी अवस्था झाली. पण हा विषय राजकारणाचा करावयाचा नाही असे विरोधी पक्षाने ठरविले. 18 तारखेला नागपूर अधिवेशन संपल्यानंतर दोन-तीन आठवडे आम्ही एकही शब्द बोललो नाही. कारण दिलेल्या शब्दाचे पालन करण्यासाठी शासनाला काही मुदत द्यावी असा मानस होतो. पण याबाबतीत कार्यवाही झाली नाही. खरेदी केंद्रावर रांगाच्यारांगा लागल्या आणि त्याचा परिणाम फार गंभीर झाला. तीन-तीन, चार-चार कि.मी.पर्यंत रांगा लागल्या. कारण पुरेशी खरेदी केंद्रे उघडण्याची क्षमता मंडळाची आणि शासनाची नव्हती . कारण त्यांच्याकडे कर्मचारी नव्हते. ज्यांनी व्ही.आर.एस.घेऊन सर्व आर्थिक लाभ घेतले होते, त्यांनाच पुन्हा बोलवावे लागले आणि त्या कर्मचा-यांना कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर घ्यावे लागले.पूर्वी जेव्हा ते मंडळाचे कर्मचारी होते, तेव्हा त्यांच्यावर मंडळाचा दबाव होता, पण आता हे कर्मचारी कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर आल्यामुळे त्यांच्यावर शासनाचा दबाव राहीला नाही आणि त्याचा परिणाम असा झाला की, या खरेदीमध्ये मोठा भ्रष्टाचार झाला. एवढा मोठा भ्रष्टाचार झाला की सर्व शेतकरी

. . . .2 वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

बाजार समितीपुढे उभे राहीले आणि त्यांनी टोकन द्या अशी मागणी केली. मग दलालांची चलती झाली आणि टोकन देण्यासाठी एक हजार रुपयांचा भाव सुरु झाला. व्यापा-यांचीही चलती सुरु झाली. याबाबतीत आणखी बरेच सांगता येईल. त्यानंतर मी पश्चिम विदर्भामध्ये रास्ता रोको आंदोलन केले आणि 10 तारखेला मी स्वत: माननीय मंत्री महोदयांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. त्यावेळी माझ्याबरोबर 100 शेतकरी होते. त्यातील ज्या मागण्या आहेत, त्या त्यांनी मान्य केल्या की नाहीत हे उत्तराच्या भाषणात सांगावे. यातील प्रमुख मागण्या अशा आहेत की, शेतक-यांच्या बैलबंडीला न्याय द्यावा, त्यांची प्रतिक्षा संपवावी, अगतिकता संपवावी. व्यापा-यांचे प्राधान्य कमी करावे. ग्रेडरकडून होणारा भष्टाचार थांबवावा. कारण त्यांनी प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार करुन शेतक-यांची फसवणूक केलेली आहे आणि व्यापा-यांच्या पदरात दान टाकलेले आहे. तसेच बाजार समितीचे कुपन देण्याच्या बाबतीत होणारा भ्रष्टाचार थांबवावा. परप्रांतातून येणारा कापूस थांबवावा. सरकारच्याविरुध्द काम करणा-यांविरुध्द खटले भरावेत. ट्रकमधून जो बेकायदेशीररित्या माल येतो, ते थांबविण्यात यावे. दुष्काळी भागातील, अवर्षणप्रवण भागातील शेतक-यांचे चुकारे त्वरित द्यावेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

नंतर नाही, ते चुकारे त्वरित द्या. इतर लोकांचे थांबवा पण त्यांचे चुकारे पंधरा दिवसात त्वरित द्या, अशा प्रकारची मी मागणी केली होती.शेतक-यांचा माल आल्या नंतर त्याची व्यवस्था करणे, त्याच्या जनावरांची व्यवस्था करणे ही बाजार समितीची जबाबदारी आहे. पण 15/15 दिवस थंडी-वा-यामध्ये थांबलेल्या शेतक-यांकडे पाहिले ना शेतक-याच्या बैलांकडे त्यांनी पाहिले, नां बैलांचा चारापाणी पाहिला. पण त्यांनी बाजार समितीच्या एक टक्का फी ची मागणी केलेली आहे ती कितपत योग्य आहे. म्हणून मी त्यासंदर्भात मागणी केली होती, त्याच वेळेला आपण निर्णय दिला की, ही सर्वच्या सर्व फी शेतक-यांना परत दिली जाईल. मंत्रिमहोदयांनी त्या दिवशी कबूल केले पण त्यासंबंधीचा कोणताही आदेश न काढल्यामुळे ती फी परत दिली गेली नाही. म्हणून माझी विनंती आहे की, सर्व खरेदी केंद्रावर शेतक-यांकडून पर क्विन्टल घेतलेले पैसे त्यांना परत दिले जावेत. ते पैसे परत देण्याचे आपण मान्य केलेले आहे. तेव्हा यासंबंधीची घोषणा करणे आवश्यक आहे. कारण ते आपण मान्य केलेले आहे. कापूस खरेदी केंद्र वाढवा वगैरे बाबतीत मी बोलणार नाही. कारण आता कापूस खरेदी संपलेली आहे. पण मला खेदाने नमूद करावेसे वाटते की, मी मंत्रिमहोदयांना भेटल्या नंतर सुध्दा कापूस खरेदीमध्ये म्हणावे तशी प्रगती झालेली नाही. 24 तारखेला बाजार समितीपुढे मी पुन्हा आंदोलन केले. भ्रष्टाचार थांबवावा यासाठी मी आंदोलन केले. शेतक-यांच्या मैल-मैल लांब रांगा लागलेल्या आहेत. त्या शेतक-यांकडे कोणी अधिकारी येऊन पाहात नाहीत. बाजार समिती पाहात नाही. आणि सरकारचेही लक्ष त्यांच्याकडे नाही. त्यमुळे शेतकरी अनेक दिवस तेथे राहिल्यामुळे त्यांचे बळी जायला लागले. ते मृत्यूमुखी पडले. सभापती महोदय, मृत्यूमुखी पडलेल्या शेतक-यांची माझ्याकडे यादी आहे. श्री. गोपाळ वैजनाथ शिंदे हया शेतक-याचा 4 जानेवारी रोजी ऱ्हदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाला. त्यांच्यावर 8500 रुपयाचे बँकेचे कर्ज आहे. त्यांची बैलबंडी विकली जात नाही, म्हणून ते पंधरा-वीस दिवस तेथे होते. गोविंद-पोरचे, जिल्हा बिड येथील 50 वर्षाचे ज्ञानोबा गाढेकर यांचा केशवराव जिनिंग मिलवर पंधरा दिवस राहिल्यामुळे थंडीमध्ये गारठून मृत्यू झाला. या सर्वांच्या नातेवाईकांकडे जाऊन त्यांना मी भेटून आलो आहे. खटवाळ वळवणी, जिल्हा बीड येथील संदीपान चौधरी हे 20 दिवस कापसाची बैलबंडी घेऊन रांगेत उभे होते. ते वेडे झाले. त्यांना श्री. अवचट जाऊन भेटले. मी ही संभाजीनगरमध्ये घाटी रुग्णालयात जाऊन त्यांना भेटलो. ते वेडयासारखे करत होते. त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

भेटायला कोणी गेले तर ते त्यांना ओळखत नव्हते. ते वेडेच झालेले होते. कापूस घेता कां, कापूस घेता कां? असे ते त्या रुग्णालयात ओरडत होते. ते भ्रमिष्ट झालेले आहेत आणि आजही ते रुग्णालयात आहेत. केळापूर तालुका नांदेड मुकुंद बंडेवार हे कापूस खरेदी केंद्रावर ऱ्हदयविकाराचा झटका येऊन मृत्युमुखी पडले. शिरसाळा, परळी येथील श्री. नानासाहेब सोळंके दहा दिवस कापसाचे माप न झाल्यामुळे खरेदी केंद्रावर चौकशी करण्याकरिता गेले असतांना सभापती महोदय, त्यासंबंधात सर्व छापून आलेले आहे, पण त्याची चौकशी कां केली नाही, याचे मला वाईट वाटते. चित्रलेखाच्या दि.12 फेब्रुवारी,2005 च्या अंकात त्यांच्या संबंधात छापून आलेले आहे. ते मुद्दाम मी या ठिकाणी वाचून दाखवितो. "परळी-शिरसाळा येथील कापूस खरेदी केंद्रावर नानासहेब सोळंके हे शेतकरी 10 दिवस मुक्काम ठोकून होते. खरेदी केंद्रावर त्यांनी कर्मचा-यांकडे कपूस विक्री बाबत चौकशी केलेली असतांना, त्यांना मुजोरपणाने उत्तरे देण्यात आली. एक दिवस तेथील हमालाच्या मदतीने कर्मचा-यांनी श्री. नानासाहेबांना बेदम मारहाण केली, त्याचा धस्का तेथील काही शेतक-यांनी घेतला आणि बिडमध्ये नंतर हे सगळे मृत्यूचे थैमान सुरु झाले." एवढया मुजोरपणाने या कापूस केंद्रावर दुर्दैवी परिस्थितीमध्ये शेतक-यांना हाताळण्यात आले. ही बाब मी या सभागृहात मुद्दाम मांडीत आहे. सभापती महोदय, कापूस एकाधिकार खरेदी मोडीत काढणार अशा प्रकारची भुमिका आमच्या सन्माननीय पणन मंत्र्यांनी मांडली. दिनांक 4-2.-2005 च्या जनमाध्यममध्ये त्यांची मुलाखत छापून आलेली आहे. ते त्यावेळेला तिकडे गेले होते. जनमाघ्यममध्ये असे म्हटल्े आहे की, पणन मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी यासंदर्भात स्पष्ट भुमिका घेतली. लोकप्रिय घोषणांच्या मागे कितीकाळ लागायचे याचा राजकीय नेत्यांनी गंभीर विचार करण्याची वेळ आलेली आहे, असे आपल्या सरकारला खडसावले. म्हणजे त्यांनी त्यांच्या सरकारला खडसावले. या योजनेचे नेमके काय करायचे ते पुढील वर्षी ठरविणे आवश्यक आहे. हे कापूस एकाधिकार मोडीत काढण्याचे सुतोवाच सन्माननीय मंत्रिमहोदयांनी केलेले आहे. कापूस एकाधिकारच्या चुका-याचा प्रश्न आता अत्यंत गंभीर झालेला आहे. त्या प्रश्नावर कितपत बोलावे? काल आमच्या चर्चेचे दोन तास त्यामध्ये गेलेले आहेत. आणि आज माननीय उपमुख्यमंत्री महोदय, दमबाजी करत त्या अधिका-याकडून खोटेनाटे कां होईना काही तरी आणून सांगतील. परंतु एक

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

गोष्ट निदर्शनास आणतो की, शेतक-यांची फसवणूक या सभागृहाच्या माध्यमातून झाली तर विरोधी पक्ष म्हणून आम्ही ते सहन करु अशातला भाग त्यांनी समजू नये. कोणत्याही परिस्थितीत ते सहन केले जाणार नाही, हे समजून घ्या. कारण काल आपण सांगितलेले आहे की, हे अधिवेशन संपेपर्यंत आम्ही सर्व पैसे देऊ. काल पुन्हा एकदा निदर्शनास आणली म्हणून एक गोष्ट मला या ठिकाणी निदर्शनास आणून द्यावयाची आहे आणि त्याचा पाठपुरावा आणि त्याची सत्यता माननीय पणन मंत्र्यांनी द्यावयाची आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, ज्यावेळी हे आंदोलन केले त्यावेळी स्टेट बँकेशी संपर्क साधला. ते 3 हजार कोटी रुपये देण्यास तयार होते. त्यांची एकच अट होती की आम्ही हे पैसे सरकारला देणार नाही, शेतकऱ्यांना देऊ. शेतकऱ्यांचे चेक आणा, त्यांना देऊ. मी तशा प्रकारे सचिवांशी बोललो. माननीय पणन मंत्र्यांशी बोललो. माननीय मुख्यमंत्र्यांपर्यन्त जाण्याचा प्रयत्न केला. 20 तारखेला त्यांची बैठक झाली. हे सगळे मी काल मांडलेले आहे. विरोधी पक्षाने नुसती विरोधाची भूमिका घेतलेली नाही तर जे करता येईल तेवढे करण्याचा आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. कारण हा विषय राजकारणाचा नाही. सभापती महोदय, एका गोष्टीचा मी तीव्र निषेध करतो. या योजनेमुळे महाराष्ट्राचा सगळा अर्थसंकल्प खड्डयात जात आहे, कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या या योजनेला 4 हजार कोटी रुपयांचा तोटा आलेला आहे अशी बोंब मारली जाते. मला हा प्रश्न विचारावयाचा आहे की, ऊस उत्पादकांकडून आता तुम्हाला तातडीने 6 हजार कोटी रुपयांचे येणे बाकी आहे. ते येत नाही त्याबद्दल कधी आरडाओरड होत नाही. मला त्यांच्याबद्दल तक्रार करावयाची नाही. परंतु विदर्भ, मराठवाडयातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या नावाने आम्हाला दरवर्षी एवढा एवढा तोटा येतो असे सांगितले जाते. आताच आपण प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सांगितले की, महाराष्ट्रातील कापूस उत्पादकांच्या कापसाची उत्पादन किंमत 2909 रुपये आहे. दोन नंबरच्या म्हणजे कमी लांबीच्या धाग्याच्या कापसाची उत्पादन किंमत शासनाने 2703 रुपये ठरविलेली आहे. त्याच्याहून जी कमी किंमत आहे ती 2300 रुपये आहे. याचा अर्थ आपण जो हमी भाव देत आहात आणि जो अग्रीम देणार आहात तसेच बोनसच्या नावाने बोंब मारता यामध्येही शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे. शेतकऱ्यांना 2900 रुपये भाव मिळाला पाहिजे. तो सुध्दा मिळत नाही. त्यामध्ये 700 रुपये कमी मिळत आहेत. ही शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे, लुबाडणूक होत आहे. तुम्हाला बोनस देतो असे जे काही आपण सांगता अशा प्रकारची शेतकऱ्यांची परिस्थिती नाही. अमेरिकेमध्ये जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे अमेरिकेमध्ये त्यांनी शेतकऱ्यांना 7 हजार कोटी डॉलर्सची सबसिडी दिली आणि त्यासंदर्भातील खटला सुध्दा दाखल करण्यात आला. मग आपल्या शेतकऱ्यांना तुम्ही दोन पैसे जास्त देतो असे सांगितल्या नंतर, मुळातच त्यांच्या कापसाची उत्पादन किंमत 2900 रुपये असताना आपण 2500 रुपये भाव जाहीर केला आणि त्यांना 1600 रुपये मिळत आहेत. म्हणजे त्यांच्या उत्पादन किंमतीपेक्षा 1 हजार रुपये कमी देत असताना देखील या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. म्हणून त्या त्या योजनेला तोटा आला, अर्थसंकल्पावर ताण पडला, फार मोठी खरेदी झाली अशा प्रकारे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या बाबतीत जी बोंब चालली आहे, जी बदनामी चालली आहे ती थांबविली गेली पाहिजे. आम्ही जे शेतकऱ्यांना देत आहोत तेच मुळात कमी आहे, त्यांच्या उत्पादन किंमतीपेक्षा कमी आहे आणि भविष्यामध्ये त्यांच्या आत्महत्या वाढतील अशी भीती वाटते. म्हणून मघाशी दोन मागण्या केलेल्या आहेत त्या आहेतच. परंतु महाराष्ट्रातील साखर कारखानदारी वाचविण्यासाठी, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नाही तर कारखानदारी वाचविण्यासाठी गॅट कराराच्या अंतर्गत केंद्राने आयात करावर 50 टक्के शुल्क लावले. आदरणीय श्री. शरद पवार साहेब आज केंद्रामध्ये कृषी मंत्री आहेत. मग कापसाच्या बाबतीत जी 10 टक्के डयुटी आहे ती जर आपण वाढविली तर आयातीवर निर्बन्ध येईल आणि आज आमचे पणन मंत्री ज्या चिंतेमध्ये आहेत की कोणीही टेंडर उचलत नाही, गाठीच्या गाठी पडून आहेत त्या पडलेल्या गाठी खपण्याकरिता निश्चितपणाने वाव मिळेल म्हणून ही तातडीने मागणी करुन कोणत्याही परिस्थितीमध्ये जसे साखरेच्या बाबतीत केंद्रात बसून आयात शुल्काच्या संदर्भात संरक्षण दिलेले आहे तसे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना संरक्षण द्यावे अशा प्रकारची मी या माध्यमातून विनंती करतो. खूप जरी सांगावयाचे असले, बरेच काही बोलावयाचे असले, अन्य खूप माहिती असली तरी अल्प का होईना आपण मला शेतकऱ्यांच्या भावना मांडण्याकरिता संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो आणि भविष्यामध्ये अशाच प्रकारे शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाणीव आपण ठेवाल याबद्दल खात्री असल्यामुळे, विश्वास असल्यामुळे शेतकऱ्यांना या सदनाच्या माध्यमातून न्याय मिळावा आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये 31 मार्चपूर्वी चुकारे करावेत अशी आग्रहाची विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

अशुधीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत बोलतील.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझ्याऐवजी सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांना बोलण्याची संधी द्यावी.

सभापती : ठीक आहे.

श्री. विलास अवचट (विधानसभेने निवडले) : सभापती महोदय, आपण या प्रश्नाच्या संदर्भात मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी बरेच मुद्दे मांडलेले आहेत. मी त्याबाबतीत बोलणार नाही. सभापती महोदय, खासकरुन संभाजीनगर जिल्हयामध्ये टोकनच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या तक्रारी येत होत्या, त्या ठिकाणी जो भ्रष्टाचार झाला त्यासंबंधीचा मुद्दा मांडाणार आहे. या वर्षी महाराष्ट्रात आणि खासकरुन मराठवाडा आणि विदर्भामध्ये कापसाचे जे उत्पादन झाले त्याप्रमाणात जी खरेदी केंद्रे उपलब्ध होण्याची आवश्यकता होती ती उपलब्ध न झाल्यामुळे आम्ही सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या नेतृत्वाखाली सन्माननीय मंत्रिमहोदयांना भेटलो. आणि त्यांना विनंती केली की, मराठवाडयात खासकरुन जास्तीत जास्त खरेदी केंद्रे उघडण्याची आवश्यकता आहे. त्यांनी सुध्दा आश्वासन दिले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट..

ज्यावेळी संभाजीनगर जिल्हयामध्ये गेलो होतो त्यावेळी अनेक तक्रारी आल्या होत्या. त्याच्या अनुषंगाने दिनांक 5 फेब्रुवारी रोजी पैठणचे आमदार श्री.संदीपान भुमरे यांच्याबरोबर मी मौजे लोहगाव याठिकाणच्या कापूस खरेदी केंद्रावर भेट दिली होती. त्याठिकाणी प्रत्यक्षात शेतक-याने जे सांगितले होते ते मंत्रिमहोदय आपण कृपया ऐकावे. पण महासंघाचे कर्मचारी श्री.अनिल हसनराव देशमुख यांनी "तुम्हाला जर टोकन पाहिजे असेल तर 500 रुपये द्यावेत" असे शेतक-यांना सांगितले. याबाबत आम्ही श्री.अनिल देशमुख यांना विचारले असता त्यांनी हे मान्य केले आणि त्या शेतक-याचे 500 रुपये परत केले. त्या शेतक-याप्रमाणे इतर शेतकरी देखील आमचेही 500 रुपये परत करावेत असे सांगण्यासाठी पुढे आले. त्यावेळी त्या कर्मचा-याने आता देऊ शकत नाही परंतु नंतर तुमचे पैसे परत करतो असे सांगितले आणि त्या शेतक-यांचे पैसे परतही केले आहेत. हा भ्रष्टाचाराचा उत्तम नमुना आहे. याच खरेदी केंद्रावर शेतकरी टोकन घेण्यासाठी गेले त्यावेळी जे सांगण्यात आले आहे ते भ्रष्टाचारावर प्रकाश टाकणारे आहे. या केंद्रावरील श्री.संजय बाबुराव जाधव व अनिल हसनराव देशमुख यांनी शेतक-यांना सांगितले की, "त्सुनामी लाटांच्या संकटग्रस्तांसाठी मदत करण्यात येणार आहे. औरंगाबाद जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने 100 रुपयांच्या पावत्या काढल्या आहेत. ज्या शेतक-यांना टोकन पाहिजे असेल त्यांनी हया पावत्या घेतल्या तर त्यांना टोकन देऊ. या शासनातील राष्ट्रवादी काँग्रेस हा एक प्रमुख पक्ष आहे. सभापती महोदय, हया पावत्या आम्ही जप्त केल्या आहेत. यासंदर्भात मी औरंगाबाद विभागाच्या विभागीय आयुक्तांची प्रत्यक्षात भेट घेऊन त्यांना एक पत्र दिले आहे. ते पत्र दिल्यानंतर यासंबंधी पोलीस अधिक्षकांना तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश देतो असे विभागीय आयुक्तांनी मला सांगितले होते. त्यानंतर विभागीय आयुक्तांनी पोलीस अधिक्षकांना 3 स्मरण पत्रे पाठविली आहेत. परंतु आजतागायत पोलीस अधिक्षकांनी संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केलेला नाही. एखादा आमदार पुराव्यानिशी भ्रष्टाचार उघड करीत असेल आणि त्याबाबत विभागीय आयुक्त 3 स्मरणपत्रे पोलीस अधिक्षकांना पाठवितात आणि या प्रकरणासंबंधी दीड महिन्यानंतरही कारवाई होत नसेल तर हे कार्यक्षम सरकार आहे असे म्हणता येईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट...

औरंगाबाद जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष श्री.कैलास पाटील-चिकटगांवकर, श्री.प्रशांत शिंदे, जिल्हा चिटणीस यांनी 31 जानेवारी रोजी ऑक्रेस्ट्राचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्याच्यानंतरही 5 फेब्रुवारी रोजी त्या पावत्या त्या खरेदी केंद्रावर होत्या याची चौकशी होणे आवश्यक आहे, एवढेच मी यानिमित्ताने बोलून येथेच थांबतो.

सभापती : मघाशी आपण जी चर्चा केली होती त्यानुसार दोन मा.सदस्यांची भाषणे झाल्यानंतर मा.पणन मंत्र्यांनी स्पष्टीकरण व उत्तराचे भाषण करावयाचे होते. परंतु मा.सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी या विषयावर बोलण्याची विनंती केली असल्यामुळे मी त्यांना 5 मिनिटे बोलण्याची परवानगी देत आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, 1200 कोटी रुपयांचे काय झाले त्याचे उत्तर पाहिजे होते.

श्री.हर्षवर्धन पाटील : मा.सदस्यांनी जरा थोडेसे थांबावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MHM/

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मला आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी प्रथम आपल्याला धन्यवाद देतो. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी या सभागृहामध्ये कापसाच्या प्रश्नावर गदारोळ झाला. या राज्याचे उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी याठिकाणी घोषणा केली की, कापूस उत्पादक शेतक-यांचे शासनाने 2400 कोटी रुपये देणे बाकी आहे त्यापैकी 1200 कोटी रुपये 3 दिवसामध्ये देऊ आणि उर्वरित 1200 कोटी रुपये मार्च महिनाअखेर देऊ. मुळात मुद्दा असा आहे की, या राज्यामध्ये कापसाचे पीक हे एक नंबरचे नगदी पीक आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर पुढे सुरु...)

या राज्यातील जवळपास 17 जिल्ह्यामध्ये कापसाचे पीक घेतले जाते. या राज्यामध्ये कापूस एकाधिकार योजना 1972 पासून सुरु झाली. या योजनेच्या माध्यमातून जो कापूस खरेदी केला जातो त्याचे पेमेंट शेतक-याला ताबडतोबीने दिले जाते. परंतु या वर्षी कापसाची प्रचंड प्रमाणात खरेदी झाली हे मला मान्य आहे. कापूस एकाधिकार योजनेच्या इतिहासातील कापूस खरेदीचा हा उच्चांक झालेला आहे. राज्यामध्ये 200 लाख क्विंटल कापसाची खरेदी झाली. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, कापूस केन्द्रावर आला, परंतु तो कापूस खरेदी करण्यामध्ये आपण अपुरे पडलो. दीड-दीड महिना कापसाचे मोजमाप झालेले नाही. ट्रॅक्टर आणि बैलगाडीचे भाडे शेतक-याच्या डोक्यावर बसले. दीड-दीड महिना ह्या गाड्या केन्द्रावर उभ्या राहिल्यामुळे कापसाच्या किंमती ऐवढेच या ट्रॅक्टर आणि बैल गाडयांचे भाडे झाले. अनेक ठिकाणी शेतकरी वेडे झाले, अनेक ठिकाणी शेतक-यांनी आत्महत्या केल्या. बीड जिल्हयातील मानेवाडी येथील श्रीमती वृंदावनी सुनील माने या महिलेचा कापूस दीड महिन्यापासून केन्द्रावर होता. तिच्या कापसाचे मोजमाप झाले नाही. दीड महिन्यानंतर तिचा 15 क्विंटल कापूस चोरीला गेला. त्यामुळे ती कंटाळली आणि अंगावर रॉकेल ओतून तिने आत्महत्या केली. असे अनेक प्रकार मला सांगता येतील. परंतु मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु याठिकाणी मी स्पेसिफिक खामगाव झोनचे उदाहरण देणार आहे. कारण त्या झोनच्या अंतर्गत मी राहातो. माझे त्या ठिकाणी वास्तव्य असते. मी वेळोवेळी सरकारी अधिकारी, पणन महासंघाचे अधिकारी, जॉईन्ट रजिस्ट्रार, डीडीआर यांना सांगून सुध्दा खामगाव सेंटरवर प्रचंड प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. एका बाजूला शेतक-यांच्या कापसाचे दीड दीड महिना मोजमाप होत नव्हते आणि दुस-या बाजूला कॉटन मार्केटचे ट्रॅक्टर येत होते. त्या ट्रक्टरचे नंबर देखील देता येतील. रोज एक ट्रॅक्टर सकाळी केन्द्रावर यायचा आणि संध्याकाळी परत जायचा. दुस-या दिवशी पुन्हा तो ट्रॅक्टर जीनवर येऊन उभा रहायचा. अशा अनेक ट्रॅक्टरमधून येणा-या कापुसाचे रोज मोजमाप व्हायचे आणि दुस-या बाजूला शेतक-यांचा कापूस दीड दीड महिने मोजला जात नव्हता. तेथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांनी कुपन पुस्तके परस्पर बाहेर छापून ती कुपन कॉटन मार्केटच्या आवारात न देता ती व्यापा-यांना दिली. त्यामुळे शेतक-यांच्या कापसाचे दीड दीड महिना मोजमाप होऊ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर पुढे सुरु...)

शकले नाही. या प्रकाराची चौकशी होणार आहे की नाही ? माझा दुसरा मुद्दा चुका-यासंबंधी आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटीलसाहेब विदर्भात आले आणि त्यांनी सांगितले की, शेवटचे बोंड असे पर्यन्त आम्ही कापूस खरेदी करु. परंतु त्यांनी आम्हाला हे सांगावे की, तीन दिवसात 1200 कोटी रु. कसे काय देणार ? मा. पणन मंत्र्यांनी सांगितले की, बाजारात कर्जरोख उभे करुन हे पैसे उभे करणार आहोत. मार्च महिन्याचे 15 दिवश शिल्लक आहेत. 15 दिवसात कर्जरोख्याच्या माध्यमातून पैसे कसे काय उभे करणार. तसेच उर्वरित अग्रीम जून आणि दिवाळीच्या वेळी दिला जाणार होता. तोही पैसा कोठून उभा करणार आहात हे या सभागृहाला समजले पाहिजे. महाराष्ट्रातील शेतक-यांना तीन दिवसात 1200 कोटी रु. देणार आहात. हे 1200 कोटी रु. विविध बँकांना रिलिज झाले आहेत काय ? महाराष्ट्र सरकारकडून जर ही पैशाची व्यवस्था होणार नसेल तर महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतक-यांसाठी 2 हजार कोटी रुपयांचे पॅकेज महाराष्ट्र सरकारने केन्द्र सरकारकडे मागितले पाहिजेत. तेव्हा हे सरकार तशा प्रकारची मागणी केन्द्राकडे करणार आहे काय ?

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील (पणन मंत्री) : सभापती महोदय, या सदनामध्ये मा. विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी एका महत्वाच्या विषयावर याठिकाणी चर्चा उपस्थित केली आणि त्या चर्चेमध्ये दोन्ही बाजूच्या मा.सदस्यांनी भाग घेतला. या चर्चेच्या माध्यमातून या ठिकाणी काही प्रश्न उपस्थित करण्यात आले. राज्यातील, विशेषत: विदर्भ, मराठवाडा या भागातील शेतक-यांच्यादृष्टीने हा अत्यंत महत्वाचा विषय आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MHM/ MHM/ SBT/ प्रथम शिगम 15:00

श्री.हर्षवर्धन पाटील...

सन्माननीय सदस्यांनी जे काही प्रश्न उपस्थित केले त्या प्रश्नाच्या बाबतीमध्ये माहिती देऊ इच्छितो आणि नंतर काल मी कापसाच्या संदर्भात विधानसभेत निवेदन केलेले आहे ते निवेदन आपल्या अनुमतीने या सभागृहात देखील करणार आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी यांनी विचारणा केली की, या योजनेत किती कापूस खरेदी करण्यात आला ? कापूस खरेदीची नेमकी रक्कम किती होते ? ती रक्कम आपण कशी उपलब्ध करणार ? या संदर्भात कायदा व सुव्यवस्था आहे की नाही ? नागपूर येथील अधिवेशनात सरकारतर्फे काय उत्तर देण्यात आले होते आणि पुढे कोणती कार्यवाही झाली ? तसेच या बाबतीत सरकारचे पुढील वर्षी काय धोरण रहाणार आहे ? असे अनेक प्रश्न काल या सदनात केले. त्या प्रश्नांना मी माझ्या भाषणाच्या माध्यमातून उत्तर देण्याचा प्रयत्न करणार आहे. त्याच प्रमाणे या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी काही मुद्दे उपस्थित केले. माझ्या दालनात या संदर्भात एक बैठक झाली त्यावेळी यासंदर्भातील एक निवेदन मला प्राप्त झालेले आहे. सभापती महोदय, कापूस एकाधिकार योजनेच्या इतिहासामध्ये या वर्षी विक्रमी खरेदी केली आहे.जवळपास 209 लाख क्विंटल कापूस 410 केंद्राच्या माध्यमातून खरेदी केलेला आहे. एक गोष्ट खरी आहे की, ही खरेदी करीत असताना शेतक-यांना शक्यतो केंद्राहून परत पाठवीत नाही. परंतु काही प्रशासकीय अडचणी निर्माण झाल्या, या योजनेत काही दोष आहेत हे या सदनात कबूल करण्यास मला कुठलीही अडचण वाटत नाही. ही यंत्रणा गेली 30-32 वर्षे या राज्यात काम करीत आहे. गेल्या दोन वर्षामध्ये 4800 कर्मचा-यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. त्यासाठी 132 कोटी रुपयांचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या समोर मी नेला आणि मंजूर करुन घेतला. या यंत्रणेतील तीन संघटनांनी स्वेच्छानिवृत्तीचा निर्णय घेतला. या वर्षी 22 जिल्हे आणि 108 तालुके हे 50 पैसे आणेवारीच्या खाली असल्याचे घोषित करण्यात आले आहेत.त्या 108 तालुक्यापैकी 77 तालुके हे कापूस पिकविणारे आहेत. म्हणून आम्ही असा अंदाज केला की, 50 ते 60 लाख क्विंटल कापूस आपल्याकडे येईल. परंतु आम्ही प्रत्यक्षात 8 नोव्हेंबर,04 रोजी कापसाची खरेदी सुरु केली. खरेदीस सुरुवात झाली तेंव्हा आम्ही अंदाज 50 लाखाचा बांधला होता. नंतर अंदाज 75 लाखापर्यन्त गेला. पुन्हा असे वाटले की, 1 लाख क्विंटल कापूस येऊन खरेदी थांबेल. सभापती महोदय, बघता बघता 28 जून 05 पर्यन्त 209 लाख क्विंटल कापूस खरेदी आम्हाला करावी लागली. त्यानंतर काही प्रशासकीय निर्णय आम्हाला करावे लागले.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...

ट्रॅक्टरने कापूस येत होता ती खरेदी बंद करण्याचा आम्ही निर्णय घेतला. विरोधी पक्ष नेते श्री.गडकरी यांनी एका ट्रॅक्टरच्या मागे एक बैलबंडी होती असे दृश्य त्यांनी पाहिले. कापूस खरेदी करताना अडचणी आल्या ही गोष्ट खरी आहे. ही योजना राबवित असताना आम्हाला ब-याच ठिकाणी कर्मचा-यांची,अधिका-यांची कमतरता भासली. ज्या कर्मचा-यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली त्या कर्मचा-यांना,अधिका-यांना आम्ही पुन्हा बोलाविण्याचा प्रयत्न केला. राज्य शासनाच्या सहकार विभागातील कर्मचारी,अधिकारी घेण्याचा आम्ही प्रयत्न केला. त्या त्या परिसरातील गट सचिव,त्याच प्रमाणे बाजार समित्यांमधील कृषी सचिव,कृषी सहाय्यक या सगळया कर्मचा-यांना एकत्रित करुन 209 लाख क्विंटल कापूस या योजनेच्या माध्यमातून खरेदी केला. शेतक-यांना त्रास व्हावा, शेतक-यांना कुठे तरी अडवावे असे कुठलेही धोरण राज्य सरकारने घेतलेले नाही. यापूर्वी कुठलेही सरकार आले असेल त्यांनी कापूस खरेदीच्या संदर्भातील असा निर्णय कधीही घेतलेला नसेल. शेतक-यांसाठी या सरकारने अतिशय महत्वपूर्ण निर्णय वेळोवेळी घेतलेले आहेत. या यंत्रणेमध्ये काही दोष आहेत ते दुरुस्त करण्याच्या बाबतीमध्ये प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे..

यानंतर श्री. उपरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.हर्षवर्धन पाटील)

सभापती महोदय,मी नागपूरच्या अधिवेशनामध्ये सांगितले की, कापसाचे चुकारे ताबडतोब उपलब्ध करून देऊ. हे मी मान्य करतो की, मी सभागृहामध्ये बोललो होतो. याबाबतची वस्तुस्थितीसुध्दा जाणून घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मी आपल्या मार्फत सदनाला सांगू इच्छितो की, आज जवळजवळ 40 लाख गाठी कापूस पणन महासंघाकडे शिल्लक आहे. आपण अध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मंत्री म्हणून काम केलेले आहे. म्हणून या सगळ्या परिस्थितीचा विचार केला तर एका बाजूला आम्ही 1652 कोटी रुपयांच्या संदर्भातील कॅबिनेटचा निर्णय पहिल्यांदा घेतला. नंतरच्या खरेदीचे सगळे चित्र डोळ्यासमोर पाहिल्यानंतर आम्हांला अग्रीमसह जवळपास 4,500 कोटी रक्कम सगळ्या शेतक-यांना देण्याकरिता उपलब्ध करावी लागेल. अशा प्रकारचे चित्रउ दिसले. खरेदीचे आकडे वाढत गेले त्यामुळे पुढील काळामध्येसुध्दा आपल्याला नियोजन करावे लागेल असे चित्र निर्माण झाले आहे. या सगळ्या परिस्थितीचा आपण अभ्यास केला तर एका बाजूला गाठींची विक्री व्हायला तयार नाही. दुस-या बाजूला दर सोमवारी आम्ही इंटरनेटवर टेंडर्स काढली आहेत पण कोणीही त्या टेंडर्सची चौकशीसुध्दा करीत नाही. म्हणून चित्र असे निर्माण झाले की, एका बाजूला गाठी विकायला तयार नाहीत आणि दुस-या बाजूला जी काही आपण पैशांची व्यवस्था करण्याचा प्रयत्न करीत होतो ते पैसे मिळण्यामध्येही काही अडचणी निर्माण होत होत्या. या सगळ्या अडचणींमुळे शेतक-यांचे पैसे देण्यासाठी विलंब झाला ही गोष्ट नाकारून चालणार नाही. कारण हे सर्व या सदनाला आणि शेतक-यांनाही माहिती आहे. शेतकरी आम्हांला येऊन असे सांगायचे की, तुम्ही आमचा कापूस घ्या. आमचा सरकारवर पूर्ण विश्वास आहे. सरकार आमचे पैसे बुडविणार नाही. पैसे देण्याच्या बाबतीत ज्या भागात दुष्काळ आहे त्यांचे पेमेंट करण्याचा विचार आम्ही केला. आम्ही 20 क्विंटलपर्यंतचे पेमेंट करण्याचा निर्णय केला पण त्यालाही आता विरोध होत आहे. खालच्या सदनामध्येसुध्दा काही सन्माननीय सदस्य असे म्हणाले की, तुम्ही असा भेदभाव कसा काय करता ? 20 क्विंटलला वेगळा न्याय आणि 100 क्विंटलला वेगळा न्याय. शेवटी आपण सगळेजण एकत्र बसून विचार करून निर्णय करतो त्यावेळी जो सर्वसामान्य शेतकरी आहे, लहान शेतकरी आहे तो ख-या अर्थाने दुष्काळामध्ये सापडलेला आहे त्यांचा अगोदर विचार करतो. शेवटी सर्व पैसे आपल्याला एकदम उपलब्ध होणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.हर्षवर्धन पाटील)

नाहीत. त्यामुळे जी रक्कम उपलब्ध होईल ती रक्कम मिळाल्यानंतर प्राधान्याने जो लहान शेतकरी आहे, गरीब शेतकरी आहे, दुष्काळी भागातील शेतकरी आहे, ज्याचे गाव किंवा परिसर हा 50 पैशांच्या आणेवारीच्या खाली आलेला आहे त्यांचाही विचार आपल्याला करावा लागणार आहे. त्यामुळे या सगळ्या गोष्टींचा विचार करून आम्ही नियोजन करीत आहोत. म्हणून या सगळ्या प्रश्नांची आपण एकत्रितपणे चर्चा करीत असताना काही तक्रारी माझ्याकडे प्राप्त झाल्या. काही ठिकाणी ॲन्टी करप्शनच्या धाडी पडल्या. काही ठिकाणी कापसाला आगी लागल्या. नेवासा या ठिकाणी जी आग लागली तेथे जवळपास 9 ते 10 कोटी रुपयांचा कापूस जळून गेला. त्या प्रकरणाच्या बाबतीत सी.आय.डी. इन्क्वॉयरी करण्याचे मी आदेश दिले. आपण माझ्याबरोबर एका चर्चेला उपस्थित होता. म्हणून सभापती महोदय, या सा-या प्रश्नाचा आपण राजकारण न आणता विचार केला पाहिजे.आपण एकत्रितपणे विचार केला पाहिजे. मला समाधान वाटले की, या प्रश्नामध्ये आपण एक मुलभूत विचार मांडण्याचा प्रयत्न केला. कोणीही राजकारण करण्याचा प्रयत्न केला नाही. स्टेट बँकेचे पैसे उपलब्ध करून देण्याकरिता आपण प्रयत्न केले. मला या ठिकाणी उल्लेख केला पाहिजे की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात एक बैठक झाली आणि त्या पध्दतीने माझीसुध्दा दोन वेळा बैठक झाली. त्या अनुषंगाने मंत्रिमंडळासमोर तो प्रस्ताव आला. त्यासंदर्भात काय निर्णय राज्य सरकारने घेतला आहे हे मी माझ्या निवेदनात सांगणार आहे. ग्रेडरच्या बाबतीत काही तक्रारी आल्या त्यांची आम्ही चौकशी सुरू केलेली आहे. आमच्या पणन महासंघातील दोन-तीन अधिकारी ॲन्टी करप्शनच्या जाळ्यात सापडले त्यांना आम्ही निलंबीत केले आणि त्यांच्या संदर्भातील कारवाई आम्ही सुरू केली. दुसरे मला या सदनामध्ये नम्रपणे सांगावेसे वाटते की, आमच्या पणन महासंघाच्या अधिका-यांच्या तोंडाला काळे फासण्याचे कामसुध्दा झालेले आहे. लोकशाहीच्या माध्यमातून आपण आंदोलन करा. पण एक तर माझ्याकडे मॅनपॉवर कमी आहे. आपण या ठिकाणी मागणी करता की, प्रत्येक विभागामध्ये सेंटर्स वाढवा. पण सेंटर्स वाढविण्यासाठी माणसे कोठून आणायची ? शेवटी या जबाबदा-या आपण कोणावर टाकणार ? सभापती महोदय, 410 सेंटर्समध्ये 210 लाख क्विंटल कापसाची खरेदी. मागचा 30 वर्षाचा इतिहास आपण काढून पहा. या सगळ्या अडचणींच्या काळामध्ये केवळ या राज्यातील शेतक-यांना न्याय देण्यासाठी आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.हर्षवर्धन पाटील)

त्याला कोणत्याही प्रकारची अडचण येता कामा नये ही भूमिका डोळ्यासमोर ठेवून आपण अशा प्रकारचा निर्णय केला. माझ्याकडे सहा-सात उदाहरणे आहेत. खालच्या सदनाचे सन्माननीय सदस्यांनी आमच्या अधिका-यांना मारहाण केली. आमच्याकडे तर एका झोनल मॅनेजरच्या भर चौकामध्ये थोबाडात मारली. याबाबत आपण कोठे तरी विचार केला पाहिजे. बुलढाण्याच्या केसमध्येसुध्दा देशमुख नावाच्या झोनल मॅनेजरच्या तोंडाला काळे फासून त्याला तीन तास त्या कार्यालयामधून बाहेर येऊ दिले नाही. नागपूरच्या कार्यालयालासुध्दा कुलूप लावण्याचा प्रकार झाला.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील ...

एका बाजूला शेतक-याला न्याय देण्यासाठी सहकार्य करु असे आपण सांगता आहात आणि दुस-या बाजूला असे कृत्य करीत आहात.

श्री.पांडुरंग फुंडकर (बसून): त्यांची लायकी तशीच होती.

श्री.हर्षवर्धन पाटील : कायदा हातात घेऊन जर आपण असे करणार असाल तर ते बरोबर होणार नाही कारण जी प्रशासकीय यंत्रणा आहे त्यांच्याकडूनच हे काम आपल्याला करुन घ्यावयाचे आहे.तेव्हा सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांनीसुध्दा याचा गांभीर्याने विचार करावा कारण आपल्याला राज्यातील शेतक-यांना न्याय द्यावयाचा आहे. पणन मंत्री म्हणून मी ही जबाबदारी स्वीकारलेली आहे. जर एखादा अधिकारी काम करीत नसेल वा एखादा अधिकारी जर चुकीच्या पध्दतीने वागत असेल तर त्याच्याविरुध्द कारवाई करण्याकरितासुध्दा आपल्याकडे काही पध्दत आहे.त्या बाबतीत मी अधिक काही भाष्य करु इच्छित नाही. परंतु या संदर्भात खुलासा करीत असतांना मी आपल्याला हे सांगू इच्छितो की ,आज खरेदी केन्द्रे सुरु करीत असतांना आम्ही असा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे की ,असुविधा केन्द्रे सुरु करावयाची नाहीत. काही भागात मागणी आल्यामुळे काही ठिकाणी खरेदी केन्द्रे सुरु करण्याचा आम्ही प्रयत्न केला होता.त्यासबंधीचे सर्व चित्र आपल्यासमोर मांडत असतांना मी सांगू इच्छितो की,अतिशय कमी कालावधीमध्ये केन्द्रावर जास्तीत जास्त कापूस खरेदी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. गेल्या 20-25 वर्षाचा इतिहास जर आपण काढून पाहिला तर आपल्याला दिसून येईल की ,मार्च अखेर, एप्रिल महिन्यात किंवा काही वेळेस 15 मे पर्यन्तसुध्दा कापूस खरेदी केन्द्रे आपण चालू ठेवलेली होती आणि त्या काळात सुध्दा 153 किंवा 175लाख क्विंटलपेक्षा अधिक कापूस आपण खरेदी करु शकलो नाही. परंतु या वर्षी 8 नोव्हेंबर 2004 पासून 28.2.2005 पर्यन्त 209 लाख क्विंटल कापसाची विक्रमी खरेदी केलेली आहे. सुदैवाने गेल्या चार पाच दिवसापासून कापसाच्या गाठींचे भाव वाढावयास लागले आहेत.आपण केन्द्र सरकारकडे अशी मागणी केलेली आहे की केन्द्र सरकारने आयात कर दहा टक्के केला आहे तो वाढवून 50 टक्के करावा.तशा प्रकारचा प्रस्ताव केन्द्रीय वाणिज्य मंत्रालयाकडे दिलेला आहे.माननीय श्री.शरद पवार साहेबांना आम्ही स्वत: भेटलो होतो.माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या मदतीने त्यांच्याकडे याबाबतीत मागणी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केलेली आहे. आज चीनमध्ये,अमेरिकेमध्ये, पाकिस्तानमध्ये कापसाचे बंपर क्रॉप आलेले आहे तेव्हा त्या ठिकाणाहून जर आपल्याकडे कापसाच्या गाठी आल्या तर पुन्हा आपल्याकडील गाठीचे भाव उतरतील. तेव्हा याबाबतीत सुध्दा शासनामार्फत प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. आपल्याकडे आता कापूस खरेदी करण्यात आलेला आहे परंतु या शेतक-यांचे पैसे कसे देणार? या बाबतीत मी आता निवेदन वाचणार आहे. खालच्या सभागृहात मी जे निवेदन केलेले आहे तेच निवेदन या सभागृहात करुन या सदनाचा मान राखण्यात येणार आहे.

श्री.नितीन गडकरी (बसून) : त्यामध्ये जो काही घोळ झालेला आहे तो सुध्दा दुरुस्त करावा लागेल.

श्री.हर्षवर्धन पाटील : तसे काही झालेले असेल तर माननीय उपमुख्यमंत्री या ठिकाणी आलेले आहेत ते या संबंधी सांगतील.कायद्याच्या बाबतीत माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एक मुद्दा उपस्थित केला होता तो मुद्दा प्रोसेसमध्ये आहे. रॉ कॉटन मोनॉपली ॲक्टच्या सबंधीचा जो विषय आहे त्याची प्रोसेस सुरु आहे.पूर्वीचा जो कायदा होता त्या कायद्यात परराज्यातील कापूस आपल्या राज्यात आणण्याकरता बंदी नाही परंतु आपल्या राज्यातील कापूस परराज्यात नेण्यासाठी बंदी होती. मूळ कायद्यात तशी तरतूद आहे. परंतु आता बी.टी कॉटनचे प्रॉडक्शन वाढणार आहे. तेव्हा त्या सगळया गोष्टीचा विचार आपण केला पाहिजे. मघाशी असेही विचारण्यात आले होते की, अमुक एका ट्रकवर कारवाई का करण्यात आली नाही ?अमुक एका व्यापा-याच्या विरुध्द कारवाई का करण्यात आली नाही ? त्याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, काल नागपूरच्या खंडपीठाने मुख्य सचिवांना पाच हजार रुपयाचा दंड केलेला आहे.आजच्या वर्तमानपत्रात ती बातमी आलेली आहे.तेव्हा या कायद्यामध्ये आपल्याला बदल करावा लागणार आहे. रॉ कॉटन मोनापली ॲक्ट मॉडिफाय करुन नंतर सुधारित कायदा आपल्याला आणावा लागणार आहे त्यासाठी जी **काही** माहिती लागणार आहे ती उपलब्ध करुन घेण्याच्या संदर्भात आमचे प्रयत्न सुरु आहेत. यानंतर आपण असा मुद्दा उपस्थित केला होता की, पुढच्या वर्षीचे धोरण कसे राहणार आहे.? आपण असेही बोलला आहात की हे आश्वासन आम्ही पाच वर्षात पूर्ण करणार आहोत.त्याचा आपण तसा अर्थ घेतला आहे.मला त्याबाबतीत खुलासा केला पाहिजे की, पुढच्या वर्षी कापसाच्या बाबतीत कोणते धोरण असावे यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विरोधी पक्ष नेत्यांची बैठक

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील ...

घेतली जाईल आणि त्या बैठकीत सर्वानुमते धोरण ठरविले जाईल. पुढच्या वर्षी शेतक-यांनी कापूस पेरण्यापूर्वी राज्य सरकार हे धोरण जाहीर करील असे मला या निमित्ताने नमूद करावेसे वाटते. सभापती महोदय, खालच्या सभागृहात मी जे निवेदन केले होते ते निवेदन मी आपल्या अनुमतीने या सभागृहात करु इच्छितो. ते निवेदन असे आहे की, " राज्य शासनाने दिनांक 24.8.2004 च्या शासन निर्णयाने राज्यातील कापूस उत्पादक शेतक-यांचे हित लक्षात घेऊन कापूस पणन महासंघामार्फत कापूस खरेदीची योजना जाहीर केली होती सदर योजने अंतर्गत एकूण 410 कापूस खरेदी केन्द्रे कार्यान्वित करण्यात आली होती.दिनांक 13.3.2005 पर्यन्त 209.35 लाख क्विंटल इतकी विक्रमी कापूस खरेदी झालेली आहे."

नंतर श्री.कानडे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**सभापतीस्थानी मा. उपसभापती**)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. रेकॉर्डवर परिणाम होऊ नये म्हणून मी माहिती देत आहे. श्री. आर.आर.पाटील यांनी 15.3.05 रोजी केलेल्या भाषणाची प्रत माझ्याकडे आहे. त्यात त्यांनी असे म्हटले होते की, राज्यातील शेतक-याला कास्तकाराला न्याय मिळाला पाहिजे. त्याच्या कुटुंबामध्ये सुखा-समाधानाचे चार दिवस निर्माण झाले पाहिजेत, ही ध्येय-धोरणे ठेवून आजपर्यंत महाराष्ट्रातील प्रत्येक राज्यकर्त्यांनी कास्तकाराला ,शेतक-याला केंद्रबिंदू मानूनच कामकाज केलेले आहे. राज्यातील कोणत्याही विभागातील शेतकरी कोणत्याही पिकाच्या बाबतीत अडचणीत आला तर मदत करण्याचा दृष्टिकोन नेहमीच राहिलेला आहे. हे आम्ही नाकारत नाही की, जाहीरनाम्यामध्ये 2700 रु. भाव देण्याचे वचन काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने महाराष्ट्रातील जनतेला दिले होते. सभापती महोदय, जाहीरनामा हा पाच वर्षासाठी असतो. पाच वर्षात तेथपर्यंत पोहोचायचे आहे. अशा पध्दतीचा संकल्प जाहीरनाम्याच्या माध्यमातून केला जातो. या राज्यातील कापूस उत्पादक शेतक-याला क्विंटलला 2700 रु. भाव मिळाला पाहिजे असे आश्वासन दिलेले आहे आणि ते पूर्ण करण्यासाठी सरकारकडे तब्बल पावणेपाच वर्षांचा कालावधी बाकी आहे. सभापती महोदय, एकाधिकार कापूस खरेदी योजना पाच वर्षे राहिली तर आश्वासन दिल्याप्रमाणे कापसाला 2700 रु. भाव शासन देऊ शकेल.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, विरोधी पक्षनेत्यांनी मुद्दा उपस्थित केला. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे कापसाच्या बाबतीत पुढील वर्षाचे धोरण निश्चित करताना सर्वांना एकत्र बोलावून चर्चा करुन ठरविले जाईल असे सूतोवाच मी यापूर्वी केले आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्ही सरकारला सल्ला द्यावयाला तयार नाही. आम्हांला बैठकीमध्ये भाग घ्यावयाचा नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, विरोधी पक्षनेत्यांशी आम्ही वेळोवेळी चर्चा करतो. खाजगीमध्ये बोलतो. त्यांच्या मार्गदर्शनाची आम्हांला नेहमीच आवश्यकता आहे. सभापती महोदय, दिनांक 13.3.05 पर्यंत एकूण 209 लाख क्विंटल इतकी विक्रमी कापसाची खरेदी करण्यात आली आहे. सदर कापूस खरेदीची हमी किंमत 3745 कोटी रुपये होत असून कापूस उत्पादक शेतक-यांना आतापर्यंत 1232.26 कोटी रुपये इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शासनाने दि. 14.3.05 च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेस रुपये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

1000.90 कोटी इतकी नजर गहाण कर्जाच्या हमी रकमेस व त्यासाठी आवश्यक असलेल्या 252.10 कोटी इतकी दुराव्याची रक्कम उपलब्ध करुन दिली आहे. अशा प्रकारे 1261 कोटी इतकी रक्कम कापूस उत्पादक शेतक-यांना तातडीने अदा केली जाणार आहे. तसेच पणन महासंघास 500 कोटी रुपये खुल्या बाजारातून खेळते भांडवल उभारणी करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. तसेच भारतीय स्टेट बँकेकडून 500 कोटी रुपये रकमेचा कापूस पणन महासंघास उपलब्ध करुन घेण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. त्याचप्रमाणे उर्वरित 300 कोटी रुपयांचा निधी कापूस गाठी व सरकी विक्रीतून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. अशा प्रकारे हमी भावाची रक्कम शेतक-यांना तातडीने अदा करण्यात येईल. राज्यातील लहान कापूस उत्पादक शेतक-यांचे हित लक्षात घेऊन 20 क्विंटल कापूस टाकला आहे अशा शेतक-यांना प्राधान्याने रक्कम अदा करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. खालच्या सभागृहात आणि वरच्या सभागृहात केलेल्या निवेदनामध्ये फरक आहे. वर्तमानपत्रात आम्ही वाचले की, खालच्या सभागृहात असे सांगण्यात आले की अधिवेशन समाप्त होण्याच्या आधी शेतक-यांना सगळे पैसे देण्यात येतील.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या राज्यातील सर्व शेतक-यांना कापूस खरेदी योजनेमध्ये जो कापूस पणन महासंघास दिलेला आहे अशा शेतक-यांना हमी देऊन संपूर्ण रक्कम अधिवेशन संपण्यापूर्वी शासनाच्या माध्यमातून देण्यात येईल.

यानंतर श्री. सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, ज्या शेतकऱ्यांना 20 क्विंटल कापूस विकला आहे त्यांची रक्कम आधी दिली जाईल आणि त्यानंतर 21 ते 50 क्विंटल कापूस विकलेल्या शेतकऱ्यांना त्यांची रक्कम दिली जाईल. आता काही शेतकऱ्यांनी 21-22 क्विंटल कापूस दिला असेल तर त्यांची रक्कम आपण दुसऱ्या टप्प्यामध्ये देणार आहात म्हणजे त्यांनी 1-2 क्विंटल जास्त कापूस दिल्यामुळे ते रक्कम मिळण्यासाठी मागे पडले आहेत. तरी त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून आपण त्यांना देखील पहिल्या टप्प्यामध्ये रक्कम देण्याचे करणार काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : अध्यक्ष महाराज, 20 क्विंटल पर्यंत ज्या शेतकऱ्यांनी कापूस घातलेला आहे अशा शेतकऱ्यांना आम्ही प्राधान्याने प्रथम पेमेंट करणार आहोत. हा निर्णय आपण अशा साठी घेतला आहे की, 20 क्विंटल कापसाची रक्कम साधारणत: 37-38 हजार रुपये पर्यंत होते आणि आता आमच्याकडे जी रक्कम उपलब्ध होईल त्यामध्ये ही प्रायॉरिटी घेऊन त्यानंतरच्या टप्प्यामध्ये 21 पासून 50 क्विंटल कापूस देणाऱ्यांचा लॉट घ्यावा आणि त्यानंतर 50 ते 100 क्विंटल वा त्यापेक्षा जास्त कापूस देणाऱ्यांचा लॉट घ्यावयाचा असे आपण ठरविले आहे. अध्यक्ष महाराज, बऱ्याच ठिकाणी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.. त्यामध्ये सगळेच दोषी आहेत असे मी म्हणणार नाही. काही मोठे शेतकरी जरूर आहेत की ज्यांच्या शेतामध्ये 100 क्विंटल पेक्षा जास्त कापूस निघाला असेल पण काही ठिकाणी व्यापाऱ्यांनी शेतकऱ्याच्या नावाखाली कापूस आपल्याकडे घातलेला आहे. तेव्हा त्या बाबतीत चौकशी आपण करणार आहोत.

श्री. पांडुरंग फुंडकर : अध्यक्ष महाराज, प्रथम लॉटसाठी 20 क्विंटल पर्यंतची मर्यादा आपण घातलेली आहे पण एखाद्याने 21-22 क्विंटल कापूस आपल्याकडे विकला असेल तर त्याला तेवढ्यासाठी जास्त काळ थांबावे लागणार काय ? कृपा करून आपण असे त्याला थांबावयास लावू नका.

श्री. हर्षवर्धन पाटील : अध्यक्ष महाराज, ही मर्यादा आपण 25 क्विंटलपर्यंत वाढविली तरी मग तेव्हाही 26-27 क्विंटल कापूस घालणारे जे आहेत त्यांचाप्रश्न अशाच प्रकारे उभा राहील. शेवटी लहान शेतकऱ्यांना मदत करण्याचे आपले काम आहे आणि म्हणूनच आपण ही मर्यादा अशा प्रकारे ठरविलेली आहे.

..... 3एच 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा. उपसभापती ...

उपसभापती : 21-22 क्विंटलवाल्यांच्या बाबतीत असा प्रश्न निर्माण होतो हे बरोबर आहे. आणि मंत्री महोदयांच्या म्हणण्याप्रमाणे ही मर्यादा वाढविली तरी त्या लगतच्यांच्या बाबतसुध्दा हा प्रश्न उपस्थित होणार आहे. म्हणून याबाबतीत एक सोपा तोडगा मी सुचवितो तो मान्य झाला तर हा प्रश्न सुटू शकेल असे वाटते. आपण सध्या जी 20 क्विंटलची मर्यादा प्रथम टप्प्यासाठी ठरविली आहे तेव्हा ज्यांनी 21-22 क्विंटल कापूस दिला असेल त्यांनाही पहिल्या टप्प्यामध्ये त्यांच्या 20 क्विंटल कापसाची किंमत चुकती करावी आणि बाकी राहिलेली रक्कम दुसऱ्या टप्प्यामध्ये अदा करावी. असे केले तर यातून मार्ग निघू शकेल असे मला वाटते.

प्रा. बी.टी.देशमुखे : अध्यक्ष महाराज, ज्या हेतूने ही मर्यादा घातली आहे तो आपला हेतू प्रामाणिक आहे हे मान्य करूनही मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण ही जी 20 क्विंटलची मर्यादा घातलेली आहे ती कमी आहे. तरीही माननीय उपसभापतींनी सुचविल्याप्रमाणे आपण केले तरी यातून मार्ग निघेल.. म्हणजे 20 ते 40 क्विंटलच्या दरम्यान ज्यांनी कापूस विकला असेल त्यांना त्यांच्या त्यापैकी 20 क्विंटलपर्यंतचे पैसे पहिल्या टप्प्यामध्ये देवून उरलेले पैसे दुसऱ्या टप्प्यामध्ये देण्याचे करावे आणि दुसरे असे की, ज्यांनी 100 क्विंटल वा त्यापेक्षा जास्त कापूस आपल्याकडे घातला आहे अशांची नावे देखील प्रसिद्ध झाली पाहिजेत, तशी ती करणार का ?

श्री. हर्षवर्धन पाटील : अध्यक्ष महाराज, 100 क्विंटलच्या वर ज्यांनी कापूस विकला आहे त्यांची नावे जरूर प्रसिध्द केली जातील आणि 50 क्विंटल कापूस ज्यांनी आपल्याला विकलेला आहे त्यांनाही आपण पुढील टप्प्यामध्ये पैसे देणार आहोत. म्हणजेच 20 क्विंटल पर्यंतचे पेमेंट आपण प्रथम टप्प्यामध्ये करणार आहोत. या ठिकाणी जसजशी रक्कम आपल्याला उपलब्ध होईल त्याप्रमाणे आपण पैसे देऊ. परंतु ते देताना या पध्दतीने आपण निर्णय घेतलेला आहे हेच मी सांगितले.

श्री. पांडुरंग फुंडकर : अध्यक्ष महाराज, खामगाव झोनमध्ये जे गैरप्रकार घडलेले आहेत ज्यांची तक्रार आम्ही आपल्याकडे केलेली आहे, त्या सर्व प्रकरणांची चौकशी आपण करणार आहात काय ?

(यानंतर श्री. जागडे .... 3आय 1 ...

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, खामगाव झोन येथे जे काही घडले आहे, त्याची निश्चितपणाने चौकशी करु. काही ग्रेडरनी टोकन देत असताना गैरव्यवहार केला आहे. त्यामुळे काही लोकांना मी सस्पेंडही केले आहे. माननीय सदस्यांनी निश्चित अशी माहिती मला दिल्यास योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मयत झालेल्या शेतक-यांचा प्रश्न शिल्लक राहिला आहे. नागपूरच्या अधिवेशनात आपण जे आश्वासन दिले होते, त्याप्रमाणे कारवाई झाली पाहिजे. त्याचे पुढे काय झाले ? सभापती महोदय, कापसाच्या या प्रश्नाबाबत विरोधी पक्षाने आंदोलने केली होती. त्या आंदोलनामध्ये अनेक केसेस दाखल झालेल्या आहेत. शेतक-यांच्या विरोधात या केसेस दाखल झालेल्या आहेत. मा. गृहमंत्र्यांना मी विनंती करतो की, या सर्व केसेस मागे घेण्यात येतील काय ? तसेच मृत झालेल्या शेतक-यांच्या नातेवाईकांना त्वरीत मदत देण्यात येईल काय ? तसेच माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी आपल्या भाषणात ज्या गोष्टींचा उल्लेख केला आहे, त्यावर कारवाई होईल काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कापूस खरेदी केंद्रावर चार शेतकरी मयत झाले आहेत. त्या बाबतची सर्व माहिती माझ्याकडे आहे. एक शेतकरी हॉस्पीटलमध्ये जाऊन मयत झाला आहे. राहिलेले तीन शेतकरी हे वणी, परभणी आणि परळी येथील आहेत. या तीनही शेतक-यांचे प्रस्ताव जिल्हाधिका-यांकडून शासनाकडे प्राप्त झाले आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील एक महिलेने कापूस केंद्रावर जाळून घेतले आहे. तिलाही मदत देण्यात यावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, त्या बाबतची माहिती जिल्हाधिका-यांकडून मागविण्यात आली आहे. शासनाकडे तीन शेतक-यांची माहिती प्राप्त झाली आहे. त्यांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री निधीतून मदत देण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

श्री. दिवाकर रावते : शेतक-यांवरील खटले मागे घेतले जातील काय ?

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, कापूस एकाधिकार खरेदी योजनेमध्ये 4800 कर्मचारी काम करीत होते. त्यांच्यासाठी व्हीआरएसची योजना आणण्यात आली. त्यासाठी शासनाकडून 132 कोटी रुपये मान्य करुन घेतले. आता यातील चार हजार कर्मचा-यांनी व्हीआरएस घेतली आहे. सभापती महोदय, ज्यावेळी कापूस खरेदी केंद्रे सुरु करण्यात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....

आली तेव्हा कर्मचा-यांचा तुटवडा शासनाला भासला. शासनाकडे यावेळी प्रशिक्षित कर्मचारी नव्हते. 4800 पैकी 4000 कर्मचा-यांनी व्हीआरएस घेतली. म्हणून आता शासन आत्मपरीक्षण करुन व्हीआरएस घेतलेल्या कर्मचा-यांना पुन्हा कामावर घेईल काय ?

(यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : ज्या कर्मचाऱ्यांनी व्ही.आर.एस. घेतली आहे त्यांना पुन्हा कामावर घेता येणार नाही. ज्याप्रमाणे सी.सी.आय. ही योजना टर्न की बेसिसवर चालविते त्याप्रमाणे त्या योजनेचे इंम्प्लिमेंटेशन राज्यामध्ये केले जाईल. त्यामुळे कॉस्टमध्ये देखील सेव्हिंग होणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, याठिकाणी दोन प्रश्न उपस्थित करण्यात आले. ज्या शेतकऱ्यांनी आदोलन केले त्यांचे खटले परत घेणार कां? आणि तीन दिवसात 1200 कोटी रुपये देणार कां? कालचा दिवस मी माझ्या दृष्टीने आणि राज्याच्या उप मुख्यमंत्र्यांच्या दृष्टीने सर्वात वाईट दिवस मानतो. परवाच्या दिवशी कापसाच्या प्रश्नावर सदनामध्ये चर्चा सुरु असतांना मी माझी प्रामाणिक भावना व्यक्त केली होती की, शेतकऱ्यांची अडचण दूर करण्यासाठी लवकरात लवकर पैसे दिले गेले पाहिजेत. माझा विदर्भातील दौरा झाल्यानंतर असणाऱ्या पुढील दोन दिवसांच्या सर्व बैठका मी रद्द करुन एकाच प्रश्नाच्या पाठीमागे चिकाटीने लागलो होतो. त्यावेळी मी राजकीय श्रेय मिळविण्यासाठी कोणत्याही वर्तमानपत्रामध्ये स्टेटमेंट केले नव्हते, आणि घोषणा करायला गेलो नव्हतो. लोकांना पेमेंट दिले गेले पाहिजे ही प्रमुख भावना त्या पाठीमागे होती. त्या दिवशी या सदनामध्ये मोठया पोट तिडिकीने प्रश्न उपस्थित केला गेला. त्यावर खूप चर्चा झाल्यानंतर सरकारच्या वतीने त्याला उत्तर दिले गेले की, हे योग्य नाही. आणि म्हणून काल या सदनामध्ये येण्यापूर्वी माननीय मुख्यमंत्री व माननीय पणन मंत्र्यांसमवेत मी एकत्र बसलो होतो. खालच्या सदनामध्ये उत्तर दिले जाणार आहे तसेच उत्तर वरच्या सदनामध्येही दिले पाहिजे. परंतु खालच्या सदनामध्ये गोंधळामुळे कामकाज तहकूब झाले, त्यामुळे उत्तर देता आले नाही. मी या सदनामध्ये उपस्थित असल्यामुळे खालच्या सदनामध्ये काय झाले याची मला कल्पना नाही. परंतु मोठया पोटतिडिकीने याठिकाणी प्रश्न मांडला. माझ्याकडे असलेली माहिती मी आपणाला सांगतो. माननीय मुख्यमंत्र्यांकडे बैठक झाल्यानंतर मी स्वत: व माननीय पणन मंत्र्यांनी स्वत: पुढाकार घेऊन माझ्या दालनामध्ये बैठक घेतली. त्या बैठकीला राज्याचे मुख्य सचिव, पणन सचिव हजर होते, फेडरेशनचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तसेच, राज्य सहकारी बँकेचे चेअरमन व एम.डी. उपस्थित होते, त्या खात्याचे संबंधित राज्यमंत्री उपस्थित होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांसह एवढया व्यापक घेतलेल्या मंत्र्यांच्या बैठकीमध्ये हा प्रश्न माझ्याकडून उपस्थित केला होता की, जर रिझर्व्ह बँकेकडून मान्यता आली नाहीतर आपण पेमेंट करु शकू कां? कारण शेतकऱ्यांना पेमेंट करण्याची आवश्यकता आहे. हे पेमेंट झाले नाहीतर यामधून लॉ अँड ऑर्डरचा प्रश्न निर्माण होईल. गरीब माणसांच्या समस्या उद्भवतील. प्रसंगी रिस्क पत्करुन, धोका पत्करुन लोकांना पेमेंट केले पाहिजे. त्याकरिता राज्य सहकारी बँकेचे सहकार्य मिळेल कां? मला राज्य सहकारी बँकेच्या चेअरमनचे मनापासून अभिनंदन केले पाहिजे की, मी ज्यावेळी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

प्रामाणिकपणे भावना व्यक्त केली त्यावेळी त्यांनी सांगितले की, रिझर्व्ह बँकेची मान्यता आपण नंतर घेऊ. अशा अनेक प्रसंगी आम्ही रिझर्व्ह बँकेची नंतर मान्यता घेतली आहे, ती एक तांत्रिक बाब आहे. राज्य सरकारने यामध्ये काही फॉर्मालिटीज पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. त्या राज्य सरकारने पूर्ण केल्या आहेत. तेव्हा राज्य सहकारी बँकेकडून पेमेंट मिळेल अशापध्दतीचे मत बँकेच्या चेअरमननी आणि एम.डी. नी त्या बैठकीमध्ये व्यक्त केले. ज्यावेळी राज्याचा उप मुख्यमंत्री अनेक मंत्री, मुख्य सचिवांसह बैठक घेतो आणि ठामपणे या सदनाच्या वतीने राज्याच्या जनतेला सांगतो त्यावेळी ती दिशाभूल असू शकत नाही. कोणताही राजकीय श्रेय उपटण्याचा प्रयत्न असू शकत नाही. कारण काल या सदनामध्ये राजकीय उपदेशाचे डोस पाजले गेले. ज्यामुळे अजीर्ण व्हावे एवढे उपदेश आपणाकडून मी ऐकले. तीन दिवसात पेमेंट केले जाईल असे मी काल या सभागृहामध्ये सांगितले आहे. आपण याठिकाणी राज्यातील गरीब शेतकऱ्यांसंबंधी मांडलेली भूमिका मी समजू शकतो. माननीय श्री. गडकरी साहेब आपला विरोध हा नेहमी विधायक विरोध राहिला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

शासनाला निर्भिडपणे सर्वात चांगल्या सूचना करणारा सदस्य म्हणून विरोधी पक्षातून कोणाला पुरस्कार देण्याचा शासनावर प्रसंग आला तर मी आपल्याला, विरोधी पक्षनेत्यांना देईन. पण काल आपल्याला सुध्दा काय झाले होते ? घाई मला झाली नव्हती. घायकुतीला कोण आले होते याचा आता नको, तर रात्री झोपताना निवांतपणे विचार करावा असे माझे अंत:करणापासून आपल्याला आवाहन आहे. तीन दिवस पूर्ण व्हावयाचे होते. कालचा दुसरा दिवस होता आणि कोणते तरी एक पत्र घेऊन आपण हे पेमेंट होणार का ? अशी शंका व्यक्त केली. मी राज्यातील जनतेची दिशाभूल केली अशा पध्दतीची भावना व्यक्त केली. कधी चुकून सापडणारा माणूस जर सापडला तर त्याला धोपटावयास सगळे कसे पाठीमागे लागतात याबाबतीत सगळी वर्तमानपत्रे वाचल्यानंतर . . . .

श्री.नितीन गडकरी(खाली बसून) : तुमच्या पाठीशी कोणी नव्हते.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही सर्व वर्तमानपत्रामध्ये वाचल्यानंतर आणि आज वर्तमानपत्रांमध्ये मोठी हेड लाईन आहे की, "आर.आर.पाटील एकाकी" येथपासून जे काही यावयाचे असेल ते आलेले आहे. पण मी आज ठामपणे सांगू इच्छितो की, मी या राज्यात एकाकी नाही. या राज्यातील सामान्य माणसाच्या सद्भावना माझ्या पाठीशी आहेत. या राज्यातील सहकार माझ्या पाठीशी आहे. मी आजचे वर्तमानपत्र वाचले आणि मग राज्य सहकारी बँकेचे चेअरमन आणि एम.डी.यांना फोन केला की, आपले ठरले होते आणि आजचा तिसरा दिवस आहे. आज मला सांगण्यास आनंद वाटतो की, रिझर्व बँकेची फोनवरुन मान्यता मिळविण्याचा प्रयत्न करुन आज 1200 कोटी रुपये कापूस उत्पादक शेतक-यांसाठी रिलीज करण्याचे आदेश राज्य सहकारी बँकेने काढलेले आहेत. उप मुख्यमंत्र्यांच्या दालनात झालेल्या बैठकीच्या वेळीही आपण दुर्दैवाने असे बोललात, खरेतर आपणही एकेकाळी सत्तेवर होतात. कक्ष अधिका-याच्या सहीचे पत्र हे महत्वाचे असते. खरेतर लोकशाहीमध्ये असे असता उपयोगाचे नाही. जनतेच्या हितासाठी वेळप्रसंगी कायदा बाजूला ठेऊन दिलेले आदेश सुध्दा, लोकप्रतिनिधींचे आदेश सुध्दा महत्वाचे झाले पाहिजेत आणि प्रशासनाने ते मानले पाहिजेत. आज त्या परिसरातील कापूस उत्पादकांची अवस्था पाहिल्यानंतर हे 1200 कोटी रुपये त्यांना आता मिळतीलच. पण उर्वरित 1200 कोटी रुपये सुध्दा शेतक-यांची जेवढी अपेक्षा नाही तेवढया लवकर देण्यासाठी राज्य सरकार बांधील आहे. या गोष्टीची या सदनाच्यावतीने राज्यातील तमाम शेतक-यांना मी ग्वाही देऊ इच्छितो. त्या शेतक-यांनी आमची

. . . .3 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

योजना होती म्हणून त्या शेतक-यांनी कापूस लावला होता. यामध्ये त्यांनी कोणते पाप केले होते. त्यांचा कापूस व्यापारी घेत नव्हते, त्या कापसाला मार्केट नव्हते. शासनाच्या दारामध्ये त्याने निघालेले सर्व पीक आणून टाकलेले होते आणि त्यांचा रोजचा व्यवहार थांबला होता. अशा प्रसंगी मदत करताना शासन आर्थिक नफ्यातोटयाचा हिशोब करु शकत नाही आणि केवळ कायद्यावर बोट ठेऊन गोरगरीबांना दिली जाणारी मदत रोखली जाऊ शकत नाही. एका बाजूला लोक आत्महत्या करीत आहेत, आंदोलने करीत आहेत, कायदा आणि सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होत आहेत. अशा वेळी सर्व बाजूला ठेऊन त्यांना मदत करण्याची आवश्यकता होती सरपोतदारसाहेब. मला नक्कीच घाई झाली नव्हती. घाई झाली असेल तर त्या गरीब माणसाला मदत करण्याची निश्चितच घाई झाली होती . तीन दिवसापूर्वी घाई झाली होती आणि भविष्यात नेहमीच होत राहणार. शेवटी त्यांच्यासाठी आपण राजकारण करताना, समाजकारण करताना, पद उपभोगताना आपण तो घटक घ्यानात ठेवण्याची आवश्यकता आहे. गडकरीसाहेब, आपण मी मिडियासमोर गेल्याचा उल्लेख केला. मी स्वत:हून नक्कीच गेलो नव्हतो. आपल्यालाही या गोष्टीची नक्कीच कल्पना आहे की, आज माध्यम सुध्दा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहेत. या सदनामध्ये एखादे वक्तव्य केल्यानंतर त्याचे डिटेल्स् मिळविण्यासाठी ते सुध्दा प्रयत्न करीत असतात. मी जिन्यावरुन उतरत असताना त्यांनी मला विचारले की, हे पैसे लवकर मिळणार आहेत का ? त्यांनीही या राज्यातील जनतेला सांगावे म्हणून या सदनामध्ये जेवढे सांगितले, तेवढेच मी त्यांना सांगितले, त्यापेक्षा एक चकार शब्द सुध्दा जास्त बोललो नव्हतो. म्हणून माध्यमासाठी आणि प्रसिध्दीसाठी सांगितले हा आपल्या सारख्यांचा निष्कर्ष माझ्यासारख्याला अनाकलनीय आहे. घाई मला नव्हती आणि आपल्यालाही घाई कधीही होत नाही. परंतु काल चुकून आपल्याला सुध्दा झाली. काल आपणही पत्रकार कक्षामध्ये गेलात .

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. आर. आर. पाटील....

माझ्या वाटयाला ते दोन्हीही नाही. "कांदा खाणर कां जोडा खाणार" असे मी वर्तमानपत्रात वाचले. आज खाल्ला असता तर कांद्यावर भागले असते. आता कांदाही खावा लागेल आणि जोडाही खावा लागेल. श्री. गडकरी साहेब आपण सांगितले की नाही, मला माहीत नाही. पण वर्तमानपत्रात मी हे कुठे तरी वाचले. आता मी इतकेच नम्रपणे विचारीन की, आता हा प्रसंग कुणावर आला? आज संध्याकाळ पर्यंत जर आपण थांबला असता तर कदाचित हा प्रसंग आपल्यावरही आला नसता. मी पूर्णपणे विचार करुन, पूर्णपणे माहिती घेऊन, या सदनामध्ये आश्वासन दिले होते. ही सगळी माहिती सांगत असतांना कुठे तरी आपल्याला नाराज करावे, नाउमेद करावे, तुम्ही मला बोललात म्हणून मी तुम्हाला बोलले पाहिजे, एवढया छोटया भुमिकेतून मी सांगत नाही. पण ब-याचवेळा शब्दावर बोट ठेवीत असतांना त्यापाठीमागची भावनासुध्दा ध्यानामध्ये घेतली पाहिजे. शेवटी फार तांत्रिक बाबी नजरेसमोर ठेवून आपण कारभार करावयाला लागलो तर अनेक अडचणी निर्माण होत असतात. संसदीय सिस्टिममध्ये सत्तेवरील लोक जितके महत्वाचे, ही बाजू जितकी महत्वपूर्ण किंबहुना तेवढीच पुढची बाजू सुध्दा महत्वपूर्ण असते. केवळ एक पक्षीय संसदीय पध्दत कधीच असू शकत नाही. काही प्रश्न, काही समस्या पक्षापुढच्या असतात. काही माणसापुढच्या असतात. तर काही राज्यापुढच्या असतात. पक्षा पुढच्या समस्या ज्याच्या त्याने आपल्या क्षमतेप्रमाणे सोडविल्या पाहिजेत. पण राज्या पुढच्या समस्या सोडवतांना आपण सगळे मिळून एकसंघ असले पाहिजे, हया भावना मी नागपूरच्या अधिवेशनामध्ये सुध्दा व्यक्त केल्या होत्या. आणि त्यावेळी आपण खूप अनुकुल प्रतिसाद दिला होता, याची आठवण आपल्याला होत असेल. किमान या राज्यातील सगळया प्रमुख पक्षांनी एकत्र बसून, या राज्यासाठी किमान एक समान कार्यक्रम आखला पाहिजे. आज ज्याला आम्ही चांगले म्हणतो, त्याला तुम्ही वाईट म्हणणार आणि उद्या तुम्ही या बाजूला आल्या नंतर तोच कार्यक्रम तुम्ही चांगला म्हणत असतांना, त्या बाजूला बसून आम्ही वाईट म्हणणार, ही खरे तर लोकशाही असू शकत नाही. ध्येय धोरणाशी हा प्रामाणिकपणा असू शकत नाही. काही प्रश्न, काही समस्या हया पक्षाच्या नाहीत. व्यक्तिच्या नाहीत. त्या राज्यासमोरच्या आहेत. एकत्र येऊन त्यावर मार्ग काढण्याची नक्कीच आवश्यकता असते. नागपूरला आपण जो शब्द दिला होता, त्याचा भविष्यात कुठे वापर करता आला तर जरुर करु. आज मात्र मी इतकेच सांगायला उभा आहे की,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

ना कांदा खाण्याचा प्रसंग माझ्यावर आहे. ना जोडे खाण्याचा प्रसंग माझ्यावर आहे. पण 1200 कोटी रुपये लोकांना उपलब्ध होण्याचा प्रसंग मात्र जनतेवर आला आहे. या गोष्टी बद्दल मी समाधान व्यक्त करतो. मी एकाकी, कां मी खिंडीत सापडलो, यापेक्षा या राज्यात अडचणीला तोंड देणारा शेतकरी एकाकी नाही, त्याच्या पाठिशी खंबीरपणाने तोंड देणारे महाराष्ट्रातील लोकशाही आघाडीचे सरकार आहे, या गोष्टीचा संदेश जरी आपण या निमित्ताने देऊ शकलो तरी मी त्याचाही आनंद मानीन. श्री. फुंडकर साहेब आणि श्री. रावतेसाहेबांनी आणखी एक प्रश्न उपस्थित केला. एका बाजूने थंडीत कुडकुडत आपला कापूस संकलन केंद्रावर घेतला पाहिजे म्हणून शेतकरी रांगा लावित होते. प्रत्येकाच्या सहनशीलतेला सुध्दा मर्यादा असते. ज्यावेळी चार-चार दिवस माणसे उपाशी-तापाशी बायका-मुलासह रस्त्यावर थांबतात, त्यावेळी कुणाची तरी गाडी मधून गेल्या नंतर त्यांचा उद्रेक होणे, राग अनावर होणे, हे मी स्वाभाविक मानतो. म्हणून मग अशा लोकांनी एकत्र येऊन कुठे आंदोलन केले, कुठल्या सेंटरवर दोन-दोन दिवस प्यायला पाणीच मिळाले नाही म्हणून त्यांनी नाराजी व्यक्त केली. कुठे तरी एखादा ग्रेडर पैसे खातांना लोकांना दिसला म्हणून त्यांनी आंदोलन केले. तेथे लोकांच्या भावना जर प्रामाणिक असतील आणि त्यांना न्याय देणा-या यंत्रणा जर अप्रामाणिक असतील तर कालच्या कापूस खरेदीच्या वेळी या राज्यातील कास्तकारांवर पोलीस दलाने ज्या केसेस घातलेल्या असतील, त्या मेरीटवर तपासल्या जातील आणि निष्पाप शेतक-यांच्या केसेस त्यांच्या मागणीचे अर्ज सुध्दा न मागवता परत घेण्याचे आदेश दिले जातील. कारण शेवटी या गरीब शेतक-यांवर कोर्टाचा खर्च पुन्हा लादणे यात मी भूषण मानत नाही. अतिशय पॉझिटिव्ह दृष्टीने याचा आपण विचार करु. मी श्री. हर्षवर्धन पाटील साहेबांचे अभिनंदन करीन. एक फार चांगली भूमिका त्यांनी घेतलेली आहे. सरकारकडे असलेले पैसे तर मर्यादित आहेत. कापूस घालणारे शेतकरी अनेक आहेत. ही गोष्ट पण आपण नाकारु शकत नाही की, एका बाजूने आपण सकाळच्या भाषणामध्ये उल्लेख केला की, विदर्भामध्ये कधी नव्हता एवढा दुष्काळ आहे. सभापती महोदय, एका बाजूने मोठा दुष्काळ आहे आणि दुस-या बाजूने संकलन केंद्रावर येणारा कापूस सुध्दा विक्रमी आहे.

अशोधित प्रत / अशोधित प्रत

यानंतर श्री. बरवड ....

श्री. आर. आर. पाटील ....

दुष्काळ आणि विक्रमी कापूस याचा मेळ कितीही विचार केला तरी बसू शकत नाही. बी.टी. कॉटन मुळे काही कापूस वाढू शकतो हे आपण समजून घेतले पाहिजे. पण सरकारने प्रामाणिक हेतूने, शेतकऱ्यांना मदत करण्याच्या हेतूने एकाधिकार खरेदी योजना सुरु केली. दलालापासून सुटका होण्यासाठी श्री. यशवंतराव मोहिते यांनी या योजनेला जन्माला घातले परंतु आज वारंवार हे नजरेला आले आहे की, ज्यावेळी राज्यामध्ये कापसाचे दर कमी असतात आणि बाहेरच्या राज्यामध्ये एकाधिकार खरेदी योजनेपेक्षा जास्त दर असतात त्यावेळी हेच दलाल सगळया मार्गांचा अवलंब करुन या राज्यातील कापूस परराज्यामध्ये नेतात आणि ज्यावेळी परराज्यामध्ये कापसाचे दर घसरतात त्यावेळी हेच दलाल परराज्यातील कापूस आणून एकाधिकार खरेदी योजनेच्या माथ्यावर मारतात. कोणाकडूनही दलालच फायद्यामध्ये राहणार असतील, कशीही योजना राबविली तरी तोटा मात्र शासनाचाच होणार असेल तर जरुर एकत्र बसण्याच्या बाबतीत जी भूमिका आपण व्यक्त केली त्याबाबतीत विचार करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, प्रसंगी राज्यावर आणखी कर्ज वाढले तरी बेहत्तर परंतु या राज्यातील शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याचे प्रसंग येता उपयोगाचे नाही. शेवटी आम्ही माणसे जिवंत ठेवणार नसू, आमच्या राज्यात माणसे जिवंत राहणार नसतील तर विकासाच्या सगळया कल्पना शून्य होत आहेत. आपण एका बाजूने दरवर्षी कोटयवधी रुपयांचा तोटा सहन करीत आहोत, शेतकऱ्यांना चांगला भाव देण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि एवढे करुन सुध्दा त्यांची आर्थिक परिवर्तने का होत नाहीत, ते सक्षम का बनत नाहीत, आम्ही खर्च केलेला पैसा, आमच्या तिजोरीतून गेलेला पैसा दलाल तर लुटत नाही ना याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी भावना व्यक्त केली की, 100 क्विंटल कापूस घातलेल्या लोकांची नावे घोषित करा. मी तर या मताचा आहे की, 100 क्विंटल पेक्षा जास्त कापूस ज्यांनी घातला त्यांचे तेवढे क्षेत्र असेल तर मुळीच तक्रार नाही. पण 5 एकर क्षेत्र असेल आणि 500 क्विंटल कापूस आला असेल, जगात कोठेही पिकत नाही एवढा कोणाचा कापूस पिकला असेल तर अशा लोकांवर पोलीस केसेस सुध्दा केल्या पाहिजेत. अशा लोकांना उघडे पाडले पाहिजे आणि सरकारने गरिबांच्यासाठी प्रामाणिक हेतूने पाठविलेले मध्येच टोळया लुटत असतील तर या टोळया नेस्तनाबूत केल्या पाहिजेत. मी त्यांच्याकडून यादी घेईन आणि

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. आर. आर. पाटील ....

ज्यांच्या नावावर क्षेत्राच्या तुलनेत ॲबनॉर्मल कापूस आला आहे त्यांना तुरुंगाची हवा दाखविली जाईल आणि या राज्यातील राज्यकर्ते असा अन्याय सहन करु शकत नाहीत असा विश्वास सुध्दा सरळमार्गी कायद्याचे पालन करणाऱ्या नागरिकांना दाखवून दिला जाईल. यापेक्षा या विषयावर मला अधिकचे बोलावयाचे नाही. मी मागणी करणार नाही. आपण राजीनामा द्यावा म्हणून मागणी केली. मी एवढेच सांगेन की, प्रसंगी हातातून चुका घडल्या, या राज्यातील जनतेशी प्रामाणिकपणे वागू शकलो नाही, ज्या दिवशी चांगले काम करण्याची क्षमता नसेल त्या दिवशी विरोधकांना राजीनामा मागण्याची वाट मी बघू देणार नाही. आमच्या बापजाद्यांकडे कोणतीच पदे नव्हती. एक कार्यकर्ता म्हणून वावरत असताना माननीय श्री. पवार साहेबांनी संधी दिली. एकाकी पडण्याचा प्रश्न नव्हता. आमच्या लोकशाही आघाडीचे सर्व घटक पक्ष चांगल्या पध्दतीची साथ करीत आहेत आणि पदच म्हणाल तर ज्या पदाची कुटुंबाला कधी सवय नव्हती अशा पदांची उलट अडचण वाटते. एक आमदार असताना जेवढा समाधानी होतो तेवढा आज नक्कीच नाही. पण पुढचे पद मिळविण्यासाठी असमाधानी नाही. लोकांच्या प्रश्नासाठी नेहमीच असमाधानी राहू. आपण माझ्याकडून दिलगिरी व्यक्त करण्याची मागणी केली. मी आपल्याकडून ती सुध्दा करीत नाही. पण पुढच्या काळात किमान प्रामाणिक भावनेने या बाजूने कोणी बोलला तर आपण सुध्दा त्या भावनांची कदर करा एवढीच कळकळीची इच्छा व्यक्त करतो. धन्यवाद.

यानंतर श्री. खंदारे ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.नितीन गडकरी (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मा.श्री.आर.आर.पाटीलसाहेबांनी याठिकाणी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्या व्यक्त केल्या असल्या तरी वस्तुस्थिती काय आहे हे सभागृहासमोर आले पाहिजे. पुढील 3 दिवसांमध्ये 1200 कोटी रुपये शेतक-यांचे पेमेंट देऊ अशाप्रकारची घोषणा त्यांनी केली होती. मी अर्धा-तास भाषण केल्यानंतर या सभागृहाचे मा.सदस्य श्री.जयंत पाटील उभे राहिले आणि त्यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या एमडीला मी विचारले असून त्यांनी असे सांगितले आहे की, अजूनपर्यंत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने 1200 कोटी रुपये मंजूर केलेले नाहीत आणि असे कोणतेही पत्र शासनाला दिलेले नाही. यासंदर्भामध्ये सहकार क्षेत्रातील आपले सहकारी मा.मंत्रिमहोदय श्री.अजित पवार यांना विचारले असते तर तुमच्या लक्षात जास्त अडचणी आल्या असत्या. तुम्ही एमएससी बँकेची बैठक बोलविली होती त्यावेळी मा.श्री.अजित पवार यांना बोलविले नाही, का बोलविले नाही त्याच्यामध्ये मी जाऊ इच्छित नाही. परंतु महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला राज्यशासनाने पैसे द्यावयाचे आहेत असे बोललो. तुम्ही असे बोललात की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने एक अट घातली आहे आणि ती विशेषत: मागीलवेळी फेडरेशनने पैसे घेतले आहेत ते 400 कोटी रुपये सरकारने ताबडतोब द्यावेत अशी अट होती. अशाप्रकारची अट त्यांनी घातली असेल तर त्याचे गंभीर परिणाम होतील आणि त्यांची वाट लागेल असे आपण बोललात. त्यानंतर मी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेबद्दल असे बोललो की, राज्य सहकारी बँकेची ही कृती योग्य नाही. त्यांनी अशाप्रकारची अट घातली असेल तर सरकारने जरुर कारवाई केली पाहिजे. यावर मा.श्री.अजित पवारसाहेब उभे राहिले आणि म्हणाले की, गडकरीसाहेब, ही अट महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने घातलेली नाही. ही अट भारताच्या रिझर्व्ह बँकेने घातलेली आहे. प्रश्न असा आहे की, काल जेव्हा सभागृहामध्ये तुम्ही निवेदन केले तेव्हा सभागृहाच्या नियमाप्रमाणे शासनाचा एखादा आदेश निघाला असेल आणि त्याची प्रत तुमच्याजवळ असेल वा माहिती असेल तेव्हा शासनाने असा आदेश निर्गमित केला आहे असे म्हटले जाते. मी तुमच्याबद्दल क्षमा मागून तुम्हाला सांगतो की, शासनाचे एकही आदेश तुमच्या सहीने वा पत्राने निघत नाहीत. तुम्ही फाईलवर घेतलेल्या निर्णयाचे आदेश तुमच्या खात्यातील अवर सचिव वा उप सचिव यांच्या सहीने निघत असतात. आजपर्यंत मा.श्री.विलासराव देशमुख किंवा मा.श्री.आर.आर.पाटील यांच्या सहीने कोणताही आदेश निघालेला नाही. मी लहानशा सोसायटीच्या मान्यतेसाठी मा.मंत्री श्री.पतंगराव कदम यांच्याकडे गेलो. त्यांनी विशेष बाब म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

परवानगी देण्यात यावी असे चार वेळा फाईलवर लिहिले आणि चार वेळा फाईल रिजेक्ट होऊन आली. म्हणून मी मा.श्री.पतंगराव कदम यांना भेटलो, त्यांना विचारले की, तुम्ही लिहून देता आणि फाईल रिजेक्ट होते हे काय चालले आहे, तुम्ही काय करता ? मग मला कळले की, प्रकरण कसे मंजूर होते, कोणत्या कलमाखाली सही केली की मंजुरी मिळते ? ही संपूर्ण प्रक्रिया आहे. मा.श्री.आर.आर.पाटीलसाहेब आपण आज फार संवेदनशीलपणे आणि मनाला लावून याठिकाणी बोललात. मी तुम्हाला काल बोलताना सांगितले होते ती वस्तुस्थिती आजही रेकॉर्डवर आहे. मा.सदस्यांपैकी जेवढे टाळया वाजवितात त्यापैकी एकाने तरी मी चुकत असेल तर सांगावे. या सभागृहामध्ये तुम्ही काल घोषणा केली त्यावेळी तुमच्याजवळ महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे डिस्बर्समेंटचे पत्र नव्हते...

श्री.आर.आर.पाटील (बसून) : आज ते पत्र आमच्याजवळ आहे.

श्री.नितीन गडकरी : पत्र असेल तर मग ते आर.बी.आय.च्या मान्यतेने घेतले आहे काय ? (अडथळा) मा.सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आपण एक वकील आहात. तुम्हाला माझा प्रश्न आहे की, मग कालच हे पत्र मागवून घोषणा का केली नाही ? (अडथळा) याचा अर्थ असा आहे की, आज तुमच्याकडे दुपारी 12.00 वाजता बँकेचे अध्यक्ष आले आणि त्यांनी तुम्हाला पत्र लिहून दिले आहे आणि ते तुमच्या ताब्यात दु.12.30 वाजता आले होते. पण काल सभागृहामध्ये जी चर्चा सुरु होती त्यावेळी घोषणा करीत असताना तुमच्याजवळ महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या मंजुरीचे पत्र नव्हते.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, काल 3 दिवस कोठे पूर्ण झाले होते ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, तुम्ही काल घोषणा केली आहे. ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. आम्ही नियम 289 अन्वये सभागृहात निवेदन केले त्यावेळी तुम्ही केलेले जे भाषण आहे ते पूर्ण लिखित भाषण माझ्याजवळ उपलब्ध आहे. तीन दिवसामध्ये पैशाची व्यवस्था केली आहे, तीन दिवसात पैशाचे वाटप करु असे त्यांनी मला सांगितले आहे. हे सर्व यामध्ये आलेले आहे. त्यानंतर मा.सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी मुद्दा काढला होता, मी मुद्दा काढला नव्हता. (अडथळा) मी राजीनामा का मागितला त्याचे कारण सांगतो. राज्य सहकारी बँकेचे पत्र तुमच्याजवळ नसताना केवळ त्यांच्याबरोबर झालेल्या चर्चेच्या आधारावर तुम्ही सभागृहात सांगितले आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु....)

M S Co-operative Bank is an independent entity which is under control of RBI and which is under dual control of co-operation department. एमएस को-ऑप. बँक ही महाराष्ट्र सरकारचा अंगिकृत व्यवसाय नाही किंवा ते डिपार्टमेंट नाही. It is an independent organisation. It is a Bank. 1200 कोटी रु. सँक्शन झालेले आहेत अशा प्रकारचे त्या बँकेचे पत्र ज्या दिवशी या सभागृहामध्ये घोषणा करण्यात आली त्या दिवशी सरकार जवळ नव्हते. मा. सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आणि मा. सदस्य श्री. यशवंतराव गडाख साहेबांच्या बोलण्यातून हे सिध्द झाले.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या सदनामध्ये मी किती तरी वेळा सांगितले की, माझ्या दालनामध्ये मी वरिष्ठ मंत्री आणि अधिकारी यांच्याकडून माहिती घेतलेली आहे..

(काही मा.सदस्य बसून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी माझ्यावर व्यक्तिगत आरोप होत आहेत. या सभागृहामध्ये मी 4 वर्षे काम करीत आहे. या सभागृहामध्ये मी जी जी वक्तव्ये केलेली आहेत ती परत घेण्याची वेळ माझ्यावर कधीही आलेली नाही. मी या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. त्यानी त्यांची सर्व राजकीय प्रतिष्ठा पणाला लावली आणि ही परवानगी आणली.

श्री. विलासराव शिंदे : तीन दिवसानंतर अभिनंदन करायचे होते. काल का बोललात ?

श्री. जयंत प्र. पाटील : काल बोललो ते बरोबर होते.

श्री. दिवाकर रावते : मा. सदस्य मध्ये मध्ये कशाला बोलत आहेत. त्यांनी मा. सभापतींची परवानगी घेऊन बोलावे.

श्री. विलासराव शिंदे : मी मा. सभापतींशी बोलत आहे.

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

उपसभापती : मा.सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : माझ्यावर व्यक्तिगत आरोप केलेले आहेत. उपमुख्यमंत्री खरे बोलतात की सदस्य खरे बोलतात, असे माझ्यावर आरोप केले जात आहेत. या सभागृहामध्ये जेवढा मा. मंत्रिमहोदयांना बोलण्याचा अधिकार आहे तेवढाच सदस्य म्हणून मला देखील बोलण्याचा अधिकार आहे. या सभागृहामध्ये दोन दिवस चर्चा झाली.

श्री. विलासराव शिंदे : माझा हरकतीचा मुद्दा आहे.

(दोन्ही बाजूचे काही मा.सदस्य एकाच वेळी बोलू लागतात.)

उपसभापती : मा.सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी सभागृहात कृपया शांतता ठेवावी.सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण आपले मनोगत थोडक्यात मांडावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, काल या सभागृहात मी जे बोललो ती वस्तुस्थिती खरी होती. आज मी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केलेले आहे. त्यांनी सगळी राजकीय प्रतिष्ठा पणाला लावून,त्यांनी आपले व्यक्तिगत वजन वापरुन, आर.बी.आय.कडून प्रस्तावास मान्यता मिळवून घेतलेली आहे. मी गेली चार वर्षे या सभागृहाचा सदस्य म्हणून काम करीत आहे.एम.एस.सी.बॅन्केत संचालक म्हणून 15 वर्षे काम करीत आहे. एम.एस.सी.बॅन्केचा एक ॲक्टीव्ह सभासद म्हणून काल या ठिकाणी मी माहिती दिलेली आहे. या ठिकाणी अनेक सदस्य त्या बॅन्केचे संचालक आहेत. आम्ही एम.एस.सी.बॅन्केचे कामकाज करतो त्यावेळी कोणत्याही प्रकारचे राजकारण आणत नाही. राज्यातील कापूस उत्पादक शेतक-यांना त्यांच्या कापसाचे पैसे मिळावेत अशी माननीय उप मुख्यमंत्र्यांची जशी भावना आहे तशी भावना माझी देखील आहे. मी राजकीय चळवळीत पुढे आलेला एक सामान्य कार्यकर्ता आहे. मी या ठिकाणी जे बोललो होतो ते बरोबर होते असे पुन्हा जाहीरपणे सांगतो. मी सभागृहाच्या लॉबीमध्ये जाऊन एम.एस.सी. बॅन्केत फोन करुन या संदर्भात चौकशी केलेली आहे.मी सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड यांना सांगू इच्छितो की, आपण बाके वाजवू नका. या ठिकाणी तीन दिवसात शेतक-यांच्या कापसाचे पैसे दिले जातील असे सांगितले गेले. ही एवढी साधी गोष्ट नाही. राज्यातील शेतकऱ्यांना गेल्या सहा महिन्यांपासून पैसे दिले गेलेले नाहीत..

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. हर्षवर्धन पाटील : आपण गेल्या चार महिन्यापासून शेतक-यांचा कापूस खरेदी करीत आहोत. सहा महिन्यापासून कापूस खरेदीस सुरुवात केलेली नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी जाहीरपणे सांगतो की, कोणाचीही चौकशी करा. माझी चौकशी केली तरी चालेल. मी मुद्दाम सभागृहास सांगू इच्छितो की, या महाराष्ट्रात दिवाळखोरीत गेलेली बँक मी वर आणलेली आहे. ही 35 कोटी वरुन 600 कोटीवर ही बॅन्क आणलेली आहे. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, नागपूर येथील अधिवेशनात मुंबई बॅन्क बरखास्त करा म्हणून मागणी करण्यात आली होती. आर.बी.आय.ची परवानगी नसताना ही

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

बॅन्क बरखास्तीची नोटीस शासनाकडून दिली गेली. या प्रश्नावर सभागृहात चर्चा होत होती त्यावेळी मी एकटा उभा राहिलो आणि शासनास सांगितले की, सहकारात तुम्ही चुकीचे करीत आहात. शासनाला बरखास्तीचा निर्णय घेता येणार नाही. जर शासनाने अशा प्रकारचा निर्णय घेतला तर हायकोर्ट त्या निर्णयास स्थगिती देईल. माझ्या म्हणण्याप्रमाणे हायकोर्टाने मुंबई बॅन्केच्या बरखास्तीस स्टे दिलेला आहे. माझ्या सांगण्यावरुन हायकोर्टाने स्टे दिलेला नाही. या देशात आणि राज्यात जे कायदे केलेले आहेत. त्याचा आधार घेऊन मी शासनाला याबाबतीत कल्पना दिली होती. सभापती महोदय, मला माननीय उप मुख्यमंत्र्यांकडून एकच आश्वासन हवे आहे. या 1200 कोटी रुपयांमध्ये मी माझ्या बँकेतून 200 कोटी रुपये देणार आहे. मी माझ्या बँकेच्या माध्यमातून ही रक्कम उपलब्ध करुन देणार आहे. एवढी मोठी रक्कम व्यक्तिगत कोणी देऊ शकत नाही...

यानंतर श्री. उपरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.जयंत प्र. पाटील)

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री म्हणाले की, मी प्रयत्न केला. या ठिकाणी मी निश्चितपणे सांगतो की, काल जे वक्तव्य मी केले होते ते खरे होते. कालपासून आज दुपारी एक वाजेपर्यंत ते वक्तव्य खरे होते. एक वाजल्यानंतर दिल्लीला फोन वगैरे करून माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी जे राजकीय कौशल्य वापरले. राजकीय उंची आणि वजन वापरले त्यामुळे महाराष्ट्रातील सगळ्या शेतक-यांना पैसे मिळणार आहेत. तरी याबद्दल मी त्यांना धन्यवाद देत आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझे भाषण पूर्ण होऊ द्या.

श्री.आर.आर.पाटील : गडकरीसाहेब, माझ्याबद्दल या ठिकाणी बोलले गेले आहे. त्यामुळे मला खुलासा करू द्या. माझे नाव घेऊन बोलले गेले आहे. अध्यक्ष महोदय, राजकीय उंची आणि वजन वापरून हे कर्ज मंजूर करून घेतले असे सन्माननीय सदस्य या ठिकाणी बोलले. पण एक तर माझी उंची कमी आहे आणि वजन गडकरीसाहेबांचे जास्त आहे.

उप सभापती : आता माननीय गृह मंत्र्यांनी वजन आणि उंचीच्या संदर्भात सांगितले. मी एकच सांगतो. पोलीस भरती चालू असताना आमच्याकडे एका उमेदवाराची उंची कमी भरली. त्याची उंची थोडीशी कमी होती. त्यामुळे त्याला परीक्षकांनी बाजूला काढले. त्यावेळी त्याने आपल्याला बाजूला का काढले ? याबाबत विचारणा केली त्यावेळी असे सांगण्यात आले की, उंची कमी आहे. हे ऐकल्यावर तो असे म्हणाला की, साहेब मला पोलीस कॉन्स्टेबल व्हायचे आहे. या राज्याचा गृहमंत्री व्हायचे नाही. गृह मंत्र्यांना जर उंची लागत नाही तर माझी उंची कशाला मोजता ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटीलसाहेब असे म्हणाले की, माझी उंची कमी आहे आणि गडकरीसाहेबांचे वजन जास्त आहे. म्हणून मी दोघांचेही आभार मानतो. दोघांच्या प्रयत्नाने मला 1200 कोटी रुपये शेतक-यांना देण्यासाठी मिळाले आहेत.

श्री.नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, विनोदाचा भाग सोडल्यास ही गोष्ट खरी आहे की, कालची स्थिती आणि आजची स्थिती यामध्ये फरक पडलेला आहे. काहीही असो. उप मुख्यमंत्र्यांनी आपले कर्तृत्व आणि आपली ताकद पणाला लावून त्यांनी आज सभागृहात सांगितले आहे की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SDU/ MHM/ KGS.

(श्री.नितीन गडकरी)

आम्ही ही डिसबर्समेंट मिळविली आहे. रिझर्व बँकेच्या परवानगीचे पत्र आम्हांला मिळाले आहे. तरी याबद्दल मी त्यांना निश्चितपणे धन्यवाद देतो. परंतु त्याबरोबरच एक गोष्ट मी सांगू इच्छितो की, हे सगळे होण्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले त्यांचेही अभिनंदन या ठिकाणी केले पाहिजे. या सभागृहातील एक सन्माननीय सदस्य आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक श्री. जयंत पाटील यांचे अभिनंदन केले पाहिजे. अध्यक्ष महाराज, काल जर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी ही खुंटी मारली नसती तर यांचा पुरुषार्थ खवळला नसता आणि कदाचित आज कापूस उत्पादक शेतक-यांना 1200 कोटी रुपये मिळाले नसते.

उप सभापती : त्या दोघांचीही उंची सारखी आहे.

. श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी काल वस्तुस्थिती मांडली होती व काल दुपारी अशा प्रकारचे सँक्शन लेटर नव्हते तरीसुध्दा घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर आम्ही हा मुद्दा उपस्थित केला होता. माननीय उप मुख्यमंत्र्याचे मन संवेदनशील असल्यामुळे त्यांना तो मुद्दा लागला. राजकारणातील काही बाबीसंबंधी मी आता उल्लेख करणार नाही पण ते मला एकटे भेटल्यानंतर त्याबाबत मी त्यांना सांगेन. राज्य हे कायद्याने आणि नियमाने चालते. तुम्ही मोठ्या पदावर आहात म्हणून मी तुमचा सन्मान ठेवतो. परंतु लहानशी गोष्ट जरी राज्यामध्ये करावयाची असेल तर ती कायद्यानेच होते आणि ती सिस्टीम आहे. त्या सिस्टीमने सगळ्यांचे अधिकार डिफाईन केलेले आहेत. तुम्ही तुमच्या मंत्रालयातील उप मुख्य मंत्र्यांच्या चेंबरमध्ये कदाचित महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या अध्यक्षांबरोबर राज्य सहकारी बँकेचे संचालक असलेले माननीय अजित पवारसाहेब यांना बोलाविले असते तर तुमची अडचण अजून सोयीची झाली असती. पण त्या वादात मी जात नाही. मला याबाबतीत राजकारण करायचे नाही. मला एकच गोष्ट सांगायची आहे की, काल ती स्थिती नव्हती म्हणून आम्ही टीका केली आणि आम्ही आमच्या प्रतिक्रिया दिल्या. आमच्या प्रतिक्रिया तुमच्याजवळ पत्र म्हणून आम्ही दिल्या असे नाही. कारण ते पत्र नव्हते. आज 12 वाजता ते पत्र तुम्हाला मिळाले. उद्याचा तिसरा दिवस आहे की आजचा आहे हे मी मोजत नाही पण 1200 कोटी रुपये तुम्ही डिसबर्समेंट कराल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी काल सांगितल्यामुळे आज हे सगळे काम युध्द पातळीवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.नितीन गडकरी)

झाले. तुम्ही प्रतिष्ठा पणाला लावून हे पत्र मिळविले. ते एम.डी.आणि अध्यक्ष सकाळी 11.30 पर्यन्त तुमच्या चेंबरमध्ये येऊन बसले आणि दिल्ली-मुंबई येथे काय केले याच्या खोलात मी जात नाही. पण तुम्ही हे पत्र आणले याचे श्रेय तुम्हाला आहे. मी तुमचे निश्चितपणे अभिनंदन करतो.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

दुसरी गोष्ट अशी आहे की, तुम्ही आता असे बोलला आहात की, एकीकडे एवढा कापूस पिकतो आणि दुसरीकडे एवढा दुष्काळ कसा ?याबाबतीत माझ्याकडे शासनाचे एक पत्र आहे. खरीप हंगामाची आणेवारी दिलेली माहिती सुध्दा माझ्याकडे आहे.त्या पत्राच्या खाली अवर सचिव श्री.प्रकाश गोसावी यांची सही आहे. ही महसूल विभागाची पध्दत आहे. महसूल मंत्री काही पत्र पाठवत नाही. परंतु त्या पत्रात 12 लाख 34 गावांचा उल्लेख करण्यात आला आहे.या गावामध्ये 50 टक्यापेक्षा कमी आणेवारी आहे. त्यामुळे टंचाई परिस्थिती (ड्रॉट) जाहीर करावी आणि त्या आदेशाला योग्य प्रसिध्दी द्यावी असे म्हटलेले आहे. हा आपल्या सरकारचा आदेश आहे.त्यामुळे यामध्ये काहीही विसंगती नाही. खरीपाची आणेवारी 50 टक्यापेक्षा कमी आहे व कोणत्या भागातील किती गावे आहेत याची यादी आपण दिलेली आहे. 10 हजार 339 गावे विदर्भातील आहेत,1278 गावे मराठवाडयातील आहेत, 135 गावे कोकणातील आहेत , 251गावे पश्चिम महाराष्ट्रातील आहेत,

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय विरोधी पक्ष नेते कोणत्या मुद्यासंबंधी बोलत आहेत.?

श्री.नितीन गडकरी : माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जे मांडले होते त्या बाबतीत मी बोलत आहे.त्यांनी 25-30 मिनिटे भाषण केले होते ते आम्ही ऐकले. तेव्हा आता माझे म्हणणे आपण ऐकून घ्यावे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी :.आपलीच बाजू सत्य आहे असे आपण समजू नका.आज जी चर्चा आहे ती मर्यादित स्वरुपाची आहे. कापूस उत्पादक शेतक-यांना चुकारे देण्याच्या संदर्भात फक्त चर्चा करावयाची आहे.

श्री.नितीन गडकरी :माननीय उप मुख्यमंत्र्यांनी दुष्काळासंबंधी उल्लेख केला होता.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : केवळ आपण मोठयाने बोलला म्हणून आपली बाजू सत्य आहे असे आम्ही समजावयाचे काय ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय मी दोन मिनिटामध्ये माझे विचार मांडतो. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात जे मुद्दे मांडले होते त्याचा खुलासा मला करणे आवश्यक आहे.या ठिकाणी आज दुपारी 12.30 वाजता महाराष्ट्र राज्य सहकारी बॅकेचे रिझर्व्ह बॅन्केच्या परवानगी सहित त्यांनी पत्र आणल्यामुळे उद्या डिसबर्समेन्ट होऊन महाराष्ट्रातील जनतेला 1200

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोटी रुपये मिळणार आहेत ही या सभागृहाची फार मोठी उपलब्धी आहे.या सभागृहातील सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील आणि यशवंतराव गडाख यांच्या सारख्या सदस्यांनी ही गोष्ट लक्षात आणून दिली होती त्यामुळे श्री.आर.आर.पाटील यांच्या सारख्या संवेदनशील उप मुख्यमंत्र्यांना काल रात्रभर झोप लागली नाही.आज सकाळी वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्यानंतर आज त्यांना झोप लागेल अशीही शक्यता नाही.तेव्हा माननीय उप मुख्यमंत्र्यांनी युध्द पातळीवर प्रयत्न केले आणि आज हे पत्र हासिल केलेले आहे व त्यामुळे ते अभिनंदनास पात्र आहेत. मी त्यांचे निश्चितपणे आज अभिनंदन करतो .परंतु काल त्यांच्याकडे पत्र नव्हते म्हणून त्या आधारावर मी काल माझे विचार मांडलेले होते. ही वस्तुस्थितीसुध्दा त्यांनी लक्षात ठेवावी.त्याचबरोबर उरलेले पैसेसुध्दा अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी देऊ असे त्यांनी सांगितलेले आहे.त्या म्हणण्यावर श्री.आर.आर.पाटील कायम आहेत.तेव्हा अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी शेवटच्या दिवशी श्री.आर.आर.पाटील यांनीच निवेदन करावे कारण या सरकारामध्ये तेच कडक आणि संवेदनशील आहेत.या बाबतीत पणन मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी पाच दहा आश्वासने दिलेली आहेत.त्याचा रेकॉर्ड माझ्याकडे आहे.घासलेल्या नाण्यासारखे हे आश्वसने झाले आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख (बसून) घासलेले शब्द वापरणे बरोबर नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय,पणन मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांच्या बाबतीत मला सन्मान आहे परंतु ते तरी काय करणार ? माननीय उप मुख्यमंत्र्याकडे वजन जरी नसले तरी पद आणि ताकद आहे. त्याचबरोबर आपल्याला एक पक्ष आहे. परंतु श्री.हर्षवर्धन पाटील हे अपक्ष आहेत. ते कधी आमच्याकडे असतात तर कधी तुमच्याकडे असतात.त्यामुळे त्यांची अडचण आहे तयेच त्या बिचा-यांच्या काही मर्यादा आहेत. त्यामुळे मी त्यांना दोष देत नाही.माननीय मुख्यमंत्री आणि आपण यांच्यामध्ये अगोदर शीतयुध्द चालू आहे. तेव्हा तुमच्यामध्ये त्या बिचा-यांचे सॅडविच कशाला करावयाचे ? सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांचे मी अभिनंदन करतो की तुम्ही केसेस.मागे घेतल्या आहेत. ती चांगली गोष्ट आहे. कापसाचे बोंड शिल्लक असेपर्यन्त कापूस खरेदी करण्यात येईल असे आपण ज्याप्रमाणे सागितले आहे त्याप्रमाणे हे अधिवेशन समाप्त होण्याच्या आत सगळे पैसे मिळतील असे सांगावे. तसेच 2700 रुपये भाव कापसाला राहील असे आपण मागे सांगितलेले आहे. तेव्हा अजून पावणे पाच वर्षे बाकी आहे व पुढच्या वर्षी 2700 रुपये

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ...

भाव देऊ असे सांगण्यात आलेले आहे. त्याचबरोबर तुम्ही वचन पूर्ण करणारे आहात..वचनाचे पक्के आहात,संवेदनशील आहात.तेव्हा पुढील पाच वर्षात कापसाला 2700 रुपये भाव तुम्ही द्याल असा माझा तुमच्या शब्दाप्रमाणे तुमच्यावर विश्वास आहे. तेव्हा हे अधिवेशन संपूण्यापूर्वी कापसाचे पैसे मिळतील असा आपण विश्वास द्यावा अशी विनंती करतो आणि आज आपण ऑर्डर काढल्याबद्दल तुमचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

श्री.जितेन्द्र आव्हाड : सभपती महोदय, काल पासून आम्ही या चर्चेच्या अनुषंगाने चांगली भाषणे ऐकली आहेत.त्यामध्ये खास करुन असे म्हटले गेले की, उच्च संसदीय परंपरेचा मान राखला पाहिजे. सभागृहाची दिशाभूल करता कामा नये वगैरे वगैरे.अशा प्रकारे छान छान शब्द वापरलेली भाषणे ऐकल्यानंतर आज जे काही घडले त्याप्रमाणे या सभागृहाची उच्च परंपरा कायम राखण्यात यावी. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी काल माननीय उपमुख्यमंत्र्यांचा राजीनामा मागितला होता.

नंतर श्री.कानडे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड .....

विरोधी पक्षनेत्यांचा आम्ही राजीनामा मागत नाही. परंतु या सभागृहाच्या परंपरेला शोभेल अशा पध्दतीनुसार आणि त्या उच्च परंपरेचा मान राखून ज्यांनी ज्यांनी या विषयावर भाषणे केली त्यांनी दिलगीरी व्यक्त करावी आणि मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, काल जे झाले ते बरोबर होते आणि आज जे झाले तेही बरोबर आहे. वस्तुस्थिती तीच आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, काल नियम 289 खाली चर्चा मागितली आणि ती चर्चा नियम 97 खाली कनव्हर्ट केली. नियम 97 खालील चर्चेची प्रक्रिया पूर्ण झाली नव्हती. मंत्रीमहोदयांचे उत्तर झाले नव्हते. आज आम्ही चर्चा मागितली ती मिळाली. चर्चा झाली. उत्तर झाले. खालच्या सदनामध्ये जे निवेदन मंत्रीमहोदयांनी केले तेच निवेदन या सदनामध्ये त्यांनीकेले. त्यानंतर मा. उपमुख्यमंत्री यांनी जवळजवळ 40 मिनिटे मोठे भाषण ऐकवले. कोणत्या नियमानुसार त्यांना ही परवानगी दिली याची मला माहिती दिली तर खूप चांगले होईल.

उपसभापती : सभागृहाच्या उच्च परंपरांचा मान राखण्याच्या दृष्टीकोनातून काही गोष्टी समन्वय साधण्यासाठी कराव्या लागतात. मा. उपमुख्यमंत्र्यांनी माझ्याकडे परवानगी मागितली आणि ती मी त्यांना माझ्या अधिकारात दिलेली आहे. त्यानंतर विरोधी पक्षनेत्यांनी सुध्दा त्यांचे अभिनंदन केले आहे. आता हा विषय येथे थांबवू या.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला एका गोष्टीबद्दल अभिनंदन करावयाचे आहे की, एवढया उच्च पातळीची चर्चा झाली आणि या चर्चेमध्ये कुणावरही हेत्वारोप झाले नाहीत. परिणाम असा झाला की शेतक-याना उपमुख्यमंत्र्यांनी आपली प्रतिष्ठा आणि कौशल्य पणास लावून पैसे उपलब्ध करुन दिले. ते पैसे उद्या शेतक-यांच्या हातात जाऊ द्या. याचे श्रेय या सदनामध्ये ज्यांनी ज्यांनी चर्चा उपस्थित केली आणि ज्यांनी चर्चेला प्रतिसाद दिला त्या सर्वांनाच आहे.

उपसभापती : सर्व सभागृह अभिनंदनास पात्र आहे. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4 वाजून 45 मिनिटांनी पुन्हा भरेल.

(4.18 ते 4.45 मध्यंतर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर ...)

सभापतीस्थानी - माननीय उपसभापती

पृ.शी. : मुलुंड येथील डंपिंग ग्राऊंड.

मु.शी. : मुलुंड येथील डंपिंग ग्राऊंड बाबत श्री.जितेंद्र आव्हाड, डॉ.वसंत पवार, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.जगन्नाथ शेवाळे, वसंतराव चव्हाण, सदाशिवराव पोळ, राजेंद्र जैन, विनोद तावडे, श्रीमती संजीवनी रायकर, श्री.रामनाथ मोते यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जितेंद्र आव्हाड (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सभागृहाचे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" ठाणे शहरालगत असलेल्या मुलुंडच्या डंपिंग ग्राऊंडवर मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील हजारो टन कचरा टाकल्यामुळे ठाणे परिसरात पसरत असलेली प्रचंड दुर्गंधी, नागरिकांना होत असलेला प्रचंड त्रास, या डंपिंग ग्राऊंड विरोधात परिसरातील रहिवाशांनी अलिकडील काळात केलेली आंदोलने, या प्रकरणी कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप, तसेच चिडीची भावना, डंपिंग ग्राऊंड परिसरात भयंकर आजारांचा फैलाव होऊन नागरिकांच्या जीवितास निर्माण झालेला धोका, या प्रकरणी वेळीच उपाय योजना न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता सदर प्रकरणी ठोस कार्यवाही करून लवकरात लवकर उपाय योजना करण्याची अत्यावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सुचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.... 3टी 2 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सुचनेवरील मा.नगरविकास राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महाराज, या लक्षवेधी सुचनेवर करण्यात आलेले निवेदन हे संपूर्णत: दिशाभूल करणारे आहे. यामध्ये सांगण्यात आले आहे की, 5500 मे.टन कचरा आणि 2000 मे.टन दगड-माती गाळ म्हणजे जवळपास साडेसात हजार मेट्रिक टन कचरा दररोज मुंबईमध्ये तयार होतो आणि पुढे असे म्हटलेले आहे की, गोराई, मुलुंड आणि देवनार या तीन ठिकाणी असलेल्या डंपिंग ग्राऊंडमध्ये तो डम्प केला जातो. अध्यक्ष महाराज, आता प्रश्न असा आहे की, शिवसेनेचे माजी महापौरांनी गोराई येथील डंपिंग ग्राऊंड बंद पाडले त्यामुळे त्या ठिकाणी आता कचरा डम्प करता येत नाही. त्यामुळे मुंबईत दररोज निर्माण होणारा जवळपास साडेसात हजार मे.टन कचरा हा मुलुंड व देवनार येथील ग्राऊंडवर डम्प केला जात आहे. त्यातही देवनार येथील ग्राऊंडवर 500 मे.टन कचरा जमा होतो आणि बाकीचा 7 हजार मे.टन कचरा हा मुलुंड येथील ग्राऊंडवर जमा केला जातो आहे. अध्यक्ष महाराज, आंतरराष्ट्रीय पर्यावरण मानकानुसार एका ठिकाणी किती लोकसंख्येच्या प्रमाणात, आजुबाजूचे वातावरण किती व कसे असावे या दृष्टीने कचरा डम्प करावा यासाठी कायदा आहे आणि या कायद्याची पायमल्ली महाराष्ट्र शासन सर्रास करीत आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. अध्यक्ष महाराज, मागील वर्षी याच भागामध्ये एक जेसीपी करीत असताना काही मानवी अवयव सापडले होते. असे जवळपास 20-25 अवयव तेथे सापडले होते. गोराईचे डंपिंग ग्राऊंड तेथील परिसरामध्ये रोगराई पसरते म्हणून बंद केले. आज मुलुंड ठाणे परिसरामधील वातावरण या डंपिंग ग्राऊंडमुळे इतके घाणेरडे झालेले आहे की, त्या भागामध्ये सतत सहन न होणारी अशी दुर्गंधी असते आणि त्यामुळे तेथील नागरिक त्रस्त झालेले आहेत. तेव्हा या बाबतीत काही उपाय योजना करावी यासाठी वारंवार मागणी केली गेली, आंदोलने केली जात आहेत. पण त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. अध्यक्ष महाराज, संपूर्ण मुंबईचा कचरा अशा प्रकारे एकाच ठिकाणी इतक्या मोठ्या प्रमाणात जो डम्प केला जात आहे तो आपण कोठल्या शास्त्रीय परिमाणानुसार वा पर्यावरणीय मानकानुसार, सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचा उपयोग करून केला जात आहे याचा कोठलाही थांगपत्ता नाही. त्यामुळे तेथील नागरिकांचे संपूर्ण जीवनाला धोका निर्माण झालेला आहे. अध्यक्ष महाराज, पर्यावरणीय शास्त्रीय मानकानुसार किती किलोमीटर जागेमध्ये किती प्रमाणात कचरा डम्प करावा याचे काही नियम आहेत काय ? आणि त्या नियमांचे पालन करून आपण मुलुंड येथील या ग्राऊंडवर कचरा डम्प करीत आहात का ?

(यानंतर श्री.जागडे .... 3यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, गोराईचे डंपींग ग्राऊंड बंद करण्यात आले आहे, असे म्हणणे चुकीचे आहे. त्या ठिकाणीही कचरा टाकण्याचे काम सुरु आहे. हायकोर्टामध्ये एक केसही दाखल झाली होती. हायकोर्टाने असे सांगितले आहे की, गोराईचे डंपींग ग्राऊंड बंद करावे. माननीय सदस्य श्री. आव्हाड यांनी असे सांगितले आहे की, साडेसात हजार मे.टन कचरा हा मुंबई शहरातून मुलूंडच्या डंपींग ग्राऊंडमध्ये येत आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, या डंपींग ग्राऊंडमध्ये तेथे राहणा-या लोकांना दुर्गन्धीचा त्रास होत आहे. हे मी नाकारणार नाही. म्हणून शास्त्रोक्त पध्दतीने या बाबतची कार्यवाही होण्याची आवश्यकता आहे. हायकोर्टाने या बाबत असा निर्णय दिला आहे की, निरी नावांची जी संस्था आहे, तिच्यामार्फत तसेच पर्यावरणातील तंज्ञ लोकांकडून या बाबतचा अभ्यास करुन तीन महिन्यात आत कारवाई करावी. शास्त्रोक्त पध्दतीने या कच-याचा वापर कसा करावयाचा ? यातून खत निर्माण करता येऊ शकते काय ? पॅलेटायझेशन करता येईल काय ? फ्युयल निर्माण करता येईल काय ? याचा अभ्यास निरी या संस्थेकडून करण्यात यावा. सभापती महोदय, अलिकडच्या काळात मोठमोठ्या जमिनी डंपींगसाठी वापरणे योग्य होणार नाही. कारण आज जमिनीचे महत्व आपणा सर्वांना माहिती आहे. म्हणून आता जी डंपींग ग्राऊन्डस् आहेत, त्या ठिकाणी अपग्रेड टेक्नॉलॉजी कशी वापरत येईल, या प्रश्नाला ख-या अर्थाने महत्व आहे. सभापती महोदय, कोर्टाच्या निर्देशानुसार येत्या तीन ते चार महिन्यात निरी या संस्थेकडून या बाबतचा रिपोर्ट घेतला जाईल. पर्यावरणामधील तंज्ञ लोकांकडून या बाबतची माहिती घेतली जाईल. त्यानंतर या बाबतचा ॲक्शन प्लॅन तयार करुन तो सगळ्या डंपींग ग्राऊंडसाठी वापरला जाईल.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी जे निवेदन केले आहे, तेच दिशाभूल करणारे आहे. मुंबईतील सर्व कचरा मुलूंडच्या डंपींग ग्राऊंडवर टाकला जात आहे. त्यामुळे त्या परिसरात राहणा-या लोकांना त्रास होत आहे. माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी असे सांगितले आहे की, देवनार आणि गोराईचे डंपींग ग्राऊंडस् बंद करण्यात आली आहेत. त्यामुळे मुंबईतील सर्व कचरा ठाण्याजवळ आणून टाकला जात आहे. यामुळे आज मुलूंडच्या डंपींग ग्राऊंडवर 20-20 फुटाचे थर निर्माण झाले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंन्धी पसरलेली आहे. तेथील नागरिकांना या दुर्गन्धीचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे....

डिओडोरॅन्टची फवारणी त्या ठिकाणी करण्यात येत आहे, असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. आता ही फवारणी केव्हा केली जाते ? सभापती महोदय, या भागात या कच-यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गन्धी पसरल्यामुळे नागरिकांना डोकेदुखी तसेच इतर आजारांना सामोरे जावे लागत आहे. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. या बाबत तेथील नागरिकांनी तसेच लोक प्रतिनिधींनी आंदोलने केली आहेत. अनेक वेळा या बाबत आश्वासने देण्यात आली आहेत. हे डंपींग ग्राऊंड बंद करण्यात येईल असे सांगण्यात आले आहे. या कच-यामुळे त्या भागात मोठ्या प्रमाणा माशा निर्माण झालेल्या आहेत. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, शासनाला न्यायालयाने निर्देश केव्हा दिले आहेत? त्याप्रमाणे त्या बाबतची कारवाई किती दिवसात करावयाची होती ?

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे...

परंतु शासनाने ती कार्यवाही आतापर्यंत केल्याचे दिसत नाही. माझी आपणाला विनंती आहे की, गोराई आणि देवनार येथील डंपिंग ग्राऊंड पुन्हा सुरु करणार काय? 20-25 वर्षापासून मुलुंड व ठाण्याच्या सरहद्दीवर डंपिंग केले जात आहे ते आपण ताबडतोब बंद करणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रश्नाची पुनरावृत्ती होत आहे. देवनार, गोराई व मुलुंड या तीनही ठिकाणी कचरा डंप करण्याचे काम चालू आहे. मुलुंड येथे 1600 टन, देवनार येथे 4500 टन आणि गोराई येथे 1800 टन कचरा डंप केला जात आहे. त्याचप्रमाणे मालाड येथील चिंचोली बंदर आपण बंद केले त्यावेळी कोर्टाने 2000 साली सूचना दिल्या होत्या की, शासनाने पर्यायी जमीन उपलब्ध करुन दिली पाहिजे. त्या अनुषंगाने मी निवेदनात सांगितल्याप्रमाणे 45 हेक्टर जमीन जवळपासच्या भागात उपलब्ध करुन दिली आहे. त्याठिकाणी असलेले आरक्षण सेक्शन 37 अन्वये उठविले आहे....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय,माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्रिमहोदयांनी 45 हेक्टर जमीन उपलब्ध करुन दिली असे सांगितले. आणि निवेदनामध्ये मुलुंड येथे 45 हेक्टर जमीन आरक्षित करण्याचा निर्णय घेतला आहे असे उत्तर दिले आहे....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ही जमीन केंद्र सरकारच्या अखत्यारीतील आहे, त्यांनी अजून ती आपल्या ताब्यात दिलेली नाही. त्या जमिनीवर जे आरक्षण होते ते उठविले आहे असे मला म्हणावयाचे आहे. त्यामुळे पर्यायी जमीन देण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. नवीन टेक्नॉलॉजी ॲडॉप्ट करण्याच्या संदर्भात "निरी" या मानद संस्थेकडून 2-3 महिन्यात अहवाल येईल त्यानंतर मुंबई महानगरपालिका, राज्य सरकार निश्चितपणे नवीन टेक्नॉलॉजी ॲडॉप्ट करुन त्यामध्ये खत निर्मिती, बायो फर्टीलायझेशनचा अंतर्भाव केला जाईल. तसेच, कमी जागेत अधिक चांगल्या पध्दतीने सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचे काम करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

श्री. संजय दत्त : कचऱ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे? त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे? आणि शासनाने त्याकरिता तरतूद केली आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता कोणती टेक्नॉलॉजी वापरणे आवश्यक आहे, व त्याकरिता किती खर्च अपेक्षित आहे हे सर्व "निरी" या संस्थेकडून येणाऱ्या अहवालावर अवलंबून आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सद्यपरिस्थितीत मुलुंडच्या डंपिंग ग्राऊंडमुळे त्या परिसरामध्ये प्रचंड दुर्गंधी पसरत आहे, माशांचा प्रादुर्भाव होत आहे.त्यासाठी आपण तातडीने कोणती उपाययोजना करणार आहात?

उपसभापती : यानिमित्ताने मला असे सुचवावयाचे आहे की, या विषयावर निश्चितपणे कायम स्वरुपी तोडगा निघणे आवश्यक आहे असे माझे स्वत:चे मत आहे. आणि म्हणून या प्रश्नाची तातडीने तड लागण्याकरिता ठाणे महानगरपालिका व मुंबई महानगरपालिकेचे महापौर, आयुक्त व संबंधित यंत्रणेचे अधिकारी, माननीय सदस्य सर्वश्री जितेंद्र आव्हाड, अनंत तरे, विलास अवचट, संजय दत्त, दिवाकर रावते इत्यादी लोकप्रतिनिधी यांची एक संयुक्त बैठक विधान भवनामध्ये बोलाविण्यात यावी अशी माझी सूचना आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, डंपिंग ग्राऊंडचा विषय फार गंभीर आहे. आपण केलेल्या सूचनेला अनुसरुन मला एक सूचना करावयाची आहे. पूर्वी महालक्ष्मीला मुंबईतल्या कचऱ्याचे डंपिंग केले जात होते. त्यावेळी सर्व कचरा कॉंपक्ट करुन तो रेल्वेने बाहेर नेला जात होता. आता ती व्यवस्था सुरु नाही. तेव्हा ती योजना पुन्हा राबविली तर शहरातील सर्व कचरा शहराबाहेर नेऊन त्याठिकाणी आपल्याला डंपिंग करता येईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते. . . .

आता आपल्याकडे पेण-पनवेलपासून पुढे देखील रेल्वे सुरु झालेली आहे. त्या भागात डंपिंग ग्राऊंड निर्माण केले तर ? ही पूर्वी योजना होती.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, आपण मघाशी सूचविल्याप्रमाणे येत्या आठवडयामध्ये नाही तर . . . .

उप सभापती : येत्या आठवडयातच बैठक बोलवावी.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, येत्या आठवडयामध्ये नाही तर अधिवेशन संपल्यानंतर बैठक घेऊ या.

उप सभापती : अधिवेशन संपल्यानंतर नको. अधिवेशनाच्या काळातच बैठक घेऊ. जेणेकरुन तुम्हालाही आमची काही मदत लागली तर ती करता येईल.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, आपण सांगत आहात, त्यापध्दतीने जरुर पुढच्या आठवडयामध्ये बैठक घेतली जाईल. एखाद्या कामावर मॉनेटरींग असेल तर ते अधिक चांगले होईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, याबाबतीत सुप्रीम कोर्टाचे डायरेक्शन्स् अतिशय कडक आहेत. वास्तविक पाहता याबाबतीत फार पूर्वी विचार करणे गरजेचे होते. सगळीकडे, आंतरराष्ट्रीय पातळीवर मुंबई हे सर्वात लोकप्रिय असे मेट्रोपॉलीटन शहर आहे. पण टोकियो, न्यूयॉर्क याठिकाणी सुध्दा असा कचरा निर्माण होतच असतो. पण त्यांची स्पिलींग ग्राऊंडची व्यवस्था अतिशय सुंदर आहे. तेव्हा यासाठी शासनाने एन्व्हायरमेंट सायंटीस्ट, लोकप्रतिनिधी यांची एक उच्च कमिटी नेमली पाहिजे. कारण दिवसेंदिवस हा प्रश्न वाढत जाणार आहे. तेव्हा शासन अशा प्रकारची समिती नेमणार आहे का ? हा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, या डंपिंग ग्राऊंडच्या बाजूला 12 हेक्टरच्या जागेवर ग्राऊंडसाठी मुंबई महानगरपालिकचे रिझर्वेशन आहे. पण मला मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांकडून अशी माहिती मिळालेली आहे की, या जागेवर ग्राऊंडसाठी असलेले रिझर्वेशन काढून तेथे डंपिंग ग्राऊंड करण्यात येणार आहे. तर ते शासन रद्द करणार आहे का आणि त्याठिकाणी ग्राऊंडसाठी असलेले रिझर्वेशन तसेच ठेवणार आहे का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, उच्चस्तरीय समितीच्या दृष्टीकोनातून ही

. . . .3 डब्ल्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आवश्यक बाब आहे. कारण ही बाब लवकर व्हावयाची असेल तर त्यासाठी मॉनेटरींग कमिटी करुन त्यामध्ये नगरविकास विभागाचे सचिव, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त आणि ऑल इंडिया इन्स्टीटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंटचे सिनिअर ॲडव्हायझर श्री.जैन आणि निरी या संस्थेचा प्रतिनिधी अशा चार जणांची कमिटी निर्माण करावयास हरकत नाही. जेणेकरुन ही कमिटी याबाबतीत पाठपुरावा करील.

उप सभापती : अशा प्रकारची कमिटी गठीत करीत असताना त्यामध्ये ठाणे महानगरपालिकेचाही अंतर्भाव असला पाहिजे. मला असे वाटते की, पुढच्या आठवडयामध्ये आपण जी कमिटी बोलविणार आहोत, त्यावेळी या सर्व गोष्टींचाही उहापोह करता येईल. त्यामुळे अशा प्रकारच्या उच्च स्तरावरील बैठक पुढच्या आठवडयात त्वरित बोलवावी.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या डंपिंग ग्राऊंडच्या बाजूला असलेल्या ग्राऊंडबाबत जो प्रश्न विचारलेला होता . . . .

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, त्या ग्राऊंड बाबतचा विषय तपासून घेण्यात येईल.

उप सभापती : येत्या आठवडयात होणा-या बैठकीमध्ये आपण या सर्वच गोष्टी फायनलाईज् करु.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मुलुंड आणि ठाणे येथील कचरा येथे डंप केला जातो. पण त्याच्या बाजूला एक छान, सुंदर ग्राऊंड आहे आणि ते मुलुंडच्या लोकांसाठी आणि ठाण्याच्या लोकांसाठी अतिशय सोयीचे आणि योग्य आहे. तेव्हा . . . .

उप सभापती : माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, याबाबतीत विचार करु.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, विचार नाही. याठिकाणी ग्राऊंडसाठी असलेले रिझर्वेशन रद्द करुन तुम्ही तेथे डंपिंग ग्राऊंड करणार आहात असे मला पालिका आयुक्तालयाकडून सांगण्यात आलेले आहे.

उप सभापती : रिझर्वेशन रद्द करण्यासाठी प्रोसीजर आहे. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी पुढील आठवडयात बैठक बोलविण्याचे मान्य केलेले आहे. त्यावेळी तेथे संबंधित अधिकारी देखील असतील. तेव्हा शासनाने ही बाब मान्य केली तर त्याची अंमलबजावणी करता येईल. . . . .डब्ल्यु-3

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सध्या ग्राऊंडच्या संबंधातील बाब न्यायप्रविष्ठ आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे :सभापती महोदय, माझी अशी विनंती आहे की, लॉंगटर्म स्वरुपात कच-यावर प्रक्रिया करुन मार्ग काढता येईल हे आपल्या भुमिकेतून स्पष्ट होईल त्याचा फायदा इतर महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकांना मिळण्याच्यादृष्टीने नगरविकास विभागाने पावले उचलावीत. कारण हा कच-याचा प्रश्न पुढे संभाजीनगर, आकोला या सगळया ठिकाणी आहे.

उप सभापती : ठीक आहे. यानंतर लक्षवेधी सूचना क्रमांक 3 घेण्यात येईल.

-x---x--

(लक्षवेधी सूचना क्र. 2 पुकारण्यात आली नाही.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : "शिक्षकांनी शालेय वेळेत अतिरिक्त 3 तास जादा अध्यापनाची कामे करावी अशी कार्यान्वीत असलेली योजना "

मु. शी : शिक्षकांनी शालेय वेळेत अतिरिक्त 3 तास जादा अध्यापनाची कामे करावी अशा कार्यान्वीत केलेल्या योजनेसंबंधी स-मा-न-ीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.अैनापुरे वि.प.स. यां-ी दिलेली लजवेधी सूच-ा.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-े नियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनिज महत्वाच्या बाबीज्डे स-मा-न-ीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी निवेद-ा ज्रावे, अशी वि-ंती ज्रतो.

"राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने प्राथमिक शिक्षणाचा घसरलेला दर्जा उंचावण्याचे कारण पुढे करुन वाचन-लेखन-हमी कार्यक्रमांअंतर्गत दिनांक 1 मार्च ते 30 एप्रिल 2005 पर्यंत शिक्षकांनी शालेय वेळेत अतिरिक्त 3 तास अध्यापनाची कामे करावी अशी योजना कार्यान्वित केली असणे, 60 दिवसांच्या अभ्यासक्रम नियोजनात शिक्षकांना शासकीय किंवा इतर कोणत्याही सुट्टया उपभोगता न येणे, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम,1977 व नियमावली, 1981 मधील नियम - 21 (कार्यभार) मध्ये तरतूद असलेल्या कार्यभारात वाढ करुन नियमांचा भंग केला असणे, शैक्षणिक कामाव्यतिरिक्त कुटुंब नियोजन, गांव सर्वेक्षण, दारिद्रय रेषेखालील नागरिकांचे सर्वेक्षण, पोलिओ अभियान, आरोग्य तपासणी, खिचडी शिजविणे, घरोघरी जाऊन निर्मलची माहिती गोळा करणे (हागणदारी मुक्त), मतदार नोंदणी, निवडणुकीची कामे, शिक्षणाधिकारी कळवेल अशी कामे शिक्षकांवर लादली असणे, अनेक प्राथमिक शाळांमध्ये एका शिक्षकाकडे दोन-दोन वर्गांना शिकविण्याची जबाबदारी असणे, 6 ते 14 वयोगटातील विद्यार्थ्यांच्या आकलन शक्तीवर विपरित परिणाम होण्याची निर्माण झालेली भिती, शिक्षकांना वेठीस धरणा-या योजनेवर राज्य प्राथमिक शिक्षक संघाने बहिष्कार टाकण्याचे ठरविले असणे, यामुळे राजयातील, शिक्षकांत निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई"

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री): सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, महत्वाची अशी लक्षवेधी सूचना आहे. या राज्यातील चार विभागीय प्राथमिक शिक्षकांच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. या लक्षवेधी सूचनेत मी जे मुद्दे उपस्थित केले होते, त्याचे उत्तर निवेदनामध्ये आलेले नाही. एवढेच नाही तर सभागृहाची दिशाभूल करणारे उत्तर याठिकाणी दिलेले आहे. लाखो शिक्षकांच्या जिव्हाळयाचा हा प्रश्न आहे. मी काही मुद्दे या लक्षवेधी सूचनेत उपस्थित केले होते. ते सर्व मुद्दे मी आता वाचून दाखविणार नाही, पण त्यातील काही मुद्दे असे आहेत की, शिक्षकांवर अवांतर कामाचा जो बोजा आहे त्याचे मी नमुने आणि उदाहरणे सुध्दा दिली की, कोणती कामे अवांतर आहेत. पण त्यावर कुठलेही भाष्य केलेले नाही. दुसरा प्रश्न असा होता की, एका शिक्षकाकडे दोन-दोन वर्ग आहेत.त्यावरही या उत्तरात कुठेही स्पर्श केलेला नाही. तिसरा मुद्दा 6 ते 14 या वयोगटावर वाचन, लेखन हा जो प्रकल्प लादलेला आहे त्याचा त्यांच्या मानसिकतेवर किती परिणाम होईल हया बाबतीतही कुठेही उत्तरामध्ये नमूद केलेले नाही. यासंदर्भाममध्ये माझे स्पेसिफिक असे दोन प्रश्न आहेत. महाराष्ट्रात अनेक संघटनानी आघाडी निर्माण करुन आंदोलन सुरु केले. 21 मार्चला मुंबईला जवळ जवळ 1 लाख शिक्षक माननीय आमदार श्री. शिवाजीराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली याचा निषेध करणार आहेत.प्रश्न असा आहे की, कामाचा बोजा याला काही मर्यादा आहे. आणि ती स्पेसिफिक मर्यादा आहे. उन्हाळयाच्या काळात चार तासा पेक्षा जास्त काम शिक्षकावर असू नये. पण या प्रकल्पाच्या माध्यमातून सकाळी 8.30 ते संध्याकाळी 6.30 वाजे पर्यंत तब्बल दहा तास वर्कलोड यांच्यावर एका दिवसाला लादलेला आहे. 60 दिवसांचा हा प्रकल्प आहे. एकही सुटी नाही. रविवार नाही किंवा शासकीय सुटी उपभोगता येत नाही. म्हणजे एका आठवडयामध्ये 25-26 तास काम करण्याऐवजी 70 तास काम यांच्यावर लादलेले आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, ही योजना चांगली आहे. पण ही योजना चांगली असली तरी शिक्षकांचे जे काही नियोजित वर्किंग आहे, त्या वर्किंगमध्ये या योजनेला राबविणे आवश्यक आहे. म्हणून माझा पहिला प्रश्न असा आहे की, आपण शिक्षकांना 60 दिवस वेठीस धरलेले आहे. नियमबाहय 70 तास त्यांच्याकडून एका आठवडयात काम करुन घेणार आहात, म्हणून ही योजना आपण स्थगित करुन आपण त्या नेहमीच्या योजनेमध्ये एक ते दीड तास काम स्पेशल या योजनेसाठी देऊन ही योजना राबवाल

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कां? हा पहिला प्रश्न. आणि दुसरा प्रश्न असा की, शिक्षकांना जी आवांतर कामे दिलेली आहेत की, ज्यामुळे शिक्षणावर खूप परिणाम झाला आहे. ती संपूर्ण अवांतर कामे या शिक्षकांकडून काढून टाकली जातील काय? असे स्पेसिफिक दोन प्रश्न आहेत.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनमध्ये सांगितल्याप्रमाणे वयोगट 6 ते 14 इयत्ता आठवीपर्यंतचे शिक्षण आपण सक्तीचे आणि मोफत केले. एकूण बजेटच्या किती टक्के खर्च प्राथमिक शिक्षणावर करावा यासंबंधात त्यांनी सांगितलेले आहे. महाराष्ट्र शासनामध्ये जवळ जवळ साडेतीन ते चार लाख प्राथमिक शिक्षक आहेत. इयत्ता दुसरी ते सातवी पर्यंतचे आम्ही सर्व्हेक्षण केले. आणि पुस्तकाविना शिक्षण कसे म्हणून पुस्तके, वही विना लिहितील कसे म्हणून लेखन साहित्य आणि कपडे नसतील तर चार-चौघात शाळेत येतील कसे म्हणून गणवेश, पोटात भूक तर एकाग्रता कशी म्हणून मध्यान्हीचे भोजन. कुटुंबची बूज राखतो तो शाळेत जाईल कसा म्हणून विद्यावेतन उपस्थिती भत्ता अशा प्रकारे शिक्षणाचे काम आपण इतके महत्वाचे मानलेले आहे. आणि दुसरी ते सातवी पर्यंत किती मुलांना लिहिता आणि वाचता येत नाही याचा आम्ही सर्वे केला तेव्हा असे आढळून आले की, 8 लाख विद्यार्थ्यांना साधे लिहिता, वाचता आणि साधे गणितही येत नाही. आणि हे महाराष्ट्र शासनाला भूषणावह नाही. महाराष्ट्र शासनाला आपण जर अग्रेसर म्हणत असू तर ते या शासनाला भूषणावह नाही. ही जबाबदारी तुमची आणि आमची सर्वांची आहे. म्हणून आम्ही हा कार्यक्रम घेतला. शालेय मंत्रिमहोदयांनी घोषणा केली आणि येत्या दोन वर्षात या महाराष्ट्रामध्ये लिहिता आणि वाचता न येणारा एकही विद्यार्थी आढळला तर आम्हाला सुध्दा मंत्रिपदावर राहण्याचा नैतिक अधिकार नाही अशा प्रकारची आम्ही घोषणा केली.

यानंतर श्री. बरवड ....

अशुद्धीत प्रत/ग्रंथिक्षेत्रासाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ .....

आम्ही फक्त 60 दिवसांचा कार्यक्रम घेतलेला आहे. शाळा चालू होण्यापूर्वी दीड तास आणि शाळा सुटल्यानंतर दीड तास असा कार्यक्रम आहे. विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून, ज्यांना लिहिता वाचता येत नाही अशी मुले बाजूला काढली आणि चार चार, पाच पाच मुलांचा गट करुन हे करावयाचे आहे. फक्त दोन महिन्यांचा कार्यक्रम आहे. सगळया ग्रामसभा, सगळे पालक, शिक्षक फार खूश आहेत. कोणीही न रहावे अज्ञ, याचसाठीच हा शिक्षण यज्ञ. सभापती महोदय, सर्वांनी यामध्ये आम्हाला सहकार्य करावे अशी विनंती करतो. फक्त जनगणना आणि निवडणुका याशिवाय दुसरे कोणतेही काम शिक्षकांना लावावयाचे नाही असे ठरविले आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, उन्हाळयामध्ये विदर्भ आणि मराठवाडयामध्ये किती तपमान असते याची आपल्याला जाणीव आहे काय ? आधी याची जाणीव करुन घ्यावी. त्या ठिकाणी 45 ते 46 डिग्री सेल्सीयस तपमान असताना सकाळी साडेआठ ते सायंकाळी साडेसहा वाजेपर्यन्त शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना शाळेत कोंडून ठेवणार आहात ही वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे. दुसरा महत्वाचा प्रश्न असा की, त्यांना जेवणाची सुध्दा सुट्टी नाही. खिचडी जी शिजविणार आहे ती विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी आहे. हा दोन महिन्यांचा कार्यक्रम आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु हा प्रकल्प तुम्ही जुलैपासून सुध्दा राबवू शकता. तुम्ही किती तास काम करुन घेणार ? एका दिवसात दहा तास काम करुन घ्यावे असे कोणत्या नियमामध्ये आहे. सध्या आहे त्या टाईम टेबलमध्ये, त्या कार्यभारात हा कार्यक्रम केला तर निश्चितपणे आपल्याला सहकार्य करु. त्यामध्ये हा कार्यक्रम राबवा. उन्हाळयामध्ये तुमच्या शाळांमध्ये पंखा आहे काय ? 60 दिवसांचा कार्यक्रम आहे. एकही दिवस सुट्टी नाही. त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था, बसण्याची व्यवस्था आहे काय हे आधी पहावे आणि त्यांची व्यवस्था करुन नंतर हा कार्यक्रम राबवावा. नुसते प्रयोग करु नका. म्हणून ही योजना रद्द करणे आवश्यक आहे. जी अवांतर कामे लादलेली आहेत ती संपूर्ण कामे काढा. आपण दोन कामे म्हणत आहात. असे आदेश तुम्ही 15 दिवसात काढणार आहात काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अशी कोणतीही कामे त्यांना लावण्यात येणार नाहीत. त्याचा आदेश सुध्दा काढला जाईल. यापूर्वी आम्ही आदेश काढलेलाच आहे. निश्चितपणे जनगणना आणि निवडणुका याशिवाय दुसरा कोणताही कार्यक्रम शिक्षकांना देत नाही. 8 लाख मुले जर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. हसन मुश्रीफ.....

अडाणी असतील तर कसे व्हावयाचे ? आपण फक्त प्रयोग करीत आहोत. तपमानाचा सुध्दा त्रास होणार नाही याची मला निश्चितपणे खात्री आहे. तसे जर झाले तर निश्चितपणे दुरुस्त करु. आम्हीही माणसे आहोत. पण 8 लाख मुलांना अडाणी ठेवणे हे महाराष्ट्राला भूषणावह नाही.

श्री. शिवाजीराव पाटील : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्री आणि शिक्षण राज्यमंत्र्यांनी सांगितले की, शिक्षकांकडे दोन कामांशिवाय कोणतेही काम नाही. आज 30 प्रकारची कामे प्राथमिक शिक्षकांना लावली जात आहेत आणि जवळजवळ वर्षातून तीन महिन्याच्या कालावधीसाठी शिक्षकांना शाळेच्या बाहेर पडावे लागते. जी मुले अप्रगत आहेत ती अप्रगत का राहतात याचा शोध न घेता जादा पैलवान पंधरा दिवसात होऊ शकेल काय ? दोन महिन्यामध्ये दहा तास काम लावत हातात. प्रचंड उन्हाळा, कामाचे दुर्भिक्ष्य, अनंत अडचणी आणि बाल मानसशास्त्राचा विचार न करता त्यांना 9 ते 10 तास काम लावण्याने ती मुले प्रगत होऊ शकतील काय ? उलट मुलांवर जास्त भार लावल्याने मुलांचे लक्ष लागणार नाही. त्यांच्यातील मानसिकता लक्षात घेतली पाहिजे. शिक्षणशास्त्र आणि मानसशास्त्र याच्यावर आधारित शिक्षण आहे. सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना वर्षभर एक तास जादा काम लावून त्या मुलांना प्रगत करा. जी अशैक्षणिक कामे आहेत ती आधी बंद करा. आजही मी तुम्हाला दाखवून देतो. सर्व जिल्हयांमध्ये कुटुंब गणना असेल, दारिद्रय रेषेखालचे काम असेल अशी अन्य 25 ते 30 प्रकारची कामे प्राथमिक शिक्षकांवर लादून त्यांना हैराण केलेले आहे. म्हणून ते शिक्षक म्हणतात की, जिल्हा परिषदेकडे शिक्षण नको. अशा परिस्थितीमध्ये मुले अप्रगत राहिली. त्यांना प्रगत करण्याकरिता एक वर्षाचा कार्यक्रम आखा. आम्ही त्याला नाही म्हणू शकत नाही. वर्षभर एक तास जादा घेतल्याने ती अप्रगत मुले प्रगत होतील. आता माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती नाही. श्री. मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना आदेश काढलेला आहे परंतु तो आदेश राबवित नाही. सगळे आदेश बाजूला ठेवलेले आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आम्ही गुरुजनांचा आदर करणारी मंडळी आहोत. गुरुजन समोरुन आले तर आम्ही रस्ता बदलत होतो अशी आमची संस्कृती आहे. या वाढीव तासांमध्ये मुलांसाठी पाण्याची सोय केली जाईल, दोन महिन्यासाठी ही मोहिम घेतली जाणार आहे. तसे आदेश काढलेले आहेत. हया सर्व मुलांना शिकू द्यावे अशी मी मा.सदस्यांना विनंती करतो.

श्री.जगन्नाथ शेवाळे : सभापती महोदय, आज प्राथमिक शाळेतील शैक्षणिक दर्जा साधारण आहे. त्यामुळे शासनाने ही योजना आखली आहे ती निश्चितच अभिनंदनीय आहे. आज स्थिती अशी आहे की, पुणे शहरापासून 10 कि.मी.वर असलेल्या शाळेतील इयत्ता तिसरी किंवा चौथीच्या मुलांना स्वत:चे नाव लिहिता येत नाही. (अडथळा) काही ठिकाणी अशी परिस्थिती आहे. पण हे वास्तव आहे. त्या वास्तवाला सामोरे जाण्यासाठी शासन शिक्षणावर एवढा खर्च करीत असताना जर स्थिती साधारण असेल तर त्याचा प्रामुख्याने विचार होणे गरजेचे आहे. शिक्षकांची बाजू चुकीची आहे असे मी म्हणत नाही. या मुलांनी सकाळी दीड तास आणि संध्याकाळी दीड तास जास्त बसावे हे तीन तास जास्त होत आहेत. त्याचा शासनाने फेरविचार करावा. दोन महिन्यामध्ये जादा वर्ग मोहिम राबवून ही गोष्ट साध्य होणार नाही. ही मोहिम सातत्याने 2-3 वर्षे राबवावी लागेल. सन्माननीय सदस्य श्री.शिवाजीराव देशमुख यांनी सूचना केली आहे त्यानुसार शाळा भरण्यापूर्वी दीड तास अगोदर हे वर्ग घ्यावे म्हणजे त्यावेळी शिक्षक देखील उपस्थित राहतील. या सर्व गोष्टी आपल्यासमोर आल्या असताना त्याची काळजी आपण घेणार आहोत की नाही ? याबाबत सर्व्हे केला जावा. ज्या विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येत नाही त्याची जबाबदारी त्या प्राथमिक शिक्षकावर टाकावी, त्याला शिक्षेस पात्र करावे. त्याच्यावर बंधन असावे. तसे बंधन शिक्षकांवर शासन टाकणार आहे काय ? विद्यार्थी पास होणे न होणे हा भाग निराळा आहे, परंतु त्याला लिहिता वाचता आले पाहिजे याची जबाबदारी शासन घेणार आहे काय ?

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, शिकणारा आणि शिकविणारा यांच्यासंबंधीची जाणीव असणे आवश्यक आहे.

उपसभापती : तशी इच्छाशक्ती असावयास पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, गाईचे वासरु ज्या ममतेने दूध पिते त्या ममतेने शिकले आणि शिकविले गेले पाहिजे. जबरदस्तीने हात पाय बांधून त्याला वर्गात उभे केले तर परिस्थिती गोचिडासारखी होते. मग फक्त रक्त येते. मा.शिक्षण मंत्र्यांनी एकाही प्रश्नाला उत्तर दिलेले नाही. मा.सदस्य श्री.शिवाजीराव पाटील यांनी जे म्हटले ते या लक्षवेधीमध्ये आहे. त्या शिक्षकांना इतर कामांना जुंपले जाते. आता मंत्रिमहोदय म्हणाले की, आम्ही नोटीस दिली आहे. नोटीस दिली असेल तर त्याचा उल्लेख निवेदनामध्ये का केला नाही ? हया शिक्षकांना जवळपास अध्यापनाच्या व्यतिरिक्त 30 कामे करावी लागतात. दोन राष्ट्रीय कामांच्याबाबतीत आदेश काढल्याचे म्हटले आहे, हे आदेश केव्हा काढले ? त्याची अंमलबजावणी इमानेइतबारे चालू आहे किंवा नाही याची माहिती का दिली नाही ? या लक्षवेधीमध्ये स्पेसिपिकपणे मुद्दे उपस्थित केले आहेत. सभापती महोदय, आपण जादा तास बसावयाचे म्हटले तर आपली काय परिस्थिती होते याचा आपणच विचार केलेला बरा. किती तास जास्त बसावयाचे याला काही मर्यादा आहेत. तरीही आपल्याला चॉईस आहे, आपल्याला बाहेर जाता येते, उशिराने येता येते किंवा एखाद्या दिवशी आले नाही तरी चालते, लॉबीमध्ये बसता येते. परंतु शासनाने शिक्षकांच्या सेवाशर्तीच्या नियमांचा भंग केलेला आहे असा यामध्ये आरोप केलेला आहे. त्याचे उत्तर शासनाने दिलेले नाही.

श्री.हसन मुश्रीफ (बसून) : त्याबाबत उत्तर दिलेले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : आपण खाली बसून उत्तर दिले आहे असे म्हणत आहात तर मग मी उभे राहून आपल्याला प्रश्न विचारतो. या लक्षवेधीमध्ये असे विचारले होते की, " महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, 1977 व नियमावली 1981 मधील नियम 21 (कार्यभार) मध्ये तरतूद असलेल्या कार्यभारात वाढ करुन नियमांचा भंग केला आहे." माझे म्हणणे असे आहे की, त्यांच्या सेवेच्या शर्ती आहेत त्या प्रत्येकाच्या ठरलेल्या आहेत. त्या नियमांमध्ये तुम्ही केव्हा दुरुस्ती केली ?

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. बी.टी.देशमुख पुढे सुरु....)

त्या नियमामध्ये दुरुस्ती न करता त्यांना दोन महिन्यांसाठी कामाला लावणे बरोबर नाही. मग शिक्षक हे वेठबिगार आहेत काय अशी भावना निर्माण होते. त्यांचे नियम ठाम आहेत. शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा चांगला नसल्याबाबत सातत्याने ओरड होत असते. या शाळेत शिकणा-या मुलांना लिहिता, वाचता येत नाही किंवा साधे गणित सुध्दा करता येत नाही अशा प्रकारच्या तक्रारी होत्या असे निवेदनामध्ये सांगितलेले आहे. मग अशा किती तक्रारी शासनाला प्राप्त झाल्या ? त्या तक्रारीच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली गेली ? मी पॉईन्टेड प्रश्न विचारु इच्छितो की, आपण हे सर्व करीत असताना राज्यामध्ये प्राथमिक शिक्षकांच्या ज्या संघटना अनेक वर्षे काम करीत आहेत त्या संघटनांशी चर्चा केली होती काय ? शिक्षण क्षेत्रातील किती लोकांबरोबर आपण यासंदर्भात चर्चा केलीत? आपण तशी चर्चा केली नसेल तर ती चर्चा करा. असे काहीही न करता एकदम स्वप्नात दृष्टान्त झाल्याप्रमाणे हे करीत आहात हे योग्य नाही. आपण आपले अपयश मान्य केलेले आहे. मा.मंत्री महोदय म्हणाले त्याचा अर्थ असा होतो की, जे कामामध्ये नियमित दोषी आहेत त्यांनी इमाने इतबारे काम केले पाहिजे. जे कोणी इमाने इतबारे काम करीत नसतील त्यांना वेठीस धरा. परंतु इमाने इतबारे जे काम करणारे आहेत त्यांना वेठीस धरु नका. माझे म्हणणे असे आहे की, या योजनेच्या संदर्भात कोणत्या स्तरावर चर्चा करण्यात आली ? नियमित काम होत नाही हे जर खरे असेल तर त्या त्या संबंधित अधिका-यांना, शिक्षकांना, जे कोणी असतील त्यांना जबाबदार धरा. परंतु तसे न करता हे जे जादा तास लावले ते बरोबर नाही. मी तिसरी गोष्ट अशी सांगितली की, त्यांचे जे नियमय आहेत त्या नियमामध्ये आवश्यकता असेल तर बदल करा. त्यांना लागू असलेल्या नियमांमध्ये केंव्हा बदल झालेले आहेत?

प्रा. वसंत पुरके : शिक्षणासंबंधीची जाण असणारे तसेच हाडाचे शिक्षक असणारे सभागृहातील सर्व मा.सदस्य, आपणा सर्वांप्रती आदर बाळगून सांगू इच्छितो की, भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद 20(अ) प्रमाणे 6 ते 14 वयोगटातील कोणताही मुलगा किंवा मुलगी शिक्षणापासून वंचित राहाता कामा नये. शिक्षण हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. महाराष्ट्रात ज्ञानेश्वर,एकनाथ्, नामदेव, तुकाराम, गोरा कुंभार, सावतामाळी असे अनेक संत होऊन गेले. संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहे, "हे सारस्वताचे झाड, तुम्हीच लाविले गोड ! प्रेमामृत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/

(प्रा. वसंत पुरके पुढे सुरु...)

शिंपून, वाढवू आम्ही !" सभापती महोदय, गुरुजनांच्या बाबतीत आदर बाळगून मी सांगू इच्छितो की, आपण 21व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे असताना, जागतिकीकरणाची भाषा करीत असताना आपल्या राज्यातील 8 लाख 31 हजार 75 मुले जर निरक्षर राहात असतील तर त्यासंदर्भात गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. जे नियमाने काम करीत नसतील त्यांची बिलकूल गय केली जाणार नाही. गुरुजनांना आपण कोणी शिकवावे अशातला भाग नाही. युनिट टेस्ट कशी घ्यायची हे गुरुजनांना शिकविण्याची गरज नाही. परंतु 8 लाख 31 हजार 75 मुले निरक्षर राहात असतील तर ते बरोबर नाही.... (अडथळा)... मा. सदस्यांनी माझे उत्तर ऐकावे अशी माझी त्यांना नम्र विनंती आहे. अधिकारी आणि आपण वेगळे नाही. आपल्या बरोबर चर्चा करण्याची तयारी आहे. आम्ही सुध्दा शिक्षकांचे प्रतिनिधी आहोत. जी कोवळी मुले आहेत त्यांचे आयुष्य बरबाद होऊ नये हा आमचा उद्देश आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके...

शिक्षकांना वेठीस धरण्याचे कारण नाही. परंतु लाखो वेठबिगार महाराष्ट्रात जन्माला येत असतील तर त्याची सुध्दा आम्ही गांभीर्याने दखल घेतलेली आहे. माननीय सभापती महोदय, शिक्षकेत्तर कामे शिक्षकांना लादली जात असतील तर त्याही संदर्भात सन्माननीय प्रा.बी.टी.देशमुख यांच्या बरोबर आम्ही चर्चा करण्यास तयार आहोत. मूलभूत प्रश्न असा आहे की, आज सातवीच्या मुलाला स्वतःचे नाव लिहीता येऊ नये याच्या सारखी शिक्षणाची शोकांतिका शोधणे हे तुमचे आमचे काम आहे. आपल्या सोबत या विषयावर चर्चा करणे आवश्यक होते. सभापती महोदय, पहिली गोष्ट अशी आहे की,या राज्यामध्ये ख-या अर्थाने गुणवत्ता विकसीत झाली पाहिजे. गुणवत्तेचा प्रश्न नंतरचा आहे. पण माझ्या राज्यात निरक्षर मुले असतील तर त्याची सुध्दा गांभीर्याने मातेच्या ममतेने भूमिका घेणे हे शासनाचे काम आहे.यासाठी आमचे हे अभियान आहे. आम्ही शिक्षकांना कुठल्याही सुटयांपासून वंचीत ठेवणार नाही. म्हणून मी नम्रपणे सांगतो की, रविवारच्या सर्व सुटया आम्ही शिक्षकांना देणार आहोत. दुसरी गोष्ट अशी आहे की,..

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : एकाही शिक्षकाला सुटी दिली जात नाही..

प्रा.वसंत पूरके : आपण माझे उत्तर पूर्णपणे ऐकून घ्यावे. रविवारच्या सुटया शिक्षकांना देण्याचा आजच निर्णय घेतलेला आहे.त्यासंबंधीचे परिपत्रक देखील निर्गमित करण्यात आलेले आहे. आम्ही शिक्षकांना रविवारच्या सुटया निश्चितपणे देऊ. दुसरी गोष्ट अशी आहे की, सायंकाळी 6.30 वाजण्याच्या सुमारास अंधार होते.म्हणून ती वेळ आम्ही 6.00 वा. पर्यंत केलेली आहे. राज्यातील सर्व मूलभूत घटकांनी,समाजव्यवस्थेने काम करणा-या शिक्षकांनी ही योजना मनापासून स्वीकारलेली आहे. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, हा एक प्रयोग आहे म्हणून तो आपण मनापासून स्वीकारावा. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी उल्लेख केला की, नियमाने कामे झाली पाहिजेत.नियमांचे उल्लंघन झाले असेल तर त्याबबद्दलही आम्ही चर्चा करण्यास तयार आहोत. या वर्षी प्रायोगिक तत्वावर, कुठलीही हाव न बाळगता किमान 1 लाख माझे इयत्ता सातवीतील विद्यार्थी इयत्ता आठवीत कोरे गेले असतील. ते जाऊ नयेत म्हणून आम्ही दखल घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. हा एक प्रयोग आहे. या प्रयोगात काही चूका असतील त्या दूर करणे हे लोकशाहीतील महत्वाचे काम आहे. ते काम आम्ही निश्चितपणे करु.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : माझ्या तिन्ही प्रश्नांची उत्तरे नाहीत त्याबद्दल मी आभारी आहे. मी फक्त एकच वाक्याचा प्रश्न विचारतो. लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने देण्यात आलेले निवेदन वाचल्या नंतर माझे ठाम मत झालेले आहे की, जेवढे तास शिक्षकाने काम केले पाहिजे तेवढे तास काम होत नाही हे लक्षवेधीच्या निवेदनात मान्य केलेले आहे. माझे म्हणणे असे आहे की, या निवेदनात ही बाब तुम्ही जाहीरपणे मान्य केलेली आहे. इतक्या वर्षापासून सातत्याने ओरड होत आहे शिक्षणाचा दर्जा चांगला नाही. एवढा मोठा आज शोध लागलेला आहे. जिल्हा परिषदा,नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या शाळामधील शिक्षणाचा दर्जा चांगला नाही हा केवढा मोठा शोध आज लागलेला आहे. Able Government must see that the work prescribed must be done. तुम्ही त्याच्या ऐवजी काहीच न करण्याचा प्रयोग करीत आहात. मला या ठिकाणी माननीय मंत्र्यांनी सांगितले पाहिजे की, हे वेठबिगारी नियमाच्या विरुध्द आहे. म्हणून माझे ठाम म्हणणे आहे की, नगरपालिका,जिल्हा परिषदा आणि महानगरपालिका यांच्या शाळांमध्ये आहे हे काम नीटपणे होणे हा प्रश्न आपल्या समोर आहे की नियमाला सोडून वेठबिगारी करणे हा आपल्या समोर प्रश्न आहे काय याचे मला उत्तर हवे आहे.

श्री. हसन मुश्रीफ : 1 मार्च पासून ते 30 एप्रिल पर्यन्त आमची योजना आहे. अतिशय उत्साही योजना आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे पालक येऊन बसता आहेत. ग्रामीण भागात या योजनेचे मोठया प्रमाणात स्वागत होत आहे.मी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना विनंती करतो की, आपण या योजनेकडे थोडे दिवस बघा...

प्रा.बी.टी.देशमुख : शाळांमध्ये रेग्युलर तास होतात की नाही याची मला प्रथम माहिती द्यावी.

श्री. हसन मुश्रीफ : पूर्वी शाळा संपल्यानंतर शिक्षक टयूशन घेत होते. आपण सगळे मिळून ही योजना साकार करु. कोणालाही या योजनेपासून दूर ठेवले जाणार नाही. 8 तासाच्या वर काम करुन घेणे हे भूषणावह नाही. प्रत्येक दिवशी फक्त तीन तास शिक्षकांचा वेळ घेणार व तो देखील फक्त दोन महिन्यांसाठीच घेणार आहोत. मला वाटते ही योजना यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. वेठबिगारी वगैरे काही नाही. आपण सर्व गुरुजनांचा आदर करणारी मंडळी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ...

आहोत. मी मघाशी म्हटले की, शिक्षकांचे स्थान आमच्या हृदयात आहे. गुरूजनांचा अनादर करणे आमचा हेतू नाही. ग्रामीण भागातील अडाणीपणा नष्ट करणे एवढाच आमचा योजने मागचा हेतू आहे.

यानंतर श्री. उपरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, त्यांना हे अधिक काम दिलेले आहे. पण इतरच्या अनेक कामामुळे नियमित कामसुध्दा त्यांच्याकडून होत नाही. तर नियमित पिरियडचे काय ? याचा खुलासा सन्माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी करावा.

श्री.हसन मुश्रीफ : मी आपल्याला सांगू इच्छितो की, शिक्षकांना जनगणना आणि निवडणूक अशी फक्त दोनच कामे देण्यात येतील. याबाबत आम्ही सगळ्यांना प्रेमाने सांगितले आहे.

डॉ.अशोक मोडक : सभापतीसुध्दा कंटाळले आहेत मग विद्यार्थी कंटाळणार नाहीत काय ?

उप सभापती : या ठिकाणी रेकॉर्डवर चुकीची जाऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, सभापती बिलकूल कंटाळलेले नाहीत.

(सभापतीस्थानी मा. सभापती)

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, माझी मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, याच्या व्यवहार्यतेचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. बाकी आपली भावना आणि आम्हां मंडळींची भावना वेगळी नाही. सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव पाटील जे बोलले ते आपण जरा गंभीरपणे विचारात का घेत नाही ? क्रॅश प्रोग्रॅमबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, "Crash Programme means crash of programme" It is not result oriented programme. सन्माननीय सदस्य श्री.शिवाजीराव पाटील हे असे बोलले आहेत की, दररोज अर्धातास एक तास ही गोष्ट आपण समजू शकतो. पण साठ दिवसांमध्ये सगळाच्या सगळा डोस पाजण्याचा उपदव्याप कशासाठी ? येथे मंत्री बदलले की उपक्रम बदलतात आणि भोगावे लागते शिक्षक आणि विद्यार्थ्यांना. मागे श्री. अनिल देशमुख हे शालेय शिक्षण राज्यमंत्री होते. त्यावेळी एक वेगळा उपक्रम काढला होता. सभापती महोदय, विषय अत्यंत गंभीर आहे. आपण दोघांनी मिळून जी चिंता व्यक्त केली त्या चिंतेशी कोणीही सुज्ञ माणूस सहमत होईल. साक्षरता वाढली पाहिजे. पण आमची इच्छा अशी आहे की, त्यावर आपण कृपा करून कमी बोला. ही व्यवहार्यता लक्षात घ्या आणि यातून खरोखरच उपक्रम यशस्वी होईल काय ? या प्रश्नाचे उत्तर मला हवे आहे आणि त्यासंदर्भात मी विनंती करीत आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आता फक्त दोन महिन्यांसाठी हा उपक्रम आहे. दोन महिन्यानंतर आम्ही सर्व्हे करू. रिझल्टस् काय मिळाले ते बघू आणि पुन्हा शिक्षक संघटनेबरोबर चर्चा करून ही योजना आम्ही राबवू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.अैनापूरे : हा प्रश्न तसा गंभीर आहे आणि तो चुकीच्या माहितीवर आधारीत आहे. उपाययोजना जी आहे ती चुकीच्या माहितीवर आधारलेली आहे. तरी माझा पहिला प्रश्न असा आहे की, 8 लाख 31 हजार मुले निरक्षर आहेत हा सर्व्हे कधी झाला, तो कोणी केला आणि त्यासंबंधीचा रिपोर्ट कोणी दिला ? त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, असे गृहित धरण्यात आले आहे की, मुले निरक्षर आहेत. त्याचे एकमेव कारण म्हणजे शिक्षक. पण हे एकमेव कारण नाही. अनेक कारणे आहेत. कोणताही सर्व्हे न करता आणि शिक्षकांची कुवत लक्षात न घेता शिक्षक विद्यार्थ्यांना किती शिकवणार याचा विचार शासनाने केला आहे काय ?

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ :सभापती महोदय, दिनांक 20.1.2005 पासून शिक्षणाधिकारी,.. प्राचार्य ,जिल्हा प्रशिक्षणाचे गट शिक्षणाधिकारी,उप शिक्षणाधिकारी यांना माहिती देऊन विद्यार्थ्यांची चाचणी करण्यात यावी असे आम्ही सांगितले होते. मुळाक्षराचे वाचन, बाराखडीचे वाचन ,अक्षरातील दिसण्याचा सारखेपणा, पहिल्या आणि दुस-या वेलांटीतील फरक , -हस्व - दीर्घ इत्यादीसंबंधीची चाचणी घेण्यात यावी असे आम्ही त्यांना कळविले होते. त्याबाबतीत आमच्याकडे शाळावार, तालुकावार,जिल्हावार,केन्द्रवार रिपोर्ट आला होता. आमच्याकडे सगळी आकडेवारी आलेली आहे कोणत्या शाळेतील किती विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येत नाही याची आकडेवारी आमच्याकडे आली होती. त्यानुसार 8 लाख विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येत नाही हे पाहिल्यानंतर आमचे डोळे पांढरे झ ाले होते.त्यामुळे आम्ही याबाबतीत एक योजना तयार केलेली आहे. तेव्हा मी सर्व शिक्षक प्रतिनिधींना अशी विनंती करतो की ,या संदर्भात त्यांनी शासनाला सहकार्य करावे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय,माननीय शिक्षण मंत्र्यांनी शिक्षकांवर असा आरोप ठेवलेला आहे की ,या राज्यातील 18 लाख 31 हजार विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येत नाही.याला केवळ शिक्षक जबाबदार नाहीत.माननीय राज्यपालांनी जे अभिभाषण केले होते ते आपण पहावे.त्या अभिभाषणात असा उल्लेख करण्यात आला होता की,महाराष्ट्र राज्यातील शिक्षक इतर राज्यातील शिक्षकांपेक्षा अधिक नियमितपणे शाळेत उपस्थित राहतात व जास्त काळ अध्यापन करतात."असे असतांना माननीय शिक्षण मंत्र्यांनी शिक्षकांवर जो आरोप केलेला आहे तो आरोप प्रथम त्यांनी मागे घ्यावा.तसेच त्यांनी दिलगिरी व्यक्त करावी.विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येत नाही त्याला केवळ शिक्षकच जबाबदार नाहीत.त्याला समाज आणि पालक जबाबदार आहेत.तेव्हा मंत्र्यांनी शिक्षकांवरील आरोप मागे घ्यावा अशी माझी त्यांना कळकळीची विनंती आहे.

श्री.हसन मुश्रीफ :मी शिक्षकांवर आरोप केलेला नाही. देवानंतर कोण ? तर गुरुजन आहेत असे मानणारे आम्ही आहोत.त्यामुळे शिक्षकांवर आम्ही आरोप केलेला नाही.विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येत नाही याला पालक जबाबदार आहेत, समाज जबाबदार आहे, विद्यार्थ्यांचा बुध्द्यांक जबाबदार आहे.

श्री.वसंतराव खोटरे : माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात शिक्षकांच्या बाबतीत चांगला उल्लेख केलेला आहे आणि आपण मात्र त्यांच्यावर आरोप करीत आहात.

श्री.हसन मुश्रीफ :आम्ही गुरुजनांवर आरोप केलेला नाही.त्यांचा आम्ही अनादर केलेला नाही.गुरुजनांमुळे आमच्यावर चांगले संस्कार झालेले आहेत याची आम्हाला जाणीव आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे. आम्हीसुध्दा शासनाला सहकार्य करण्यास तयार आहोत. सन्माननीय सदस्य श्री.शिवाजीराव पाटील यांनी स्पष्टपणे असे नमूद केलेले आहे की,विद्यार्थ्याच्या विकासाकरता आम्ही शासनाला सहकार्य करण्यास तयार आहोत.परंतु आजारापेक्षा इलाज भयंकर अशी स्थिती शासनाने निर्माण केलेली आहे.तेव्हा यामध्ये बदल करण्यात यावा.निवेदन करीत असतांना शासनाने सांगितले आहे की, कोणत्याही प्रकारे नियमांचे उल्लंघन केलेले नाही.मला माननीय मंत्रिमहोदयांना एक मुलभूत प्रश्न विचारावयाचा आहे.याठिकाणी कोणत्याही नियमांचे उल्लंघन झालेले नाही असे आपण सांगत आहात.बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्टमधील कलम 125(1) आणि (2) मध्ये कामाचे तास दिलेले आहेत. त्यात स्पष्ट असे म्हटलेले आहे की, दुसरी ते चौथीच्या वर्गाना तीन ते पाच तासापेक्षा जास्त काम एका दिवसात करुन घेता येणार नाही त्याचबरोबर इतर वर्गासाठी चार ते सहा तासापेक्षा जास्त तास काम करुन घेता येणार नाही असे असतांना विद्यार्थ्याना आणि शिक्षकांना
9 तास वेठीस धरणार असाल तर शासनाचा निर्णय हा कायद्यापेक्षा श्रेष्ठ आहे काय ?कायद्याचे उल्लंघन करुन आपण या निर्णयाची अंमलबजावणी जबरदस्तीने करणार आहात काय? याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

प्रा.वसंत पुरके :नियमांचे उल्लंघन होणे निश्चितच समर्थनीय नाही. परतु घटनात्मक अधिकारापासून कोणाला वंचित ठेवणे हे सुध्दा उचित नाही. सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे यामध्ये नियमित वर्ग राहतील...

प्रा.बी.टी.देशमुख : दहा तास काम करावे असा भारताच्या घटनेत उल्लेख आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : माझे उत्तर अजून पूर्ण झालेले नाही. सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर प्रथम ऐकून घ्यावे. आम्ही सर्व शिक्षकांना विनंती केलेली आहे .नियमित कामकाज त्यांनी करावयाचे आहे.परंतु ज्यांना लिहिता वाचता येत नाही,ज्यांना अंकाची ओळख नाही असा विद्यार्थ्यासाठी दीड तास अगोदर शिक्षकांना बोलावलेले आहे.त्यापैकी एक तास आम्ही निश्चित कमी करु.

नंतर श्री.कानडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 3 पुढे सुरु .....

श्री. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, मंत्रीमहोदय योग्य प्रकारे उत्तर देत नाहीत. रेग्युलर फंक्शनिंगच्या बाबतीत बोलत नाहीत.

सभापती : याविषयाच्या संदर्भात लोकप्रतिनिधींच्या भावना अशा आहेत की, मुलांना अशा पध्दतीने आपण जास्तीचे प्रशिक्षण देतो ते शालेय वेळापत्रकामध्ये देणार आहात काय ? शालेय वेळापत्रक जर सहा तास असेल आणि त्या व्यतिरिक्त जादा दीड तास देतो हे योग्य आहे काय ? या प्रश्नावर पुष्कळ चर्चा झालेली आहे. अजून दहा सदस्यांना बोलण्याची संधी दिली तरी हा विषय संपणार नाही. मला वाटते की अल्पसूचनेच्या माध्यमातून किंवा अन्य पध्दतीने चर्चा झाली पाहिजे. सगळया सदस्यांच्या विचाराने चर्चा घेतली तर ते योग्य राहील.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, राज्यातील विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेतली तर साडेतीन लाख प्राथमिक शिक्षक आहेत. रेग्युलर वर्गातून मुलांचे शिक्षण झालेले नाही. दोष कुणाचाही असेल. अशी मुले आम्ही बाजूला काढली. आज आठ लाख विद्यार्थ्यांना लिहिता-वाचता येत नाही. या मुलांना शिकवायचे कसे याबाबत आदेश दिले आणि शाळांमध्ये जाऊन मुले तपासली. अशा मुलांची संख्या बाजूला काढली. शिक्षक देण्याचा निर्णय घेतला. त्यांना गृहपाठ द्यावयाचे आहेत. याबाबतीत शिक्षकांच्या काही तक्रारी नाहीत, विद्यार्थ्यांच्या नाहीत, ग्रामस्थांच्या नाहीत. गावामध्ये उत्साहाचे वातावरण तयार झालेले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शिक्षण मंत्र्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. ते स्वत: प्राध्यापक आहेत. या लक्षवेधीच्या माध्यमातून शिक्षकांवर अन्याय होत आहे अशा प्रकारचे वातावरण तयार झालेले आहे. शिक्षकांवर तीन तासांचे लोड वाढले त्याबाबतीत आपण बोलतो परंतु विद्यार्थ्यांच्या बाबतीत कोणीच बोलत नाही. महाराष्ट्रातील परिस्थिती गंभीर आहे. नवीन शिक्षण मंत्री आल्यावर नवीन धोरण तयार केले जाते. आठ लाखापेक्षा जास्त विद्यार्थी अशिक्षित आहेत. मी शिक्षकांची इन्एफीशिअन्सी आहे असे म्हणणार नाही. श्री. बी.टी.देशमुख साहेब यांच्या मताशी मी सहमत आहे. परंतु शिक्षकांवर आणि विद्यार्थ्यांवर लोडींग किती करावे हा प्रश्न आहे. याबाबतीत

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. गायकवाड 17:40

श्री. दिवाकर रावते ....

शक्षक संघटनांशी चर्चा करावी आणि पुढील वर्षाचा कार्यक्रम आखावा. ज्या पध्दतीने मुलांना शिक्षित करण्याचा निर्धार मंत्रीमहोदयांनी व्यक्त केला आहे त्या मागे आपण सर्वांनी उभे राहिले पाहिजे. कार्यक्रम अत्यंत महत्वाचा आहे. शिक्षण खात्याचे यासंदर्भात अभिनंदन केले पाहिजे. शिक्षकांना माझी विनंती आहे ज्याप्रमाणे पोटतिडिकीने शिक्षकांच्या हक्काकरिता भांडता...

यानंतर श्री. सुंबरे ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

आम्ही तुमच्याबरोबर नेहमीच असतो आणि आम्हाला तुमचा नेहमी अभिमानही वाटतो. परंतु शिक्षकांच्या उणीवांबाबत मात्र आपण केव्हाही त्यांना साथ देऊ नका अशी कळकळीची विनंती आपणास करतो. यामध्ये कोठेही शिक्षकांवर अन्याय केला गेलेला नाही. म्हणून मी सन्माननीय श्री.बी.टी.देशमुख यांना सांगतो की, तुमच्याशी मीही सहमत आहे. पण तुम्ही केवळ या ठिकाणी शिक्षकांवरील लोडींगबद्दलच चर्चा केली आहे की, शिक्षकांना तुम्ही किती वेळ राबविणार आहात, त्यांना तुम्ही वेठबिगार करणार आहात का ? वगैरे. परंतु जे शिक्षक ही अशी परिस्थिती निर्माण करीत असतील तर कोठल्याही संघटनेने त्यांची बाजू घेऊ नये या मताचा मी आहे. कारण शेवटी पालकांची देखील एक बाजू असू शकते. या ठिकाणी आम्ही हे मान्य करतो की, शासनाने जर हा कार्यक्रम घेतला असेल तर तो योग्यच आहे आणि एक शिक्षक म्हणून आम्हाला येथील शिक्षक प्रतिनिधींबद्दल आदरच आहे आणि म्हणूनच तुम्ही देखील हे स्वीकारले पाहिजे आणि याबाबतीत मार्गदर्शन देखील केले पाहिजे. आपण सर्वांनी मिळून हा कार्यक्रम राबविण्यासाठी शिक्षण खात्याला सहकार्य केलेच पाहिजे. मात्र एवढीच विनंती आहे की, हे जे शिक्षकांवर लोडींग आहे त्या संदर्भात आपण शिक्षक प्रतिनिधी आणि शिक्षक संघटना तसेच शिक्षण विभागाचे प्रतिनिधी, मंत्री महोदय, आपण एकत्र बसून मार्ग काढावा. पण सध्या तरी हा कार्यक्रम राबविण्याचा या वेळपुरता निर्णय घ्यावा आणि पुढील सत्रामध्ये जसे सन्माननीय श्री.बी.टी.देशमुख म्हणाले की, शिक्षकांच्याकडून आपण त्यांच्या तासिकांमधूनच असे काम करून घ्यावे, जेणे करून असे होणार नाही या दृष्टीने काही सूचना कराव्यात अशी माझी नम्र विनंती आहे, म्हणून माझा प्रश्न यामध्ये काही नाही.

श्री. शिवाजीराव पाटील : अध्यक्ष महाराज, मी सुरूवातीसच सांगितले आहे की, आम्ही यासाठी पूर्णपणे सहकार्य करण्यास तयार आहोत. पण दोन महिन्यापुरता 8-10 तसास मुलांवर लादून... कारण यामध्ये मुलांचा पहिला प्रश्न मी मांडला आहे., शिक्षकांना जादा तास काम करावे लागते आहे म्हणून आमची तक्रार नाही. पण मुले 10 तास उन्हामध्ये .. कडक उन्हाळ्यामध्ये, विदर्भामध्ये कसले ऊन असते याची आपणा सर्वांनाच कल्पना आहे, शिवाय पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे अशा दिवसांमध्ये मुलांनी सतत 10 तास बसण्याने काय परिणाम होईल याचाही आपण विचार केला पाहिजे. तेव्हा या संबंधात माझा प्रश्न असा आहे की, शिक्षकांना अशैक्षणिक कामे मोठ्या

..... 4एफ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाटील ...

प्रमाणात दिली जातात याबाबत मी अनेक पुरावे देण्यास तयार आहे. सर्वच जिल्ह्यांमध्ये प्रचंड अशैक्षणिक कामे शिक्षकांवर आहेत म्हणूनच मुले अप्रगत राहिली. ती मुले प्रगत होण्यासाठी सरकारचा जो काही कार्यक्रम असेल .. वास्तविक या बाबतीत निर्णय घेताना संघटनांना बोलावून त्यांचेबरोबर चर्चा करून हा निर्णय करावयास पाहिजे होता, पण कोठल्याही संघटनेला न बोलाविता अधिकाऱ्यांकडून हा निर्णय शिक्षकांवर आणि मुलांवर देखील लादला गेला आहे आणि त्याचे फलित मिळणार नाही म्हणून वर्षभर हा प्रयोग आपण राबवावा, त्यासाठी आमचे पूर्ण सहकार्य आहे पण यासाठी एखादा तास जादा ठेवावा इतकीच माझी आपणास सूचना आहे त्याचा आपण विचार करणार का ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, हे दोन महिने झाल्यानंतर त्याचे रिझल्टस् काय आहेत ते आपण पाहू आणि मग याबाबत पुन्हा निर्णय घेताना सर्व संघटनांशी बोलून हे ठरवू. पण सध्या तरी हा कार्यक्रम आपण राबविणार आहोत.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : अध्यक्ष महाराज, आम्हाला हे मान्य नाही, आम्ही याचा निषेध करतो आणि शासनाच्या या धोरणाचा निषेध करतो आणि शिक्षकांना व मुलांना 10-10 तास भर उन्हाळ्यामध्ये काम व अभ्यास करावा लागणार असल्याने .. सरकारच्या या धोरणाचा निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(काही सदस्य सभात्याग करतात ..)

प्रा. जोगेंद्र कवाडे : अध्यक्ष महाराज, या लक्षवेधी सुचनेच्या निमित्ताने शासन, प्रशासन आणि आमचे गुरूजन, शिक्षक आणि प्राथमिक शिक्षकांची अवस्था आपण ऐकून घेतली पण या संदर्भात पालकांची भूमिका काय आहे ते मांडणे मी येथे माझे कर्तव्य समजतो. या लक्षवेधीच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षणाचा जो आमचा मुलभूत अधिकार आहे त्या अधिकारापासून आमची 6 ते 14 वयोगटातील विद्यार्थी आहेत.. त्यांना लिहिता-वाचता यावे, त्यांना गणित देखील कळावे ही आपली साधारण अपेक्षा आहे. असे असताना देखील हा जो दोन महिन्यांचा क्रॅश कोर्स सुचविलेला आहे हीच भूमिका ... अध्यक्ष महाराज, मी प्रश्न विचारतो पण तत्पूर्वी मी आपल्याला सांगू इच्छितो की, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.पाटील यांनी एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा मांडला. संपूर्ण वर्षभराच्या कालावधीमध्ये एक तास जास्त राबवून जर आपणास हे काम करता आले .. जसे

अशोधित प्रत / अशोधित प्रत

प्रा. कवाडे ....

सांगण्यात आले की, एकाच दिवशी खूप खाऊन काही कोणी पैलवान होत नाही तसे दोन महिने जास्त अभ्यास करून वा काम करून काही कोणी लगेच प्रगत होत नाही. तसेच हे 8 लाख 30 हजार विद्यार्थी जे आहेत की ज्यांना लिहिता वाचता अजून येत नाही. ही जी दुरावस्था निर्माण झालेली आहे त्याच्या मुळामध्ये शासन पोहोचण्याचा प्रयत्न करणार आहे की नाही हा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, शिक्षकांना अशैक्षणिक कामांमध्ये गुंतविल्यामुळे आमच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहिजे तेवढी वर येत नाही.

(यानंतर श्री. जागडे .... 4जी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जोगेंद्र कवाडे....

या क्रॅश प्रोग्रॅममुळे राज्यामध्ये तसेच देशामध्ये वेगळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पालकांच्या दृष्टीने मला एक विनंती या निमित्ताने करावयाची आहे. आज अनेक शिक्षक अशैक्षणिक काम करीत आहेत. विद्यार्थ्यांवर याचा परिणाम होत आहे. म्हणून या अशैक्षणिक कामाची पध्दत आपण बदलणार आहांत काय ? त्यासाठी कोणता कार्यक्रम घेणार आहांत ?

सभापती : मा. श्री. अरविंद सावंत यांनी प्रश्न विचारावा. त्यानंतर दोन्ही प्रश्नांना माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांची तळमळ मला माहिती आहे. कारण आम्ही एकाच कमिटीवर काम केले आहे. मी सुध्दा मुंबईतील महानगरपालिकेच्या शाळेतून शिकलो आहे. आम्ही जेव्हा हायस्कूलला गेलो तेव्हा आमच्या शाळेच्या तासाव्यतिरिक्त इंग्रजीचा तसेच इतर विषयाचे क्लासेस घेतले जायचे. सहा तासांची शाळा असते. यामध्ये पहिली आणि चवथीसाठी तितकास तास नसतो. माननीय सदस्य श्री. जोगेंद्र कवाडे यांनी सांगितल्याप्रमाणे हा क्रॅश प्रोग्रॅम आपण दोन महिन्याकरिता करीत आहांत. मे आणि दिवाळीच्या सुट्टीत सुध्दा हा कार्यक्रम घेण्याची आवश्यकता आहे. म्हणून हा क्रॅश प्रोग्रॅम क्रश प्रोग्रॅम न होता तो वर्षभर चालू राहणार आहे काय ?

श्री. वसंत पुरके : सभापती महोदय, मा. सदस्य श्री. कवाडे यांनी सांगितल्याप्रमाणे त्याचा आम्ही विचार करीत आहोत. माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत आणि श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे ही योजना निश्चितपणे चांगली आहे. परंतु काही अंशी फेरविचार करण्याची आवश्यकता आहे. पूर्वी साडेसहाची वेळ होती, ती अर्ध्या तासाने कमी करण्यात आली आहे. ज्यांना लिहता - वाचता येत नाही, त्यांच्यासाठी हा जास्तीचा तास आहे. माननीय सदस्य श्री. शिवाजीराव पाटील यांच्या सूचनेचा आम्ही पुढील वर्षी निश्चितपणाने विचार करणार आहोत. आम्ही याबाबतचा प्रोग्रॅम शिक्षकांनाच तयार करण्यास सांगितले आहे. तेव्हा हा कार्यक्रम आम्ही व्यवहार्य करु. मला सदनाला अशी विनंती करावयाची आहे की, तूर्त या वर्षाकरिता तरी आम्हाला मदत करावी.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : महाराष्ट्र पशुधन महामंडळाकडून द्रवरुप नायट्रोजन उपलब्ध न होणे.

मु.शी. : महाराष्ट्र पशुधन महामंडळाकडून द्रवरुप नायट्रोजन उपलब्ध न होणे या संबंधी सर्वश्री प्रतापराव सोनवणे, शांताराम करमळकर, जगदिश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. शांताराम करमळकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पशुसंवर्धन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

" महाराष्ट्र पशुधन महामंडळाकडून द्रवरुप नायट्रोजन उपलब्ध होत नसल्याने राज्यातील शासकीय पशवैद्यकिय कृत्रिम रेतन केंद्र पध्दत बंद पडणे, गेल्या सहा महिन्यांपासून या समस्येने राज्यातील पशुपालक त्रस्त असणे, शासनाने तातडीने कारवाई करुन या महामंडळाला द्रवरुप नायट्रोजन पुरविण्याची आवश्यकता, शासनाची प्रतिक्रिया.

श्री. हसन मुश्रीफ (पशुसंवर्धन राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन
(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शांताराम करमळकर : सभापती महोदय, महाराष्ट्र पशुधन महामंडळाकडून द्रवरुप नायट्रोजनचा पुरवठा खंडीत झाला आहे, हे खरे आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन 2003-2004 या वर्षात द्रवनत्राचा दरकरार करण्यात आलेला होता व त्याची मुदत 30 जून 2004 पर्यन्त होती. पशुधन महामंडळास लागणा-या द्रवनत्राची खरेदी आयुक्त पातळीवर होत असते. सन 2004-2005 या वर्षासाठी द्रवनत्र पुरवठा करण्याबाबत निविदा प्रक्रिया 21.6.2004 रोजी सुरु करण्यात आली. तसेच 2003-2004 च्या भावबंद करारास 30.9.2004 पर्यन्त मुदतवाढ देण्यात आली होती. या कालावधीमध्ये सहा वेळी निविदा घेण्यात आलेल्या होत्या. त्यामध्ये दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. परंतु त्यांच्याकडून दरात वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे द्रवनत्राची खरेदी होवू शकली नाही.

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शांताराम करमळकर : द्रवनत्र पुरवठा केव्हापासून नियमितपणे सुरु होईल? आणि ज्या संस्था नियमितपणे पुरवठा करु शकत नाहीत त्यांचे काम केव्हापासून सुरु होईल?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, नागपूर व अमरावतीमध्ये दोन आठवडयापासून नियमित पुरवठा सुरु झाला आहे. औरंगाबाद व लातूर येथे 1.1.2005 पासून पुरवठा सुरु झाला आहे. मुंबई, कोकण व पुणे विभागात चार-पाच दिवसापूर्वी पुरवठा सुरु झाला आहे.

सभापती : सातत्याने पुरवठा सुरु रहाण्याकरिता राज्य स्तरावर खरेदी प्रक्रिया करण्याबाबत आपण काही विचार केला आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : शासनाने खरेदीचे अधिकार आयुक्तांना दिले होते. 5-6 महिने वेळेवर पुरवठा न झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले. म्हणून शासनाने ताबडतोबीने खरेदी करण्यास सांगितले होते. खरेदीचे दर करार पूर्ण झाल्यामुळे आता पुरवठा सुरळीत होईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : याठिकाणी आपल्याला रासायनिक शीतकरण गृहाची आवश्यकता आहे. परंतु प्रचंड लोड शेडींग होत असल्यामुळे नायट्रोजनच्या प्रिझर्व्हेशनवर त्याचा परिणाम होतो. आणि म्हणून लोड शेडींगच्या संदर्भात आपण सुरक्षात्मक उपाय योजना केली आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : लिक्विड नायट्रोजन हे वेगवेगळया कंपन्यांकडून निविदा मागवून आपण खरेदी करतो. त्याचे तापमान उणे 97 डिग्री म्हणजे बर्फापेक्षा चौपट थंड असते. वातावरणातून पदार्थ काढून घेऊन त्यापासून लिक्विड नायट्रोजन तयार केले जाते. त्यामुळे लोड शेडींगबाबत सुरक्षात्मक उपाय योजना करण्याची जबाबदारी संबंधितांची आहे, आमची नाही.

श्री. शांताराम करमळकर : निवेदनामध्ये "झालेल्या दुर्लक्षाबद्दल त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत शासन विचार करीत आहे" असे म्हटले आहे. तेव्हा ही कार्यवाही केव्हा होईल?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासनाने सहा वेळा निविदा मागविल्या परंतु त्यांना प्रतिसाद मिळाला नाही. एक वेळा प्रतिसाद मिळाला त्यावेळी आपण खरेदी केले नव्हते. त्यामुळे शेतकऱ्यांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झाले. यासंबंधी मंत्रिमहोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली आणि त्यामध्ये याबाबत आयुक्तांसारखा कितीही वरिष्ठ अधिकारी असला तरी त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन त्यांचेकडून स्पष्टीकरण मागण्यात येईल असे ठरले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एम. ए. अझीज : लिक्विड नायट्रोजनचा वेळेवर पुरवठा न झाल्यामुळे शासनाचे किती नुकसान झाले? आणि लिक्विड नायट्रोजन उपलब्ध नसल्यामुळे फ्रोजन सीमेनची स्थिती कशी होती?

श्री अनिस अहमद :सभापति महोदय, यह बात सच है कि कमिश्नर लेवर पर द्रवरुप नायट्रोजन खरीदा जाता है. 6 बार इस संबंध में निविदा मंगवाई गई थी लेकिन वह स्वीकार नहीं गई थी, जिसके कारण किसानों का नुकसान हुआ है. इस संबंध में निविदा भरने वालों के साथ निगोशिएशन करने की जरुरत थी. 6 बार निविदा मंगवाने की जरुरत नहीं थी. इसलिए यह साफ नज़र आता है कि कमिश्नर लेवल पर गलती हुई है. अक्तूबर से फरवरी तक का समय महत्वपूर्ण होता है और ऐसे समय में ही द्रवरुप नायट्रोजन उपलब्ध न होने के कारण नुकसान हुआ है. 18 लाख 35 हजार रुपये का नुकसान हुआ है. इसमें कमिश्नर कार्यालय जिम्मेदार है. इसमें किसानों का नुकसान हुआ है. चूंकि सरकार ने टेम्परारि अरेंजमेंट की है. जहां 40 लाख लीटर नायट्रोजन की आवश्यकता होती है वहां 20 लाख लीटर नायट्रोजन की पूर्ति की है. लेकिन इस संबंध में हमें परमानेंट सोलूशन निकालना पड़ेगा. क्योंकि महाराष्ट्र में दूध के माध्यम से कई लोगों को रोजगार मिल रहा है. इसलिए हम इसी संबंध में एक योजना बनाने की कोशिश कर रहे हैं ताकि इस में परमानेंट सोलूशन निकल सके.

श्री. अनंत तरे : मंत्रिमहोदयांनी कबूल केले की, शासनाने टेंडर मागविल्यानंतर ते स्वीकारण्याच्या बाबतीत पुरेसा प्रतिसाद दिलेला नाही. ज्या अधिकाऱ्यांनी याबाबतीत निष्काळजीपणा दाखविला त्यांच्यावर आपण कारवाई केली काय? केली नसल्यास काय कारवाई करणार?

श्री अनिस अहमद : इस संबंध में कमिश्नर ऑफिस में जिसने गलती की है, उसके खिलाफ डी.ई. शुरु करेंगे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, सांगितलेली गोष्ट सत्य आहे. त्या अधिकाऱ्यांनी चूक केल्याचे स्पष्ट झाले आहे व आपणही मान्य केले आहे.

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, यहां पर जिस अधिकारी ने गलती की है, उसके खिलाफ डी.ई. शुरु करेंगे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, ही गोष्ट सत्य आहे की, त्या अधिका-यामुळे नुकसान झालेले आहे. हे आपण मान्य केलेले आहे. तेव्हा आता विभागीय चौकशी काय करणार ? खरे म्हणजे त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ते सांगावे. त्यांना सस्पेंड करावे. याठिकाणी अठरा लाख रुपयांचे नुकसान झालेले आहे. कारण त्यांच्यामुळे शेतक-यांचे नुकसान झाले आहे हे आपण मान्य केलेले आहे.

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, यह हमारे अधिकार में नहीं है. डी.ई. करने के लिए हमारे पास अधिकार है और डी.ई. करने के लिए मैंने पहले ही कह दिया है.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर स्वरुपाचा विषय आहे. भारतीय ॲग्रो इंडस्ट्रीज फाऊंडेशन या संस्थेमार्फत कै.मणिभाई देसाई यांच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्हयातील हवेली तालुक्यात फार मोठा प्लॅन्ट उभारण्यात आला होता आणि परत-परत निविदा काढून लोक टेंडर घेण्यासाठी पुढे येत नाहीत याचा अर्थ ते व्हाएबल नाही किंवा त्यामध्ये आर्थिक स्वरुपाची फार मोठी कमतरता आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, कारवाईच्याबरोबर, या विषयातील जे तज्ञ आहेत, महाराष्ट्रात जे व्हेटर्नरी कॉलेज आहेत, भारतीय ॲग्रो इंडस्ट्रीज फाऊंडेशन आहे, त्यांची आपण या कामामध्ये मदत घेतली आहे का ? जर घेतली नसेल तर तशा प्रकारची मदत घेऊन याबद्दलची श्वेतपत्रिका तयार करुन एक धोरण आणि कार्यक्रम तयार करुन जेणेकरुन पुन्हा-पुन्हा अशा प्रकारे शेतक-यांचे नुकसान होणार नाही यादृष्टीने आपण निर्णय घेणार आहात का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासनाचे कृती करण्याचे नियम ठरलेले आहेत. निविदा वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द केल्या पाहिजेत. त्यानंतर तीन निविदा प्राप्त झाल्या पाहिजेत आणि त्यातील जी निविदा न्यूनतम असेल ती स्विकारली पाहिजे. अशा प्रकारे पारदर्शीपणाचा नियम केलेला आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती गो-हे यांनी सूचना केली आहे की, असा प्लॅन्ट उरळीकांचनला आहे. इतर ठिकाणीही आहे. त्याठिकाणी ते लिक्वीड नायट्रोजनचा कार्यक्रम करीत आहेत. अशा ज्या संस्था आहेत, त्यांच्याशी निश्चितपणे चर्चा करता येईल. पण खरेदीचे धोरणाच्या बाबतीत शासन लेव्हलवरच त्याचा धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. त्यामध्ये आपल्याला बदल करता येणार नाही.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की,

. . . .4 आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खरेदीच्या बाबतीत शासन लेव्हलवर निर्णय घेतला पाहिजे. मघापासून दोन्ही माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, यामध्ये फक्त 18 लाखाचे नुकसान झालेले आहे. पण हे हिमनगाचे टोक आहे. यामुळे शेतक-यांचे झालेले नुकसान किती आहे हे ते सांगतच नाहीत. कारण लिक्वीड नायट्रोजन नसल्यामुळे पशुधन निर्माण होणार होते, ते झालेले नाही आणि त्यामुळे शेतीवर होणारा जो परिणाम आहे, त्याचा हिशोब केला तर ते नुकसान कोटीच्या घरामध्ये जाण्याची शक्यता आहे. एखादा आयुक्त स्वत:च्या स्वार्थासाठी किंवा निष्क्रियतेसाठी संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेला वेठीस धरतो आणि शासन कोणता तरी नियम काढून आम्हाला कारण सांगत आहे. या ऑर्डरला तीन महिन्याचे एक्सटेंशन दिले होते. अजून तीन महिन्याचे का दिले नाही ? अजून सहा महिन्याचे एक्सटेंशन का दिले नाही ? इमर्जन्सीमध्ये खरेदीच्या स्पेशल पॉवर्स् कमिशनर आणि सेक्रेटरी लेव्हलवर आहेत, डिव्हीजनल कमिशन लेव्हलवर अशा पॉवर्स् आहेत. अशा पध्दतीचा वापर करुन शेतक-यांचे नुकसान होणार नाही यादृष्टीने का काळजी घेतली नाही ? तसेच शेतक-यांचे किती कोटीचे नुकसान झालेले आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 18 ते 20 लाख रुपयांचे लिक्वीड नायट्रोजनच्या दराच्या तफावतीमुळे नुकसान झाले हे खरे आहे. नाशिक विभागामध्ये 1,01,305, ए.आय. कमी झाले पुणे विभागामध्ये 94,916 आणि मुंबई विभागामध्ये 9903 कमी झाले आहे. शेतक-यांचे झालेले नुकसान हे पैशामध्ये मोजता येणार नाही पण मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. शासनाने संबंधित अधिका-याची डी.ई. करण्याच्या बाबतीत निर्णय घेतलेला आहे. यामध्ये शेतक-यांचे नुकसान झालेले आहे आणि लिक्वीड नायट्रोजनच्या दराच्या तफावतीमुळे नुकसान झालेले आहे.

. . . .4 आय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

पृ.शी.: दि.14-3-2005 रोजी कोयना, पुणे,सातारा,मुंबई,

कोकण विभागामध्ये झालेला भूकंप.

मु.शी.: दि.14-3-2005 रोजी कोयना, पुणे,सातारा,मुंबई, कोकण विभागामध्ये झालेला भूकंप याबाबत मा. सदस्य श्री.संजय दत्त यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : मा.सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"कोयना,पुणे,सातारा,मुंबई, कोकण या विभागामध्ये दि.14-3-2005 रोजी दुपारी 3.00 वाजता 5.1 रिस्टर इतका भूकंप झाला. वेळोवेळी कोयना भागात व मुंबईमध्ये असे भूकंपाचे धक्के बसत आहेत. मुंबईमध्ये टोलेजंग इमारतींना या भूकंपापासून कोणत्याही प्रकारचे संरक्षण नाही. कोयना धरणात प्रचंड पाण्याचा साठा आहे, अशा वेळी राज्यात वारंवार होणा-या या भूकंपाला तोंड देण्यासाठी शासनाकडे असलेली यंत्रणा अधिक भक्कम करावी. तसेच जवळच असलेला सागरी किनारा नुकताच त्सुनामीचा झालेला प्रकार लक्षात घेऊन याबाबत शासनाने गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. तसेच सदर घटनेची माहिती वेळोवेळी भूकंप नियंत्रण कक्ष किंवा आपत्कालीन कक्षास मिळाल्यास सदर अधिका-यांनी राज्यातील जनतेला त्वरित याबाबत सूचना द्याव्यात व प्रसार माध्यमातून वस्तुस्थितीची माहिती जनतेपर्यंत पोचवावी जेणेकरुन अशा वेळी अफवांच्या पिकामुळे लोकांमध्ये घबराट निर्माण होणार नाही व यापासून मनुष्याच्या जिवीतास धोका होणार नाही. तसेच अशा नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी नागरिकांना सूचना त्वरीत देण्यात यावी ."

सभापती महोदय, कोयना, पुणे,सातारा,मुंबईसह कोकण या विभागामध्ये दि.14-3-2005 रोजी 5.1रिस्टर स्केल व दिनांक 15-3-2005 रोजी 4.2 रिस्टर स्केल इतक्या तीव्रतेचा भूकंप झाला. कोयना परिसरात भूकंपाचे धक्के वारंवार बसत आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. संजय दत्त....

त्या भूकंपाचा परिणाम राज्यात विशेषत: मुंबई व पुणे परिसरात तीव्रतेने जाणवतो. मुंबई व पुणे मध्ये टोलेजंग इमारती असून या भूकंपापासून संरक्षण होईल अशी काही ठोस उपाययोजना शासनाकडे आज रोजी उपलब्ध नाही. राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या अनेक महत्वपूर्ण इमारती मुंबई व पुणे शहरात आहेत. भविष्यात राज्यात प्रामुख्याने मुंबईत जास्त रिस्टर स्केलचा भूकंप जर झाला तर फार मोठया प्रमाणात जीवितहानी व वित्तहानी होण्याची दाट शक्यता आहे. सुनामी लाटांमुळे नुकताच भारताचा पूर्व-पश्चिम किनारा होरपळला, मोठया प्रमाणात अंदमान, निकोबारसह दोन्ही किना-यांवर जीवित हानी झाली. मुंबई शहर हे प्रामुख्याने भूकंप प्रवणक्षेत्रात येत असल्या कारणाने अशी दुर्दैवी घटना भविष्यात मुंबईच्या किना-यावर घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. वारंवार होणा-या या अपत्तींना तोंड देण्यासाठी राज्य शासनाकडे असलेली यंत्रणा अधिक भक्कम करणे आवश्यक आहे. या बाबत शासनाने गंभीर दखल घेऊन अशा घटनेची माहिती त्वरीत राज्याच्या भूकंप नियंत्रण कक्ष वा आपत्कालीन कक्षास दिल्यास संबंधित अधिका-यांनी राज्यातील जनतेला या बाबत सूचना द्यावी व प्रसार माध्यमातूनही वस्तुस्थितीची माहिती जनतेपर्यंत पोचवावी. जेणेकरुन अशा वेळी अफवांच्या पिकामुळे लोकांमध्ये घबराहट निर्माण होणार नाही व संभावित जीवितहानीचा धोकाही टळू शकेल. तरी मा. सभापती महोदयांनी या गंभीर विषयावर ठोस पाऊल उचलावे व शासनास त्या बाबत योग्य सूचना द्यावी ही या विशेष उल्लेखाद्वारे मी विनंती करतो.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

थोरात.

पृ.शी. : म्हसळयातील ग्रामीण रुग्णालयासंदर्भात शासनाकडून नागरिकांची अक्षम्य फसवणूक.

मु.शी. : म्हसळयातील ग्रामीण रुग्णालयासंदर्भात शासनाकडून नागरिकांची अक्षम्य फसवणूक या बाबत श्री. जयंत प्र.पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सन 1991 ची लोकसंख्या व शासनाचे धोरण व निकषानुसार म्हसळा तालुक्याचे मुख्यालय म्हसळा येथे ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या नियोजित रुग्णालयासाठी जागा उपलब्ध होण्यासाठी पंचायत समिती, म्हसळाचे कार्यालय अन्यत्र स्थलांतरीत केले आहे. त्यामुळे म्हसळा येथील सर्व्हे नं. 115 , हिस्सा नं. 1 मधील क्षेत्र ग्रामीण रुग्णालयासाठी उपलब्ध करुन दिले आहे. तरीही या दवाखान्याच्या बांधकामास सुरुवात का झाली नाही या बाबत खुलासा व्हावा.

रुग्णालयाचे बांधकाम वेळीच सुरु न झाल्याने पंचायत समिती म्हसळाने सोडून दिलेल्या इमारतीमध्ये आज अवैध व्यवसाय सुरु झाले आहेत ते तात्काळ बंद करावेत.

तसेच ग्रामीण रुग्णालय, म्हसळाचे इमारतीचे बांधकाम तात्काळ सुरु करावे, यासाठी शासनाचे लक्ष वेधण्याकरिता मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृशी. : लेखन वाचन हमी कार्यक्रम.

मु.शी. : लेखन वाचन हमी कार्यक्रमाबाबत श्रीमती संजीवनी रायकर यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"लेखन वाचन हमी कार्यक्रमांतर्गत 2 री ते 7 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सकाळी 9 ते संध्याकाळी 9.30 पर्यंत सलग 9 तास शिकविण्यामुळे विद्यार्थ्यांच्या बालमनावर व मानसिकतेच्या विरुध्द उपक्रम दिनांक 1 मार्च, 2005 ते मे अखेरपर्यंत राबविण्याचे आदेश शासनाने दिले आहेत, याबाबत फेरविचार करण्याची आवश्यकता,

सदर विषय अत्यंत महत्वाचा व सार्वजनिक हिताचा असल्यामुळे तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे मांडू इच्छितो, कृपया परवानगी द्यावी."

सभापती महोदय, दिनांक 17.2.2005 रोजी शासनाने लेखन- वाचन - हमी हा कार्यक्रम काढला. त्याच्यावर आता खूप चरवण झालेले आहे. तरी सुध्दा मला बोलायची संधी मिळाली आणि काही गोष्टी अस्पर्श राहिलेल्या आहेत म्हणून मला येथे उल्लेख करावासा वाटतो. दिनांक 1 मार्च ते 30 एप्रिल पर्यंत शासन ही योजना राबविणार आहे. लिहिता , वाचता न येणारे 17 टक्के विद्यार्थी आहेत. हे विद्यार्थी कोण याचा सर्व्हे शासनाने केलेला आहे असे दिसत नाही. तळागाळातील आदिवासी लोक आहेत, त्यांच्या घरात अभ्यासाला पोषक अशी जागा नाही, वातावरण नाही, त्यांना भावडांना सांभाळावे लागते. अशिक्षित पालक, मुलें शाळेत गेलीच पाहिजेत असा त्यांचा आग्रही नसतो. अशी मुले जर मागे पडली तर केवळ हा शिक्षकांचाच दोष आहे कां? सकाळी 9.00 वाजल्या पासून संध्याकाळी 7.00 वाजेपर्यंत म्हणजे 9 तास मुलांना एका जागी बसवणे हे मानसशास्त्रज्ञांच्या मते ही 6 ते 12 वयोगटातील अतिशय किशोर वयीन मुले आहेत ते अत्यंत चंचल असतात. एकाच विषयावर दीर्घ काळ अवधान देणे त्यांना अत्यंत कठीण जाते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर...

शिक्षकांना अशैक्षणिक कामांना जुंपणे याबद्दल खूप चर्चा झालेली आहे, त्यामुळे त्या बद्दल मी काही बोलत नाही. पण विद्यार्थ्यांना शिक्षकांची गरज आहे. तेच जर वर्गात नसतील, तुम्ही त्यांना बाहेर पाठवित असाल तर मुले शिकणार कशी? त्यांना शाळेची गोडी कशी वाटणार? प्रौढ शिक्षण वर्गात सुध्दा शिक्षकांना पाठविले जाते.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर .....

वरवर पाहता योजना चांगली वाटते परंतु विद्यार्थ्यांना 9 तास बसविणे अशक्य आहे. नवीन योजनांची खैरात करणे हे या शासनाला खूप चांगले जमते. दोन तीन वर्षापूर्वी इंग्रजी विषयाची सक्ती केली. ज्या मुलांना लिहिता वाचता येत नाही त्यांचे सर्व्हेक्षण आता करीत आहात आणि दुसरीकडे इंग्रजीची सक्ती केली आहे. याचा सुध्दा आपण विचार करावा. ही जी योजना आज राबवित आहात त्याऐवजी पुढील जून महिन्यापासून सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये काय अडचणी आहेत याचा सर्व्हे घ्यावा. मग ही योजना राबविण्याची गरजच पडणार नाही. ही योजना तात्काळ रद्द करावी अशी मी विनंती करते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नगरपालिका व महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना चार महिन्यांपासून वेत न मिळणे.

मु. शी. : नगरपालिका व महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना चार महिन्यांपासून वेत न मिळणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : मा□□□य सदस्य श्री. रामनाथ मोते यां□ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूच□ मांडतो.

" महाराष्ट्रातील नगरपालिका व महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गेल्या 4 महिन्यापासून वेतन मिळालेले नसून वेतनाअभावी शिक्षकांच्या कुटुंबियांची उपासमार होत असून अनेक आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हया महत्वाच्या व गंभीर विषयाबाबत विशेष उल्लेखाची संमती मिळावी, ही विनंती"

सभापती महोदय, महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या म्हणजे नगरपालिका आणि महापालिकांनी चालविलेल्या ज्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आहेत त्यांना शासनाकडून अनुदान मिळते. त्या शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गेल्या चार महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. यासंदर्भामध्ये संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यांचे असे म्हणणे आहे की, 580 या शीर्षाखाली शासनाकडून जेवढे अनुदान आम्हाला यावयास पाहिजे होते, जेवढी तरतूद व्हावयास पाहिजे होती तेवढी तरतूद झालेली नाही. त्यामुळे या शिक्षकांना गेल्या चार पाच महिन्यांपासून वेतन देऊ शकलो नाही. कालच्या पुरवणी मागण्यांमध्ये सुध्दा मुंबई महापालिकेसाठी तरतूद केलेली आहे परंतु अन्य नगरपालिकांच्या आणि महापालिकांच्या ज्या

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

श्री. रामनाथ मोते .....

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आहेत त्यांच्या पगारासाठी कोणतीही तरतूद नाही. गेली चार महिने आमचे सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी पगाराविना काम करीत आहेत. त्यामुळे ते अनेक अडचणींना सामोरे जात आहेत. अनेकांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. आमचे पगार 1 तारखेऐवजी 10 तारखेला झाले तरी अडचण सुरु होते. त्या शिक्षकांना चार चार महिने पगार नाही. अनेकांच्या वैद्यकीय अडचणी निर्माण झाल्या आहेत तर अनेकांचे टेलिफोन बंद केलेले आहेत. कोणाची बिले थकलेली आहेत. अशा प्रकारे आमच्या सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आर्थिक कुचंबणा शासनाने केलेली आहे. याबाबत संबंधित खात्याच्या माननीय मंत्रिमहोदयांची भेट घेतलेली आहे परंतु अद्यापही शिक्षकांचे वेतन मिळालेले नाही. आमच्या शिक्षकांनी आर्थिक संस्थेकडून आणि अन्य ठिकाणाहून कर्ज घेतलेले आहेत. एल.आय.सी. चे कर्ज घेतलेले आहे. त्याचे हप्ते पगारातून भरावयाचे असतात. त्याचे हप्ते वेळेवर न गेल्यामुळे शिक्षकांना भूर्दन्ड भरावा लागतो. त्यांना व्याज आणि दंड भरावा लागतो. शिक्षकांना वेळेवर पगार न मिळाल्यामुळे शिक्षकांची आर्थिक अडचण निर्माण होते. म्हणून या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाचे लक्ष या महत्वाच्या विषयाकडे वेधू इच्छितो. यासंदर्भात शासनाने लवकरात लवकर त्या शिक्षकांचे पगार होतील यासाठी कार्यवाही करावी अशी आपल्या माध्यमातून विनंती करतो.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

पृ. शी. : राज्यात सहकारी तत्वावर चालणाऱ्या उद्योग, संस्था यावर देखरेख करण्यासाठी लोकलेखा समितीच्या धर्तीवर दोन्ही सभागृहातील सदस्यांची संयुक्त समिती नेमणे.

मु. शी. : राज्यात सहकारी तत्वावर चालणाऱ्या उद्योग, संस्था यावर देखरेख करण्यासाठी लोकलेखा समितीच्या धर्तीवर दोन्ही सभागृहातील सदस्यांची संयुक्त समिती नेमणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : मा□□य सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

राज्यात सहकारी तत्वावर चालणारे विविध उद्योग, संस्था यावर देखरेख करण्यासाठी लोकलेखा समितीच्या धर्तीवर दोन्ही सभागृहातील सदस्यांची संयुक्त समिती नेमणे या सार्वजनिक महत्वाच्या व तातडीच्या विषयाबाबत मी आज सभागृहात विशेष उल्लेख उपस्थित करु इच्छितो कृपया अनुमती द्यावी.

"राज्यात मोठया प्रमाणावर विकसित झालेला सहकारी साखर उद्योग, सहकारी सुतगिरण्या, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, खरेदी विक्री संघ, अपेक्स मार्केटिंग सोसायटया, शिखर बँका या सर्व सहकारी संस्थांमध्ये शासनाने कोटयवधी रुपयांचा निधी गुंतविलेला असून तो निधी विचारात घेता, तसेच राज्याचे अर्थकारण व राजकारण यात सहकारी उद्योगाचा व संस्थांचा असलेला मोलाचा वाटा, केंद्र शासन तसेच राज्य शासनाकडून या उद्योगाला वेळोवेळी देण्यात येत असलेली विविध स्वरुपाची अनुदाने व सबसिडी, त्याचप्रमाणे शासनाकडून सहकारी कारखान्यांना व उद्योगाला देण्यात येत असलेली कर्जे व हमी, परिणामी आर्थिक अनियमितता झाल्यास त्याचा सामान्य शेतकरी कामगार, गुंतवणूकदार यांना अप्रत्यक्षपणे बसणारा फटका याबाबत सद्याच्या काळात वारंवार उघडकीस येत असलेली अनेक उदाहरणे, यासर्व बाबी लक्षात घेता राज्यातील या

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी .....

विविध सहकारी उद्योग व संस्थांवर नियंत्रण ठेवण्याची निर्माण झालेली आवश्यकता, सहकारी क्षेत्राचा राज्याच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय जडणघडणीत तसेच राज्याच्या एकंदरीत विकासात महत्वाचा वाटा आहे. शासनाच्या सहकार विभागामार्फत या विभागावर नियमन करण्याचे कार्य करण्यात येते. त्यामुळे शासनाचा सहकार विभाग हा एक प्रमुख विभाग मानला जातो विधिमंडळाच्या विविध समित्यांमार्फत शासनाच्या विविध विभागातून करण्यात येणा-या कामकाजावर अंकुश ठेवण्यात येतो. या समित्यांमार्फत करण्यात येणा-या शिफारशींच्या अनुषंगाने अनेक विभागांच्या कामकाजावर लोकप्रतिनिधींमार्फत नियंत्रण ठेवण्यात येते व त्यांचा कारभार अधिकाधिक चांगला होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात.

शासनाच्या जवळपास सर्वच विभागावर नियंत्रण करण्यासाठी विधानमंडळातील लोकप्रतिनिधींच्या समित्या आहेत. परंतु सहकार या महत्वाच्या विभागासाठी मात्र सद्य:स्थितीत एकही समिती नाही. सहकार क्षेत्र व पर्यायाने शासनाचा सहकार विभाग यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी अद्यापपर्यंत लोकप्रतिनिधींची एकही समिती अस्तित्वात नसल्याने सहकार क्षेत्राशी निगडित राज्यातील गरीब शेतकरी, कामगार, गुंतवणूकदार यांचे हित लक्षात घेता सहकार विभागाच्या कार्य कक्षेत येणा-या विविध सहकारी संस्थांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी तसेच लोकलेखा समितीच्या धर्तीवर दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करावी, अशी मी आपणास विनंती करीत आहे. कृपया माझ्या विनंतीचा प्रधान्याने विचार व्हावा, ही नम्र विनंती.

याबाबत व्यक्तीश: आपणासोबत तसेच मा. अध्यक्ष विधानसभा यांचे सोबत व माननीय मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे सोबत देखील वेळोवेळी पत्र व्यवहार विनंती वजा पाठपुरावा केलेला आहे. कृपया माझ्या विनंतीचा विचार व्हावा ही विनंती.

आपण विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात हा विषय उपस्थित करण्यास अनुमती दिल्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. "

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये सहकार विभागामध्ये राज्य शासनाचे मोठया प्रमाणामध्ये पैसे गुंतविले गेलेले असतात. त्यांचे धोरण व अनेक गोष्टी वेळेवर न होणे, त्यांना पूर्ण प्रशासकीय अधिकार असल्यामुळे आणि ते परस्पर निर्णय घेत असल्यामुळे त्याचा मोठया प्रमाणावर

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी .....

दुरुपयोग झाल्याचे मागच्या तीन वर्षामध्ये आपल्या निदर्शनास आलेले आहे. बँका असो, साखर कारखाने असो किंवा सूतगिरण्या असो. मी गेल्या आठ नऊ महिन्यांपासून सूचना दिलेली आहे. दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची एक समिती झाली पाहिजे. महाराष्ट्र शासनाच्या इतर सर्व विभागांच्या बाबतीत समिती आहे परंतु सहकार विभागाच्या बाबतीत दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची समिती नसल्यामुळे त्यांच्यावर अंकुश राहात नाही. तो अंकुश राहावा, वेळेवर निर्णय व्हावेत, धोरणात्मक निर्णय व्हावे जेणेकरुन आतापर्यन्त जो मोठया प्रमाणात गैरव्यवहार किंवा दुरुपयोग होतो तसेच नंतर पैसे वसूल करण्यामध्ये अडचणी निर्माण होतात त्यादृष्टीने वेळोवेळी नियंत्रण राहावे म्हणून या विशेष उल्लेखाव्दारे मी विनंती करीत आहे. त्याबाबत शासनाने दखल घ्यावी. मी दोन तीन सविस्तर पत्रे वर्षभरापासून दिलेली आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी..

मी आतापर्यंत 8-10 पत्रे दिलेली आहेत, परंतु त्याची गंभीर दखल घेण्यात आलेली नाही. विषय महत्वाचा असल्यामुळे शासनाने याची गंभीर दखल घ्यावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MHM/

पृ.शी. : कोयना वीज प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन न होणे.

मु.शी. : कोयना वीज प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन न होणे याबाबत डॉ.नीलम गो-हे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"कोयना या महत्वाकांक्षी वीज प्रकल्पासाठी शेकडो भूमिपुत्रांनी आपल्या सुपिक जमिनी आणि घरेदारे 30 वर्षापूर्वी शासनाच्या ताब्यात दिली, असे असताना ठाणे जिल्हयाच्या शहापूर तालुक्यातील सुमारे 125 प्रकल्पग्रस्तांना शासनाने आजपर्यंत वा-यावर सोडल्याने शहापूर तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांना 1974 साली खुटकर गावातील 416 एकर जमिनीवर पुनर्वसन करण्याचे जाहीर करुनही त्यासाठी प्रत्येक कुटुंबाला चार एकर जमीन देण्याचे शासनाने दिलेले आदेश, परंतु आज 30 वर्षे होऊनही जमीन देण्यात आली नसल्याने पुनर्वसनाअभावी सदर कुटुंबियांचे होणारे हाल, त्यामुळे आपल्या रास्त व न्याय्य मागण्यांची पूर्तता होत नसल्याने नैराश्यापोटी 125 प्रकल्पग्रस्त कुटुंबियांनी कोयनेच्या जलाशयात उडया मारुन सामुहिक आत्महत्या करण्याचा दिलेला इशारा, सदर आगाऊ गंभीर इशा-याची दखल घेऊन त्यावर आदेश देण्याची नितांत आवश्यकता व त्याबाबत शासनाने निवेदन करावे ही विनंती."

सभापती महोदय, दिनांक 21 फेब्रुवारी, 2005 रोजी दैनिक सामनामध्ये नमूद केले आहे की, कोयनेच्या प्रकल्पग्रस्तांपैकी 125 कुटुंबियांना अनेक वर्षांपासून शासनाकडून आश्वासन मिळून देखील त्यांचे पुनर्वसन झालेले नाही. कोयना प्रकल्पासाठी ज्या शेतक-यांनी जमिनी दिल्या आहेत अशा प्रकल्पग्रस्तांपैकी 100 वसाहती वाडा, भिवंडी, पनवेल, खालापूर, सांगली, सातारा, पंढरपूर, मंगळवेढा या तालुक्यांमध्ये वसलेल्या आहेत. 1974 साली खुटकर गावामध्ये 496 एकर जमिनीवर प्रत्येक कुटुंबाला 4 एकरप्रमाणे 86 कुटुंबियांना जमीन देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. 1974 सालापासून आतापर्यंत 40 वर्षे होऊन गेली आहेत. परंतु या प्रकल्पग्रस्तांना जमीन मिळालेली नाही. त्यामुळे हे सगळे तरुण नैराश्यग्रस्त झाले आहेत. शहापूर तालुक्यातील ग्राम

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विकास समितीने असा इशारा दिला आहे की, आमचे पुनर्वसन झाले नाही तर आम्ही कोयनेच्या जलाशयामध्ये उडया मारुन सामुहिकपणे आत्महत्या करणार आहोत. यासंबंधी शहापूर तालुक्याचे तहसीलदार आणि ठाणे जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांनी, तसेच पुनर्वसन विभाग, महसूल विभागाने या इशा-याची गंभीरपणे दखल घेऊन या कोयनेच्या प्रकल्पग्रस्तांचे पुढील 3 महिन्याच्या आत पुनर्वसन करावे आणि त्याबाबतचा तपशीलवार अहवाल विधिमंडळाला सादर करावा अशी विनंती मी या विशेष उल्लेख सूचनेद्वारे शासनाला करीत आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MHM/

सभापती : आज राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. आजच्या एकूण कामकाजासाठी थोडा जास्त वेळ झालेला आहे. उद्या शुक्रवार आहे याचा विचार करता खालच्या सदनामध्ये राज्यपालांच्या अभिभाषणावर आज उत्तर झाले तर याठिकाणीही आजच अभिभाषणावरील चर्चा आणि उत्तर पूर्ण होणे आवश्यक आहे. आतापर्यंत सदनामध्ये सर्व मा.सदस्यांनी फार चांगल्या प्रकारचे सहकार्य केले आहे. मी व्यक्तिगत मा.सदस्यांना विनंती करीन की, आज सकाळी आपण अडीच तास बसलो होतो आणि आता किमान 2 तास बसलो तर हे संपूर्ण कामकाज पूर्ण होईल. हे कामकाज करीत असताना सदनाचा जास्त वेळ घेतला जाणार नाही अशी माझी अपेक्षा आहे. माझी इच्छा आहे की, राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव आहे तो मंजूर करण्याच्या दृष्टीने जे काम आहे ते पूर्ण करावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आज आपण सकाळी 10 वाजल्यापासून बसलो आहोत.

सभापती : आज आपण सकाळी 10 वाजल्यापासून बसलो आहोत ही वस्तुस्थिती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : दोन तासामध्ये ही चर्चा पूर्ण होणार नाही.

सभापती : आपण सकाळी अडीच तास चर्चा केलेली आहे आणि आता दोन तास जास्त बसलो तर ही चर्चा पूर्ण होईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मा.सदस्य अतिशय महत्वाच्या विषयासंबंधी विशेष उल्लेख उपस्थित करीत असतात. परंतु विशेष उल्लेख उपस्थित केल्यानंतर नियम 101-फ नुसार त्यासंबंधीचे लेखी उत्तर तीस दिवसांच्या आत संबंधित सदस्यास पाठविण्याचे बंधन मंत्र्यांवर आहे. मी दिनांक 17 डिसेंबर, 2004 रोजी विशेष उल्लेख उपस्थित केला होता. आपल्या प्रधान सचिवांच्या सहीने 3 स्मरणपत्रे दिली गेली आहेत. अशा परिस्थितीत विशेष उल्लेख उपस्थित करुन काय उपयोग आहे ?

सभापती : मा.सदस्यांनी मला पत्र लिहिले आहे. मी त्या विभागाला पत्र देण्यासाठी माझ्या कार्यालयाला सांगितले आहे. सभागृहात ज्या उद्देशाने विशेष उल्लेख मांडला जातो त्याबाबतीत कोणत्याही परिस्थितीत त्याचा कम्प्लायंस झाला पाहिजे. त्याचे उत्तर 30 दिवसात आले नाही तर त्यासंबंधी कोणत्या पध्दतीने कठोर कारवाई करता येईल याबाबत मी 2-3 दिवसामध्ये निर्णय घेतो आणि या निर्णयाची सदनाला माहिती देतो.

5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MHM/

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याबाबत हक्कभंगाची सूचना देता येईल काय ?

सभापती : यासंबंधीचा निर्णय घेत असताना त्याचाही विचार करता येईल का ते मी पाहतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी देखील 4 विशेष उल्लेख उपस्थित केलेले आहेत, त्याचीही उत्तरे मला आलेली नाहीत.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभरप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा (चर्चा पुढे सुरु..)

श्री. नानासाहेब बोरस्ते (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी दिनांक 14 मार्च 2005 रोजी दोन्ही सभागृहाच्या माननीय सदस्यांसमोर जे अभिभाषण केले त्या अभिभाषणाच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्राच्या जनतेला दिलेले आश्वासन पूर्ण करण्यामध्ये या शासनाला पुरेश यश आलेले दिसत नाही. राज्यात सर्वाधिक महसूली खर्च हा शिक्षणावर केला जातो अशा प्रकारचा दावा शासनातर्फे करण्यात आलेला आहे. परंतु आज निधीच्या उपलब्धते अभावी शिक्षणाचे गाडे पूर्णत: अडून पडलेले आहे. जिल्हा परिषदेच्या अनेक प्राथमिक शाळांमध्ये वर्गखोल्यांची पूर्तता झालेली नाही. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुख्याध्यापक आणि शिक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत. परिणामी विद्यार्थ्यांचे फार मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत आहे. तसेच ज्या खाजगी अनुदानित शाळा आहेत त्या शाळांचे तसेच उच्च माध्यमिक शाळांचे वेतनेतर अनुदान वर्षानुवर्षे रखडलेले आहे. त्यामुळे शैक्षणिक साधनसामग्री उपलब्ध होत नाही. शासनाने शिक्षक सेवक योजना सुरु केलेली आहे. शिक्षक सेवक योजना म्हणजे एका शिक्षकाचा पगार हा तिघा-तिघांमध्ये वाटला जातो. आता शासन कायम स्वरुपी विनाअनुदान शाळांना प्रोत्साहन देत आहे. म्हणजे स्वयंसेवी संस्थावर आर्थिक भार टाकून आपण मात्र नामानिराळे रहायचे ही शासनाची कृती योग्य नाही. तेव्हा शिक्षणावर जास्तीत जास्त महसूली खर्च केला जात असल्याचे जे शासना मार्फत सांगितले जाते ते पूर्णत: असत्य आहे. शिक्षणावर 3 टक्क्या पेक्षा अधिक खर्च होत नाही. खरे म्हणजे शिक्षणावर किमान 6 टक्के खर्च व्हावयास पाहिजे. छत्रपती शाहू महाराज, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर जगदाळे, कर्मवीर रावसाहेब थोरात यांनी शिक्षणाची गंगोत्री बहुजन समाजाचा दारापर्यन्त आणली. परंतु आता जी विनाअनुदानित तत्वाची संस्कृति आलेली आहे त्यामुळे हे शिक्षण धनदांडग्यांच्या हातामध्ये जाण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. शिक्षणाचे खाजगीकरण होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. तेव्हा बहुजन समाजाच्या दारापर्यन्त आलेल्या ह्या शिक्षणाच्या गंगोत्रीचा प्रवाह खंडित होतो की काय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नानासाहेब बोरस्ते पुढे सुरु....)

अशा प्रकारची भीती समाजामध्ये निर्माण झालेली आहे. तेव्हा शिक्षणावर सर्वाधिक खर्च होण्याच्या दृष्टीकोनातून मा. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख यावयास पाहिजे होता. परंतु तशा प्रकारचा उल्लेख न आल्यामुळे खेद होतो. तेव्हा शालेय शिक्षणावर सर्वाधिक महसूली खर्च केला जात असल्याचा शासनाचा दावा फोल ठरलेला आह, फसवा ठरलेला आहे. शिक्षण विषयक बाबीवर या सभागृहामध्ये अनेक वेळा आश्वासने दिली गेली आहेत. परंतु त्या आश्वासनांची अंमलबजावणी होत नाही. केवळ वेळकाढूपणाचे धोरण् अवलंबिले जाते. महाराष्ट्रामध्ये अनधिकृत शाळांचे पीकही फार मोठ्या प्रमाणावर आलेले आहे. अनधिकृत शाळां चालविणा-यांवर फौजदारी खटले भरा असे शिक्षण विभागाला सांगितले जाते आणि वृत्तपत्रातूनही तशी निवेदने दिली जातात. परंतु शिक्षण विभागाला अशा अनधिकृत शाळा चालविणा-यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यासंबंधी अधिकार दिलेले नाहीत. शिक्षण विभागाला केवळ वरपांगी सूचना दिल्या जातात. तेव्हा अनधिकृत शाळा चालविणारे जे संस्थाचालक असतील त्यांच्यावर फौजदारी खटले भरुन त्यांना तुरुंगाची हवा दाखवयाला पाहिजे. आज शिक्षण क्षेत्रात गैरस्पर्धा सुरु झालेली आहे. त्यामुळे शिक्षणाचा खेळखंडोबा झालेला आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नानासाहेब बोरस्ते....

त्याला जास्त फी भरुन शाळेत जावे लागते. त्या शाळेतील शिक्षकांना अल्प वेतनावर काम करावे लागते. विद्यार्थी आणि शिक्षक अशा संस्थांमध्ये समाधानी नसतात. त्याच प्रमाणे आदिवासी उप योजनेमधील खाजगी शैक्षणिक संस्थेच्या शाळा आणि तुकडया अनुदानास निकषपात्र ठरलेल्या असताना सुध्दा अद्याप अशा संस्थांना अनुदान मिळालेले नाही. आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षणाचा दर्जा यासंदर्भात या ठिकाणी उल्लेख केला गेला. हा दर्जा सुधारण्यासाठी शासन संगणक प्रयोगशाळा उभारणार आहे. ही अभिनंदनीय गोष्ट आहे. आश्रमशाळेतील मुलींच्या वसतिगृहांसाठी महिला अधीक्षकेची नेमणूक करा अशी मागणी सभागृहात केली गेली होती. त्या बाबतीत राज्य शासनाने जाहीरपणे आश्वासन दिलेले असताना सुध्दा ते आश्वासन आजही पाळले गेलेले नाही. महिला अधीक्षकांच्या नेमणूका न झाल्यामुळे आश्रमशाळेतील मुलींच्या संरक्षणाची जबाबदारी दिवसें दिवस वाढत आहे. म्हणून मुलींच्या वसतिगृहात महिला अधीक्षकांच्या तात्काळ नेमणूका करण्यात याव्यात अशी मी शासनास विनंती करतो. सभापती महोदय, क्रीडा क्षेत्राचा अभिभाषणात उल्लेख केला गेलेला आहे. उत्कृष्ट खेळाडूंसाठी शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये 5 टक्के पदे आरक्षित ठेवण्यात आलेली आहेत. परंतु शालेय स्तरावर बाल क्रीडापटू तयार व्हावेत, त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून 250 विद्यार्थ्यांमागे एक बी.पी.एड.झालेला शिक्षक नेमला जाईल अशा प्रकारचे आश्वासन शासनाने दिले होते. त्या आश्वासनाची पूर्तता अद्याप शासनाकडून पूर्ण झालेली नाही. शासनाने दिलेले आश्वासन पूर्ण करावे अशी माझी शासनास विनंती आहे. आश्रमशाळांमध्ये अधीक्षक नेमले जाणार आहेत ते बी.पी.एड. झालेले नेमले गेले तर क्रीडा क्षेत्रास अजून मोठया प्रमाणात प्रोत्साहन मिळेल. म्हणून आश्रमशाळांमध्ये बी.पी.एड. झालेल्या अधीक्षकांची नेमणूक करण्यात यावी अशी माझी या निमित्ताने शासनास विनंती आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रामध्ये आपण मोठी कामगिरी पार पाडू असे मला काही वाटत नाही. या विभागासाठी भरीव अशी तरतूद करुन क्रीडा क्षेत्र विकसीत करण्यासाठी नवीन योजना शासनाने आखाव्यात अशी माझी मागणी आहे. राज्यातील सत्र न्यायालयातील खटले प्रलंबित रहाण्याचा कालावधी कमी झाला आहे असे शासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे. ही देखील अभिनंदनीय गोष्ट आहे. परंतु शालेय न्यायाधिकरणांतर्गत येणारे जे खटले आहेत ते वर्षानुवर्षे प्रलंबीत रहातात. शिक्षकांच्या पदरात निर्णय पडत नाही ही वस्तुस्थिती आहे. या बाबीकडे शासनाने लक्ष दिले

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नानासाहेब बोरस्ते...

पाहिजे. 374 गावे अक्षय प्रकाश योजने अंतर्गत भार नियमनातून मुक्त झालेली आहे असा अभिभाषणात उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु खेद एका गोष्टीचा होतो की, ग्रामीण भागात प्राथमिक ते माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या परिक्षेच्या कालावधीमध्ये विजेचे भार नियमन मोठया प्रमाणात झाल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. ही गंभीर गोष्ट आहे. या गोष्टीकडे शासनाने गांभीर्याने पाहिले पाहिजे. वेळ कमी असल्यामुळे मी जास्त मुद्दयांना स्पर्श करीत नाही. परंतु एका गोष्टीचे मी मनापासून अभिनंदन करतो की, माननीय राज्यपाल महोदयांनी मान्य केले आहे की, महाराष्ट्रातील शिक्षक इतर राज्यातील शिक्षकाच्या तुलनेने अधीक काळ काम करतो. महाराष्ट्रातील शिक्षकांच्या कामाच्या बाबतीत कौतूक केलेले आहे. त्यामुळे राज्यातील शिक्षकांचा निश्चित आत्मसन्मान वाढला आहे. राज्यातील शिक्षक हे अधीक काम करतात असा विश्वास माननीय राज्यपालांनी दाखविला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि माझे भाषण संपवितो.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी मी उभी आहे. सन्माननीय सदस्य श्री. बोरस्ते यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर आपले विचार मांडले. त्यांनी राज्यपालांच्या अभिभाषणातील काही मुद्दयांवर बोलावयास पाहिजे होते परंतु ते बोलू शकले नाहीत. ते ज्या मुद्यांवर बोलू शकले नाहीत तेवढयाच मुद्यांवर मी बोलणार आहे. माननीय राज्यपालांचा अभिभाषणात विजेचा तुटवडा येत्या पाच वर्षात भरुन काढण्यात येईल असे म्हटले आहे. विजेच्या भार निमयमनाचा फटका आमच्या विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणात बसला आहे. ग्रामीण भागातील इयत्ता 12 वी च्या विद्यार्थ्यांना परिक्षा अंधारात द्याव्या लागल्या. रात्रीचा अभ्यास करताना देखील भार नियमाचा विद्यार्थ्यांना त्रास झाला. या बाबतीत शासनाने गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. देशाचे आर्थिक शक्तिकेंद्र मुंबई शहर आहे असा उल्लेख माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात केलेला आहे. मुंबईचा विकास करण्यासाठी मेट्रो रेल्वे आणि इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याचा देखील उल्लेख करण्यात आलेला आहे. या सुविधा कशा उपलब्ध करुन दिल्या जातील याबाबतीत काही सुधारणा देखील सुचविलेल्या आहेत. मुंबई शहरात येणारे परकीय लोंढे जर आपण थांबविले नाहीत तर मुंबई शहर हे अधीक बकाल होईल. मुंबई शहरात वाढत असलेल्या झोपडपट्टयांना या शासनाकडून संरक्षण दिले जात आहे. 2000 सालापर्यन्त झोपडयांना संरक्षण देण्याचा शासनाचा विचार आहे. त्यानंतर शासनाकडून 2005 या वर्षापर्यन्तच्या झोपडयांना संरक्षण शासनाकडून देण्यात येईल. अशा प्रकारचे संरक्षण झोपडयांना शासनाकडून दिले तर मुंबई शहरात कितीही मोठया प्रमाणात नागरी सुविधा उपलब्ध करुन दिल्या तर त्याचा मुंबईतील जनतेला काहीही फायदा होणार नाही. जर अशा प्रकारे झोपडयांना संरक्षण शासनाकडून दिले गेले तर शासनाने ज्या योजना नमूद केलेल्या आहेत त्या यशस्वी कशा होऊ शकतील याचा खुलासा या ठिकाणी केला गेला पाहिजे. हावर्ड विद्यापीठ आणि जागतिक बॅन्क यांच्या सर्व्हेक्षणातून इतर राज्यातील शिक्षकांपेक्षा आपले शिक्षक अधीक काम करतात म्हणून माननीय राज्यपालांनी कौतूक केलेले आहे. यासंदर्भात झालेल्या सर्व्हेक्षणातून इतर राज्यातील शैक्षणिक दर्जा कसा असेल याचे मला आश्चर्य वाटते. या ठिकाणचे शिक्षक नियमित जास्त अध्यापन ते करतात. परंतु या शासनाला या राज्यातील शिक्षकांची काही कदर आहे काय ? गेल्या वर्षी विना अनुदान 1600 तुकडया सुरु केल्या. त्यामुळे

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अनुदानीत तुकडयांवर त्याचा परिणाम झाला आहे. आज 275 शिक्षक अतिरिक्त झालेले आहेत. या शिक्षकांना तुम्ही कुठे सामावून घेणार आहात ? या अतिरिक्त शिक्षकांना निदान आपण पगार तरी देणार आहात. राज्यात जे शिक्षण सेवक आहेत त्यांना नोटीसा देऊन झालेल्या आहेत. तीन वर्षात का होईना रेग्युलर पे स्केल मिळेल या आशेवर ते होते. "उत्पद्यन्ते विलियन्ते अद्यापकानाम् मनोरथ:".

यानंतर श्री. उपरे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती संजीवनी रायकर)

सभापती महोदय, आश्रम शाळेच्या बाबतीत आणि विशेषत: त्या ठिकाणच्या मुलींच्या बाबतीत ज्या समस्या आहेत त्यांच्याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. महिला संघर्ष तदर्थ समितीने काम केले म्हणून त्या ठिकाणच्या समस्या काही प्रमाणात कमी झाल्या आहेत. तरी ही समिती पुन्हा गठीत करावी अशी माझी विनंती आहे. ती गठीत केली तर आश्रम शाळेतील मुलींचे बरेचसे प्रश्न मार्गी लागतील असे मला वाटते.

सभापती महोदय, सत्र न्यायालयाच्या बाबतीत एक वर्षाच्या आत सुनावणी असे म्हटलेले आहे. शालेय न्यायाधिकरणाच्या बाबतीत या ठिकाणी न बोललेले बरे असे मला वाटते. मुंबईला या न्यायाधिकरणासाठी उत्तम जागाच नाही. त्यामुळे पीठासीन अधिकारी बरेच दिवस त्या ठिकाणी टिकत नाहीत. जे शिक्षक त्या ठिकाणी येतात त्यांना बसायला जागा नाही. तेथे फार काळ प्रकरणे प्रलंबित असतात. त्यांचा निकाल लवकर लागत नाही. ज्यांचे निकाल लागतात त्यांच्या बाबतीतसुध्दा प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जात नाही. वास्तविक न्यायालयाचा अवमान करणा-यांना 75 हजार , एक लाख असे दंड सुचविलेले आहेत. परंतु प्रत्यक्षात मात्र हे दंड त्यांना केले जात नाहीत. शिक्षण अधिका-यांना त्या बाबतीत काय अडचण येते ती मला माहिती नाही. पण याबाबतीतसुध्दा त्यांना ताकीद दिली पाहिजे. ज्येष्ठ नागरीकांच्या बाबतीत कायम स्वरुपी निवृत्ती वेतन वगैरे म्हटले आहे. पण त्यांना वैद्यकीय मदतीची गरज आहे. कारण निवृत्तीनंतर त्यांना आजारपण अधिक येते. त्यामुळे त्यांची काही तरी सोय आपण केली पाहिजे. क्रीडापटूंच्या बाबतीत काही आकर्षक योजना आपण सुचविल्या आहेत. पण क्रीडांगणाच्या बाबतीत मात्र काहीही विचार केलेला नाही. क्रीडांगणावर डंपिंग ग्राऊंड आहेत, अनधिकृत गोष्टी आहेत. आमच्या शिवडी येथे एक ग्राऊंड होते. त्या ग्राऊंडवर ट्रान्झीट कॅम्पसाठी एक तीन मजली इमारत उभारलेली आहें. शेजारच्या झोपडपट्टीतील लोकांना जागा देण्यासाठी ही इमारत उभारली आहे त्याला दोन-तीन वर्षे झाली. तरी ते ग्राऊंड कधी मोकळे होणार आहे ? उत्तम क्रीडापटू निर्माण व्हायला पाहिजेत म्हणून लहानपणापासून त्यांना ज्या सुविधा देणे आवश्यक आहेत त्या दिल्या नाहीत तर सगळे फुकट जाईल. वढे बोलून मी माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मत मांडले आहे. मी या ठिकाणी खेद व्यक्त करण्यासाठी उभी आहे. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दुसरा मुद्दा त्यांनी असा दिलेला आहे की, "महाराष्ट्राच्या जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी, नवीन शासनाने, सर्वतोपरी काम करण्यास सुरूवात केली आहे, हे पाहून मला समाधान वाटते. महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याच्या मुलभूत समस्या सोडविण्याचा आणि भविष्यातील प्रगतीची दिशा ठरवण्याचा शासन प्रयत्न करीत आहे." खरे म्हणजे हे वाचल्यानंतर आणि ऐकल्यानंतर या सरकारचे पहिले 100 दिवस आपण पाहिले तर समाधान वाटण्यासारखे काय काम या सरकारने केलेले आहे ? आपण जर पाहिले तर या 100 दिवसांमध्ये विषारी दारूचे 100 बळी पडले आहेत. प्रशासकीय हलगर्जीपणामुळे मांढरा देवीला जवळपास 400 भाविकांचे मृत्यू झालेले आहेत. 84 हजार अनधिकृत झोपडपट्ट्यांच्या विरोधामधील मोहिम आणि त्याच बरोबर शेतक-यांच्या आत्महत्त्या झालेल्या आहेत. या सर्व घटनांवरून आपल्या लक्षात येईल की, जिव्हाळ्याचे प्रश्न किंवा मुलभूत समस्या सोडविण्यासाठी या सरकारने काय प्रयत्न केले आहेत ? शेतक-यांच्या आत्महत्त्या होत आहेत. त्या होऊ नयेत यासाठी दीर्घ काळ प्रयत्न करावयाला पाहिजेत. कालबध्द कार्यक्रमही सरकारने आखलेला दिसत नाही. शेती तज्ञ किंवा विरोधकांशी या सरकारने कधी चर्चा केलेली माझ्या ऐकण्यात नाही. पण वीज टंचाई असताना शेती पंपाना मात्र मोफत वीज देण्यात आलेली आहे.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ...

कापसाचे चुकारे देण्यासाठी पैसे नसतांना एकाधिकार कापूस खरेदीची योजना राबविली जात आहे अशा प्रकारे जे तात्कालिक उपाययोजना केल्या जातात त्याचा काहीही उपयोग होत नाही.पायाभूत सोयी सुविधाची गुंतवणूक असो, एन्रॉन प्रकल्पाचे भिजत पडलेले घोंगडे असो किंवा सिंचन प्रकल्पाची अंमलबजावणी करावयाची असो अशा प्रकारचे अनेक प्रकल्प रेंगाळत पडलेले आपल्याला दिसून येईल. केन्द्रामध्ये तसेच राज्यामध्ये एकाच पक्षाचे सरकार असेल तर भरपूर मदत केन्द्राकडून राज्याला मिळेल अशा प्रकारची आश्वासने निवडणुकीच्या वेळी आपल्या पक्षाच्या लोकांनी राज्यातील जनतेला दिली होती..परंतु प्रत्यक्षात राज्य सरकारने केन्द्राकडून किती मदत मिळवली आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. सरकारपुढे सर्वात मोठा प्रश्न निधीच्या बाबतीतील आहे.आमदारांसाठी स्थानिक विकास निधी दिला जातो परंतु तो निधी देण्यासाठी सुध्दा राज्य सरकारकडे पैसे नाहीत. पैशा अभावी अनेक छोटया मोठया योजना आज बंद पडलेल्या आपल्याला दिसून येतात. जाहीरनाम्यातील आश्वासने पूर्ण करण्याचा अट्टाहास केला जातो व त्यामुळे ज्या अव्यवहार्य योजना आहेत त्यावर मोठया प्रमाणावर उधळपट्टी केली जाते असे दिसून येते. असे जर असेल तर राज्याचा विकास कसा होईल ? राज्यातील जनतेची अशी अपेक्षा आहे की, राज्याचा विकास झाला पाहिजे तेव्हा ही बाब जाहीरनाम्यातील आश्वासनापेक्षा अधिक महत्वाची आहे असे मला वाटते. विजेच्या बाबतीत माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये सरकारचे मत मांडलेले आहे.वास्तविक महाराष्ट्राला अंधारातून प्रकाशात आणण्यासाठी राज्य वीज मंडळ कोणते ठोस पाऊल उचलत आहे याकडे सुध्दा गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.सध्या जी काही वीज निर्मितीची क्षमता आहे त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे व त्यामुळे वीज मंडळाचे 100 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे.वीज निर्मिती करण्यासाठी अनेक प्रकल्प आज उभे आहेत परंतु त्या पैकी प्रत्यक्षात किती प्रकल्प चालू आहेत हे पाहण्याची गरज आहे.या प्रकल्पापैकी काही प्रकल्प किरकोळ दुरुस्ती अभावी बंद झालेले आहेत. परिणामी वीज निर्मिती थांबलेली आहे.विजेच्या कमतरतेपोटी आपण बाहेरुन वीज खरेदी करीत असतो आणि ही वीज तुलनेने बरीच महाग आहे.त्यामुळे वीज मंडळाला दुप्पट तोटा होत असतो. कोल्हापूर येथील काळमावाडी तसेच तिल्लारी या जलविद्यूत केन्द्रातून 100 मेगॅवॅटस वीज निर्माण केली जाते तसेच उरण येथे गॅसवर आधारित वीज निर्माण केली जाते 912 मेगॅवॅटस वीज निर्माण करण्याची या प्रकल्पाची

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ...

क्षमता आहे. कोल्हापूर येथील दोन्ही वीज निर्मिती केन्द्रे आज बंद आहेत.उरण येथील केन्द्रसुध्दा किरकोळ दुरुस्तीसाठी बंद आहे .त्यामुळे वीज मंडळाचे मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे त्याला कोण जबाबदार आहे? सभापती महोदय, यांनतर मी दुसरा एक मुद्दा मांडणार आहे अंगणवाडीच्या सव्वा लाख कर्मचाऱ्यानी 8 फेब्रुवारी 2005 रोजी उपोषण केले होते. राज्य सरकारने आपल्या जाहीरनाम्यात अंगणवाडीच्या सव्वालाख कर्मचा-यांना किमान वेतनाचे आश्वासन दिले होते.ते आश्वासन का पूर्ण करण्यात आले नाही ? सभापती महोदय,यानंतर मला राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नासंबंधी बोलावयाचे आहे . माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात असे म्हटलेले आहे की," राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती समाधानकारक आहे.राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यास माझ्या सरकारने प्राधान्य दिले आहे."परंतु दोन तीन दिवसातील वर्तमानपत्रे जर आपण पाहिली तर प्रत्यक्षात कायदा व सुव्यवस्था कशी आहे हे आपल्याला दिसून येईल. बोईसर येथे एकाच कुटूबातील चार जणांची हत्या करण्यात आली असून त्यामध्ये दोन कोवळी मुले आहेत.कांदिवली येथील समता नगर भागातील लोक वाढत्या गुन्हेगारीमुळे त्रस्त झाले आहेत.कांदिवली येथील व्यापा-यांनी साखळी उपोषण सुरु केलेले आहे. चार महिन्यात त्या भागात एक डझन घरफोडया झाल्या आहेत. तेथे एका गृहिणीची हत्यासुध्दा करण्यात आली आहे त्याचबरोबर खाकी वर्दीत लुटमार करणा-या तीन जणांना अटक करण्यात आलेली आहे. तेव्हा हे तीन जण कोण आहेत ? त्यामध्ये एक सी.बी.आय.चा शिपाई आणि तर बाकीचे आयकर विभागाचे दोन कर्मचारी आहेत. त्यांनी लोकांकडून 20 लाख रुपये उकळले आहेत.गुन्हयातून नाव काढण्यासाठी आरोपीकडून 9 हजार रुपयांची लाच वसूल करणा-या वाशी रेल्वे पोलीस स्टेशनमधील हवालदाराला लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिका-यांनी रंगेहाथ पकडले आहे कालच कल्याण तालुक्यात भरदिवसा एका घरावर दरोडा पडला आसून श्री.प्रशांत भंडारी यांनी स्वत: दरोडेखोराबरोबर सामना केला आणि एका दरोडेखोराला ठार मारले होते.अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. तेव्हा या राज्यात कायदा व सुव्यवस्था चांगली असल्याचे यावरुन आपल्याला कोठे दिसत आहे ?

नतर श्री.कानडे

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ....

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेतील नाला बंडिंगच्या कामासंदर्भात प्रचंड भ्रष्टाचार झालेला आहे. भाईंदर येथे काँग्रेस पक्षाच्या एक नगरसेविका यासंदर्भात उपोषणाला बसल्या आहेत. श्रीमती रिटा शहा नावाच्या नगरसेविका उपोषणाला बसल्या आहेत. संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानामध्ये प्रचंड भ्रष्टाचार आहे. नगरसेवकांच्या तक्रारी आहेत. भ्रष्टाचार झालेला आहे. कॉंग्रेस पक्षाच्या नगरसेविका उपोषणाला बसल्या आहेत. यावरुन आपल्या लक्षात येईल की मा. राज्यपालांचे जे अभिभाषण आहे हे अभिभाषण म्हणजे वरवरचा मुलामा आहे. परंतु आतापर्यंत जी आश्वासने देण्यात आलेली आहेत त्याची पूर्तता केलेली आहे काय याचा राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख नसल्यामुळे या अभिभाषणाचा मी निषेध व्यक्त करते आणि माझे भाषण संपविते.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, मा. राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी वेळ फार थोडा असल्याने मी सगळेच मुद्दे याठिकाणी मांडणार नाही. मा. राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल जो आभार प्रदर्शनाचा ठराव मांडला आहे त्याला निश्चितपणाने मी पाठिंबा देऊ शकत नाही. राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल सहानुभूतिचा ठराव आला असता तर त्याला मी पाठिंबा दिला असता. राज्यपाल 8/10 दिवसापूर्वी या राज्यामध्ये आले. त्यांना महाराष्ट्राचा इतिहास माहीत नाही. मुंबई काय आहे माहीत नाही. मी जरुर त्यांना केव्हा तरी मुंबई-पुण्यातील वातावरण त्यांना दाखवून देईन. ते पाहिल्यानंतर ते स्वत:च्या अभिभाषणाशी सहमत होणार नाहीत आणि तुमचा अभिनंदनाचा ठराव देखील परत घेतील. सभापती महोदय, मी एका अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे जरुर लक्ष वेधू इच्छितो. जो विषय आतापर्यंत आपल्यासमोर आला नाही. एक नवीन विषय महाराष्ट्राच्या कलाक्षेत्रामध्ये येऊन वातावरण गढूळ होऊ लागले आहे. एक भीतीग्रस्त वातावरण तयार झालेले आहे. कास्टिंग काउच सुरु आहे. खाजगी संस्थेने कॅमेरा घेऊन जायचे शूटींग करावयाचे आणि संपूर्ण जगाला ते दाखवायचे आणि त्यातून भरपूर पैसा मिळवावयाचा असा प्रकार मुंबई आणि इतर ठिकाणी सुरु झालेला आहे. दुर्दैवाने शासनाने आणि आपण सर्वांनीच याची गंभीर दखल घेतलेली नाही. सिक्रसी ॲक्ट आहे. रजत शर्मा हा इंडिया टीव्ही चा माणूस स्वत:ला कोण समजतो ? कोणाच्याही बेडरुममध्ये नकळत घुसायचे कॅमेरा घेऊन जायचे तेथे शूटींग करावयाचे आणि सर्व जगाला दाखवायचे. अत्यंत निंद्य आणि सडक्या मनोवृत्तीचा हा प्रसयकार आहे. मी सुध्दा पत्रकार आहे. शक्ती कपूरला फोन करुन एक मुलगी बोलावते ती मुलगी कोण असू शकते ? ती मुलगी रात्री 11.30 वा. तुलीप स्टार हॉटेलमध्ये शक्ती कपूरला बोलावते. एवढया रात्री ती मुलगी हॉटेलमध्ये कशी काय येते ? या मुलीचे चारित्र्य तपासून पाहिले पाहिजे. या तुलीप स्टार हॉटेलवर काही दिवसापूर्वी धाड पडली होती आणि काही वेश्यांना पकडले होते. रात्री 11.30 वा किंवा 12.00 वा. एक मुलगी नटाला हॉटेलवर बोलाविते याची चौकशी झाली पाहिजे. तुलीप हॉटेलमध्ये गार्ड असतात. वाटेल त्याला जाण्यास परवानगी नसते. हॉटेलमध्ये गैरप्रकार झाले तर त्या हॉटेलला खुलासा करावा लागतो. रुमध्ये साधा चरस सापडला तरी हॉटेलला खुलासा करावा लागतो. परंतु खोलीमध्ये छुपे कॅमेरे लावून चार भिंतींच्या आत घडवून आणलेला संवाद हा अत्यंत घाणेरडा प्रकार आहे.

यानंतर श्री. सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

कारण पुढे आता अमन वर्मा आहे त्याचेही काही शुटींग केलेले आहे. हे असेच चालल्यामुळे संपूर्ण सिनेमा क्षेत्र, आपल्या दादासाहेब फाळक्यांचे सिनेमा क्षेत्र, जे आपण चांगले आहे असे मानत होतो ते या एका प्रकारामुळे, एका क्षणामध्ये सारे बदनाम करून टाकले आहे की त्याला क्षमा करता कामा नये. आज तो रजत शर्मा मोठ्या अभिमानाने सांगतो आहे की, आम्ही काही मोठे घबाड शोधून काढले आहे, पण ते खरे नाही, ते अत्यंत चुकीचे आहे. किंबहुना तो एक गुन्हा आहे आता संपूर्ण सिनेमा क्षेत्रामध्ये, नाटकांच्या क्षेत्रामध्ये, एकूणच कला क्षेत्रामध्ये असलेल्या त्या कलाकारांकडे जनता कोणत्या दृष्टीने पाहणार आहे ? एखादे क्षेत्र अशा प्रकारे बदनाम करण्याचा काय अधिकार आहे या माणसाला ? हे बदनाम कोणी केले ? त्या शक्ती कपूर विषयी मला जराशी देखील सहानुभूती नाही. त्याने केवळ मूर्खपणाच केला आहे. त्याविषयी मला काहीच बोलावयाचे नाही. पण तो मूर्खपणा त्याने चार भिंतीच्या आड केलेला आहे. हा चार भिंतीआडचा मूर्खपणा नाक्या नाक्यावर होतो, घरा-घरामध्ये होतो, तो मूर्खपणा जर तुम्ही गुपचूप शुटिंग करून अख्ख्या हिंदुस्थानला दाखविणार असाल तर केवळ देशाचीच नाही तर देशा बाहेर देखील अशी बदनामी झाली आहे की, आमच्या कलाक्षेत्रामध्ये काम करणाऱ्या या मुली आपल्या चारित्र्याशी तडजोड करूनच तेथे काम मिळवितात अशा प्रकारचा एक संदेश साऱ्या जगामध्ये गेलेला आहे. त्याला जबाबदार कोण ? मी या गोष्टीला जबाबदार त्या शक्ती कपूरला धरत नाही, मी तर त्याला काही किंमतच देत नाही. पण त्या शक्ती कपूरने एका खोलीमध्ये केलेला हा संवाद, त्यामध्ये तो जे काही बडबडला असेल ते साऱ्या जगामध्ये रिले करण्याचा कोणाला काय अधिकार आहे ? कोठे आहे आपले सेन्सॉर बोर्ड ? आपल्या हातामध्ये एखादे चॅनेल आहे म्हणून कोणालाही या माणसाने बदनाम करावयाचे का ? कोणाच्याही बेडरूममध्ये शिरायचे, कोणाच्याही बाथरूममध्ये शिरायचे, हा अधिकार या लोकांना कोणी दिला ? हे आपले चारित्र्य नाही, ही आपली संस्कृती नाही, ही आपली पध्दत देखील नाही. म्हणून हे सारे मूळापासून उखडून काढावयाचे असेल तर पहिल्या प्रथम त्या रजत शर्माला पकडा. त्याला विचारा की, हा अधिकार तुला कुणी दिला ? तू कोणत्या गोष्टी रिले करतो आहेस ? ती काही पब्लिक जागा नव्हती. एखाद्या सार्वजनिक जागेवरती अशी कोणाची बदनामी कोणी केली असेल तर ती मी समजू शकतो. पण एखाद्या छोट्याशा खोलीमध्ये केलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नवलकर .....

गोष्टीची अशा प्रकारे बदनामी केल्यानंतर ... कोणी तरी पंख्याला कॅमेरा बसवावयाचा, हा सारा प्रकार काही बरोबर नाही. आणि त्यामध्येही संशयाला जागा अशी आहे की, हे सारे त्या तुलिप हॉटेलच्या संगनमताने झाले आहे किंवा काय हे मला कळत नाही. कारण ती मुलगी त्याच तुलिप हॉटेलमध्ये रहात होती. हे असेच चालू राहिले तर काहीच सुरक्षित नाही. उद्या सगळ्या मंत्र्यांच्या अँटी चेबरमध्ये हे घुसतील, मंत्र्यांच्या बंगल्यावर हे कॅमेरे येतील. माझ्या घरामध्ये कॅमेरा, तुमच्या घरामध्ये कॅमेरा.. आणि शेवटी तुटक तुटक संवाद दिल्यानंतर त्याचा अर्थ उद्या कोणताही होऊ शकतो. तेव्हा हे जे विष आलेले आहे ते आपल्याला तोडून काढले पाहिजे, कारण हे प्रकार आता वाढत चालले आहेत. तहलका पासून सुरूवात झाली, तेव्हा सार्वजनिक विषय असल्याने आम्ही काही बोललो नाही. पण आता खाजगीरित्या असलेल्या गोष्टी देखील तुम्ही अशा प्रकारे चव्हाट्यावर आणू लागलात तर ते वाईट आहे. एखाद्या बाथरूममध्ये कोणाचे तरी चित्रण करायचे आणि तो माणूस नग्न आहे म्हणून साऱ्या जगाला दाखवायचे ही कोठली संस्कृती ? काही कायदा म्हणून आहे की नाही ? कोणी याची दखल घेणार आहे की नाही ? याची सरकारने दखल घेतली पाहिजे. कारण हा प्रकार दुर्दैवाने आपल्या मुंबई शहरामध्ये घडला आहे.

अध्यक्ष महाराज, आणखी एक विषय मला आपल्यापुढे मांडावयाचा आहे. तसे मला बरेच काही बोलावयाचे होते. पण वेळ नसल्याने, केवळ तीन मिनिटे असल्याने मी एकच विषय मांडतो. अध्यक्ष महाराज, झोपडपट्टीचा उल्लेख यामध्ये नाही म्हणून अनेकांनी येथे टीका केली. माझ्या माहिती प्रमाणे किंवा अंदाजाप्रमाणे झोपडपट्टीचा विषय यांनी यामध्ये मुद्दाम टाळला आहे कारण झोपडपट्टीविषयी निर्णय घेताना तुमच्या पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी राज्यपालांना देखील टाळले. 50 वर्षांच्या इतिहासामध्ये असे कधी घडले नव्हते. आपली पक्षीय लोकशाही असताना प्रत्येक पक्षाच्या अध्यक्षांना निर्विवादपणे फार मोठा मान आणि अधिकार देखील आहेत आणि त्यांना केव्हाही काही निर्णय बदलावयाचे असतील तर ते बदलू शकतात. पण ते केव्हा ? तर निर्णय प्रक्रिया चालू असताना. येथे काय घडले आहे ? या दोन्ही सभागृहांनी विचारपूर्वक घेतलेला निर्णय, राज्यपालांनी त्यावर विचारपूर्वक शिक्कामोर्तब केले होते आणि त्यावर पंतप्रधानांनी देखील आपला संदेश विचारपूर्वकच दिलेला होता. म्हणजे पंतप्रधान जे ठरवितात, दोन सभागृहे जे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवलकर ....

ठरवितात, निर्णय घेतात आणि त्याची अमलबजावणी सुरू झाल्यावर कोणी तरी पाच झोपडीदादा तेथे जातात, मॅडमना भेटतात आणि मॅडम तुम्हाला टेलिफोन करून सांगतात. म्हणजे निर्णय प्रक्रिया सुरू झाल्यानंतर नाही तर निर्णय प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यवाहीची प्रक्रिया सुरू झाली होती, कामाला सुरूवात झाली होती., त्यानंतरही ते काम थांबविले जाते. हे बरोबर नाही. मग कशासाठी पाहिजेत ही सभागृहे ? येथे घेतलेले निर्णय, खाली घेतलेले निर्णय, राज्यपाल-पंतप्रधानांनी घेतलले निर्णय, सोनिया गांधी एक मिनिटामध्ये, कोणताही विचार न करता थांबविणार असतील तर मग आम्हाला येथे बोलावूच नका. अध्यक्ष महाराज, ही दोन्ही सभागृहे बरखास्त करून टाका. अशा प्रकारची सुप्रीम ॲथॉरिटी या लोकशाही मध्ये चालणार नाही. मी याला हिटलरशाही म्हणणार नाही पण नेमके सोनिया गांधींनी तरी यामध्ये दुसरे काय केले आहे ? तुमचे जे पाच झोपडी दादा तेथे गेले होते त्यांनी नेमके त्यांना सांगितले तरी काय हे माहीत नाही पण कोठे तरी तुमच्यामध्ये आणि सोनिया गांधींमध्ये गॅप राहिली आहे आणि तेथून संदेश आला. हा प्रकार देखील थांबविला पाहिजे. या सभागृहामध्ये घेतलेले निर्णय, त्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर ती रोखण्याचे अधिकार हे केवळ राज्यपालांना आणि राष्ट्रपतींनाच आहे. अन्य कोणीही तो निर्णय थांबवू शकत नाही, त्या निर्णयाची अमलबजावणी थांबवू शकत नाही. पण हे घडले आहे, गेल्या 50 वर्षामध्ये जे कधी घडले नव्हते ते घडले आहे. अध्यक्ष महाराज, मला सोनिया गांधीं विषयी आदर आहे. मला त्यांच्याविषयी जास्त काही बोलावयाचे नाही. पण त्यांनी हा घेतलेला निर्णय म्हणजे लोकशाहीच्या पाठीत खुपसलेला सुरा होता. त्यामुळे दोन्ही सभागृहांचे महत्त्व निघून गेलेले आहे याची देखील सरकारने गंभीर दखल घेतली पाहिजे असे मला वाटते. ...

(यानंतर श्री. जागडे .... 4एस 1 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर...

सभापती महोदय, तिसरा विषय हा या शहरातील व्यभिचाराचा आहे. पेपरमध्ये रोजी 26 नंबर येत असतात. त्या नंबरावर तुम्ही फोन केला तर तुम्हाला भेटावयाला एक मुलगी तुमच्या घरी येते. आणि ही मुलगी आपल्याला सांगते की, एक हजार रुपये तुम्ही मला द्या. मी तुम्हाला 11 नंबर देते. आता ते नंबर मी काही देत नाही. कारण बरेच लोक असे म्हणतात की, नवलकर नंबर देतात, म्हणून आर.आर.पाटील यांच्यासारखी माणसे धावत येतात. काही लोक असेही म्हणतात की, नवलकर उभे राहिले असता पत्ते आणि नंबर देतात, म्हणून अनेक माणसे धावत येत असतात. परंतु या ठिकाणी मी नबर देणार नाही, तसेच पत्तेही देणार नाही. मला या ठिकाणी असे सांगावयाचे आहे की, माझ्याकडे 16 ते 17 नंबर आहेत. ते मी आपणाकडे देईन. आता मी मघाशी सांगितलेल्या नंबर फोन केल्यानंतर एक मुलगी तुमच्या घरी येते आणि असे सांगते की, आपण मला एक हजार रुपये द्या मी आपणाला आणखी 11 नंबर देते. हे सर्व मोबाईल नंबर आहेत. म्हणून मी मुद्दामहून एका नंबरावर फोन केला. तिने मला असे सांगितले की, मी आता आपणाकडे येऊ का ? म्हणजे मॅकडोनाल्डसारखी घर डिलव्हरी सुरु झाली आहे. तेव्हा तिने मला असे सांगितले की, तुम्ही काही माझ्याकडे येऊ नका. मी विलेपार्ले येथील दिनानाथ मंगेशकर थिएटरच्या दारात उभी राहते, तेथे तुम्ही या. ती कोणता पोषाख करणार आहे, हे तिने मला सांगितले आणि मला विचारले की, तुमच्या गाडीचा नंबर काय आहे ? त्यावेळी मी विचार केला की, पुढे जावे आणि काय होते ते पाहू या. त्यानंतर मी तिला विचारले की, आपण जायचे कोठे ? तिने मला सांगितले की, मालाड येथे माझ्या बहिणीची जागा आहे, परंतु येताना मात्र पाच हजार रुपये घेऊन या. आता ही अपवादत्मक परिस्थिती नाही. मी अनेक नंबर आपल्याला देवू शकेन. ते सर्व नंबर मी आपणाला देईन. आपण या नंबरावर फोन केल्यास आपण त्या त्या ठिकाणी जाऊ शकाल. आपण असे पाहाल की, चांगल्या चांगल्या घरातील लोक या धद्यात आहेत. मी या ठिकाणी आपणाला नांवे सांगितली तर ती अतिशय धक्कादायक आहे. हा विषय काही येथेच संपणारा नाही. आपण खाजगीत या विषयावर चर्चा करु. आपण मला परवानगी दिल्यास मी आपणा बरोबर एक दिवस बसेन. ज्याप्रमाणे माझ्याबरोबर अंतुले जसे फिरले, तसाच मी तुमच्याबरोबरही जरुन फिरेन. आपला हेतू काही वाईट नाही. तुम्ही माझ्याबरोबर आलात तर काही बिघडणार नाही. एवढी खात्री मी आपणाला देवू शकतो. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्याद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या भाषणात महाराष्ट्राची कशी दैदिप्यमान प्रगती झाली आहे, या बाबतचा उल्लेख आहे. निर्यात वाढीचा दर हा पूर्वीच्या वर्षापेक्षा या वर्षी 63 टक्क्याने वाढला असेही नमूद करण्यात आले आहे. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन विकास संस्थेच्या जागतिकता स्पर्धात्मकता अहवालामध्ये राज्याला मानाचा दर्जा आलेला आहे, असाही उल्लेख करण्यात आला आहे. शासनाने महाराष्ट्रातील औद्योगिक शहरांना ज्या सोई-सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत, याचा जर आपण विचार केला तर मला काही गोष्टी खेदाने नमूद करावयाच्या आहेत. ग्रामीण भागात एक म्हण आहे ती मी सांगणार आहे. ती म्हण या लोकशाही आघाडीला सरकारला बरोबर लागू पडते. ती म्हण अशी आहे की, " चट्टीपट्टीचा बोभाटा आणि झिपरी मारी झपाटा. " या सरकारचे काम थोडेच आहे, परंतु भ्रष्टाचाराचा राक्षस मात्र मोठा आहे. त्याची मी अनेक उदाहरणे या ठिकाणी देवू शकेन. चट्टीपट्टीचा बोभाटा आपण किती केला आहे हे मी दाखवून देईन. आणि प्रत्यक्षात धनदांडग्यानीच याचा झपाटा मारला आहे. पुणे, कोल्हापूर, सोलापूर, ठाणे, नाशिक, औरंगाबाद या शहराकडे जाणा-या मोठ्या रस्त्यांच्या सुधारणांकडे शिवशाही सरकारने अग्रक्रमाने लक्ष दिले होते. आता मात्र सामान्य नागरिकांना प्रदुषणाला सामोरे जावे लागत आहे. शासनाकडे याकडे पूर्णपणाने दुर्लक्ष झालेले आहे. नागपूर अधिवेशन संपले त्यावेळी आम्ही एक विषारी घोषणा ऐकली होती. महाराष्ट्रात देशी दारुची दुकाने वाढविली जाणार आहेत. त्यामुळे हातभट्टीच्या दारुवर नियंत्रण येणार आहे. आता ही घोषणा झाल्याबरोबर काही दुर्देवी घटना घडल्या. मुंबईमध्ये हातभट्टीची दारु पिऊन अनेक लोक मरण पावले आहेत. म्हणजेच यमदूताशी समझौता झाला होता काय ? असे वाटण्याची पाळी आली आहे.

(यानंतर श्री. सरफरे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

आणि आम्ही अशा काही मान्यवरांकडून ऐकले आहे की,देशी दारुचे परवाने वाढविले जाणार आहेत. त्यामध्ये विधवा, परित्यक्ता स्त्रीयांना प्राधान्य दिले जाणार आहे. त्याबाबत माननीय गृहमंत्र्यांनी काही घोषणा केलेली आहे. आज दुर्दैवाने म्हटले पाहिजे की, एका बाजूला आपण महात्मा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतो. आणि दुसरीकडे मिथेनॉल सर्वत्र मिळत असल्यामुळे हातभट्टीमध्ये त्याचा जास्तीत जास्त उपयोग केला जात आहे. हे मिथेनाईल जोपर्यंत आपणास मिळत आहे, तोपर्यंत देशी दारु व हात भट्टी यामध्ये हातभट्टी सातत्याने लोकांना स्वस्त मिळणार आहे. आणि अशा वेळी आपण कितीही म्हटले तरी दारुवर नियंत्रण आणणे शक्य होणार नाही. प्रत्यक्षात देशी दारुची दुकाने चालू आणि हातभट्टीही चालू आहे. अशा वेळी नशाबंदी विभाग काय जागृती करीत आहे? धाडीची बातमी अगोदरच धंदेवाल्यांपर्यंत कशी पोहोचते? या संदर्भात प्रत्यक्षात कोणतेही उत्तर मिळत नाही. या उलट विदेशी दारुच्या बाटल्यांमध्ये भेसळ करुन कोटयावधी रुपयांचा नफा कमाविणारे भक्षक नवी मुंबई परिसरात वावरत आहेत हे चित्र स्पष्ट आहे. एका बाजूला शारिरीक आरोग्याची धुळधाण होत असतांना पुणे शहराच्या वाहन व्यवस्थेकडे मी आपले लक्ष वेधते. पुण्यामध्ये, पिंपरी चिंचवड भागात वहातुकीची कोंडी होत असून रोज एका विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीचा पी.एम.टी. च्या बसचा धक्का लागून मृत्यू होण्याची घटना गेले अनेक महिने घडत आहे. वहातुकीचे नियोजन नसल्यामुळे पी.एम.टी. ला पब्लिक मर्डर ट्रान्सपोर्ट असे पुणेकर नागरिकांनी नाव दिले आहे. गाडया जुन्या झाल्या आहेत, ब्रेक फेल होत आहे, बॅटरी डाऊन होणे, चाक निखळणे यामुळे रोज किमान एक अपघात होत आहे. अशा अनेक मानवी चुकांबरोबर, दुरुस्त्यांबरोबर, दुर्व्यवस्थेबरोबर ज्येष्ठ नागरीक, लहान मुले यांना वाहनांनी धक्का दिल्यामुळे जीव गमाविल्याची उदाहरणे अनेक घडत आहेत. पुण्यातील वहातुकीच्या सोयीसाठी शासनाने दाईच्या मायेने नाहीतर आईच्या मायेने भूमिका स्वीकारुन लॉंग टर्म उपाययोजना स्वीकारणे आवश्यक आहे. दै. सकाळने याबाबत सातत्याने पुढाकार करुन तज्ज्ञांच्या सूचना वारंवार शासनाकडे दिल्या आहेत. पुण्याच्या वहातुकीच्या नियंत्रणाच्या संदर्भात शासन आराखडा स्वीकारेल असे आम्हाला वाटले होते. परंतु तरीही आमच्या सिंहगड-कात्रज रस्त्यावर रस्ता 30 फूट रुंद आणि पूल 10 मीटरचा असे उदाहरण दै. लोकमतने 7 मार्च 2005 रोजी तपशीलवार देऊन देखील त्यामध्ये अजून बदल झालेला नाही. शेतीच्या जमिनी रस्तें विकास महामंडळाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

ताब्यात घेऊन एक वर्ष होऊन देखील नुकसान भरपाई दिलेली नाही. आणि अशावेळी रस्ते दुरुस्तीही नाही व प्रत्यक्षात शेतकऱ्यांनाही न्याय नाही. याबाबतीत शासनाने लक्ष दिले नाही. आपण वर्तमानपत्रातील बातम्यांबाबत खूप संवेदनशील आहोत असे शासनाचे म्हणणे असते. परंतु दै. महाराष्ट्र टाईम्स व दै. सामना यांनी वारंवार लक्षात आणून देखील पुणे शहरातील वहातुकीच्या संदर्भात कोणतेही धोरण आखण्यात आले नाही. गेल्या काही महिन्यात गरीब लोकांच्या झोपडयांना आगी लागून त्या जमीनदोस्त होणे, टिंबर मार्केटमधील अनेक दुकाने भक्ष्यस्थानी जाणे या घटना घडल्या आहेत. टेकडी विकासाचा प्रश्न असो किंवा शहर विकासाचा प्रश्न असो. परंतु वाढत्या शहरासाठी निर्णय घेण्याची क्षमता आपण दाखवत नाही. स्वत:च्या कामांबाबत मघाशी म्हटल्याप्रमाणे "चट्टीपट्टीचा बोभाटा, धनदांडग्यांना धपाटा" मारायची संधी पुणे शहरात भरपूर दिली आहे. काही मुद्दयाचा उल्लेख करीत असतांना नागपूरच्या अधिवेशनात 11 डिसेंबर 2003 रोजी पुरवणी मागण्यावंर बोलत असतांना मांढरदेवीच्या काळूबाई मंदिराच्या अव्यवस्थेचा उल्लेख केला होता. मी स्पष्टपणे मागणी केली होती की, पाथर्डी तालुक्यातील मोहता डोंगरावर असलेले देवीचे देवस्थान आणि मांढरदेवी काळूबाई या देवस्थानाच्या ठिकाणी वहातुकीची व्यवस्था चांगली झाली पाहिजे. काळूबाईला जाणारे अनेक भक्त माझ्या परिचयाचे आहेत. हडपसर परिसरात माझा 7 वर्षे दवाखाना होता. अतिशय अंधश्रध्दा असलेल्या, नाडल्या गेलेल्या समाजातील स्त्रीया त्याठिकाणी जातात. म्हणून पुरवणी मागण्यावर बोलतांना उल्लेख केला होता की, गडावर जाणारा रस्ता आपण सुधारला पाहिजे. मला खेद वाटतो की, आमच्यापैकी कुणीही सूचना केली तरी त्याची गांभीर्याने नोंद न घेण्याची संवय शासनाला झाली आहे. काही लोकांच्या मागण्यांची दखल घ्यायची आणि बाकीच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीतरी त्याबाबत बेफिकिरी ठेवायची. सत्ता व प्रसिध्दीच्या सूत्राच्या जोरावर अनुल्लेखाने मारायचे. आज मी सातत्याने सर्वत्र चर्चा ऐकते की, नारळ फोडल्यामुळे झ ालेल्या घसरंडीवरुन पाय घसरुन बायका त्याठिकाणी एकमेकावर पडून मेल्या. प्रश्न असा आहे की श्रध्देचे व्यवस्थापन करण्याची पालक म्हणून शासनाची जबाबदारी आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे एक अतिशय भीषण नरसंहार मांढरादेवीला झाला त्याबद्दल आम्ही कोणती भूमिका घेणार आहोत. पर्यटन विभाग, श्रध्देचे व्यवस्थापन याबद्दल आम्ही काय व्यवस्थापन करणार आहोत याचा कुठेही उल्लेख आम्हाला माननीय राज्यपालांच्या अभिभाषणमध्ये दिसला नाही. म्हणून कसले व्यवस्थापन, कसला विकास आणि कसले प्रबोधन याबद्दल कोणतीही उत्तरे न देता केवळ आपण यासंदर्भात अवडंबर माजवित आहोत असे देखील मला सातत्याने चित्र दिसत आहे. म्हणून पुणे शहराच्या विकासाचा प्रश्न असेल, देशी दारुच्या दुकानांच्या परवानग्या वाढविण्याचा प्रश्न असेल किंवा भाविकांच्या संदर्भातल्या व्यवस्थापनाचा प्रश्न असेल या सगळयांबद्दल एक अनास्थेची भूमिका माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामधून दिसत आहे. म्हणून मी त्यांच्या अभिभाषणाबद्दल असमाधान व्यक्त करते, खेद व्यक्त करते आणि माझे दोन शब्द संपविते. जय भीम जय महाराष्ट्र.

. . . .4 यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, याठिकाणी महनीय राज्यपाल यांच्या भाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी मांडलेला आहे. त्यावर माझे विचार करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या अभिभाषणातील परिच्छेद 6 मध्ये म्हटलेले आहे की,"देशाचे आर्थिक शक्तीकेंद्र असलेले मुंबई शहर हे, महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाची गती वाढविणारे आणि मुंबईच्या रहिवाशांना अधिक चांगले राहणीमान देणारे असे जागतिक दर्जाचे शहर बनविण्याचा आपला निर्धार आहे." आज या मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटी 19 लाख आहे. सभागृहामध्ये मुंबईतील झोपडपट्टी असेल किंवा मोफत घरांचा मुद्दा असेल, त्याबाबतीत चर्चा करीत असताना असा उल्लेख केला जातो की, युती शासन आणि माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या बाबतीत उल्लेख केला जातो की, त्यांनी मोफत घराच्या बाबतीत घोषणा केली, त्यामुळे मुंबईत झोपडपट्टया वाढल्या. मी शासनाच्या हे लक्षात आणून देतो की, 1961 मध्ये येथील लोकसंख्या 39 लाख होती. 1971 मध्ये 69 लाख होती, 1981 मध्ये 82 लाख झाली, 1991 मध्ये 99 लाख झाली आणि 2001 मध्ये 1 कोटी 19 लाख आणि आज ही लोकसंख्या 1 कोटी 27 लाख झालेली आहे. मुंबई शहरामध्ये लोकसंख्या वाढली, ज्यावेळी 1971 मध्ये काँग्रेसने निवडणुकीमध्ये 1970 च्या पूर्वीच्या झोपडयांना मान्यता देऊ असे आपल्या घोषणापत्रात जाहीर केले होते, आम्ही जाहीर केले नव्हते. 1971 ते 1981 पर्यंत मुंबई शहरात 22 लाख लोकसंख्याझाली. त्यामुळे 1960 ते 1971 मध्ये ही लोकसंख्या 18 लाखांनी वाढली. 1981 ते 1991 या काळात 16 लाख 82 हजारांनी वाढली आणि 1995 ते 1999 या काळात केवळ साडेतीन लाख लोकसंख्या वाढली. तेव्हा आमच्या मोफत घराच्या योजनेच्या आकर्षणामुळे या शहरात लोकसंख्या वाढलेली नाही हे दिसून येईल. मुंबई शहराचे शांघाय करुन येथील लोकांना चांगले जनजीवन उपलब्ध करुन देऊ असे सांगण्यात आले आहे. टाटा संस्थेच्या पाहणीमध्ये मुंबई शहरात 11 लाख लोक सकाळ,संध्याकाळ रस्त्यावर शौचास बसतात. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी अतिशय मार्मिक उल्लेख केला की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये झोपडपट्टीबद्दल काहीही उल्लेख नाही. 1995 पूर्वीची जी अनधिकृत बांधकामे आहेत, मी झोपडपट्टया म्हणत नाही. पण प्रत्येक झोपडपट्टी ही काँग्रेसच्या धोरणामुळे वाढलेली आहे. 1980 साली आणि त्यापूर्वी स्व.रजनी पटेल यांनी मुंबई शहरातील झोपडपट्टयांना मान्यता द्यावी अशा प्रकारचे आदेश त्यावेळचे मुंबई महानगरपालिकेचे महापौर श्री.

. . . .4 यु-3

श्री.मधुकर चव्हाण . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुरली देवरा यांना दिले होते आणि त्यावर या सदनामध्ये मोठे रणकंदन माजले होते. मुंबईत अनधिकृत झोपडपट्टया आहेत. शामाप्रसाद मुखर्जी झोपडपट्टी किंवा काँग्रेस पक्षाच्या नेत्यांच्या नावाने झोपडपट्टया आहेत. जसे संजय गांधी झोपडपट्टी, इंदिरा गांधी झोपडपट्टी, कामराज इ ोपडपट्टी इ. माननीय राज्यपाल असे म्हणतात की, मुंबईच्या रहिवाशांना अधिक चांगले राहणीमान देणारे असे जागतिक दर्जाचे शहर बनविण्याचा आपला निर्धार आहे. पण चांगले राहणीमान कसे देणार आहात ? मुंबई शहरात दररोज प्रतिमाणशी सरासरी 230 लि.पाण्याची आवश्यकता आहे आणि मुंबईला दोन वर्षापूर्वी दररोज प्रतिमाणशी 135 लि.पाणी मिळत होते आणि आज केवळ 90 लिटर पाणी मिळत आहे आणि मुंबईच्या हायड्रोलीक इंजिनिअर यांनी निवेदन केले आहे की, एक-दीड वर्षामध्ये मुंबईला प्रतिदिनी, प्रति माणशी केवळ 35 लि.पाणी मिळेल. साधारणपणे आंधोळीसाठी 50 लि., स्वयंपाकासाठी 50 लि आणि कपडे धुण्यासाठी 50 लि.पाण्याची आवश्यकता असते. आता 2000 पर्यंतच्या झोपडपट्टयांना मान्यता द्यावी असे सांगत असताना, अशा परिस्थिती येथील लोकांना कोणत्या सुविधा देणार आहात ? चांगले रस्ते देणार आहात ? पाणी देणार आहात ? चालण्यासाठी पदपथ देणार आहात ?

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

या मुंबई शहराच्या वाहतुकीची वाट लागणार आहे. 50 ते 52 फ्लायओव्हर ब्रिज आहेत, पण मुंबई शहरात जे नाके आहेत, बॉटलनेक करणारी जी ठिकाणी आहेत, तेथे तुम्ही गेलात, तर मग ते घाटकोपर असेल, सायन असेल, दादर सर्कल असेल, लालबाग असेल, जे.जे.चा फ्लायओव्हर ब्रिज उतरल्यानंतर खाली बोरीबंदरपासून जे.जे.च्या फ्लायओव्हर ब्रिजपर्यंत गाडयांचा ताफा उभा असतो. जोपर्यंत अतिशय कठोरपणे राजकीय अभिनिवेश न आणता याबाबतचा निर्णय घेतला जात नाही तोपर्यंत या मुंबई शहरातील लोंढे आपण थांबवू शकत नाही. त्याशिवाय माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात म्हटल्याप्रमाणे, या मुंबई शहरात आपण चांगले नागरीजीवन देऊ शकणार नाही. सभापती महोदय, मुंबई शहरात महानगरनियमनच्या 37(1) या कायद्याप्रमाणे मुंबई शहरातले अनेक भूखंड सार्वजनिक हिताच्या नावाखाली बिल्डरच्या घशात घतलेले आहेत. मुंबई शहरात दोन प्रकारची लोकसंख्या वाढलेली आहे. एक अन्य भारतातून येणारे लोंढे आणि दुसरे या बिल्डर्सनी ज्या गगनचुंबी इमारती उभ्या केलेल्या आहेत, त्या इमारतीमध्ये मुंबई आणि महाराष्ट्राच्या बाहेरचा जो दोन नंबरचा पैसा आहे. जो भ्रष्टाचाराने मिळविलेला पैसा आहे, तो या गगनचुंबी इमारतीमध्ये त्यांनी वेगवेगळे फ्लॅट्स खरेदी करुन इन्व्हेस्ट करुन ठेवलेला आहे. असे म्हणतात की, मुंबई शहरामध्ये सुमारे चार ते साडेचार लाख फ्लॅट्स हे रिकामे आहेत, केवळ टाळे लावून ठेवलेले आहेत. ज्याला आपण काळया पैशाची इन्व्हेस्टमेंट म्हणतो. आणि माननीय राज्यपाल म्हणतात मुंबई शहराला आम्ही चांगले जीवनमान देणार आहोत. कशा प्रकारे हे चांगले जीवनमान मुंबई शहरात देणार आहात? गेल्या दोन महिन्यामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या इंप्रुव्हमेंट कमिटीमध्ये मुंबईच्या सुधार समितीमध्ये शासनाने आदेश देऊन जे अनिवासी पट्टयाचे भूखंड होते, जे मनोरंजनासाठीचे भूखंड होते, जे गार्डनसाठी भूखंड होते, जे खेळाच्या मैदानासाठी भूखंड होते, जे रस्ता रुंदीकरणासाठी भूखंड होते, जे रुग्णालयासाठी भूखंड होते आणि जे वेगवेगळया विकासाच्या कामासाठी भूखंड ठेवलेले होते ते जवळ जवळ 67 भूखंड वेगवेगळया कारणासाठी बिल्डर्सना देण्यात आलेले आहेत. त्यामुळे आता तेथे इमारती होणार. तेथे माणसे येणार आणि तेथे त्यांना नगरीसुविधा द्याव्या लागणार. त्यामुळे मुंबई शहरातील गरीब माणूस आहे, जो चाळीत राहणारा आहे, जो मध्यमवर्गीय आहे, जो वनरुम किचनमध्ये राहणारा आहे, त्याला दोनतास सुध्दा पाणी मिळत नाही. परंतु मुंबई शहरात काळया पैशाच्या माध्यमातून वेगवेगळया गगनचुंबी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण..

इमारतीमध्ये ज्यांनी मोठे-मोठे फ्लॅटस घेतलेले आहेत त्यांना बाथरुममध्ये पाणी, टबबाथरुममध्ये पाणी मिळते. त्यांना पाण्याची कुठल्याही प्रकारची कमतरता भासत नाही. आज या मुंबई शहरात अतिशय चांगले काम शासनाने घेतले होते. श्रीमती मेधा पाटकर यांच्या बद्दल आम्हाला अतिशय आदर आहे. स्वत:च्या घरामध्ये घेणार नाहीत. चर्चेवर चर्चा करतील की गरिबाला झोपडपट्टी बांधायला मिळाली पाहिजे, गरिबांचे घर तोडू नका, परंतु एक उदाहरण देतो. मुंबई महानगरपालिकेमध्ये 117 प्रकरणे अशी आहेत की, मुंबई महाहनगरपालिकेच्या कर्मचा-यांनी पै-पै जमवून आपली को-ऑपरेटिव्ह सोसायटी काढून त्या ठिकाणी आपले घर बांधू या उद्देशाने भूखंड घेतलेले आहेत. हे सगळे भूखंड या अनधिकृत झोपडपटयांनी व्यापलेले आहेत आणि आम्ही त्या जमिनी त्या सोसायटयांना देणार नाही असे सांगितले जाते. मुंबई शहराला चांगली रेल्वेलाईन देणार असे शासनाने सांगितले. त्यासाठी रेल्वे ट्रॅक वाढविले पाहिजेत. झोपडपट्टी ज्या रेल्वे लाईनवर आहेत त्या सुध्दा शासन उठवायला तयार नाही. श्रीमती मेधा पाटकरना सवंग लोकप्रियता मिळवायला आंदोलन करायला फारमोठे डोके लागत नाही. या मुंबई शहरात अतिशय चांगल्या प्रकारचे धोरण शासनाने स्वीकारले होते. काय झाले मला माहीत नाही. त्यांनी बरोबर उल्लेख केला आहे. 1995 पूर्वीच्या बांधकामाला मान्यता द्यावी अशा प्रकारचा जर कायदा या सभागृहामध्ये केलेला आहे तर त्या ठिकाणी दुसरा कायदा करावयाचा असेल, पहिल्या कायद्याला स्टे द्यावयाचा असेल तर सभागृहामध्ये यावे लागते. मुंबईमध्ये महानगरपालिकेच्या किंवा कुठल्याही हद्दीमध्ये या राज्याचे मुख्यमंत्री अतिशय कठोर निर्णय जाहीर करतात.आणि त्यांना कुणीतरी कॉन्ग्रेसच्या कार्यकर्त्यांनी घेराव घातल्यानंतर मार्गारेट अल्वा सांगतात हा चुकीचा निर्णय आहे. टिळक भवनमध्ये या राज्याचे निर्णय जाहिर केले जातात की, उद्या स्टे मिळेल. मार्गारेट अल्वांना स्टे देण्याचा अधिकार कोणी दिला? मी मुख्यमंत्र्यांना विनंती करील असे त्या सांगू शकतात. पण मी उद्यापासून स्टे देईन असे त्या सांगतात, हे काय राज्य चाललेले आहे? म्हणजे पक्षाचा नेता आणि त्या पक्षाचा सरकारमध्ये असलेला नेता यांच्यामध्ये या मुंबई शहराच्या विकासासंबंधी जर एकमत नेसल तर आम्ही कुठल्या गोष्टी या ठिकाणी करणार आहोत. गिरणीच्या जमिनीसंबंधी येथे असा प्रस्ताव आला होता, त्यावर माननीय मंत्रिमहोदयांनी अतिशय "चुकीचे" उत्तर दिले हा शब्द असंसदीय असेल तर "योग्य" उत्तर दिलेले नाही असे मी म्हणेन.

यानंतर श्री. बरवड..

अशुद्धीत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

त्यांनी सांगितले की, कायद्यामध्ये तरतूदच नाही. तेवढयात आपण निर्णय दिला आणि ती चर्चा संपली. आम्ही आपला निर्णय मान्य केला. मुंबई महापालिकेला आणि म्हाडाला जमीन देण्याची कायद्यात तरतूद नाही असे त्यांनी सांगितले. केवळ मातुल्य मिल सोडून मुंबईतील इतर गिरणी मालकांनी नियम 58 प्रमाणे एक इंच सुध्दा जमीन शासनाला, महापालिकेला दिलेली नाही. अतिशय चुकीचे आणि दिशाभूल करणारे उत्तर काल या ठिकाणी देऊन आमचे तोंड बंद करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या मिलच्या जागेवर ज्या चाळी आहेत त्यामध्ये दिग्विजय मिल, इंडिया युनायटेड मिल आणि कुलाब्याची एक मिल सोडली तर मुंबईतील 60 ते 65 गिरण्यांपैकी कोणत्याही मिल मालकांनी कामगारांसाठी 225 चौरस फुटाची घरे बांधलेली नाहीत. टाटा आणि दोन तीन लोक सोडले तर कोठेच काही झालेले नाही. या मुंबई शहरामध्ये अतिशय चांगल्या प्रकारचे जीवन देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत असे सांगितले जाते. या अभिभाषणामध्ये असे म्हटले आहे की, "पाणी आणि स्वच्छता हा मुंबईमधील आपला एक अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न असल्यामुळे मध्य वैतरणा प्रकल्प आणि मुंबई मलनिस्सारण प्रकल्प यांच्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने जागतिक बँकेकडे जे सहाय्य मागितले, त्याची शिफारस माझ्या शासनाने केली आहे." हे केले म्हणजे काही उपकार केले काय ? नियम असा आहे की, एखाद्या महापालिकेला किंवा राज्य शासनाला जागतिक बँकेकडे कर्ज मागता येत नाही. पण मुंबई महापालिकेला जागतिक बँकेने रस्ता रुंदीकरण तसेच इतर कामांसाठी पैसे दिले. मुंबईमध्ये जे अतिशय शुध्द पाणी येते ते भांडूप कॉम्प्लेक्स मधून येते. तिथून मुंबई शहराला अतिशय चांगल्या प्रकारे पाणी मिळते. सुमारे दीड हजार कोटी रुपये जागतिक बँकेने आतापर्यन्त दिलेले आहेत. त्यातील 350 ते 400 कोटी रुपये शासनाने आपल्याकडे ठेवलेले आहेत. जागतिक बँकेने जी रक्कम दिलेली असते त्यातील 4 टक्के रक्कम राज्यासाठी किंवा राज्याच्या शहरांच्या विकासासाठी ठेवण्याची परवानगी रिझर्व बँक राज्याला देते. 1971 पासून आजपर्यन्त जागतिक बँकेने मुंबई महापालिकेला पाणी पुरवठयासाठी, रस्त्याच्या सिमेंटीकरणासाठी, मलनिस्सारणासाठी, कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी जे कर्ज दिले त्यातील सगळे पैसे दिलेले नाहीत. या ठिकाणी केंद्राचा आदेश येतो. आपण श्रीमती सोनिया गांधी यांचे आदेश पाळता. काँग्रेसचे 1980 पासूनच्या प्रत्येक निवडणुकांचे मॅनिफॅस्टो माझ्याकडे आहेत. काँग्रेसने लोकांची मते मिळविण्यासाठी लोकांना सांगितले की, तुम्ही आम्हाला मते द्या, आम्ही सन

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. मधुकर चव्हाण .....

2000 सालापर्यन्तच्या झोपड्यांना मान्यता देऊ. आम्ही कोणीही असे आश्वासन दिलेले नाही. उलट आम्ही त्या ठिकाणी आमचे नगरसेवक किंवा आमदार निवडून येतील की नाही याची पर्वा केली नाही. मी अतिशय अभिमानाने सांगू शकतो. एक अतिशय मर्द आणि सिंह दिलाचा माणूस आहे, ज्याने सांगितले की, मला मतांची गरज आहे हे मान्य आहे पण 1995 नंतरच्या झोपड्यांना मान्यता देऊ नये. त्यांचे नाव आहे श्री. बाळासाहेब ठाकरे. त्यांनी अतिशय स्पष्टपणे सांगितले. मिडियाने त्यांना अनेक प्रकारे विचारण्याचा प्रयत्न केला. तुम्ही आमची टिंगल काय करता ? आम्ही सुखथनकर समितीच्या अहवालाची अंमलबजावणी केली. तुमच्या काळात दिघे समिती झाली. प्रेमानंद आवळे समिती झाली. केरकर समिती झाली. ज्यांना मंत्रिपदे दिली नाहीत त्यांना तुम्ही बिनकामाच्या कमिटया दिल्या. त्यांचे सर्व अहवाल धूळ खात पडलेले आहेत. माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार सुखथनकर कमिटी स्थापन झाली. सुखथनकर समितीच्या 80 टक्के शिफारशींची अंमलबजावणी केली. 2.5 एफएसआय दिला. 225 चौ.फुटाच्या जागा दिल्या. आम्ही 27 हजार घरे बांधली. मी मुंबई इमारत दुरुस्ती मंडळाचा सभापती होतो. आम्ही 27 हजार घरे बांधली आणि त्या घरांचे वाटप केलेले आहे. हार्बर ब्रांचवर वेगळी ट्रॅक बांधण्यासाठी तीन महिन्यामध्ये झोपडया हलविल्या होत्या. एक मानवतावादी पत्रकार कोर्टात गेले आणि त्यांनी हायकोर्टाचा स्टे आणला. ज्यांचा महाराष्ट्राशी काही संबंध नाही अशा लोकांच्या 350 झोपडया शिवडी, कॉटनग्रीन ते मानखूर्दपर्यन्तच्या भागामध्ये होत्या. फुकटका चंदन... अशा प्रकारची एक म्हण आहे. शेवटी कोर्टाच्या आदेशानुसार त्या सगळया लोकांना आम्ही श्री. बी.जी.शिर्के यांच्या माध्यमातून मानखूर्द येथे बांधलेली घरे दिली. त्यातील एकही माणूस त्या ठिकाणी राहात नाही. सात आठ महिन्यानंतर त्या लोकांनी तीन लाख रुपये, 4 लाख रुपये, 5 लाख रुपये अशा किंमतीला त्या जागा विकल्या. ठाण्याला जाताना नवी मुंबईकडे डाव्या बाजूला खाडी आहे त्या ठिकाणी विकासासाठी भराव घालून जमीन तयार केली होती त्या ठिकाणी हे सगळे लोक पुन्हा झोपडया बांधण्यासाठी गेले. श्रीमती सोनिया गांधी यांनी सांगितले त्यामुळे 2000 सालापर्यन्तच्या झोपडयांना मान्यता देतो. आम्हाला एवढे कोटी रुपये द्या. पाणी पुरवठयाची योजना नाही. पाईप लाईन्स जुन्या झालेल्या आहेत. मलनिस्सारणाची व्यवस्था जुनी झालेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

चालण्यासाठी पदपथ नाही याउलट जे नागरिक आपल्या पगारातून प्रामाणिकपणे आपले जीवन जगून नियमांचे पालन करीत असतान, जे आयकर भरतात, व्यवसाय कर भरतात, मालमत्ता कर भरतात, पाणीपट्टी देतात, शिक्षण कर भरतात त्यांना कोणत्याही सुविधा दिल्या जात नाही. परंतु जे कोणतेही नियम पाळत नाहीत, ते लोक मुंबईमध्ये येतात कोठेही घरे बांधतात, मग तेथे तुमचेच कॉंग्रेसवाले जाऊन यमराज नगर, कामराज नगर, संजय गांधी नगर, राजीव गांधी नगर, अशाप्रकारची नावे देतात, सुदैवाने मुंबईत अजून शरद पवार नगर आले नाही हे आमचे नशीब आहे. या मुंबई शहराचा कशाप्रकारे विकास करणार आहात ? राज्यपालांचे अभिभाषण हा जर एक सोपस्कार असेल तर तो सोपस्कार ब्रिटिशांच्या काळापासून चालत आला आहे की, गव्हर्नर जनरलने भाषण केले पाहिजे. व्हाइसरॉय भाषण करीत असत ही त्यांची परंपरा चालत आहे. इंग्लंडाची राणी तुम्हाला हे देणार आहे, इंग्लंडची राणी हया सुविधा देणार आहे. मग आम्ही त्याठिकाणी राणीचा जयजयकार करीत असू. ही प्रथा मोडून काढावी. परंतु जे तुम्ही देणार आहात, जे तुम्ही केले आहे, त्या वास्तवाच्या आधारावर, जे तर्काच्या आधारावर आहे तेच द्या. आज कॉंग्रेसच्या धोरणामुळे मुंबईत नियमाने जगणा-या नागरिकांचे हाल कुत्रा खात नाही. आवो घर तुम्हारा, शासनाने मुंबईची धर्मशाळा करुन टाकली आहे. सत्तेचा मुकूट आईच्या पोटातून घेऊन कोणी जन्माला येत नाही. तो जनता देत असते. म्हणून राज्यकर्त्यांनी कठोर व्हावे लागते. गेली सत्ता तरी चालेल, त्याची पर्वा नाही, या मुंबई शहराची तुम्ही वाट लावून टाकणार आहात. तुम्ही कसले या मुंबई शहराला चांगले जीवन देत आहात ? म्हणून मी या अभिभाषणाबद्दल अभिनंदन करण्याऐवजी सखेद व्यक्त करतो. मला आपण बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानताना मी एकच मा.उपमुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, अनधिकृत बांधकामाचा राक्षस तुम्ही जाळला नाही तर आज मुंबई शहर ज्वालामुखीच्या तोंडावर उभे आहे हे मी सांगू इच्छितो. आज कोणीही गुन्हेगार कोठून तरी बाहेरगावरुन येतात चो-या, दरोडे पडतात, कोणत्या तरी म्हाता-या माणसाचा, पोराबाळांचा गळा दाबतात, पोलीस रेकॉर्डवर त्यांचे पंजे, बोटांचे ठसे नसतात, मिळणार नाहीत, कारण त्यांनी पलायन केलेले असते. परंतु आम्ही मात्र त्या वस्तीमध्ये त्यांच्या प्रेत

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..

यात्रा काढावयाच्या आणि शोकसभा घ्यावयाच्या. आज मुंबई शहरामध्ये गुन्हेगारी वाढण्याचे कारण ही अनधिकृत बांधकामे हे आहे, झोपडपट्टया आहेत. आज अनधिकृत बांधकामांबाबत राजकारणाच्या पलिकडे जाऊन बोलले पाहिजे. माझी शासनाला विनंती आहे की, मुंबईतील या अनधिकृत बांधकामांवर आणि वाढत्या लोंढयांवर कठोरपणे नियंत्रण ठेवले नाही तर ही माणसे रस्त्यावर येतील आणि अतिशय भयानक परिस्थिती येत्या एक-दोन वर्षात निर्माण होईल असे निदर्शनास आणून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन करण्याचा जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला अनुमोदन आणि समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. अर्थात अनुमोदन देत असताना आणि आभार मानित असताना वेळेअभावी सगळया गोष्टींचा परामर्श घेणे अवघड होईल. परंतु काही महत्वाच्या मुद्यांना स्पर्श करणे आवश्यक आहे असे मला वाटते. या अभिभाषणामध्ये सुरुवातीलाच तामिळनाडू आणि त्याच्या लगत असलेल्या पाँडेचेरी आणि अंदमान निकोबार येथे नैसर्गिक आपत्ती आली असताना महाराष्ट्र राज्याचे पथक लवकर पोहोचले याबाबतचा उल्लेख करण्यात आला आहे. मी यापूर्वीच्या घटनेचाही उल्लेख करु इच्छितो. शेजारच्या गुजराथ राज्यातील कच्छ आणि भूज परिसरामध्ये जो भूकंप झाला त्याही ठिकाणी आरोग्याची मदत पुरविण्यासाठी डॉक्टरांची टीम सर्व प्रथम पोहोचली होती. एवढेच नव्हे तर त्याठिकाणच्या काही गावांचे पुनर्वसन अतिशय उत्तम प्रकारे महाराष्ट्र शासनाने केले आहे. मला तेथे जाण्याची संधी मिळाली होती. मला आनंद होतो की, उत्तम घरांच्या वितरणाच्या समारंभाला मी उपस्थित होतो, उत्तम ग्राम सचिवालय, उत्तम शाळा आणि तेथे दवाखाना उभा केला आहे त्याला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव दिलेले आहे. त्याचप्रमाणे ओरिसाला जेव्हा सागरी वादळ झाले त्याठिकाणच्या गावांचे पुनर्वसन महाराष्ट्र शासनाने उत्तम प्रकारे केले आहे. त्याही ठिकाणी दवाखाना उभा केला आहे त्याला शिवाजी महाराजांचे नाव दिले आहे आणि तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभा करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाच्यावतीने घेतला आहे. पाँडिचेरीच्या संदर्भात शंका उपस्थित करण्यात आली आहे. मी अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो की, ओरिसा आणि गुजराथ या दोन्ही ठिकाणच्या पुनर्वसनाची कामे तुम्ही पाहिली तर आपल्या सगळयांच्या लक्षात येईल.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. उल्हास पवार पुढे सुरु...)

पाँडेचरीच्या संदर्भात जी जबाबदारी टाकलेली आहे ती सुध्दा महाराष्ट्र शासन उत्तम प्रकारे पार पाडल्या शिवाय राहाणार नाही. याठिकाणी मुंबईतील लोकसंख्या, घरांचा प्रश्न, आरोग्य तसेच पाण्याचा प्रश्न अशा अनेक बाबींचा उल्लेख झालेला आहे. त्या सर्व गोष्टींचा पुन्हा उल्लेख करुन मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, मुंबईचा आरोग्याचा प्रश्न असेल, पण्याचा प्रश्न असेल, शिक्षणाचा प्रश्न असेल, घरांचा प्रश्न असेल, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न असेल, वाहतुकीचा प्रश्न असेल, अपघात कमी करण्याचा प्रश्न असेल या सर्व प्रश्नांचा साकल्याने विचार करीत असताना मुंबईमध्ये वाढणा-या लोकसंख्येचा पूर्णपणे विचार केला पाहिजे. शेवटी मुंबईला तिन्ही बाजूंनी समुद्र आहे. म्हणून या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. याठिकाणी झोपडपट्टीचा उल्लेख करण्यात आला. 1995 पर्यन्तच्या झोपड्यांना आपण संरक्षण दिलेले आहे. त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करु असे सांगितलेले आहे. आता 2000 सालापर्यन्तच्या झोपड्यांचा उल्लेख होतोय. यासंदर्भात श्रीमती सोनिया गांधीचा उल्लेख झाला म्हणून मी नम्रपणे सांगू इच्छितो की, याबाबतीत श्रीमती सोनिया गांधींनी कोणताही आदेश दिलेला नाही किंवा कोणतेही स्टेटमेंट केलेले नाही. जेव्हा झोपड्या पाडण्याच्या संदर्भात प्रतिक्रिया उमटल्या त्यावेळी त्यांनी काही लोकांना बोलावले. त्यानंतर प्रदेश काँग्रेसच्या कार्यालयामध्ये मिटींग झाली. त्या मिटींगमध्ये प्रांताध्यक्षांनी आमचा जाहीरनामा दोन वेळा मोठ्याने वाचून दाखविला. त्यामध्ये 1995 पर्यन्तच्या झोपड्यांना पूर्ण संरक्षण आणि त्यांचे पुनर्वसन आणि 1995 ते 2000 पर्यन्तच्या झोपड्यांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल असे सांगितलेले आहे. सभापती महोदय, मुंबईचे प्रश्न सोडवायचे असतील तर झोपड्यांच्या बाबतीत कुठे तरी कालमर्यादा घातली पाहिजे. मुंबईमध्ये 65 हजार झोपड्या फूटपाथवर आहेत. खरे म्हणजे फूटपाथ हे पादचा-यांना चालण्यासाठी केलेले आहेत. झोपड्यांच्या संदर्भात सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सातत्याने निवेदने केलेली आहेत, त्याबद्दलच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. 1995 पर्यन्तच्या झोपड्यांना कायद्याने संरक्षण आहे. परंतु त्या पुढील झोपड्यांच्या बाबतीत विचार करताना या सभागृहामध्ये चर्चा करुन निर्णय घेतला पाहिजे. यासंदर्भात या सभागृहाने कायदा केलेला आहे. शेवटी काही प्रश्न असे असतात की, त्याबाबतीत सर्वांशी विचारविनिमय करुनच अंतिम टप्प्यापर्यनत यावयाचे असते.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. उल्हास पवार पुढे सुरु...)

सभापती महोदय, याठिकाणी रोजगार हमी योजनेचा देखील उल्लेख करण्यात आला. मा.सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी सांगितल्या प्रमाणे कोणतीही योजना वाईट आहे असे म्हणता कामा नये. मी तर असे म्हणेन की, ही योजना जर यापूर्वी बिहार आणि उत्तर प्रदेश सारख्या राज्यांमध्ये राबविली गेली असती तर आता जे लोंढेच्या लोंढे त्या राज्यांतून मुंबईमध्ये येत आहेत, ते कदाचित आले नसते. परंतु उशिरा का होईना देश पातळीवर रोजगार हमी योजनेचा स्वीकार झालेला आहे. युनोपर्यन्त या योजनेचा उल्लेख झालेला आहे. ही योजना देश पातळीवर लवकरात लवकर सुरु झाली तर मुंबईमध्ये येणा-या लोंढ्यांचे प्रमाण थांबेल. कुपोषणाच्या संदर्भात उल्लेख करण्यात आला. आरोग्याच्या संदर्भात आपण योजना केल्या. गर्भवती मातांकरिता ज्या सोयी केलेल्या आहेत त्याचाही उल्लेख याठिकाणी झालेला आहे. परंतु ज्या ज्या काही घटना घडतात, त्या घटनांचा त्यानंतर मागोवा घेतला जातो काय ? मी एका दवाखान्याला भेट दिली होती.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

त्या ठिकाणी एक सिव्हील सर्जन ऑन डयूटी दारु प्यायलेला होता. अनेक रुग्णालयातील डॉक्टर ऑन डयूटी दारु पिऊन झिंगलेल्या अवस्थेत होते. त्यासंबंधी शासनाने काही निवेदने केली, उत्तरे दिली. मी एवढेच या निमित्ताने स्मरण करुन देऊ इच्छितो की, त्या डॉक्टरांवर काही कारवाई झाली आहे काय ? स्वत: सिव्हील सर्जन ऑन डयूटी हॉस्पीटलमध्ये दारु पिऊन झिंगलेल्या अवस्थेत असतो, त्यास साधे उभे देखील रहाता येत नाही, अशा अवस्थेतील डॉक्टर कुपोषण झालेल्या बालकांवर, आदिवासी पाडयांवर कशी काय सेवा करणार असा मुद्दा सभागृहात उपस्थित झाला होता हे आजही मला आठवते. या संदर्भात शासनाने कडक कारवाई केली पाहिजे. आदिवासी पाडयांमध्ये आणि गरीबांच्या वाडयांमध्ये आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी म्हणून शासनाने डॉक्टरांना मोठया विश्वासाने तेथे पाठविले आहे. ती माणसे जर अशा प्रकारे सेवा बजावित असतील तर कुपोषणाचे प्रमाण हे वाढतच राहील. या निमित्ताने मी एक नम्रपणे सांगू इच्छितो की,माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात एका गोष्टीचा उल्लेख करण्यात आलेला नाही. त्या गोष्टीचा मी उल्लेख या ठिकाणी करणार आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कुटुंब नियोजनाचा उल्लेख करण्यात आलेला नाही. मी युवक कॉंग्रेसचा अध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. मला स्व.संजय गांधी यांची आठवण होते. 1975 साली त्यांनी यासंबंधीचा अतिशय उत्तम कार्यक्रम दिलेला होता. परंतु पुढे आणिबाणी देशात आली. त्यावेळी काही गोष्टींवर टीका झाली. त्यावेळी याही गोष्टीवर भयंकर टीका झाली. तो कार्यक्रम जवळ जवळ नष्ट होऊन गेलेला आहे. आज देशाची लोकसंख्या जवळ जवळ 115 कोटीच्या पुढे गेलेली आहे आणि महाराष्टाची लोकसंख्या 10 कोटीच्या पुढे गेलेली आहे. या सर्व प्रश्नासाठी कुटुंब नियोजन, त्याचे प्रबोधन, त्या निमित्ताने करण्यात येणारे मार्गदर्शन यासंदर्भात काय योजले आहे याचा उल्लेख या अभिभाषणात झालेला नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्यानी मांढरदेवी तीर्थक्षेत्राचा उल्ल्ेख केला. मी नम्रपणे सांगतो की, मी अनेक तीर्थक्षेत्रीत जाणारा आहे. मांढरदेवीला वाईकडून जाणारा रस्ता पूर्वीपेक्षा बराचसा रुंद केलेला आहे. तो रस्ता आता बराचसा चांगला आहे. या यात्रेस गर्दी वाढलेली आहे. परंतु डोंगर माथ्यावरची जी जागा आहे ती तेवढीच आहे. ब-याच यात्रेत पशुहत्त्या,पशुबळी दिले जातात. त्यानंतर यात्रेकरु त्या ठिकाणी दारु पिण्याचा कार्यक्रम करीत असतात. मला आठवते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी त्यावेळचे राष्ट्रपती श्री.राजेंद्र बाबुंना योजना दिली होती की,

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार...

देशामध्ये ज्या ज्या ठिकाणी यात्रा असतील ती आपोआपच गर्दीची ठिकाणे होतील. यात्रांना लक्षावधी लोक जमत आहेत. पण ही भक्तीची ठिकाणे शक्तीच्या रुपाने त्यांचे प्रबोधन करुन समाजाच्या सेवेकरिता,देशाच्या सेवेकरिता आणि स्वंयशिस्त ठेवली पाहिजेत. मी पंढरपुरला नेहमी जातो. त्या मानाने पंढरपूरला जाणारे वारकरी हे फार शिस्तीने वागतात.24-24 तास ओळीमध्ये थांबतात. पण ज्या ठिकाणी पशुहत्त्या होते, काही ठिकाणी दारुचा नैवद्य दाखविला जातो अशा ठिकाणी व्यसनी माणसे हौसे,गवसे,नवसे अशा यात्रेमध्ये शिरतात त्यांचा बंदोबस्त केला पाहिजे. पोलिसांनी जर अशा प्रकाराबाबत काही कारवाई केली नाही तर पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली असे आपण म्हणतो.पोलिसांनी लाठीचार्ज केला तर पोलिसांनी यात्रेकरुंवर अमानुष लाठीमार केला असेही आपण म्हणतो. या गोष्टीचा साकल्याने साधक -बाधक विचार होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील खेळाडूना शासनातर्फे छत्रपती शिवाजी पुरस्कार दिला जातो. मला आनंद वाटला की, राज्यात विविध क्रीडाप्रकारांना प्रोत्साहन मिळावे यासाठी शासनाने शासकीय व निमशासकीय सेवेतील संवर्ग "अ","ब","क","ड" मधील सरळसेवा भरतीने भरल्या जाणा-या पदांपैकी 5 टक्के पदे उत्कृष्ट खेळाडूसाठी आरक्षित ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे. मी कुठल्याही परदेशी खेळाच्या विरुध्द नाही. कबड्डी,मलखांब,खो-खो,कुस्ती हे मर्दानी आणि देशी खेळ आहेत. या खेळात अतिशय उत्तम कार्य केलेली माणसे आज आपल्या राज्यात आहेत.परंतु या माणसांचा आपण वृत्तपत्रात देखील उल्लेख करीत नाही. या मर्दानी खेळामध्ये अतिशय उंची गाठलेली माणसे आपल्या राज्यात आहेत.सचिनने 10 हजार धावा केल्या त्याबाबतीत जरुर त्याचे अभिनंदन केले पाहिजे.कुस्ती हा महाराष्ट्रातील मर्दानी खेळ आहे. महाराष्ट्रातील कुस्तीची परंपरा ही राष्ट्रकूल स्पर्धेपर्यन्त आणि अशियायी स्पर्धेपर्यन्त श्री.मारुती माने आणि अनेक लोकांनी पोहोचविलेली आहे. जवळपास 16 पदके आपल्या खेळाडुंनी मिळविलेली आहेत. या लोकांची नावे महाराष्ट्रात कुठेही दिसत नाहीत. राज्यात उत्कृष्ट खेळाडू वाढावेत यादृष्टीने शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. उत्कृष्ट खेळाडूना शासनाच्या सेवेत 5 टक्के जागा आरक्षित ठेवल्या त्याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. अनेक गोष्टींवर मला बोलण्याची इच्छा होती परंतु वेळ फार कमी असल्यामुळे मी माझे मनोगत थांबवितो.

यानंतर श्री. उपरे..

अशोधित प्रत / शोधनीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: न्यायमूर्ती श्री. पी.बी.सावंत यांच्या चौकशी आयोगाच्या अहवालावर चर्चा करण्याबाबत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, न्यायमूर्ती श्री.पी.बी.सावंत यांच्या चौकशी आयोगाच्या अहवाल आज आम्हांला देण्यात आलेला आहे. तो आमच्याच हातात यावा, दुस-या कोणाच्या हातात जाऊ नये म्हणून काळजी घेतली आहे याबद्दल धन्यवाद. हा अहवाल आता प्रसिध्द झालेला आहे आणि त्यांचे गंभीर पडसाद महाराष्ट्राच्या जनमानसात उमटले आहेत. घराघरात हा चर्चेचा विषय झालेला आहे. वर्तमानपत्रातूनही ही बाब सर्व लोकांपर्यंत पोहोचली असल्याने हा चर्चेचा विषय आहे. तरी या सभागृहाच्या माध्यमातून त्या अहवालावर चर्चा व्हावी अशी अपेक्षा आहे. मला सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरीसाहेबांकडून निरोपही आला. तरी नियम 97 अन्वये या अहवालावर चर्चा उपस्थित करण्याकरिता आपली परवानगी असावी म्हणजे उद्या यावर चर्चा होईल. खालच्या सभागृहामध्येही उद्या यावर चर्चा ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे या सभागृहामध्येही उद्या चर्चा होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती : मघाशी मी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरीसाहेबांना पहात होतो. पण ते पनवेलला गेले आहेत असे मला कळले. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांच्याशी माझी चर्चा झाली आहे. तसेच सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांच्या बरोबरही चर्चा झाली आहे. उद्या खालच्या सभागृहामध्येही या अहवालावर चर्चा आहे. त्याप्रमाणे उद्या या सभागृहामध्येही चर्चा होणे आवश्यक आहे. आपण केलेली सूचना योग्य आहे. तरी त्याबाबतचा निर्णय घेंण्यात येईल. सभागृहाचे नेते सन्माननीय उप मुख्यमंत्री या ठिकाणी आहेत. आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उद्या या अहवालावर चर्चा घेण्यात यावी अशी विनंती केली आहे आणि मीसुध्दा त्याबाबत बोललो आहे. तरी याला आपलीही मान्यता आहे असे मी समजतो.

श्री.आर.आर.पाटील : ठीक आहे. उद्या चर्चा करू.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, आम्हांला जो अहवाल प्राप्त झालेला आहे तो इंग्रजीमध्ये आहे. तरी मराठीमध्ये अहवाल मिळावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

मु.शी.: राज्यपालांच्या अभिषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा (पुढे चालू).

श्री.अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या ठिकाणी राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या ठिकाणी राज्यपालांनी 6 डिसेंबरला त्सुनामी लाटांनी या देशात आणि परदेशात काही कुटुंबे उद्ध्वस्थ झाली त्याबद्दल दु:ख व्यक्त केले आहे. याच दरम्यान महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यामधील वाई तालुक्यातील मांढर देवीच्या ठिकाणी सुमारे 250 पेक्षा जास्त भाविक मृत्यूमुखी पडले आहेत त्याबद्दल राज्यपालांनी एका शब्दाचाही उल्लेख केलेला नाही याबद्दल मी या ठिकाणी खेद व्यक्त करतो. सभापती महोदय, आपले राज्य हे नेहमीच देशातील एक प्रमुख औद्योगिक राज्य राहिलेले आहे अशा प्रकारचा उल्लेख या अभिभाषणात केलेला आहे. याच्यापूर्वी औद्योगाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य अग्रेसर होते, एक नंबरचे राज्य होते अशा प्रकारचा उल्लेख होत असे. पण आता एक प्रमुख औद्योगिक राज्य अशा प्रकारचा उल्लेख केलेला आहे. सभापती महोदय, 2000 ते 2002 पर्यंत या राज्यात 18,126 कारखाने बंद पडले आणि त्यामुळे 3,24,580 कामगार बेकार झाले आहेत. हे सगळे असताना महाराष्ट्र राज्य हे एक प्रमुख औद्योगिक राज्य राहिले आहे अशा प्रकारचा उल्लेख केलेला आहे. सभापती महोदय, राज्यामध्ये ठाणे जिल्हा हा औद्योगिक क्षेत्रामध्ये निश्चितपणे अग्रेसर होता. ठाणे हे एक प्रमुख शहर म्हणून गणले जात होते. पण या शहराची अवस्था आज काय झालेली आहे ? त्या ठिकाणी दिवसाला एक कंपनी बंद पडते असा प्रकार त्या ठिकाणी घडत आहे. शासनाने या कंपन्या, कारखाने चालू रहावे अशा प्रकारचे धोरण घेतलेले नाही. त्या उलट त्या ठिकाणी कंपन्या बंद करून निवासी संकुले उभी करण्यासाठी बिल्डर्सना मदत करण्याचे धोरण या ठिकाणी घेतलेले आहे याबाबत मी खेद व्यक्त करतो. ठाणे येथील हिंद कंटेनर ही कंपनी 16 वर्षापूर्वी बंद पडली. आजपर्यंत त्या कर्मचा-यांना पाच पैसेही मिळालेले नाही. त्या ठिकाणी हायकोर्टामध्ये कामगारांची बाजू मांडली गेली नसल्यामुळे त्यांना हायकोर्टातून न्याय मिळाला नाही. औद्योगिक न्यायालयाने निर्णय दिला तो बिल्डरनी मानला नाही. त्यामुळे त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.अनंत तरे)

ठिकाणी आज गृह संकुले उभी राहिली आहेत. जर त्या ठिकाणी गृह संकुलांना निवासी दाखला मिळाला तर त्या कामगारांना मिळावयाचे पैसे कोणीही देणार नाही.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे ..

या कंपनीतील 107 कामगारांना 1 कोटी 64 हजार रुपये पंधरा दिवसात जर मिळाले नाही तर आत्मदहन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.ठाणे,वागळे इस्टेट आणि नवी मुंबई या ठिकाणी अशीच परिस्थिती आहे. औद्योगिक वाढीचा दर 9 टक्के आहे असे सांगण्यात आलेले आहे परंतु यापूर्वी हा दर काय होता याची माहिती शासनाने घ्यावी. तसेच औद्योगिक वाढीचा दर वाढेल, कंपन्या सुरु राहतील, कारखाने सुरु राहतील अशा प्रकारचे धोरण राबविण्याची गरज आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा एक मुद्दा येथे मांडावयाचा आहे. राज्यामध्ये विजेचा तुटवडा आहे असे सांगण्यात आलेले आहे.एका बाजूला भारनियमन केले जात आहे परंतु दुस-या बाजूला भिवंडी शहरामध्ये विजेची 600 कोटी रुपयांची थकबाकी आहे.त्या ठिकाणी राजरोसपणे विजेची मोठया प्रमाणावर चोरी केली जाते आणि त्यामध्ये वीज मंडळातील कर्मचारी आणि अधिकारीसुध्दा सहभागी आहेत. परंतु राज्य सरकार हतबल असल्यामुळे त्या संदर्भात ते काहीही करु शकत नाही अशी स्थिती आहे. मुंब्रा येथे राहणारे अनेक लोक चोरुन वीज वापरत असतात आणि त्या ठिकाणी 100 कोटी रुपयांची विजेची थकबाकी आहे.रायगड जिल्हयातील पेण तालुक्यामध्ये "इस्पात" कंपनीकडे सुध्दा 300 कोटी रुपयांची विजेची थकबाकी आहे.एका बाजूला भारनियमन केले जाते तर दुस-या बाजूला विजेची चोरी होत असतांना त्याला शासनाची मूक संमती आहेअशा प्रकारचे धोरण राज्य सरकारचे आहे. तेव्हा थकबाकी असणा-याविरुध्द तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे..

सभापती महोदय, आज शेतक-यांना महत्व दिले जात आहे परंतु या शेतक-यांबरोबर महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर मत्स्य शेती करणारे जे मच्छिमार बांधव आहेत त्यांचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आलेला नाही.मच्छिमार बांधव स्वयं रोजगार निर्माण करतात तसेच जे मांसाहार करणारे आहेत त्यांना खाद्यपदार्थ उपलब्ध करुन देतात, त्याचबरोबर देशाचे परकीय चलन सुध्दा वाढवतात परंतु त्या बाबतीत माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात काहीही उल्लेख केलेला नाही.याबद्दल मी खेद व्यक्त करीत आहे.सभापती महोदय, मराठी बांधवाच्या तीव्र भावना लक्षात घेऊन प्रदीर्घ काळ प्रलंबित असलेला महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न निकाली काढण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणाबद्दल माझ्या शासनाकडून तत्परतेने पाठपुरावा केला जाईल असे राज्यपालांच्या अभिभाषणात सांगण्यात आलेले आहे. गेल्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे ..

वर्षीच्या अभिभाषणात हेच सांगण्यात आले होते.गेल्या वर्षी वेगळी परिस्थिती होती.सन्माननीय राज्यपाल हे कर्नाटक राज्याचे काही वर्षे मुख्यमंत्री होते आणि त्यांनी जर मनावर घेतले तर सुप्रीम कोर्टात असलेली केस बाजूला सारुन दोन्ही राज्यातील मुख्यमंत्र्यांना एकत्र बोलावून ते हा प्रश्न निकाली काढू शकतील.त्यांना जर हा प्रश्न खरोखर निकाली काढावयाचा असेल तर अशा प्रकारची कार्यवाही त्यांच्याकडून निश्चितपणे अपेक्षित होती.परतु ते अशा प्रकारची कार्यवाही करु शकलेले नाहीत. म्हणून माननीय राज्यपालाचे अभिनंदन करावे अशा प्रकारचे हे अभिभाषण नाही. शेवटी मला एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे की, महाराष्ट्राला 720 किलोमिटर्स लांबीची किनारपट्टी मिळालेली आहे.या किनारपट्टीवर सुमारे 5 लाखापेक्षा जास्त मच्छिमार बांधव राहतात त्याची आज काय हालत आहे? केन्द्र शासनाने तीन वर्षापूर्वी दिलेले जे डिझेलचे परतावे होते ते सुध्दा राज्य सरकार परत देऊ शकलेले नाहीत. हे पैसे राज्य सरकारने वापरलेले आहेत. सर्वात खेदाची बाब अशी आहे की, राष्ट्रीय सहकार विकास निगम पुरस्कृत योजने अंतर्गत मच्छिमार सेवा सहकारी सोसायटयांना विविध प्रकारचे अनुदान दिले जाते.केन्द्र सरकारकडून 80 टक्के अनुदान मिळते, दहा टक्के अनुदान राज्य सरकारकडून मिळते आणि दहा टक्के अनुदान हे स्थानिक मच्छिमार बांधवांना सहकारी सोसायटयांकडून मिळते. गेल्या वर्षभरात 720 किलोमिटर्स लांबीची किनारपट्टी असलेल्या भागात राहणा-या एकासुध्दा मच्छिमार सोसायटीला शासनाच्या माध्यमातून एन.सी.डी.सी.कडून अनुदान मिळालेले नाही अनेक प्रस्ताव राज्य शासनाकडे तसेच मत्सोद्योग खात्याकडे पडून आहेत.हे प्रस्ताव कशाची वाट पहात आहे हे कळत नाही.म्हणून माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल मी खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

नंतर श्री.कानडे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

श्री. विलास अवचट (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मा.राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मा.राज्यपालांनी मुंबई शहराच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्याचा संकल्प केलेला आहे. सभापती महोदय, गेल्या 30 वर्षामध्ये या मुंबई शहराच्या विकासाच्या बाबतीत अनेक घोषणा झालेल्या आहेत. या घोषणेमध्ये पहिली घोषणा होती की स्वच्छ मुंबई हरित मुंबई. दुसरी घोषणा होती स्वच्छ मुंबई मराठी मुंबई. त्यानंतर घोषणा झाली की स्वच्छ मुंबईचे पॅरिसमध्ये रुपांतर केले जाईल आणि त्यानंतर पुन्हा घोषणा झाली की मुंबईमध्ये सिंगापूरमध्ये रुपांतर केले जाईल. त्यानंतर आता घोषणा झाली की मुंबईचे शांघाय करण्यात येणार आहे. मुंबईचे शांघाय करण्याचा संकल्प केलेला आहे परंतु दुसरीकडे 2000 सालापर्यंतच्या झोपडयांना संरक्षण दिले जात आहे. हा एक प्रकारचा विरोधाभास आहे. मुंबई ही मुंबई राहू द्या त्याचे जोहान्सबर्ग करु नका. मुंबई शहराची जोहान्सबर्ग शहराशी तुलना करावयाची झाली तर संपूर्ण जगामध्ये सगळयात अस्वच्छ शहर कुठले असेल तर ते जोहान्सबर्ग आहे. मुंबई शहराच्या बाबतीत विकास नियमावली तयार करण्यात आली. अनेक प्रकारचे नियम त्यात असले तरी आतापर्यंत शासनाने फक्त आपल्याला पाहिजे तेवढे नियम अंमलात आणले आहेत. नियम 33 असेल किंवा 33(7) असेल त्याचा उपयोग करुन या मुंबईचा चेहरा-मोहरा बदलण्याचा प्रयत्न झालेला आहे. मुंबई शहराच्या विकास आराखडयात असलेले निरनिराळे भूखंड मग ते म्हाडा कडे असतील किंवा महानगरपालिकेकडे असतील जेणेकरुन या मुंबई शहरामध्ये नागरी सुविधा देण्याच्या दृष्टिकोनातून मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असताना देखील त्यांचे अधिकार काढून घेऊन मंत्रालयातून अशा प्रकारे भूखंडांच्या आरक्षणामध्ये बदल केले आणि असे केले तर मुंबईचे शांघाय होण्याऐवजी जोहान्सबर्ग होण्यास वेळ लागणार नाही याचा खेद होत आहे. मुंबई ही केवळ राज्याची नव्हे तर देशाची आर्थिक राजधानी आहे. आघाडी शासनाने ज्यावेळी विधानसभेच्या निवडणुका होत्या त्यावेळी जाहीरनाम्यामध्ये आश्वासन दिले होते की आम्ही 2000 सालापर्यंतच्या झोपडयांना संरक्षण देऊ. वीज बिल माफ करु. कर्जावरील व्याज माफ करु. असे असताना खासदार आणि आमदारांचे शिष्टमंडळ दिल्लीला गेले त्यावेळी दिल्लीसमोर गुडघे टेकून 2000 सालापर्यंतच्या झोपडयांना संरक्षण मिळविले. परंतु बाकीच्या आश्वासनांच्या बाबतीत शासन काही करु शकले नाही. यामध्ये कोणते राजकारण आहे हे ओळखणे आवश्यक आहे. पाणी पुरवठयाच्या बाबतीत मुंबई महानगरपालिकेला जागतिक बँकेकडून

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट ....

अर्थसहाय्य येते. यासाठी प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न केलेला आहे. मा. सदस्य श्री. सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे पाण्यासाठी जे प्रकल्प आहेत त्यासाठी जागतिक बँकेकडून राज्य शासनाला पैसे येतात परंतु हे पैसे महानगरपालिकेकडे पोहोचत नाहीत. कर्जावरील व्याज मात्र महानगरपालिका भरते आहे. मुंबई शहराला जो पाणी पुरवठा होतो तो 150 कि.मी.अंतरावरुन पाईप लाईनमधून पाणी आणून गेली 50-60 वर्षे महानगरपालिकेकडून होत आहे. परंतु या जलवाहिन्यांना 60 हजार झोपडयांचा विळखा आहे ही परिस्थिती गंभीर आहे. विकासाच्या आड झोपडया येत असतील तर त्यांना पर्यायी जागा देऊ असे सांगितले जाते. 150 कि.मी.अंतरावरुन ज्या जलवाहिन्या गेलेल्या आहेत त्या झोपडपट्टयांमधून गेलेल्या आहेत.

यानंतर श्री. सुंबरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अवचट ....

आणि त्यामुळे असे झालेले आहे की, त्या पाण्याच्या पाईपलाईन उघडावयाची जी चावी असते ती चावी लावण्यासाठी देखील त्या झोपडपट्टीवाल्यांची मेहरनजर घ्यावी लागते ही या मागील शोकांतिका आहे. अशाच प्रकारे आपल्याला मुंबईचा विकास करावयाचा असेल तर मग प्रश्नच नाही. मुंबईचा विकास करताना येथील बेकायदा झोपड्यांचा प्रश्न आपल्याला सोडवावा लागेल परंतु प्रथम 1995 च्या आणि त्यानंतर आता 2000 पर्यंतच्या झोपड्यांना आपण संरक्षण देत आहात त्यामुळे ही परिस्थिती गंभीरच होणार हे आपण लक्षात घ्यावे इतकेच मला आपल्याला सांगावयाचे आहे.

अध्यक्ष महाराज, या मुंबई शहराच्या विकासासंबंधी विचार करताना मुंबईतील गिरण्यांचा आणि गिरण्याच्या जमिनींचा, गिरणी कामगारांचा देखील प्रश्न महत्त्वाचा असल्याने तो विचारात घेणे आवश्यक आहे. पण माननीय राज्यपालांच्या या अभिभाषणामध्ये मुंबईतील गिरण्यांच्या जमिनींबाबत तसेच गिरणी कामगारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे मुद्दा उपस्थित केलेला नाही. अध्यक्ष महाराज, मुंबईची संपूर्ण संस्कृती आणि एकूणच संस्कार करण्याचे काम कोणी केले असेल तर ते गिरणी कामगारांनी केलेले आहे. मुंबईतील या गिरण्या बंद झाल्या आणि त्यातील कामगार बेकार झाले. गिरण्या बंद पडल्याने त्यांच्या जमिनींचा प्रश्न महत्त्वाचा झाला. अशा वेळी विकास नियमावलीतील नियम 58 च्या माध्यमातून या गिरण्यांच्या जमिनींचा विकास करताना म्हाडाला एक तृतियांश, महापालिकेला एक तृतियांश आणि उर्वरित जमीन गिरणी मालकाला विकसित करण्यास देण्याचा प्रयत्न केला. पण त्या नियमाला देखील आता बगल देवून त्या नियम 58 मधून सूट देण्याचा प्रयत्न केला गेला. अध्यक्ष महाराज, याच सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते की, जोपर्यंत गिरणी कामगारांची देणी दिली जात नाहीत तोपर्यंत गिरण्याची जमीन विकसित करू दिली जाणार नाही, विकू दिली जाणार नाही. आता या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी किंवा कोणाही मंत्र्यांनी सांगावे की, कोठल्या गिरणी मालकाने आपल्या कामगारांची देणी दिल्यानंतरच तेथील जमिनींवर टॉवर उभारण्यास सुरूवात केली आहे. परंतु असे घडलेले आहे. आज आपण मुंबईतील गिरणगावातील ना.म.जोशी मार्गावर पाहिले तर आपल्याला सर्वत्र टॉवर संस्कृती उभी राहिल्याचे आणि मुंबई संस्कृती उभी करणारा गिरणी कामगार मात्र अजूनही रस्त्यावर असल्याचेच

..... 5डी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिसून येते. अध्यक्ष महाराज, हे सारे प्रश्न महत्वाचे असल्याने ते येथे उपस्थित करावयाचे म्हटले तर दिलेला वेळ कमी पडणार आहे. म्हणूनच आपण जो वेळ दिलेला आहे त्यामध्ये काही मुद्दे-प्रश्न मांडण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. त्यातीलच गृहनिर्माणचाही प्रश्न सगळ्यात महत्त्वाचा आहे. शेवटी मुंबईमध्ये गृहनिर्माणाची जबाबदारी ही म्हाडाकडे आहे आणि म्हाडा ही गृह बांधणी करीत असताना म्हाडाचे साडेतीनशे कोटी रुपये देय असताना या ठिकाणी घरबांधणी कशी होऊ शकते हाही संशोधनाचा विषय आहे असे मला वाटते आणि म्हणून मला या ठिकाणी खेद व्यक्त करावासा वाटतो, तो खेद व्यक्त करून मी भाषण संपवितो. धन्यवाद.

***

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यक्ष महाराज, महामहीम राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या ठिकाणी मुंबईच्या विषयावर सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.प्रमोदजी नवलकर, श्री.मधू चव्हाण, श्री.विलास अवचट यांनी प्रकाश टाकला आहे. मी या निमित्ताने माननीय गृहमंत्र्यांच्या नजरेस एकच गोष्ट आणून देऊ इच्छितो की, मुंबई महापालिकेला सरकारकडून जवळजवळ साडेसातशे कोटी रुपयांचे येणे आहे. अध्यक्ष महाराज, मला आश्चर्य वाटते की, जेव्हा मुंबईचे शांघाय किंवा सिंगापूर करावयाचे म्हटले जाते .. त्यावर सन्माननीय श्री.अवचट यांनी सांगितले की, मुंबई ही मुंबईच राहू द्यात. संयुक्त महाराष्ट्र समितीचा लढा ज्या कामगारांनी लढून मुंबई मिळविली, त्यातील 105 हुतात्म्यांचे स्मारक आम्ही पाहतो. पण कधी तरी अशी वेळ येईल की, मुंबई मिळविण्यासाठी जेवढे हुतात्मे झाले आहेत तेवढीच मराठी माणसे मुंबईत राहतील आणि बाकीची मात्र सारी परप्रांतीय असतील अशी वेळ आता आली आहे असे वाटते. म्हणून या सर्व प्रकरणामध्ये जेव्हा आपण मुंबईच्या विकासाच्या गोष्टी करतो आहोत .. मुंबईला दिल्या जाणाऱ्या सुविधांमधील पाण्याची सुविधा देण्यासाठी आता अप्पर वैतरणा प्रकल्प येत आहे हे मान्य आहे. पण आताच सन्माननीय श्री.अवचट यांनी सांगितल्याप्रमाणे त्या संपूर्ण जलवाहिनींच्या सभोवताली झोपडपट्टीचा वेढा पडलेला आहे त्यामुळे त्या झोपडपट्ट्या प्राधान्याने हटविणे आवश्यक आहे आणि पहिली गोष्ट म्हणजे मुंबई महानगरपालिकेला आपल्या राज्य सरकारकडून जे सुमारे साडेसातशे कोटी रुपयांचे देणे द्यावयाचे आहे ते प्राधान्याने आपण दिले पाहिजे अन्यथा मुंबई महानगरपालिका यापुढे या शहरातील स्वच्छता, आरोग्य वगैरे टिकवू शकणार नाही. अध्यक्ष महाराज, या संदर्भात मी एकच सांगेन की, या विषयाला धरून येथे गिरणी कामगारांचा विषय आला. मला या संदर्भात बालपणीची एक कविता आठवते आहे की ज्या कवितेमध्ये या संबंधातील सारे सार आलेले आहे. आज या गिरणी कामगारांची अवस्था काय आहे?

उभे भवती प्रासाद गगनभेदी
पदी लोकांची होय दाट गर्दी
प्रभा दीपांची फुले अंतराळी
दौलतीची नीत चालते दिवाळी
कोपऱ्यात गुणगुणत अन् अभंग
उभा केव्हाचा एक तो अपंग

.... 5डी 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सावंत ....

अशी त्या गिरणी कामगारांची आज अवस्था आहे. या ठिकाणी सर्व उंच उंच इमारती उभ्या रहात आहेत, त्यांच्या प्रकाशातून तो दिपून जात आहे ...

भोवतीचा अंधार जो निमाला

हृदयी त्याच्या जणू जात आश्रयाला

म्हणजे अंधारसुद्धा त्याच्या आश्रयाला जातो आहे इतकी वाईट अवस्था त्या गिरणी कामगाराची आज झालेली आहे. अध्यक्ष महाराज, अतिशय खेदाने, राज्यपाल महोदयांचे अभिभाषण म्हणजे सरकारच्या उद्याच्या बजेटची थोडीशी चाहूल असते. पक्षांची पहाटेची किलबिल ऐकली आणि थोडासा प्रकाश येऊ लागते तेव्हा वाटते की, सूर्योदय होतो आहे तशीच संध्याकाळीसुद्धा पक्षांची किलबिल ऐकू येते आणि लक्षात येते की आता अंधार होतो आहे. हे नक्की कशाचे द्योतक आहे हे मला कळले नाही पण या गिरणी कामगारांच्या संदर्भात यामध्ये कोठेही उल्लेख नाही. .....

(यानंतर श्री. जागडे .... 5इ 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

त्यामुळे आता या गिरण्यांच्या जमिनी 94 टक्के मालकांच्या हातात जाणार आहे. फक्त सहा टक्के जमीनच शिल्लक राहणार आहे. मी शिवडी येथे राहतो. शेजारच्या चायना मिलमध्ये आपण गेलात तर फक्त चालण्यासाठी रस्ता सोडला तर कोठेही जागा नाही. या चायना मिलचा खाडा मात्र दुस-या बाजुला आहे. आता त्या ठिकाणी मोठमोठे प्रासाद तयार व्हावयाला लागले आहेत. दोस्ती बिल्डर्सने हे प्रासाद उभे केले आहेत. कमर्शियल युटीलायझेशनसाठी हे करण्यात आले होते. परंतु गिरण्यांमध्ये काम करणा-या गिरणी कामगारांना काहीच दिले नाही. शासनाचे त्यांच्या मुलांचा कोठेही विचार केला नाही. शासनाने या सर्व गोष्टींकडे बारकाईने लक्ष देण्याची गरज आहे. कारण गिरणी कामगारांचा मुलगा उध्वस्त झाला तर संपूर्ण मुंबई उध्वस्त व्हावयाला वेळ लागणार नाही. सभापती महोदय, कामगारांच्या निवासासाठी राष्ट्रीय मिल मजदूर संघाने मा. श्री. शरद पवार यांच्याकडून 1990 साली मढ येथे जमीन घेतलेली आहे. त्या ठिकाणी आतापर्यनत तारेचे कुंपन घालण्यात आले आहे. त्यावेळी आरएमएमएसला याची काहीच माहिती नव्हती. आता मात्र त्या ठिकाणी असलेल्या दलदलीची माहिती झाली आहे. मला या ठिकाणी शासनाला हे सांगावयाचे आहे, आता गिरणी कामगार राहिला आहे कोठे ? तो कोठून यासाठी पैसे भरेल. आज त्या ठिकाणी शेजारी असलेले मोठेमोठे बिल्डर्स या जमिनीकडे डोळा लावून बसले आहेत. म्हणून या बाबत आपण शासन काय करणार आहे, हे आम्हाला या ठिकाणी समजण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात पाटबंधारे प्रकल्पाचा उल्लेख केला आहे. मा. राज्यपाल असे म्हणत आहेत की, " पाटबंधारे प्रकल्पाच्या कोणत्याही जलप्रदाय क्षेत्रातील सर्व लाभार्थींना पाण्याचे समन्यायी वाटप होईल. " सभापती महोदय, माझ्याकडे कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे दोन अहवाल आहेत. 1999-2000 आणि 2000-2001 या कालावधीत लेख्यावरील लेखापालांचा लेखा परिक्षण अहवाल माझ्याकडे आहे. त्यामध्ये असे म्हंटले आहे की, " कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यक्रमानुसार महामंडळाच्या सर्व योजना 2005 पर्यन्त पूर्ण करावयाच्या असून त्याचा उपयोग ठाणे, रायगड आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यातील 302 गावांच्या सिंचनासाठी होणार आहे. या योजनांवर मार्च 2001 अखेर रुपये 475.12 कोटी खर्च झालेला आहे. सन 1999-2000 व सन 2000-2001 या वर्षातील एकूण रुपये 446.09 कोटी अर्थसंकल्पीय तरतूदीवर रु. 218.19 कोटी प्रत्यक्ष खर्च करण्यात आलेला आहे." तसेच माझ्याकडे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....

2002-2003 चा लेखा परिक्षण अहवाल आहे. त्यामध्ये असे म्हंटले आहे की, त्यावर्षात एक मोठा प्रकल्प पूर्ण करावयाचा होता. परंतु तो पूर्ण झालेला नाही. 4 मध्यम प्रकल्प पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले होते, परंतु एकही पूर्ण झालेला नाही. लघूपाटबंधारे प्रकल्प 33 करण्याचे ठरविण्यात आले होते, त्यातील फक्त 6 पूर्ण झालेले आहेत. अशा प्रकारची जर परिस्थिती असेल तर कोकणाचा विकास कसा होणार ? शासन या सगळ्या गोष्टीकडे लक्ष देणार आहे की नाही ?

सभापती महोदय, जाता जाता मी दोन गोष्टींचा उल्लेख करणार आहे. राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्र. 10 व 27 वर मी बोलणार आहे. मुद्दा क्र. 10 मध्ये असे म्हंटले आहे की, " महाराष्ट्रात सर्वात जास्त औद्योगिक गुंतवणूक प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. मागील वर्षीच्या ऑक्टोबर पर्यन्त एकूण 11,967 औद्योगिक गुंतवणूक प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यात 2,65,411 कोटी रुपये इतक्या गुंतवणूकीचा अंतर्भाव असून सुमारे 20 लाख बेजरोजगारांना रोजगार देण्याची क्षमता आहे."

(यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

त्याचप्रमाणे परिच्छेद 27 मध्ये "जागतिकीकरण व उदारीकरणाच्या धोरणामुळे नोकरीच्या संधीमध्ये घट झाली आहे", घट झाली आहे म्हणजे नक्की काय झाले आहे? या भाषणातील आकडेवारी आम्ही कित्येक वर्षापासून वाचत आहोत. आपण केलेली गुंतवणूक कुठे केली हे आम्हाला दाखवा? एक कारखाना तरी उभा राहिला कां हे आम्हाला दाखवा? फक्त स्कोडाचा कारखाना उभा राहिला. नाशिकची एम.आय.डी.सी. बंद पडली. आपण फाईव्ह स्टार एम.आय.डी.सी. आणली तीसुध्दा बंद पडत चालली आहे. याकडे आपण लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, कोकणामध्ये आपण वनराई बंधारे दिले. वनराई बंधारे बांधण्याकरिता कोकणात गोणी उपलब्ध नव्हत्या. माझ्या गावामध्ये पाणी वाहून चालले आहे. तेथील पाण्याच्या प्रवाहाचा वेग कमी झाला आहे, त्याठिकाणी आपण वनराई बंधारा घाला असे मी तहसिलदारांना सांगितले. परंतु ते म्हणतात की, आमच्याकडे गोणीच उपलब्ध नाही. आपण बांधलेले बंधारे कौतुकास्पद आहेत. तेव्हा कोकणामध्ये वनराई बंधारे बांधण्यासाठी गोणी कां मिळत नाहीत याची आपण चौकशी करा.

आश्रमशाळेतील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी संगणकाचा वापर करण्याचे यामध्ये म्हटले आहे. संगणक चालविण्यासाठी आपल्याकडे वीज कुठे आहे? संगणकाचा वापर होत नसल्यामुळे ते शोकेसमध्ये पडून आहेत व बिघडले आहेत. त्याठिकाणी वीज उपलब्ध होण्यासाठी आपण काहीच केले नाही. ठाणे जिल्हयातील मोखाडा सारख्या आदिवासी तालुक्यामध्ये माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे व मी देखील जात असतो. त्याठिकाणी कुपोषित बालकांचे प्रमाण अधिक आहे सहा महिन्यापूर्वीचा 240 वरील आकडा मागील महिन्यात 142 वर आला होता. आज तो आकडा 500 वर गेला आहे. तसेच, 5 ते 10 वयोगटातील बालके आता कुपोषित व्हावयास लागली आहेत. त्या गावामध्ये लोकांना खायला अन्न नाही, रोजगार उपलब्ध नाही. आपण रोजगार हमी योजनेचा उल्लेख करता. खरे तर ही एक राज्याची अभिमानास्पद अशी योजना आहे. परंतु मोखाडा तालुक्यातील आदिवासी विभागामध्ये रोजगार हमी योजनेचे एकही काम सुरु नाही. आपण त्याठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पहावे. त्यांना काम नसल्यामुळे त्या तालुक्यातील किती आदिवासी स्थलांतरित होत आहेत हे आपण एकदा जाऊन पहावे.

सभापती महोदय, मी जाता जाता वनाच्या संदर्भात मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. परिच्छेद क्र. 39 वर "जैव-विविधतेचे जतन करण्यासाठी आणि निसर्ग व आधुनिक विकास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यांमध्ये समतोल राखण्यासाठी लोक सहभागातून वनांचे संरक्षण व संवर्धन करणे अत्यावश्यक आहे" असे म्हटले आहे. हे वाचून मला खेद होतो. मुंबईहून आपण कर्नाळा अभयारण्याच्या पुढे गेलात तर तुम्हाला संपूर्ण डोंगर ओसाड झाल्याचे दिसेल. पहाटे सहा-सात वाजता आपण गेलात तर आदिवासी रांगेत आपल्या डोक्यावरुन लाकडाचे भार घेऊन चालत असल्याचे दिसतील. एवढया मोठया प्रमाणात जंगल तोड त्या भागात सुरु आहे. शहापूर-खर्डीपासून पुढे ईगतपुरी-नाशिक रोडवर गेलात तर आपल्याला लाकडाचे भार डोक्यावर वाहून नेणारी माणसे दिसतील. जर वनांचे संरक्षण झाले नाही तर पाऊस पडणार नाही, आणि पाऊस पडला नाही तर जलसंधारणाची कामे होणार नाहीत, पाणी अडविले जाणार नाही, राज्यामध्ये पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण होईल. म्हणून आपण वेळीच याची काळजी घ्यावी असे मला वाटते.

सभापती महोदय, परिच्छेद क्र. 54 वर माननीय राज्यपालांनी "राज्य शासनाने, असंघटित कामगारांसाठी राज्यस्तरीय प्राधिकरण आणि जिल्हा स्तरीय समित्या घटित केल्या आहेत" असे म्हटले आहे. यामध्ये "घटित" या शब्दाच्या बाबतीत मी "गठीत" अशी दुरुस्ती करतो. खालच्या परिच्छेदामध्ये आपण मराठी भाषिकांच्या तीव्र भावना लक्षात घेता आणि वरच्या परिच्छेदामध्ये अशुध्द लेखन करीत आहात. निदान लेखन तरी शुध्द असू द्या. तेव्हा आपण मराठी माणसाच्या भावना, मराठी माणसाचे राज्य, मराठी माणसाची मुंबई शिल्लक रहावी असे वाटत असेल तर त्यासंबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कुठेही उल्लेख नाही. याचा खेद व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुध्दीत प्रत / अशुध्दीपत्रक नाही

श्री.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या भाषणात मुंबई शहर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर व्हावे म्हणून माझे शासन प्रयत्न करीत आहे असे म्हटलेले आहे. पण ही अतिशय चांगली संकल्पना केवळ कागदापुरती दिसते. कारण शहर आंतरराष्ट्रीय दर्जाचे करावयाचे तर त्यासाठी नेमके काय केले पाहिजे याबाबतचा कोणताही विचार या भाषणात दिसत नाही. तसेच या शहरातील लोकांना चांगले राहणीमान द्यावयाचे आहे. पण ते नेमके कोणाला देणार आहात ? जे कर भरणारे लोक आहेत, त्यांना देणार की कर न भरणा-या लोकांना देणार आहात ? हा महत्वाचा प्रश्न आहे. तसेच राज्याने सादर केलेल्या 36,600 कोटी रुपये खर्चाच्या महत्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांबाबतचा विशेष उल्लेख सन 1005-2006 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात केला आहे असेही म्हटलेले आहे. पण या सुविधा कोणासाठी आहेत ? 1995 पर्यंत मुंबईत राहणा-या लोकांसाठी आहेत का ? कारण मुंबईच्या नागरीकांसाठी, त्यांच्या मुलभूत समस्या सोडविण्यासाठी, तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनविण्यासाठी ही मागणी केलेली आहे. पण आता मतांवर डोळा ठेऊन 2000 पर्यंतच्या झोपडयांना संरक्षण देण्याची मागणी पुढे आली आहे. आता 2007 मध्ये मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूका होणार आहेत. आता 2000 सालापर्यंतच्या झोपडयांना संरक्षण देण्याची मागणी आली आहे, पुढे 2005 पर्यंतच्या झोपडयांना संरक्षण देण्याची मागणी येईल का ? अशी मुंबईतील लोकांच्या मनामध्ये भीती निर्माण झाली आहे. तसेच आघाडी शासन मतांसाठी काहीही करील या निर्णयाप्रत येथील लोक आलेले आहेत आणि दुसरीकडे माननीय मुख्यमंत्री म्हणतात की, दिलेली आश्वासने पाळलीच पाहिजेत असे नाही. मुंबई शहराचे शांघाय करण्याचे माननीय पंतप्रधान आणि माननीय मुख्यमंत्र्यांचे स्वप्न आहे. पण मुंबईचे ढाक्का बनविण्याची सुपारी ज्यांनी घेतली आहे अशा लोकांना जेरबंद करण्याची तयारी असल्याचे लोकशाही आघाडी सरकारने दाखविलेले नाही, याबाबतचे धैर्य कुठेही दिसत नाही. तेव्हा चांगले राहणीमान, चांगला दर्जा आणि चांगल्या सुखसोयी कोणाला देणार आहात ? 1995 पर्यंत मुंबईत राहीलेल्या लोकांना देणार की 2000 सालापर्यंत मुंबईत असलेल्या लोकांना देणार की 2005 पर्यंत मुंबईत असलेल्या लोकांना देणार आहात ? नेमक्या कोणासाठी या सोयीसुविधा देणार आहात ? चांगल्या दर्जाचे राहणीमान कोणाला देणार आहात ? कोणासाठी या घोषणा करीत आहात ? मुंबईत प्रचंड प्रमाणात लोकसंख्या वाढलेली आहे आणि

. . . .5 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल परब . . . . .

लोक गटारावर, दलदलीमध्ये बांबूच्या झोपडया बांधून राहतात. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे या झोपडया तोडताना तेथील लोकांच्या संसाराच्या उपयोगी वस्तू जप्त करता येत नाहीत. तर केवळ चटया, बांबू वगैरे जप्त करता येतात. त्यामुळे आजही झोपडया तोडल्यानंतर दुस-या दिवशी पुन्हा झोपडया उभ्या राहील्याचे दिसते. लोकशाही आघाडी सरकारने 90 हजार झोपडया तोडल्या. पण कुठे माशी शिंकली माहिती नाही, कुठून निर्देश आले हे माहिती नाही. पण ताबडतोब या कारवाईला स्टे मिळाला. जेव्हा याबाबतीत कारवाई सुरु झाली, तेव्हा येथील लोकांना असे वाटत होते की, मुंबई शहर चांगले करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाकडून प्रयत्न केला जात आहे. पण शासनाने पुन्हा आपली नखे किंवा शासनाला आपले जे रंग दाखवावयाचे होते, ते दाखविण्यास सुरुवात केली. त्यामुळे लोकांच्या मनात पुन्हा संभ्रम निर्माण झाला आहे की, ही मुंबई करदात्यांसाठी आहे की कर न भरणा-यांसाठी आहे. येथील लोकांना मुलभूत सुविधा देण्याचे काम मुंबई महानगरपालिकेचे आहे. पण त्यांच्या मनामध्ये आपल्याला सापत्नपणाची वागणूक दिली जात आहे याचे दु:ख आहे. महापालिकेची जवळजवळ 580 कोटी रुपयांची थकबाकी राज्य शासनाकडे आहे. महापालिका त्यांच्या ज्या डयुटीज् आहेत त्यानुसार काम करण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांना राज्य शासनाकडून, केंद्र शासनाकडून निधी मिळत नसेल तर ते कोणती कामे करतील ? पण त्याचा उल्लेख या अभिभाषणामध्ये दिसत नाही. ज्या अनधिकृत झोपडया होत्या, त्या तोडण्यात आल्या. पण तेथील लोकांची जी नावे मतदार यादीमध्ये होती, तर ते मतदार बोगस म्हणून सिध्द झालेले आहे. त्यामुळे बोगस नावे मतदार यादीतून वगळली गेली पाहिजेत अशी आमची भावना आहे. बोगस मतदानाच्या जोरावर लोकशाही आघाडी मुंबईमध्ये जिंकलेली आहे.

सभापती महोदय, राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत सांगावयाचे तर लोकांचा यावर बिलकूल विश्वास राहीलेला नाही. लोक पोलीस येण्याची वाट पाहत नाहीत तर स्वत:च मिळेल ते शस्त्र घेऊन दरोडेखोरांना मारुन टाकतात. आता पोलीस केवळ पंचनामा करण्यापुरते उरलेले आहेत. त्यामुळे एक दिवस पोलीस अस्तित्वात राहतील की नाही अशी शंका निर्माण झालेली आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखीय नोंद

श्री. अनिल परब....

पोलिसांच्या मदतीवर अवलंबून राहून चालणार नाही. आपल्याला स्वत:चे संरक्षण आपण स्वत: करावयास पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पावर यांनी सांगितले की, त्यांनी ज्यावेळेला दौरा केला तेव्हा त्यांना डॉक्टर दारु प्यायल्याच्या अवस्थेत सापडले. दिवसा डॉक्टर दारु प्यायलेल्या अवस्थेत होते. रात्री पोलीसस्टेशनमध्ये असणारे पोलीस अधिकारी दारु प्यायलेल्या अवस्थेत असतात. मला असे वाटते की, राज्यात निर्माण होणारी दारु संपवण्याची जबाबदारी ही डॉक्टरांनी आणि पोलीसांनीच घेतली आहे की काय? सभापती महोदय, आम्ही तळागाळातील कार्यकर्ता असल्यामुळे रात्रीच्यावेळी पोलीसस्टेशनमध्ये जातो. पोलीस कशा अवस्थेत असतात ते आम्ही बघतो. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेमध्ये पोलिसांचे धिंडवडे निघत आहेत त्याबाबतीत कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत महाराष्ट्र शासन काय करणार आहे, हे या अभिभाषणामध्ये कुठेही लिहिलेले नाही. म्हणून मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण सपंवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या ठिकाणी आदरणीय राज्यपालांच्या अभिभाषणावर मी माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी उभा आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी जे भाषण केले त्यामध्ये आमची अपेक्षा अशी होती की, जरी त्यांची मातृभाषा मराठी नसली तरी सुध्दा आदरणीय राज्यपाल महोदय, किमान त्यांच्या भाषणाची सुरुवात तरी या महाराष्ट्रात मराठीतून करतील. परंतु तेही ते करु शकले नाहीत. याबद्दल खरोखरच खंत वाटते. दुसरा महत्वाचा प्रश्न असा की, राज्य शासनाने शिक्षण क्षेत्रात एक वेगळया प्रकारची वेटबिगारी सुरु केलेली आहे. नियमित वेतनश्रेणीमध्ये शिक्षकांना नेमणुका देण्याऐवजी गेल्या चार वर्षापासून महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणा-या शिक्षकांना मानधनावर काम करावे लागत आहे. शिक्षण सेवक योजना शासनाने सुरु केल्यामुळे आमचे अत्यंत क्वालिफाईड शिक्षक तीन ते पाच हजार रुपयावर काम करीत आहेत. ही शिक्षण सेवक योजना बंद करण्याच्या संदर्भात या राज्याचे उपमुख्यमंत्री महोदय श्री. आर.आर.पाटील साहेबांनी आणि अनेक कार्यक्रमामध्ये श्री. अजित पवार साहेब यांनी सुध्दा आपले मनोगत व्यक्त केलेले आहे की, शिक्षण सेवक योजना बंद करण्याचा आम्ही विचार करीत आहोत. पण त्याचा कुठेही उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आलेला नाही. गेल्या अनेक वर्षापासून ज्या अनेक शैक्षणिक संस्था आहेत. या शैक्षणिक संस्थांचे मेन्टेनन्स ग्रँन्ट आहे किंवा वेतनेत्तर अनुदान आहे ते कत्येक कोटी रुपये शासनाने अनुदान थकित ठेवलेले आहे. हे अनुदान वेळोवेळी त्या संस्थांना न मिळाल्यामुळे त्याचा विपरित परिणाम शिक्षण क्षेत्रावर विद्यार्थ्यांच्या एकूणच शैक्षणिक वातावरणावर होत आहे. तसेच त्याचा विपरित परिणाम शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणा-या शिक्षकांवरसुध्दा होत आहे. त्या सस्थांना वेतनेत्तर अनुदान न मिळाल्यामुळे शळेतील किंवा शैक्षणिक विकासाच्या ज्या खर्चाच्या बाबी आहेत त्यासाठी आमच्या शिक्षकांना खर्च करावा लागतो. शिक्षकांना कॉन्ट्रीब्यूशन करुन विजेची बिले भरावी लागतात. टेलिफोनची बिले भरावी लागतात.प्रिंन्टींगचे पैसे द्यावे लागत आहेत. त्यामुळे त्याचा विपरित परिणाम या शिक्षणक्षेत्रावर होत आहे. या शैक्षणिक संस्थांना त्यांचे वेतनेत्तर अनुदान देण्याचा कोणताही उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आलेला नाही. कोकण चार जिल्हयांचा विभाग आहे. त्याला जवळ जवळ 700 कि.मी.चा समुद्र किनारा लाभलेला आहे. त्या भागात पर्यटण म्हणा, मत्स्य व्यवसाय किंवा अन्य काही जलवाहतुकीचे उपक्रम राबविता येऊ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

शकतील. त्या भागामध्ये सुमारे 10 लाख हेक्टर जमीन पडीत आहे. पण परिस्थिती अशी आहे की, कोकणातील माणूस कोकणातील जनता तीन महिने पाण्यामध्ये बुडालेली असते आणि चार महिने पाण्यावाचून तडफडत असते. या भागामध्ये 125 इंचपेक्षा अधिक पाऊस पडतो त्यासंबंधात पाणी साठविण्याचे काही नियोजन केले तर चांगले उपक्रम त्या भागात राबविले जाऊ शकतात परंतु कोकण विकासाच्या संदर्भातील कोणताही मुद्दा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आलेला नाही.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

आदिवासी आणि नक्षलग्रस्त भागामध्ये काम करणारे राज्य शासनाचे जे कर्मचारी आहेत किंवा अन्य क्षेत्रामध्ये काम करणारे कर्मचारी आहेत त्यांच्यासाठी विशेष प्रकारचा प्रोत्साहन भत्ता देण्याचा आणि वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्याचा निर्णय शासनाने 6 ऑगस्ट, 2002 ला घेतलेला आहे. हे कर्मचारी इतर लोकांच्यापेक्षा वेगळया भागामध्ये काम करतात, वेगळया वातावरणामध्ये काम करतात. काही गोष्टीचा त्यांना त्याग करावा लागतो म्हणून त्यांना हा विशिष्ट टक्के प्रोत्साहन भत्ता दिला जातो. आज अशी परिस्थिती आहे की, नक्षलग्रस्त भागामध्ये किंवा अतिसंवेदनशील भागामध्ये सुध्दा आमच्या कर्मचाऱ्यांना 200 रुपये, 300 रुपये प्रोत्साहन भत्ता मिळतो. शासकीय नियमाप्रमाणे 15 टक्के प्रोत्साहन भत्ता दिला पाहिजे पण तेवढा भत्ता दिला जात नाही. यासाठी वर्षानुवर्षे संघर्ष करीत आहोत. तो भत्ता देण्याबाबत आश्वासने दिली जातात. हा प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत किंवा आदिवासी भागामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिलासा देण्याबाबतचा कोणताही मुद्दा या अभिभाषणामध्ये आलेला नाही. महाराष्ट्राच्या आदिवासी आश्रमशाळांच्या बाबतीतही दुर्लक्ष झालेले आहे. त्याचा कोणताही उल्लेख अभिभाषणामध्ये आलेला नाही. सर्वात महत्वाची समस्या अशी आहे की, महाराष्ट्रामध्ये मराठी माध्यमाच्या शाळा टिकल्या पाहिजेत. दिवसेंदिवस मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत. त्यामुळे आमचे शिक्षक बेकार होत आहेत. मुंबईमध्ये गेल्या चार वर्षामध्ये 650 तुकडया बंद झालेल्या आहेत. मागच्या वर्षी काही तुकडया टिकू शकणार नाही अशी मला बातमी मिळाली. त्या तुकडया बंद पडणार आहेत म्हणून 275 शिक्षण सेवकांचा पगार बंद करा अशी संस्था चालकांना नोटीस दिलेली आहे. आपली सेवा समाप्त करण्यात येत आहे अशी त्यांना नोटीस दिलेली आहे. त्यामुळे मराठी माध्यमाच्या 275 शिक्षण सेवकांना धोका निर्माण झालेला आहे. त्यांची सेवा असुरक्षित झालेली आहे. अशा प्रकारे महाराष्ट्रामध्ये मराठी माध्यमाच्या शाळांचा प्रश्न फार बिकट झालेला आहे. त्याचा कोणताही उल्लेख या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही. सभापती महोदय, दुसरा एक महत्वाचा मुद्दा म्हणजे महाराष्ट्राची जी एन.सी.सी. विंग आहे ज्याला आपण राष्ट्रीय छात्र सेना म्हणतो त्यांनी प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने परेडमध्ये भाग घेऊन पंतप्रधान ध्वज पटकाविलेला आहे. महाराष्ट्र राज्यात अशा प्रकारे नेतृत्वगुण वाढीस लागावे, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय प्रेम निर्माण व्हावे म्हणून एम.सी.सी. नावाची योजना सुरु

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

झाली होती. ती योजना बंद करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या काही योजना सुरु करण्याच्या बाबतीत शासनाचे काय धोरण आहे यासंदर्भात या अभिभाषणामध्ये उल्लेख आलेला नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे या महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेची जी परवड होत आहे त्यासंदर्भात सुध्दा या अभिभाषणामध्ये मुद्दा आलेला नाही. या महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेला प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळावे याविषयी कोणताही मुद्दा अभिभाषणात आलेला नाही. तालुका आणि जिल्हा न्यायालयामधील कामकाज सर्वसामान्य जनतेपर्यन्त पोहोचण्यासाठी त्या ठिकाणी मराठीतून कामकाज व्हावे याची चर्चा झालेली आहे. परंतु मराठीला प्रेरणा किंवा प्रोत्साहन देण्यासाठी आणि मराठी माणसांपर्यन्त ही सगळी माहिती पोहचविण्यासाठी ताबडतोब या न्यायालयातील कामकाज मराठीतून चालविण्यासंबंधीचा कोणताही उल्लेख या अभिभाषणामध्ये आलेला नाही. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील (उपमुख्यमंत्री) : माननीय सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी जो अभिनंदनाचा प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाला सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी अनुमोदन दिलेले आहे. या प्रस्तावावर साधारणत: 21 तें 22 सन्माननीय सदस्यांनी आणि विरोधी पक्ष नेत्यांनी आपली मते व्यक्त केलेली आहेत. प्रदीर्घ काळ चाललेल्या या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. नेहमीचा संकेत असा आहे की, ज्या विषयावर आपण भाषण करतो त्या विषयावरच्या उत्तराला हजर असावे. परंतु माननीय विरोधी पक्ष नेते काही कामानिमित्त बाहेर गेलेले आहेत.

श्री. अनंत तरे : ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रस्ताव मांडला त्या सुध्दा सभागृहात हजर नाहीत.

श्री. आर. आर. पाटील : ज्यांनी प्रस्ताव मांडला त्या सन्माननीय सदस्याही गैरहजर आहेत. ज्यांनी भाषणे केली त्यापैकी जवळजवळ निम्मे सन्माननीय सदस्य सभागृहातून निघून गेलेले आहेत.

श्री. अनंत तरे : दोन्ही बाजूचे सदस्य निघून गेलेले आहेत.

श्री. आर. आर. पाटील : भाषण करणारे जास्त सदस्य समोरच्या बाजूचे हाते. सभापती महोदय, मी अधिक वेळ न घेता

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

ज्यांनी या अभिभाषणाच्या प्रस्तावावर आपली मते व्यक्त केली त्याबद्दल धन्यवाद देतो, मी त्यांचा आभारी आहे. ज्यांनी अभिभाषणावर आपले विचार मांडून उत्तर ऐकण्यासाठी उपस्थिती राखली त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. तसे पाहिले तर पूर्ण मंत्रिमंडळाची रचना झाल्यानंतर राज्यपालांनी केलेले हे पहिलेच अभिभाषण आहे. ज्यावेळी मंत्रिमंडळामध्ये मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री हे दोघेच होते त्यावेळी देखील राज्यपालांनी दोन्ही सदनाच्या संयुक्त बैठकीमध्ये अभिभाषण केले होते. कोणत्याही राज्यपालांनी केलेले भाषण त्या वर्षासाठी सरकारची दिशादर्शक भाषण असते. सरकार कोणत्या गोष्टी, कोणत्या योजना करु इच्छिते, सरकारची उद्दिष्टये काय आहेत, पाठीमागच्या वर्षामध्ये साधारणत: कोणती उद्दिष्टये गाठण्यासाठी यश मिळविले आहे आणि कोणत्या पध्दतीने केंद्रबिंदू मानून साधारणत: पुढील वर्षामध्ये शासन काम करणार आहे याचा थोडक्यात आढावा राज्यपाल आपल्या भाषणात घेत असतात. या अभिभाषणातील 56 मुद्यांमधून लोकशाही आघाडीचे सरकारे कोणत्या क्षेत्रासाठी, कोणत्या सेक्टर व कोणत्या विभागासाठी कशापध्दतीने काम करणार आहे याची मुख्य दिशा दिसू शकेल, समजू शकेल अशापध्दतीचे एक उत्कृष्ट भाषण आपल्या राज्यपाल महोदयांनी केले आहे. सरकार सत्तेवर आल्यानंतर सरकारचे वास्तविक हे पहिलेच अभिभाषण असल्यामुळे आणि राज्यामध्ये राज्यपाल आल्यानंतर राज्यपालांचे दोन्ही बाजुने ख-या अर्थाने अभिनंदन झाले असते तर एक चांगल्या समन्वयाची सुरुवात झाली असती असा अर्थ निघाला असता. परंतु अगदी शुध्दलेखनांच्या चुकांपासून उणिवा शोधण्यापर्यंत आमच्यासमोरच्या मित्रांनी कोठेही कसूर सोडली नाही आणि हे काम करीत असतानाच काही सदस्यांकडून अतिशय चांगल्या सूचना करण्यात आलेल्या आहेत त्याचा विचार भविष्यामध्ये निश्चितपणे करु. मा.विरोधी पक्ष नेत्यांनी आपले भाषण करीत असताना अनुशेषाचा मुद्दा उपस्थित केला. हे राज्य एकसंघ रहावयाचे पाहिजे असे म्हणतो परंतु आज विभागाविभागामध्ये ताणतणाव निर्माण होत असताना दिसत आहेत. विकासाच्या कामाबद्दल संघर्ष उठताना दिसत आहेत. त्याच्याबद्दल सगळयांनी विचार करण्याची आवश्यकता आहे. या दोन्ही सदनांच्या माध्यमातून विभागाविभागातील ऐक्य मजबूत करण्याची भूमिका मजबूत बजावली पाहिजे. परंतु आज अल्प, आत्मकेंद्रित भूमिका घेऊन तणाव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

वाढतील अशापध्दतीचे वातावरण दुर्दैवाने निर्माण होत आहे. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होण्यासाठी 105 जणांना आपले हौतात्म्य द्यावे लागले आणि सगळया मराठी भाषिकांची मान उंचावेल असे कर्तृत्वान मराठमोळया माणसांचे मराठी राज्य अस्तित्वात आले. राज्याच्या एकत्रित अस्तित्वातच मराठी माणसाची जडणघडण अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकेल असे स्वप्न राज्याच्या ज्या शिल्पकारांनी तयार केले ते अधिक मजबूत करण्याची आवश्यकता आहे. याठिकाणी विरोधी पक्षाकडून अनेक चांगल्या सूचना करण्यात आल्या आहेत. प्रामुख्याने मराठवाडा आणि विदर्भात पडलेल्या दुष्काळावर शासनाचे लक्ष वेधण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. काही प्रमाणात नैसर्गिक कारणामुळे, इंटरस्टेट प्रकल्पामुळे अनुशेष निर्माण झालेले आहेत ही वस्तुस्थिती कोणीही नाकारु शकत नाही. त्यातही या राज्याचा जर खरा इतिहास बघितला तर अनुशेष सगळयात कधी जास्त निर्माण झाला असेल तो युतीच्या राजवटीमध्ये वाढलेला आहे, हे मी राजकीय बोलत नाही. कृष्णा खोरे महामंडळ, रस्ते विकास महामंडळ केली गेली, कर्ज वाढले आणि एकाचवेळी अनेक प्रकल्प सुरु झाले, नंतर आलेल्या सरकारला जुने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी, जुन्या काढलेल्या कर्जाची व्याजे देण्यासाठी पुन्हा कर्ज काढावी लागली आणि विशिष्ट सर्कलमध्ये राज्य अडकल्याचे पहावयास मिळत आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...)

सभापती महोदय, मी त्यांना दोष देत नाही. परंतु त्याच काळामध्ये अशी परिस्थिती निर्माण झाली होती की, कृष्णेच्या पाण्यावर खाली कर्नाटक सरकार हक्क सांगायला उठले होते, आंध्रप्रदेशने पाणी अडवण्याच्या बाबतीत आपल्या पेक्षा खूप बाजी मारली होती. लवादाचा निर्णय असा होता की, प्रत्यक्ष पाण्याचा वापर गृहीत धरुन हे पाणी 2000सालापर्यन्त वापरणार नाही त्या पाण्याच्याचे फेर वाटप होईल. तेव्हा ती देखील शक्यता होती. यामुळे एकाच वेळी अनेक प्रकल्प कृष्णेच्या खो-यामध्ये सुरु करण्याची चूक युतीच्या सरकारने केली असे मी नक्कीच म्हणणार नाही. परंतु त्याचवेळी जी गोष्ट बरोबर केली होती ती गोष्ट आज सत्तेतून पायउतार झाल्यानंतर चुकीची वाटत असेल तर राज्याच्या हिताचे सुध्दा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. अनुशेष दूर झाला पाहिजे आणि त्यादृष्टीने मागील साडेचार वर्षामध्ये अनुशेष दूर करण्यामध्ये जेवढा प्रत्यक्ष निधी उपलब्ध झाला तेवढा निधी महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये कधीही झाला नव्हता. परंतु अनुशेषासाठी अधिकचा निधी देऊन सुध्दा आज विदर्भातील आणि मराठवाडयातील जनतेची मने दुखावलेली आहेत आणि त्याची शासनाला पूर्णपणे कल्पना आहे. आम्ही हे निश्चित केलेले आहे की, एका बाजूने अनुशेष दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे. त्याच बरोबर ज्या नदीच्या पाण्याच्या बाबतीत लवाद आहेत, ज्या नद्यांवर इंटरस्टेट प्रोजेक्ट आहेत, ज्या नद्या इंटरस्टेट आहेत, अशा प्रोजेक्टना प्राधान्य देऊन मग ते कृष्णा खोरे असेल, तापी खोरे असेल किंवा गोदावरी खोरे असेल, त्या खो-यातील जे पाणी लवादाने राज्याच्या हिश्याला दिलेले आहे त्यातील थेंब-न्-थेंब पाणी राज्यामध्ये राहिले पाहिजे. महाराष्ट्राच्या हिश्याच्या पाण्यावर कोणीही एका थेंबाचाही हक्क सांगता कामा नये असा प्रयत्न करण्याचा निर्धार आम्ही निश्चितपणे केलेला आहे. त्या दृष्टीने आम्ही पावले टाकत असून केन्द्र सरकारकडून अधिकचा निधी उपलब्ध करुन घेणे, अधिकचा कर्ज पुरवठा उपलब्ध करुन घेणे आणि या योजनांना चालना देणे या बाबी आम्ही केन्द्रीभूत मानलेल्या आहेत. गेल्या वर्षी पश्चिम महाराष्ट्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडला होता. जवळ जवळ 1600कोटी रुपया पेक्षा अधिक खर्च हा जनावरांच्या चा-यासाठी करण्यात आला आणि तितकाच खर्च रोजगार हमीसाठी करण्यात आला. खूप मोठ्या प्रमाणावर आपणाला खर्च करावा लागला. मा. विरोधी पक्ष नेत्यांनी याठिकाणी भावना व्यक्त केली. गेल्या वर्षी दुष्काळामध्ये जेवढी गावे होती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...)

त्याच्या बरोबर दुप्पट संख्येने आज गांवावर दुष्काळ पडलेला आहे. दुष्काळाच्या बाबतीत दुजाभाव दाखवला जातो असे त्यांनी सांगितले. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या या मताशी मी सहमत होत नाही. कोणत्याही जिल्हयातील, विभागातील लोकांना अडचणी येतात, लोक नैसर्गिक आपत्तीत सापडतात अशा वेळी ते कोणत्या विभागातील आहेत हे पाहून त्यांना मदत करण्याचे दळभद्री राजकारण कुणाच्याही राजवटीमध्ये यापूर्वी केले गेले नव्हते आणि ते आजही करणे शक्य नाही. ही गोष्ट खरी आहे की, गेल्या वर्षीच्या जितक्या गावांमध्ये दुष्काळ पडला होता त्या पेक्षा यावर्षी दुष्काळ पडलेल्या गावांची संख्या जास्त आहे. गेल्या वर्षी ज्या भागामध्ये दुष्काळ पडला होता त्या भागात सलग 4 वर्षे दुष्काळ होता. त्यामुळे त्या भागामध्ये दुष्काळाची तीव्रता कित्येक पटीने आहे. गेल्या वर्षीच्या दुष्काळामध्ये 12 लाख लोक रोजगार हमी योजनेच्या कामावर होते. आज दुष्काळ पडलेल्या गावांची संख्या दुप्पट असनू सुध्दा राज्यातील रोजगार हमी योजनेच्या कामावर 4 लाख 20 हजार लोक कामावर आहेत. गेल्या वर्षी याच महिन्यामध्ये जवळ जवळ 2900 टँकरने पाणी पुरवठा केला जात होता. आज गावांची संख्या दुप्पट आहे आणि 468 टँकरने गावांना पाणी पुरवठा केला जात आहे. याचा सरळ अर्थ असा आहे की, विदर्भातील अनेक गावांना तितक्याच तीव्रतेने दुष्काळाचा फटका भसलेला आहे. 50 पैशाच्या आत आणेवारी, दुष्काळ हे आपल्या राज्यातील प्रश्न आहेत. गेल्या वर्षी मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये पाण्याची पातळी जितकी खाली गेली होती तेवढी ती आज गेलेली नाही. काही प्रमाणात रोजगार उपलब्ध होतोय.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

पण या निमित्ताने मी स्पष्टपणाने ग्वाही या सदनाच्या मार्फत विदर्भ आणि मराठवाडयातील दुष्काळग्रस्त लोकांना देऊ इच्छितो की, पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांना गेल्या वर्षी जी मदत, ज्या सवलती दिल्या होत्या त्या सगळयाच्या सगळया सवलती विदर्भ आणि मराठवाडयातील लोकांना जशाच्या तशा देण्यात येतील. कर्जाच्या वसुलीस स्थगिती दिली जाईल. जनावरांच्या चा-यासाठी अनुदान उपलब्ध करुन दिले जाईल, ज्या गावात पिण्यासाठी पाणी नाही त्या ठिकाणी टँकर्स उपलब्ध करुन दिले जातील आणि मागेल त्याला काम देण्याची भूमिका स्वीकारली जाईल. काही ठिकाणी प्रशासकीय अडचणीमुळे रोजगार उपलब्ध होऊ शकत नसेल, त्या स्तरावर स्कॉड नेमले जातील आणि लोकांना रोजगार उपलब्ध होईल अशा पध्दतीचे धोरण स्वीकारले जाईल. जरी 10 हजार 234 गावांमध्ये दुष्काळ असला तरी मी ठामपणे सांगू इच्छितो की, रोजगार नाही, पिण्याचे पाणी नाही म्हणून मराठवाडयातील आणि विदर्भातील काही नागरिकांना स्तलांतर करावे लागले अशी नामुष्कीची वेळ येऊ देणार नाही या गोष्टीची सदनामार्फत राज्यातील तमाम जनतेला ग्वाही देऊ इच्छितो. नैसर्गिक आपत्तीमध्ये विभागवाद असूच शकत नाही. आज त्या परिसरातील लोक दुष्काळाने होरपळता आहेत, अशा वेळी त्यांना योग्य न्याय देण्याची भूमिका राज्य सरकारने स्वीकारलेली आहे. त्या विभागातील धान उत्पादक शेतक-यांना न्याय देण्यासाठी 83 कोटी रुपये शासनाने खर्च केले. गारपीट झाली त्यात बाधीत झालेल्या शेतक-यांना मदत करण्याची भूमिका स्वीकारली. नैसर्गिक आपत्तीत जे सापडले त्यांना मदत करण्याची यापूर्वीची भूमिका राज्य सरकारकडून स्वीकारली जाईल. या ठिकाणी असाही प्रश्न उपस्थित केला गेला की, मागच्या वेळी केंद्र सरकारकडून मागितली गेली होती. त्या अनुषंगाने या ठिकाणी आरोप केले गेले. यावेळी केंद्र सरकारकडे मदत का मागण्यात आली नाही अशी विचारणा केली गेली. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, मागच्या वेळी मदत मागण्याची आवश्यकता वाटत होती. कारण मागच्या वर्षी रोजगार हमी योजनेवर जास्त प्रमाणात मजूर काम करीत होते. मजुरीवर खूप पैसे खर्च होत होते. आज रोजगार हमी योजनेच्या कामावर फक्त 4 लाख 20 हजार मजूर काम करीत आहेत. आज केंद्र सरकारने आपणहून दिलेली मदत, केंद्र सरकारने आपणहून पाठविलेले धान्य गोडाऊन्समध्ये कुठे ठेवावयाचे हा या राज्यापुढे प्रश्न निर्माण झालेला आहे. मला केंद्र सरकारला मनापासून धन्यवाद दिले पाहिजे की, एक काळ होता मागून मदत मिळत नव्हती. मी व्यक्तिगत,

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील..

कुठल्या राजकीय पक्षाला अजिबात दोष देणार नाही. पण आज न मागता केंद्र शासनाकडून महाराष्ट्रास भरमसाठ मदत मिळावयास लागली आहे ही गोष्ट मी सदनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. जनावरांसाठी लागणारा चारा असेल, रोजगार हमी योजनेवर होणारा खर्च असेल, हा राज्य सरकारची आजची परिस्थिती बघितल्या नंतर 1 हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव मदत मागण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठविण्याचे ठरविले आहे. केंद्र सरकार या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद देईल, आणि केंद्र शासनाकडून महाराष्ट्राला ही आर्थिक मदत उपलब्ध होईल अशा पध्दतीच्या आशा मी व्यक्त करतो. केंद्र सरकारने आपले पाहणी पथक विदर्भ आणि मराठवाडयात लवकरात लवकर पाठवावे अशाही पध्दतीची राज्य सरकारमार्फत विनंती केली जाईल. आज जे तत्कालिक प्रश्न निर्माण झालेले आहेत त्यावर खंबीरपणेपणे मात केली जाईल. नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या लोकांना मदत केली जाईल. आज राज्यापुढे दुष्काळ हीच एक समस्या नाही. माझ्या सारख्याला भेडसवणारी सगळयात मोठी समस्या दिवसें दिवस राज्यात वाढत चाललेली बेकारी ही आहे. काही कुटुंबातून पहिली पिढी शिकून तयार व्हावयास लागली. मोठया अपेक्षेने ती शिकली. पण आज भांडवली गुंतवणूक ज्या पध्दतीने वाढते आहे,त्या पध्दतीने रोजगार निर्मिती वाढत नाही ही वस्तुस्थिती आहे. आज सेवायोजन कार्यालयातील नोंदणी 44 लाखापर्यन्त पोहोचलेली आहे. शहाणी माणसे सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणीच्या भानगडीतच पडत नाहीत. कारण वडिलांनी नाव नोंदविले आहे त्यांना कॉल आला नाही. तर त्याचा मुलगा स्वाभावीक विचार करतो की, अजून वडिलांचा कॉलला नंबर लागला नाही तर आपले नाव नोंदवून काय उपयोग आहे अशी काही उदाहरणे माझ्या लक्षात आणून देण्यात आलेली आहेत. नोंदविलेली नावे 44 लाख आहेत. न नोंदविलेली नावे आणखी जास्त आहेत. म्हणून विचारपूर्वक या राज्याच्या औद्योगिकरणास चालना मिळेल, या राज्यातील शेतीला पाणी मिळेल आणि या राज्यामध्ये जे मनुष्यबळ आहे त्यांना शेतामध्ये काम मिळेल, कारखान्यामध्ये काम मिळेल अशी व्यवस्था निर्माण करण्याची आज गरज आहे. आपल्या राज्यातील तज्ञ मनुष्यबळ जगातील कानाकोप-यात जाऊन चार पैसे मिळवून राज्याचा लौकिक वाढवील अशा पध्दतीची धोरणे घेण्याची भूमिका आम्ही स्वीकारलेली आहे,त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानास, जैविक तंत्रज्ञानास चालना देणे या बाबी आम्ही प्रामुख्याने केंद्रीत केलेल्या आहेत.

यानंतर श्री.उपरे...

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखीय नोंद

(श्री.आर.आर.पाटील)

राज्य सरकारची नेहमीच धारणा आहे की, आजपर्यंत या राज्याला अनेक दिग्गज नेते लाभले. ज्यांचा वारसा आपण जोपासत आहोत असे कर्तृत्ववान अनेक नागरीक या राज्याला लाभले आणि त्यांनी केलेल्या कर्तृत्वामुळे प्रतिकूल नैसर्गिक परिस्थिती असतानासुध्दा देशातल्या कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्र राज्य हे प्रत्येक चांगल्या कामाच्या बाबतीत देशामधील अग्रेसर राज्य आहे. सामाजिक सुधारणांच्या बाबतीत, औद्योगिक प्रगतीच्या बाबतीत, राजकीय प्रगतीच्या बाबतीत आणि शैक्षणिक प्रगतीच्या बाबतीत आज महाराष्ट्रा इतकी लोकसंख्या असलेली राज्ये महाराष्ट्राच्या पासंगालासुध्दा पुरत नाहीत ही या राज्याची 50 वर्षांची उज्ज्वल परंपरा आहे. हीच परंपरा भविष्यामध्ये जोपासली पाहिजे म्हणून आजपर्यंत जी चांगली सुत्रे आणि जी चांगली धोरणे राज्याने स्वीकारली त्यात आणखी भर टाकत हे राज्य पुढे नेण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. एका बाजूनी अनुशेष भरून काढत दुस-या बाजूनी सामाजिक न्याय देण्याची भूमिकासुध्दा स्वीकारण्याचा निर्णय या अभिभाषणामध्ये व्यक्त होताना आपल्याला दिसत आहे. आजही आपण प्रगतशील महाराष्ट्र म्हणत असताना, प्रगतीच्या बाबतीत देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य म्हणत असताना महाराष्ट्रामध्ये गोरगरीब मुले जर कुपोषणाने मरत असतील तर हे कुपोषण प्रगतशील महाराष्ट्रावरील आपण कलंक मानला पाहिजे आणि याच्या विरोधात एक व्यापक कार्यक्रम हातामध्ये घेऊन या राज्यामध्ये जगण्याचा हक्क घेऊन जन्माला आलेले एकही बालक पोटाला मिळाले नाही म्हणून मरता कामा नये. कुपोषित होता कामा नये. जगण्याचा हक्क त्याला मिळाला पाहिजे यादृष्टीने राजमाता जिजाऊ माता-बाल कल्याण मिशन स्थापन करण्याचा राज्य सरकारने निर्णय घेतला आहे. आदिवासी आणि गरीब माणसांसाठी असलेल्या सगळ्या योजनांचे मॉनेटरिंग चांगल्या पध्दतीने करून गरीब आणि गरजू माणसांपर्यंत या योजना चांगल्या पध्दतीने पोहोचतील यादृष्टीने आम्ही लक्ष केंद्रीत करू.

सभापती महोदय, आदिवासी क्षेत्रामध्ये लोकांना रोजगार मिळत नाही. ठाणे जिल्ह्यामध्येसुध्दा रोजगार मिळत नाही अशा पध्दतीच्या तक्रारी करण्यात आल्या. पण माझ्याकडे जी माहिती उपलब्ध आहे त्यामध्ये राज्यामध्ये जे आदिवासी जिल्हे आहेत त्या ठिकाणी रोजगार हमी योजनेवर आज 1 लाख 66 हजार लोक प्रत्यक्ष काम करीत आहेत आणि त्यापैकी एकट्या ठाणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.आर.आर.पाटील)

जिल्ह्यामध्ये 59 हजार लोक आज कामावर आहेत. अध्यक्ष महोदय, प्रशासकीय त्रुटीमुळे जर कोठे लोकांना काम मिळत नसेल तर जागृत लोकप्रतिनिधींनी या बाबी लक्षात आणून द्याव्यात. डोंगरी विभागामध्ये, आदिवासी क्षेत्रामध्ये काम मिळाले पाहिजे आणि मागेल त्याला काम देण्याचा आपल्या राज्याचा कायदा आहे. त्यामुळे प्रसंगी अन्य विकास कामे बाजूला ठेवली जातील, प्लॅन गुंडाळला जाईल पण गरीब माणसांना या राज्यात काम नाही अशा पध्दतीची स्थिती निर्माण होऊ दिली जाणार नाही. जे अधिकारी दुर्लक्ष करतात त्यांच्यावर कारवाई करण्याची भूमिका ही निश्चितपणे स्वीकारली जाईल. या राज्यातील दलितांच्या बाबतीत सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी भावना व्यक्त केली. पुरोगामी महाराष्ट्रामध्ये दलितांवर अत्याचार होता उपयोगाचे नाहीत. मी सगळीच आकडेवारी वाचून दाखविण्यामध्ये वेळ घालवू इच्छित नाही. पण गेले एक वर्ष महाराष्ट्रामध्ये भाग्यशाली असे गेले. ब-याच वर्षानी भाग्यशाली गेले. एकाही सवर्णाकडून दलिताचा एकही खून न झालेले महाराष्ट्राच्या इतिहासातील जर कोणते वर्ष असेल तर ते गेले वर्ष होते. या दोन महिन्यांमध्येसुध्दा अशी घटना घडली नाही. सवर्ण व्यक्तिकडून दलिताचा खून होणे ही चांगली गोष्ट नाही. महाराष्ट्राने विचारपूर्वक या गोष्टीला पूर्णविराम दिलेला दिसतो आहे. हे सौदाहार्याचे वातावरणच समाजा-समाजामध्ये एकतेची भावना निर्माण करेल असा विश्वास बाळगायला काही हरकत नाही. आज दलितांवर होणा-या अन्यायांच्या बाबतीत आणि गुन्ह्यांच्या बाबतीत दिवसे दिवस महाराष्ट्रामध्ये घट व्हायला लागली आहे हे आपण सुचिन्ह मानले पाहिजे आणि हा आकडा शुन्यावर आणण्यासाठी आपणसुध्दा सगळ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. याच भावना मी या निमित्ताने व्यक्त करीन. माननीय राज्यपाल महोदयांनी अभिभाषण अतिशय चांगले केले आहे. औद्योगिक वाढीला चालना देत शिक्षणावर केंद्रीकरण करून गेल्या वर्षभरातील परिस्थितीचा पूर्णपणे आढावा घेतला आहे. हे सगळे प्रश्न सोडवित असताना राज्यामध्ये काही प्रश्न नव्याने निर्माण झालेले आहेत.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

सभापती महोदय, 1994 सालापर्यन्त दुस-या राज्याला वीज देणारे आपले राज्य होते. आपल्या राज्याला लागेल त्यापेक्षा अधिकची वीज या राज्यामध्ये आपण निर्माण करीत होतो.परंतु आता दिवसाला सात ते आठ तास लोड शेडीग करावे लागत आहे.इन्डस्ट्रीजवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे.शेती उद्योगाला त्याचा मोठा फटका बसला आहे.त्याचबरोबर नागरिकांना मोठया प्रमाणावर गैरसोय सहन करावी लागत आहे.एखादी चूक झाली तर तिचा किती प्रदीर्घ काळ परिणाम होत असतो याचा अनुभव आणि प्रचिती आज महाराष्ट्राला येत आहे.1993-94 सालासाठी आपण राज्यामध्ये तो प्रकल्प आणला होता व .700 मेगॅवॅटस वीज निर्मितीचा हा प्रकल्प होता.हा प्रकल्प महागडा असून तो अमेरिकेचा आहे त्यामुळे आम्ही हा प्रकल्प अरबी समुद्रात बुडवू अशी भूमिका घेण्यात आली होती.दुर्दैवाने तो अरबी समुद्रात बुडवलासुध्दा परंतु नंतर तीनपट मोठे करुन त्याला पुन्हा वर काढण्याचे पाप झाले गेले. नंतर हा वाद लंडनच्या लवादाकडे गेला होता . त्यामुळे हा निर्णय झाला नाही. एका एन्रॉन सबंधीचा निर्णय अनिर्णित राहिल्यामुळे नवीन प्रकल्प घ्यावेत की नकोत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.जर नव्याने प्रकल्प घेतले, नवीन कर्जे काढली आणि लवादाने पुन्हा एन्रॉन प्रकल्प महाराष्ट्राच्या माथ्यावर मारला तर दोन्ही कडील वीज महाराष्ट्र घेऊ शकणार नाही.दोन्ही कर्जे महाराष्ट्राला पेलणार नाहीत.मागील पाच वर्षात नवीन वीज निर्मिती झाली नाही.एन्रॉनचा गुंता व तिढा सुटला नाही. आज पीक पिरिअडला 3 हजार मेगॅवॅटसची भासत असलेली विजेची कमतरता दैनंदिन जीवनात खूप मोठी गैरसोय निर्माण करते.यावर काही भूमिका घेण्याची आवश्यकता होती. सुदैवाने केन्द्र सरकारने या बाबतीत काही अनुकूल भूमिका घेतलेली आहे.केन्द्र सरकारच्या महामंडळाकडून जर एन्रॉन प्रकल्प सुरु झाला तर त्याची वीज महाराष्ट्र सरकार घेऊ शकेल अशा प्रकारचा होकारही त्यांना देण्यात आला आहे.परंतु केवळ तेवढयावरच न थांबता विजेच्या निर्मितीच्या क्षेत्रात खाजगी गुंतवणूक झाली पाहिजे अशा प्रकारची योग्य वास्तववादी भूमिका आज राज्य सरकारने स्वीकारलेली आहे.2010 सालापर्यन्त जर वीज निर्मिती आपण केली नाही तर 7 हजार मेगॅवॅटसची विजेची कमतरता भासेल. आज 9000 मेगॅवॅटसची वीज आपण जिकरीने निर्माण करीत आहोत आणि पीक पिरिअडला साडे अकरा हजार वीज मॅगॅवॅटसची मागणी या राज्यात असते.ज्या दिवशी सात हजार मॅगॅवॅटसची वीज कमी पडेल त्यावेळी दिवसातून चार पाच तास वीज मिळेल

आणि बाकीच्या वेळी लोड शेडीग असेल.अशा परिस्थितीमध्ये राज्य प्रगती करु शकणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ..

म्हणून आम्ही असा निर्णय घेतला आहे की खाजगी गुंतवणुकीला या क्षेत्रात चालना देण्याची भूमिका स्वीकारावी. खाजगी उद्योगपतीनी, खाजगी उद्योजकांनी येथे येऊन वीज निर्माण करावी आणि राज्य सरकारला तसेच वीज मंडळाला परवडेल अशी वीज त्यांनी द्यावी अशा प्रकारची वास्तववादी भूमिका राज्य सरकारने स्वीकारलेली आहे.जर स्व निधीतून वीज निर्मीती करण्याचे ठरवले तर 56 हजार कोटी रुपये त्याकरता लागतील आणि एवढे पैसे गुंतवणे राज्य सरकारला शक्य नाही.ही गोष्ट खरी आहे. सवंग लोकप्रियतेची भूमिका आपण स्वीकारली. अर्थकारण आणि राजकारण एकत्र करण्याचा प्रयत्न केला तर खूप मोठा फटका बसतो. अनुभवातील काही गोष्टी शिकण्यासाठी आणि शहाणे होण्यासाठी असतात. वास्तविक आज मोफत विजेच्या बाबतीत खाजगीत आपण काय बोलतो हे मी आपल्याला सांगण्याची आवश्यकता नाही.ऐपतदार माणसाला मोफत वीज का द्यावी ? हे सर्वाचे मत बनते. तरी सुध्दा सरसकट सर्वांना वीज मोफत दिलेली आहे.याचे सर्वच पाप आमच्या बाजूला नाही हे मी विनम्रपणे आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. वास्तविक आपण पहिल्यांदा अशी घोषणा केली की आम्ही जर सत्तेवर आलो तर मोफत वीज देऊ.यामुळे आम्ही असा विचार केला की मोफत विजेची घोषण करुन आपण सत्तेत आला तर आमचेक खूप मोठे नुकसान होईल. "मरता क्या नही करता" म्हणून त्यासंबंधी आपण घोषणा केली आणि त्याची प्रत्यक्षात कृती आम्ही केली. त्यामुळे आज विजेचा वापर वाढला आणि पाण्याची पातळीसुध्दा खाली गेली आहे.आपण त्याची काळजी करु नका. या राज्यातील काही धोरणे सर्वानी एकत्र बसून ठरविण्याची आवश्यकता आहे हे मी आज दिवसभर बघत आहे.आपण जर घोषण केली नसती तर आम्ही कृती केली नसती.आंध्र राज्याचा अनुभव आमच्या पुढे होता. मोफत विजेची घोषणा करत आंध्र राज्यामध्ये कॉग्रेस पक्ष सत्तेवर आले आणि आम्हालासुध्दा असे वाटले की त्यांचे अनुकारण आम्ही करावे म्हणून आम्ही ती भूमिका स्वीकारली.परंतु आज केठे तरी जमिनीवर पाय टेकवत व्यवहार्य भूमिका घेण्याची निश्चित आवश्यकता आहे.याचा अर्थ मात्र असा नाही की, या राज्यातील गोरगरीब सामान्य माणसाला किंवा आता कोठे तरी ज्याच्या कुटूंबात चांगले 4 दिवस निर्माण होत आहे अशा माणसाच्या तोंडचा घास काढून घेण्याची भूमिका कधीच घेतली जाणार नाही .

नंतर श्री.कानडे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

सभापती महोदय, मी आपल्याला ग्वाही देईन की, ज्यांची ऐपत नाही आणि ज्याला मोफत वीज देण्याची आवश्यकता आहे त्यांना जरुर मोफतच वीज दिली पाहिजे. प्रसंगी आणखी काही मदत करण्याची भूमिका स्वीकारली पाहिजे. परंतु ऐपतदारांना मग ते कोणत्याही क्षेत्रातील लोकांना मोफत वीज द्यावयाची काय यावर एकत्र बसून विचार होऊ शकतो. आघाडी शासन स्थापन झालेले असले तरी आमची समन्वय समिती नेमलेली नाही . समन्वय समिती नेमल्यावर यावर जरुर विचार होईल. परंतु हवेत बार काढण्याचे धोरण ब-याच वेळेला होते. झोपडपट्टयांच्या बाबतीत दिल्लीवरुन फोन आला काय ? दिल्लीवरुन पत्र आले काय ? याबाबतीत काही निर्णय घेतला काय ? तुमच्या जाहीरनाम्यामध्ये तुम्ही असे म्हणाला होता. मते देताना या राज्यातील जनतेने आमचा जाहीरनामा वाचला नसेल तेवढा आम्हांला जाब विचारण्यासाठी वाचला जात आहे.आमचा जाहीरनामा निवडणुकीपूर्वी नव्हे तर निवडणुकीनंतर वाचला जातो. आमचा जाहीरनामा कोणी तरी वाचत आहे या गोष्टीचे मला मनापासून समाधान आहे.आज विरोधक जास्त प्रमाणात जाहीरनामा वाचत आहेत.अजून जाहीरनामा वाचून मते देण्याइतपत जनमत जागे झाले असे म्हणता येणार नाही आजही लोकांना मत देण्यासाठी चिन्ह ठेवले आहे,पक्षाचे नांव आहे,कोणाचे तरी हात बळकट करण्यासाठी मते द्या इतपत सगळया पक्षामध्ये उघडे व्यवहार आहेत. काही ठिकाणी अन्य वेगवेगळी आमिषे दाखविली जातात ही वस्तुस्थिती कोणीही नाकारण्याची आवश्यकता नाही. रोज उठून जाहीरनाम्याची भीती किमान आम्हांला तरी घालू नये. कुणालाही त्यावेळी आग्रही भूमिका घेता येईल. जाहीरनामा दिला आणि 100 टक्के अमलबजावणी केली आणि दिलेल्या शब्दाला जागणारे राजा हरिश्चंद्रासारखे तेथे असतील त्यांनी जरुर आग्रही भूमिका घ्यावी. विरोधासाठी विरोध नाही. युतीचा जाहीरनामा निघाला होता. मी असे म्हणेन की 27 लाख नोक-या कुठे आहेत. 40 लाख झोपडपट्टीधारकांना घरे कुठे आहेत. युतीचा जाहीरनामा मी विसरुन गेलो आहे. पण रोज उठून जाहीरनामाच जर हातामध्ये घेणार असाल तर 1995 साली केलेला तुमचा जाहीरनामा आम्हालाही हातामध्ये घ्यावा लागेल. पण अशामुळे प्रश्न संपत नाही. काही प्रश्नांच्या बाबतीत व्यवहार्य भूमिका घेवून मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. मार्ग जरुर काढले जातील. राज्यपालांचे सगळे अभिभाषण सरकारची दिशा स्पष्ट करणारे आहे. विकासाच्या कामाच्या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

बाबतीत महाराष्ट्र देशामध्ये पहिल्याच क्रमांकावर राहिला पाहिजे. त्याचबरोबर हे राज्य पुढे नेत असताना या राज्यातील मागासवर्गीय असेल,आदिवासी असेल दलित असेल किंवा महिला असतील आणि समाजातील जे मागासलेले घटक असतील त्यांना केंद्रबिंदू मानून उपेक्षित विभागाला न्याय देण्याची भूमिका हे राज्य पुरोगामी राहिले पाहिजे ही दिशा दाखविणारे स्पष्ट असे अभिभाषण आहे. पहिले अभिभाषण असल्यामुळे सगळयांनी मिळून अभिनंदन केले असते तर अधिक चांगले झाले असते.परंतु ब-याच वेळेला मनाला एखादी गोष्ट पटली तरी राजकारणामध्ये तसे दाखविता येत नाही. हे मी माझ्या बाबतीत बोलत नाही. आपल्याबाबतीत बोलतो. आपण जर याअभिभाषणाला पाठिंबा दिला असता तर आपल्यालाही पक्षात जाब विचारला जाऊ शकतो. विरोधकांनी फक्त दोषच शोधले पाहिजेत हा भारताच्या लोकशाहीमध्ये एक दोष निर्माण होत आहे. विरोधकांनी गुण बघत बघत बारकाईने दोष बघितले पाहिजे. आपण घ पासून ग पर्यंतच्या शुध्दलेखनाच्या चुका दाखवीत आहात. तेवढेच जर या अभिभाषणातील चांगले बघितले असते तर सरकारला मार्गदर्शन झाले असते. श्री. मधु चव्हाण साहेब यांनी मुंबईच्या समस्या पोटतिडिकीने मांडल्या. गोष्ट खरी आहे की, आज मुंबईच्या सर्व लोकप्रतिनिधींनी ज्या भावना व्यक्त केल्या त्यानुसार मुंबई किती वाढू द्यावयाची यावर एकत्रितपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. सरकारने काही झोपडयांच्या बाबतीत भूमिका घेतली. इतकी कडक आणि धडक भूमिका घेतली जी बडयांची अनधिकृत बांधकामे होती याबाबतीत सरकारने तेवढीच खंबीर भूमिका घेतलेली आहे. कोर्टातील स्टेचा काही जण आधार घेत आहेत आणि दिवस घालवीत आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. सुंबरे ....

श्री. आर.आर.पाटील ...

परंतु याही बाबतीत सक्षमपणे न्यायालयाकडून न्याय मिळविणारी यंत्रणा, वकील उभे केले जातील आणि न्यायालयाने दिलेले स्टे व्हेकेट केले जातील आणि ज्याप्रमाणे गरीब माणसांना मज्जाव केला जातो तसेच बड्यांना देखील अनियंत्रितपणे बांधकामे करता येणार नाहीत याची प्रचिती आणून दिली जाईल. अध्यक्ष महाराज, 1995 का 2000 असा प्रश्न विचारला जातो. पण 1995 पर्यंतच्या झोपड्या कोणी नियमित केल्या ? आपण केल्या की, त्यापूर्वी 1997 मध्ये झाल्या याची सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी माहिती घ्यावी. विकास झाला पाहिजे आणि या अभिभाषणामध्ये केंद्र सरकारला धन्यवाद देऊन एका गोष्टीवर जर पहिल्यांदा केंद्रीत झाले असेल तर मुंबईच्या बाबतीत खूप चांगला विचार, खूप चांगल्या भावना या देशाच्या पंतप्रधानांनी व्यक्त केलेल्या आहेत. या शहराच्या समस्या सुटल्या पाहिजेत याबद्दल कुणाचेच दुमत नाही. याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील आपली मते मांडलेली आहेत. सार्वजनिक उपक्रमासाठी लागणाऱ्या सगळ्या जागा खालीच केल्या पाहिजेत. प्रसंगी कायद्यात, नियमात मानवतेचा दृष्टीकोनातून आणि मर्यादेमध्ये त्यांचे पुनर्वसन कोठे करता आले तर तेही करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सरकारची भूमिका या बाबतीत अजूनही 1995 पर्यंतच्या झोपड्या कायम करणे अशीच आहे. या पुढचा निर्णय आमच्या समन्वय समितीच्या बैठकीतच घेण्यात येईल. पण ही समन्वय समिती अजून नेमलेली नसल्याने, ती नेमली गेल्यानंतरच तिच्या बैठकीत हे निर्णय घेतले जातील. महाराष्ट्राचे निर्णय हे महाराष्ट्रातच होत आहेत. आपण ज्या पध्दतीने समजता की कोणाच्या तरी आदेशाने निर्णय होतात, तर असे निर्णय लोकशाही आघाडीच्या सरकारमध्ये होत नाहीत. समन्वय समितीमध्येच 1995 पर्यंत की 2000 पर्यंत याबाबतचा निर्णय होईल. पण हे निर्णय होत असताना मुंबईला बकालपणा येता उपयोगी नाही. मुंबईतील नागरी असुविधांमध्ये भर पडता उपयोगी नाही. मात्र मुंबईला सुविधा पुरविताना केंद्र सरकारकडून, जागतिक बँकेकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देवून पिण्याच्या पाण्यापासून रस्त्यांपर्यंत आणि रेल्वेपर्यंतच्या सगळ्या समस्या सोडवित असताना एक माणुसकीचा चेहरासुद्धा विसरला जाणार नाही. या दोन्ही गोष्टींचे भान ठेवून समन्वय समितीमध्ये निर्णय घेतले जातील. अतिशय चांगले अभिभाषण राज्यपाल महोदयांनी दोन्ही सदनाच्या सदस्यांसमोर केलेले आहे. वास्तविक मी गृहमंत्री असल्याने गृह खात्यावर अधिकची चर्चा होईल अशी अपेक्षा माझी होती. पण ज्यांचा पोलीसांशी जास्त संबंध आला होता किंवा येतो असेच लोक गृहखात्या बद्दल

..... 5पी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ....

फार बोलतात. पण मी स्वत:ला सुदैवी समजतो आणि महाराष्ट्राचे भाग्य आहे की, या सदनामध्ये पोलीस खात्याशी संबंध आलेले वा असलेले असे फार कमी लोक आहेत. त्यामुळे गृहखात्यावर चर्चा एक तर राज्यामध्ये खूप चांगल्या पध्दतीने चालले आहे म्हणून टाळली असावी किंवा राज्य सरकार आज जे उपक्रम करीत आहे त्याबद्दल आपण समाधान व्यक्त केलेले असावे. आता ही गोष्ट खरी आहे की, मोठ्या प्रमाणात गावठी दारू पिवून लोक मेले. अनेक ठिकाणी यात्रेमध्ये देखील चेंगराचेंगरी झाली. पण ते केवळ अपघात होते. पण त्यानंतर राज्य सरकारने ज्या कठोरपणे भूमिका घेतल्या त्याचा परिणाम आपण आज पाहिला तर दिसून येईल की, आज अमरावतीचे स्टॅटिस्टिक्स पुढे आले आहे की, नोंदल्या जाणाऱ्या गुन्ह्यांमध्ये 11 टक्क्यांनी घट झाली आहे आणि महिलाबाबतीत होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये देखील 25 टक्क्यांनी घट झाली आहे. खूप चांगले रिझल्टस् गावठी दारू बंद करण्याचे यावयास लागले आहेत. या बाबतीतील सर्व राज्याचे सर्वेक्षण करण्याचा आम्ही लवकरात लवकर प्रयत्न करीत आहोत. पण गावठी दारू मोठ्या प्रमाणात बंद केल्यामुळे राज्याचे दोन वर्षाचे एक्साईजचे उत्पन्न 65 कोटींनी वाढले आहे. काही लोक गावठी दारू पित होते ते गावठी दारू मिळत नाही म्हणून सरकारी अधिकृत दारू पिऊ लागले, त्यामुळे ती दारू अधिक खपू लागली आणि सरकारचे उत्पन्न 65 कोटींनी वाढले. आता काही लोकांनी दारू सोडलेली आहे, तर काही लोक तिकडे वळले आहेत. उत्पन्नाशी संबंध नाही. एक वेळ महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये दारूपासून मिळणारे उत्पन्न शून्य झाले तरी बेहत्तर, उत्पन्नाशी ही बाब मी निगडित मानत नाही. पण मी आज इतकेच सांगेन, मी पूर्णपणे अगदी 100 टक्के दावा केला आणि उद्या कोठे तरी एखाद्या ठिकाणी चालू असलेली दारूभट्टी दिसली तर मी खोटे बोललो असे व्हायला नको. पण विनम्रपणे माझा इतकाच दावा आहे की, आजच्या घडीला गावठी हातभट्टीवर जेवढी नियंत्रणे आहत तेवढी नियंत्रणे महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये यापूर्वी केव्हाही नव्हती. ....

(यानंतर श्री. जागडे ... 5क्यू 1 ...

अशुद्धीत मूल / शीघ्रलेखाची नाही

श्री. आर. आर. पाटील....

आपण आता अवैध वाहतूक बंद केली आहे. याचा परिणाम गेल्या तीन महिन्यात एस.टी. चे उत्पन्न 42 कोटी रुपयांनी वाढले आहे. तसेच अपघाताचे प्रमाण 2 दोन टक्क्यावर आले आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, आज सगळी यंत्रणा जागे होऊन काम करावयाला लागली आहे. आता काम करीत असताना कोठेतरी दोष असतील. कोठेच दोष नाहीत, असे मी म्हणणार नाही. आता कोठेतरी एखादा डॉक्टर रात्री दारु प्यालेला सापडेल. मी एवढा फिरत आहे, परंतु मला दारु प्यालेले लोक कोठेही दिसून येत नाही. आमच्या दादाना काय झाले कोणास ठाऊक. त्यांना सर्वत्र दारु प्यालेले लोकच मिळत आहेत. दादांचा मला एकदा फोन आला होता. दोन कॉन्स्टेबल ड्रेसवर हॉटेलमध्ये बसून दारु पित आहेत. त्यांनी मला फोनवर बक्कल नंबर सांगितले. आम्ही त्यांना दुस-या दिवशी सस्पेंड केले. आता दादा कोठेतरी आदिवासी भागात गेले होते. त्या ठिकाणी त्यांना डॉक्टर दारु प्यालेला दिसला. यामुळे दादांपुढे दारु पिणा-या माणसांनी पुढे येण्याची हिम्मत करु नये. किंवा दादांनी तरी रात्री फिरु नये. ड्युटीवर असतांना कोणी चूक करीत असेल तर त्या सुधारल्या पाहिजेत. प्रशासनाला योग्य मार्गाने नेण्यासाठी प्रयत्न केले जातील. आता पोलीस खात्याचे अनुभव चांगले यावयाला लागले आहेत. परंतु आजही मनुष्यबळ खूपच कमी प्रमाणात आहेत. 1961 मानकांप्रमाणे आज 94 हजार पोलिसांची संख्या वाढविण्याची आवश्यकता आहे. मनुष्यबळ न वाढता कामे मात्र खूपच वाढत आहेत. त्यातच काही काही लोकांना 100 पोलिसांचे संरक्षण द्यावे लागत आहे. तर काही जणांना 10-15 पोलिसांचे संरक्षण द्यावे लागत आहे. गराड्यात फिरणे हे स्टेटस् सिम्बॉल समजले जात आहे. पाच-दहा पोलिसावाले आणि स्टेनगनवाले घेऊन मोठ्याने बोलणे ही आता फॅशन ठरायला लागली. म्हणून जरुर याही बाबतीत विचार करण्याची गरज आहे. माणसे सत्तेवर असू दे, अगर नसू दे. त्यांना आवश्यक असणारे संरक्षणच दिले जाईल. मोठ्यांच्या साठीच पोलीस आहेत, ही भूमिका पूसून टाकून पोलिसांच्या सेवेचा गरीब माणसांना लाभ देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. माननीय राज्यपालांनी एक चांगले अभिभाषण दोन्ही सदनासमोर केले आहे. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जर भाषणात खेद व्यक्त केला असला व विरोध केला असला तरी त्यांच्या सर्व विधायक सूचनांची नोंद आम्ही घेतलेली आहेत. त्या सर्व सूचना स्वीकारल्या जातील आणि कृतीत आणल्या जातील. एवढीच मी या ठिकाणी ग्वाही देतो. सर्व मा. सदस्यांनी या अभिभाषणाला पाठिंबा द्यावा, अशी विनंती करतो. धन्यवाद.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी आता प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

--

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अर्धा तास चर्चेसंबंधी

सभापती : आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या दोन्ही अर्धा तास पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 18.3.2005 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 53 मिनिटांनी, शुक्रवार दिनांक 18.3.2005 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही